**<u>पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८</u>**

**<u>मा.महापालिका सभा</u>**

**<u>कार्यपत्रिका क्रमांक - ६१</u>**

**<u>सभावृत्तांत</u>**

<u>दिनांक - २०.०७.२०१६</u> <u>वेळ - दुपारी २.०० वाजता</u>

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची माहे **जुलै-२०१६** ची मासिक मा.महापालिका सभा बुधवार दि.२०.०७.२०१६ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.थोरात वनिता एकनाथ
१०. मा.सायकर अजय शंकरराव
११. मा.जाधव साधना रामदास
१२. मा.जाधव राहुल गुलाब
१३. मा.आल्हाट मंदा उत्तम
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.पात्रे राम संभाजी
१७. मा.बाबर शारदा प्रकाश
१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१९. मा.उल्हास शेट्टी

२०. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

२१. मा.पवार संगीता शाम

२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२३. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२५. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२७. मा.भारती फरांदे

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.जावेद रमजान शेख

३०. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

३१. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३२. मा.राजू मिसाळ

३३. मा.नंदा विकास ताकवणे

३४. मा.नेटके सुमन राजेंद्र

३५. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३६. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३७. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३८. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३९. मा.लोंढे गणेश नारायण

४०. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४१. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४२. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४३. मा.अपर्णा निलेश डोके

४४. मा.अनंत सुभाष को-हाळे

४५. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४६. मा.जयश्री वसंत गावडे

४७. मा.प्रसाद शेट्टी

४८. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४९. मा.शेख अस्लम शैकत

५०. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५२. मा.वाबळे संजय मल्हारराव

५३. मा.मडिगेरी वर्षा विलास

५४. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५५. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५६. मा.सुपे आशा रविंद्र

५७. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५८. मा.मोहिनीताई विलास लांडे

५९. मा.अजित दामोदर गव्हाणे

६०. मा.गोफणे अनुराधा देविदास

६१. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६२. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६३. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६४. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६५. मा.लोंढे शुभांगी संतोष

६६. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६७. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६८. मा.सावळे सिमा रविंद्र

६९. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७०. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७१. मा.पालांडे सुजाता सुनिल

७२. मा.बहल योगेश मंगलसेन

७३. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७४. मा.कदम सदगुरु महादेव

७५. मा.गिता सुशील मंचरकर

७६. मा.कैलास महादेव कदम

७७. मा.छाया जगन्नाथ साबळे

७८. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

७९. मा.वाघेरे सुनिता राजेश

८०. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८१. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

८२. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८३. मा.काळे विमल रमेश

८४. मा.पाडाळे निता विलास

८५. मा.विनोद जयवंत नढे

८६. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८७. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

८८. मा.विमलताई सुरेश जगताप

८९. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९०. मा.बारणे निलेश हिरामण

९१. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९२. मा.बारणे माया संतोष

९३. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९४. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९५. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९६. मा.कलाटे स्वाती मयुर

९७. मा.नांदगुडे विलास एकनाथ

९८. मा.चौंधे आरती सुरेश

९९. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१००. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०१. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०२. मा.जवळकर वैशाली राहुल

१०३. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०४. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०५. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०६. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०७. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

१०८. मा.जम सोनाली पोपट

१०९. मा.प्रशांत शितोळे

११०. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

१११. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११३. मा.शेंडगे आशा सुखदेव

११४. मा.मोटे किरण बाळासाहेब

११५. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११६. मा.संजय केशवराव काटे

११७. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

११८. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

११९. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.गावडे- सह आयुक्त, मा.उल्हास जगताप - नगरसचिव, मा.तळदेकर-मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.पाटील, मा.दुधकर, मा.पठाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.माने, मा.दंडवते, मा.माछरे, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.सवणे, मा.इंगळे, मा.लडकत, मा.कुलकर्णी, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.कांबळे -कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

१) पिंपरी चिंचवड शहराच्या मंजूर विकास योजनेत पिंपरी कॅम्प मधील बॅरॅक्स क्षेत्र दाटवस्ती म्हणून दर्शविण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास आणि फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करण्याकामीचा मा.स्थायी समितीचा प्रस्ताव सभा कामकाजात दाखल करुन घेणेबाबत मा.स्थायी समिती सभेची मागणी मतास टाकणेत आली असता -

अनुकूल -९९ प्रतिकूल - ०

अशी मते पडली व सदरचा विषय सभा कामकाजात दाखल करुन घेणेत आला असल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. दोन दिवसापुर्वी कोपर्डी गावामध्ये मुलीवर जो बलात्कार झाला आणि बलात्कार झाल्यानंतर त्या मुलीची अमानुष हात्या करण्यात आली त्याचा प्रथमत: मी राष्ट्रवादी पक्षाच्या वतीने निषेध करते. मा.महापौर साहेब, कायदा आणि सुव्यवस्था ही ज्या पध्दतीने आता प्रशासनाकडून चालविली जाते त्याचा प्रथम आम्ही सर्व महीला निषेध करतो. आज एखादया मुलींवर बलात्कार होतो आणि त्या मुलीवर बलात्कार झाल्यानंतर प्रशासन पाच लाख किंवा तीन लाख अशी काहीतरी त्याची किमंत दिली जाते, मला वाटते महीलेची किमंत प्रशासनामध्ये हीच ठरली जाते का हा प्रश्न आहे आणि आज कायदा आणि सुव्यवस्था याचा जो बोजवारा वाजलेला आहे त्याच्यामुळे कुठल्या पध्दतीने आम्ही महीला जाणार आहोत हा मोठा प्रश्न आम्हांला भेडसावतो. तरी आज मला वाटत आपण या गोष्टीचा निषेध करुन आजची सभा दि. ५/८/२०१६ पर्यंत तहकूब करावी.

**मा.अपर्णा डोके** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी आता जो सुजाताताई पालांडे यांनी विषय मांडला, निश्चितच जी घटना झाली ती अत्यंत निषेधार्ह आहे. कोणतीही महीला काय, कोणताही पुरुषही या घटनेचं समर्थन करु शकत नाही. परंतु त्याची कायदयाच्या चौकटीमध्ये जी काही शिक्षा आहे, कठोरात कठोर शिक्षा व्हावी अशी आमच्या सगळयांची मागणी आहे. त्यामुळे मीही या घटनेचा निषेध करते. त्याचबरोबर मा.महापौर साहेब, आम्ही वर्तमानपत्रामध्ये बातमी वाचली होती की पांडूरंगाच्या मुर्ती चोरीला गेल्या त्यामुळ संपुर्ण नगरसेवकांची बदनामी झालेली आहे मा.महापौर साहेब, आपण एकतर हा शब्द मागे घ्यावा किंवा याचा खुलासा करावा की नक्की मुर्ती चोरीला गेलेल्या आहेत का कारण चोर हा शब्द फार मोठा आहे. एकतर तुम्ही सांगा की हा शब्द चुकीचा आहे, हा शब्द तुम्ही घेतलेला नव्हता किंवा जो घेतला त्याच्यातून काहीतरी गैरसमज समोरच्यांचा झालेला आहे, याचा खुलासा व्हावा.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, सभेमध्ये तहकूबी मांडलेली आहे त्याला अनुमोदन दिलेले आहे. श्रध्दांजलीतरी वाहून घ्या अगोदर.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, तहकूबी मांडलेली आहे पहीला तहकूबीचा निर्णय दया त्याला अनुमोदन दिलेल आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, तुम्ही येथे खुलासा दया अन्यत आम्हांला तुमच्या दालनात याव लागेल. आम्ही सुध्दा या घटनेचा निषेध केलेला आहे. नगरसेवकांच्या बाबतीत

चोर हा शब्द याठिकाणी आलेला आहे. या गोष्टीचा फक्त खुलासा व्हावा अशी आमची ईच्छा आहे. मुर्तीचोर जर तुम्हांला माहीती असतीलतर त्यांची नाव आपण घेतली पाहीजेत. आपण अत्यंत प्रामाणिकपणे काम करता त्यामुळे तुम्हांला झालेली घटना सहन झालेली नाही आणि तुम्ही स्वत:च्या भोळेपणामध्ये बोलून गेलात परंतु बोलण्यामुळे नगरसेवक याच्यामुळे बाधित झालेले आहेत. त्यामुळे मा.महापौर साहेब, येथे खुलासा व्हावा आणि या घटनेचा तीव्र शब्दात आम्ही सुध्दा निषेध केलेला आहे. त्या निषेधाच्या पाठीमाग दुसरी गोष्ट लपवू नये. तुम्ही दोन्ही गोष्टीचा या ठिकाणी खुलासा करावा. श्रध्दांजली दयावी पण त्या आदि खुलासा करावा अन्यत: आम्हांला तुमच्या दालनात येवून अंदोलन करावे लागेल.

**मा.महापौर -** सर्व नगरसेवक माझे आहेत, मी एका पक्षाची नाही, शहराची महापौर आहे. सगळे नगरसेवक माझेच आहेत. ज्यावेळी त्या मुर्त्या दयायच्या होत्या वारकरी येतात, त्यांना वाटत काही काही नगरसेवकांकडे ते मागत असतात त्यावेळेसच मी बोदाडेनां सांगीतल होत की मुर्त्या ६५० घेण्याऐवजी ८०० घ्याव्यात. गेल्यावेळेस सतरंज्या वाटल्या, त्या काही वारकरी लोकांना मिळाल्या नव्हत्या. सगळयांनी बसून घ्यावे, खुलासा करायचा आहे. “कर नाही त्याला डर नाही” मला खुलासा करु दया......

(मा.नगरसेवक सभागृहा बाहेर निघुन चालले)

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन ही सभा शुक्रवार दि.५/०८/२०१६ रोजी दुपारी २.०० पर्यंत तहकूब करण्यात येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)
**महापौर**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ६१**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०/०७/२०१६ ची तहकूब सभा)**

दिनांक - ५.०८.२०१६ वेळ - दुपारी २.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे **जुलै-२०१६** ची) दि.२०.०७.२०१६ ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.५.०८.२०१६ रोजी दुपारी २.०० वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.आल्हाट मंदा उत्तम
११. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१२. मा.काळजे नितीन प्रताप
१३. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१४. मा.पाञे राम संभाजी
१५. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१६. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१७. मा.उल्हास शेट्टी
१८. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१९. मा.पवार संगीता शाम

२०. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२१. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२२. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२३. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२४. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२५. मा.भारती फरांदे

२६. मा.आर.एस.कुमार

२७. मा.जावेद रमजान शेख

२८. मा.चारुशीला प्रभाकर कुटे

२९. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३०. मा.राजू मिसाळ

३१. मा.नंदा विकास ताकवणे

३२. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३३. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३४. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३५. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३६. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३७. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

३८. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३९. मा.अपर्णा निलेश डोके

४०. मा.अनंत सुभाष को-हाळे

४१. मा.जयश्री वसंत गावडे

४२. मा.प्रसाद शेट्टी

४३. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४४. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४५. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४६. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४७. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४८. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

४९. मा.सुपे आशा रविंद्र

५०. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५१. मा.मोहिनीताई विलास लांडे

५२. मा.अजित दामोदर गव्हाणे

५३. मा.गोफणे अनुराधा देविदास

५४. मा.महेशदादा किसन लांडगे

५५. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

५६. मा.लोंढे शुभांगी संतोष

५७. मा.सावळे सिमा रविंद्र

५८. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

५९. मा.भोसले राहूल हनुमंतराव

६०. मा.पालांडे सुजाता सुनिल

६१. मा.बहल योगेश मंगलसेन

६२. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

६३. मा.कदम सदगुरु महादेव

६४. मा.गिता सुशील मंचरकर

६५. मा.कैलास महादेव कदम

६६. मा.छाया जगन्नाथ साबळे

६७. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

६८. मा.टाक अरुण मदन

६९. मा.आसवाणी सविता धनराज

७०. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

७१. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

७२. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

७३. मा.पाडाळे निता विलास

७४. मा.विनोद जयवंत नढे

७५. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७६. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

७७. मा.विमलताई सुरेश जगताप

७८. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

७९. मा.बारणे निलेश हिरामण

८०. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

८१. मा.ओव्हाळ शेखर अशोक

८२. मा.यमुनाताई रमणनाना पवार

८३. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

८४. मा.चौंधे आरती सुरेश

८५. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८६. मा.जवळकर वैशाली राहुल

८७. मा.जगताप राजेंद्र गणपत

८८. मा.शितोळे शैलजा बाबुराव

८९. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

९०. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

९१. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

९२. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

९३. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९४. मा.शेंडगे आशा सुखदेव

९५. मा.मोटे किरण बाळासाहेब

९६. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९७. मा.संजय केशवराव काटे

९८. मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

९९. मा.पाटील सुजित वसंत

१००. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

याशिवाय मा.दिनेश वाघमारे आयुक्त, मा.तानाजी शिंदे- अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.तळदेकर- मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.दुधकर, मा.तुपे, मा.पठाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर,

मा.लोणकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.कारेकर-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.निकम, मा.लडकत, मा.बरशेट्टी, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गायकवाड -कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मुंबई-गोवा महामार्गावरील महाडजवळील राजेवाडी येथील पूल दुर्घटनेत मृत्यूमुखी पडलेले प्रवासी फ्रान्समध्ये झालेल्या दहशतवादी हल्ल्यात मृत्यूमुखी पडलेले नागरीक कोपर्डी जि.अहमदनगर येथील अत्याचार घटनेत मृत्यू पावलेली अल्पवयीन मुलगी तसेच महाश्वेतादेवी- ज्येष्ठ लेखिका व सामाजिक कार्यकर्त्या, नंदू पोळ - ज्येष्ठ अभिनेते, श.श्री.पुराणिक- इतिहास संशोधक, कुणाल संजय निगुडकर, अजिंक्य कारखानीस, ओंकार प्रवीण मंचरकर व राजवीरसिंह ठाकूर - मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावर अपघातात मृत्यूमुखी पडलेले श्रीपती गणपती जाधव, गजराबाई भाऊसाहेब भुजबळ, अरुण पिंपळीकर, वीणा सहस्त्रबुद्धे- सुप्रसिद्ध गायिका, डॉ.रा.चिं.ढेरे - ज्येष्ठ लेखक, समीक्षक व संशोधक, वसुंधरा पेंडसे नाईक- ज्येष्ठ पत्रकार, संपादिका, लेखिका, वसंत हळबी - ज्येष्ठ कवी, मुबारक बेगम-ज्येष्ठ गायिका, ताराबाई केरु गायकवाड-महापौर कक्षातील चोपदार रमेश केरु गायकवाड यांच्या मातोश्री. यांचे दुःखद निधन झाल्याने त्यांना श्रध्दांजली अर्पण करणेत यावी अशी सूचना मी मांडतो.

**मा.सुरेखा साळुंके** - मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देतो.

**मा.महापौर** - श्रध्दांजली वाहणेसाठी सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे रहावे.

(सर्वांनी दोन मिनिटे स्तब्ध उभे राहून श्रध्दांजली अर्पण केली)

**मा.अपर्णा डोके -** मा.महापौर साहेब, सभा शुक्रवार दि. ५/८/२०१५ रोजी दुपारी २.२० पर्यंत तहकूब करणेत यावी अशी सूचना मी मांडते.

**मा.सुरेखा साळुंके -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

**मा.महापौर -** सर्वांच्या संमतीप्रमाणे शुक्रवार दिनांक ५/८/२०१५ रोजी दुपारी २.२० पर्यंत सभा तहकूब करण्यात येत आहे.

--------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ६१**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०/०७/२०१६ व दि.५.०८.२०१६ (दु.२.००) ची तहकूब सभा)**

दिनांक - ५.०८.२०१६ वेळ - दुपारी २.२० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे **जुलै-२०१६** ची) दि.५.०८.२०१६ (दु.२.००) ची तहकूब मा.महापालिका सभा शुक्रवार दि.५.०८.२०१६ रोजी दुपारी २.२० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.सौ.स्वाती प्रमोद साने
८. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
९. मा.जाधव साधना रामदास
१०. मा.आल्हाट मंदा उत्तम
११. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१२. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१३. मा.पात्रे राम संभाजी
१४. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव
१५. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम
१६. मा.उल्हास शेट्टी
१७. मा.ठोंबरे सुभद्रा ईश्वर

१८. मा.पवार संगीता शाम

१९. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२०. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२१. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२२. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२३. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२४. मा.भारती फरांदे

२५. मा.आर.एस.कुमार

२६. मा.जावेद रमजान शेख

२७. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

२८. मा.नंदा विकास ताकवणे

२९. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३०. मा.मोरेश्वर महादू भोंडवे

३१. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३२. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३३. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

३४. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

३५. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

३६. मा.अपर्णा निलेश डोके

३७. मा.अनंत सुभाष को-हाळे

३८. मा.जयश्री वसंत गावडे

३९. मा.प्रसाद शेट्टी

४०. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४१. मा.काळभोर वैशाली जालिंदर

४२. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

४३. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

४४. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

४५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

४६. मा.सुपे आशा रविंद्र

४७. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

४८. मा.मोहिनीताई विलास लांडे

४९. मा.अजित दामोदर गव्हाणे

५०. मा.गोफणे अनुराधा देविदास

५१. मा.महेशदादा किसन लांडगे

५२. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

५३. मा.लोंढे शुभांगी संतोष

५४. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

५५. मा.भोसले राहूल हनुमंतराव

५६. मा.पालांडे सुजाता सुनिल

५७. मा.बहल योगेश मंगलसेन

५८. मा.कदम सदगुरु महादेव

५९. मा.गिता सुशील मंचरकर

६०. मा.कैलास महादेव कदम

६१. मा.छाया जगन्नाथ साबळे

६२. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

६३. मा.टाक अरुण मदन

६४. मा.आसवाणी सविता धनराज

६५. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

६६. मा.उषा संजोग वाघेरे (पाटील)

६७. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

६८. मा.पाडाळे निता विलास

६९. मा.विनोद जयवंत नढे

७०. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

७१. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

७२. मा.विमलताई सुरेश जगताप

७३. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

७४. मा.बारणे निलेश हिरामण

७५. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

७६.	मा.ओव्हाळ शेखर अशोक

७७.	मा.यमुनाताई रमणनाना पवार

७८.	मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

७९.	मा.चौंधे आरती सुरेश

८०.	मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

८१.	मा.जवळकर वैशाली राहुल

८२.	मा.जगताप राजेंद्र गणपत

८३.	मा.शितोळे शैलजा बाबुराव

८४.	मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

८५.	मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

८६.	मा.काटे रोहितअप्पा सुदाम

८७.	मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

८८.	मा.शेंडगे आशा सुखदेव

८९.	मा.मोटे किरण बाळासाहेब

९०.	मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९१.	मा.संजय केशवराव काटे

९२.	मा.गावडे हनुमंत बाळासाहेब

९३.	मा.बो-हाडे अरुण तुकाराम

याशिवाय मा.दिनेश वाघमारे आयुक्त, मा.तानाजी शिंदे- अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.तळदेकर- मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.दुधकर, मा.तुपे, मा.पठाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा.लोणकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.साळुंके-मुख्य उदयान अधिक्षक, मा.कारेकर-प्रशासन अधिकारी (शिक्षणमंडळ), मा.निकम, मा.लडकत, मा.बरशेट्टी, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गायकवाड -कार्यकारी अभियंता हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेल्या काही दिवसात आपण पाहतो आहोत की महाराष्ट्र वेगवेगळया गोष्टीने होरपळून निघतो. पुर परिस्थिती असेल, चालु असलेले विधीमंडळाच अधिवेशन असेल, अधिवेशनात सुध्दा अनेक विषय चिघळले गेलेत आणि या महाराष्ट्राचे जे तुकडे करण्याचे सत्ताधारी पक्षाचे धोरण लोकसभेमध्ये ठेवण्यात आलं. महाराष्ट्राचे तुकडे करण्यासंबंधीची भूमिका भाजपाच्या खासदारानी लोकसभेमध्ये मांडली आणि त्याचे पडसाद विधानसभेमध्ये सुध्दा उमटले गेले. खरंतर महाराष्ट्राचे तुकडे होणं ही आपल्या सार्वभौम असणा-या महाराष्ट्राला अतीशय लाजीरवाणी गोष्ट आहे. मी या विधानसभेमध्ये झालेल्या चर्चेचा निषेध करतो. विधानसभेत अनेक विषय या महाराष्ट्राला काळीमा फासणारे आहेत. त्यापैकी हा एक आहे. अनेक लोकांचा विरोध असताना देखील अशाप्रकारचे विषय पटलावर येणं किंवा चर्चा होणे हे चुकीच आहे असं मला वाटत. आज या गोष्टीचे पडसाद संबंध महाराष्ट्रात आहेत. परवा निसर्गाने केलेला कोप आणि त्या पुरपरिस्थितीमध्ये झालेली विदारक घटना या गोष्टी सुध्दा या विधानसभेमध्ये चर्चेला आल्या. या गोष्टी होत असताना पुर्वी झालेल्या काही पुलांची स्ट्रक्चर ऑडीट बाबतीतची शंका व्यक्त करण्यात आली, शंकेबाबत संबंधीत मंत्र्यावर गुन्हे दाखल करा अशी मागणी आमचे नेते आदरणीय मा.अजीतदादानी सभागृहात केली त्याच्यानंतर या पुलांची सार्वजनीक उपयुक्तता आणि उपयोगीता येथून पुढच्या काळात होऊ नये असे सर्वसाधारण मत आहे. त्या मताशी कोणीही दुमत असायच काहीही कारण नाही. जर एखादी गोष्ट, जर एखादी वस्तू जर ती फार पुरातन झालेली असेलतर, आऊटडेट झाली असेलतर ती मजबुत केली पाहीजे किंवा ती काढून दुरुस्त केली पाहीजे, नवीन केली पाहीजे ही मागणी काही चुकीची नाही. अशाप्रकारच्या वेगवेगळया मागण्या वरच्या सभागृहात होत असताना आपल्याकडे अशा ब-याचशा घटना घडल्या की त्या महाराष्ट्राला काळीमा फासणा-या होत्या. मग ते कोपर्डीतील असेल त्याच्यानंतर अशाप्रकारच्या महीलांवरती अत्याचाराच्या घटना दोन-तीन वेळा होवून गेलेल्या आहेत ही सुध्दा एक लाजीरवाणी गोष्ट आहे आणि याच्या बाबतीत वक्तव्य मा.महापौर आपण स्वत: देखील केलेलं आहे. मध्यंतरीच्या काळात मुंबईमध्ये डॉ.बाबासाहेब आंबेडकर स्मारकाच्या वास्तूच्या बाबतीत घडलेली घटना ही सुध्दा आपल्या संपुर्ण महाराष्ट्राला दुर्दैवी अशाप्रकारची म्हणावी लागेल यात शंका नाही. आपले सभागृह सुध्दा या सर्व गोष्टीशी कुठंकुठतरी संबंधीत आहे याची जाणीव आपल्या सर्वानाच आहे. या गोष्टीची चर्चा जरी आपल्या पटलावर येत नसल्या, महानगरपालिकेच्या संबंधीत विषय आपल्या पटलावर असलेतरी सुध्दा आपण या महाराष्ट्राचे एक घटक आहोत, या महाराष्ट्राचे जबाबदार नागरीक आहोत हे आपण विसरता कामा नये. त्यामुळे या आखंड महाराष्ट्राला पाठिंबा देण्यासाठी आपण आपली ही सभा दि.२०.८.२०१६ पर्यंत तहकूब करावी आणि संबंधीत ज्या लोकांनी या विषयाबाबतचा विषय

मान्यतेसाठी ठेवलेला आहे त्याबाबतचा मी निषेध करतो आणि ही सभा दि. २०.८.२०१६ पर्यंत तहकूब करावी अशी मी सूचना मांडतो.

**मा.नारायण बहीरवाडे -** मा.महापौर साहेब, तहकूबी सुचनेस अनुमोदन देतो.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह मी याठिकाणी अवर्जून सांगतो या घटनेला डोळयासमोर ठेवून महाराष्ट्राची जी दुर्घटनेची मालीका सुरु झालेली आहे ती अत्यंत विदारक स्वरुपात संपुर्ण महाराष्ट्रा समोर येत आहे. परंतु हे सर्व घडत असताना दुर्दैव एकच आहे की प्रशासन कोणतेही असू दया मग राज्यशासन असु दया की महानगरपालिका असु दया कोणतीही घटना घडल्यानंतर खडबडून जागे होते आणि आपल्या कुठे चुका झाल्या का याचे प्रायश्चित करण्याचा प्रयत्न करतात आणि म्हणून आखंड महाराष्ट्राच्या संदर्भात प्रशांत शितोळे यांनी भूमिका मांडलेली आहे, प्रत्येकाचे मत असतात. परंतु आम्हीतर अस म्हणेल की सभागृहामध्ये आपलं मत शासनाला, केंद्रशासनाला आखंड महाराष्ट्र हा आखंड महाराष्ट्रच रहावा अशा पध्दतीचा ठराव करुन आपण आपली भूमिका स्पष्ट ठेवूयात. मा.आयुक्त साहेब, नैसर्गीक आपत्ती ही काही ठरवून येत नाही परंतू अशा पध्दतीचे छोटेछोटे, मोठेमोठे ब्रीज आपल्या शहरात आहेत का किंबहूना आपल्या शहराला जोडणारे असे मोठे ब्रीज आपल्या शहरात आहेत का, त्याचे आयुष्यमान किती आहे आणि आपल्या ठेकेदाराने केलेले सर्व ब्रीज सुध्दा चेक करावे आणि त्यांचे आयुष्यमान किती आहे हे बघावे. ब्रीटीश कालीन ब्रीजचे आयुष्यमान किती आहे ११०, १२० वर्षाच आहे हे ते जर याचा पत्रव्यवहार ब्रीटनहून येथे करु शकतात तर आपल्या झालेल्या ब्रीजचे वयोमर्यादा काय असेल हे बघावे. याठिकाणी अनधिकृत बांधकामाच्या संदर्भात न बोललेल बरं, न्यायालयीन बाब आहे. एकाही नगरसेवकाला आपआपल्या परिसरामध्ये चाललेल्या अनधिकृत बांधकामाबद्दल कोणीही विचारल नाही कारण त्यांच जे भरारी पथक आहे ते तर फेरारीमध्ये येतात आणि लगेच निघुन जातात. आणि ते काय करतात कसे करतात सगळ व्यवस्थित बांधकाम चालू आहेत. परंतु मी गांभीर्यान तुम्हांला सांगतो की नाल्यामध्ये सुध्दा बांधकाम चालू आहे किंवा नाही याचे सुध्दा पुर्ण ऑडीट होणे गरजेचे आहे. नदीपात्रा शेजारी बांधकाम चालू आहेत का नाही हे पाहून याची सुध्दा ताबडतोब कारवाई चालू करा. खड्डे किती पडले आणि जर एक महीन्यापुर्वी तो रस्ता झालेला असेलतर आणि त्या रस्त्याला खड्डे पडले असतीलतर त्या ठेकेदारावर ताबडतोब कारवाई करावी त्याच्यावर कोणतीही मेहरबानी करु नका. कारण याच प्रायश्चित आम्हांला भोगाव लागत. ज्यांच्या घरची व्यक्ति जाते त्यावेळेला त्या घरातील लोकांना दु:ख होत असते. महानगरपालिकेच्या अधिका-यांना जाग करण्याच्या या संदर्भात आपत्ती येते, नैसर्गीक होतं अशा पध्दतीच्या अविर्भावात जात असतीलतर ते चुकीच आहे. आयुक्त साहेब आपण तातडीने या सुचनेची अंमलबजावणी करावी अशी याठिकाणी मी मागणी करतो.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, तहकूबीवर निर्णय दयावा.

**मा.महापौर-** बाकीच्यानाही बोलू दयात.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. तुम्ही मांडलेल्या खोटया ठरावाला आणि खोटया निषेधाला याठिकाणी कडाडून विरोध करते. तो ठराव विधानसभेत झालाच नाही.

(सन्मा.सदस्य सभागृहाबाहेर चालले)

**मा.महापौर-** सभासदांनी खाली बसावे. योगेश बहल तुम्ही पण महापौर होतात.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** सर्वांनी खाली बसून घ्यावे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, तहकूबीवर निर्णय दयावा.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. वेगळया विदर्भा बाबतचा अधिकार केंद्रशासनाचा आहे परंतु याठिकाणी सन्मा.सदस्य खोटा ठराव आणून त्याचा येथे निषेध करायचा ही नागरीकांची दिशाभूल करतात. विधानसभेमध्ये असा कुठलाही ठराव झालेला नाही. मा.मुख्यमंत्री साहेबांनी सांगीतलेले आहे मी संबंध महाराष्ट्राचा मुख्यमंत्री आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर -** खाली बसा ही सभा होणार आहे. या शहराचे प्रश्न आहेत ही सभा चालू राहणार आहे. तहकूबी मांडली तरी तो अधिकार माझा आहे. सगळयांनी खाली बसावे ही सभा होणार आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी राष्ट्रवादीच्या सदस्यांना इश्यू कुठलाही नाही, त्यांना काहीतरी निमीत्त काढून सभा तहकूब करण्याचे नाटक चालले आहे त्या नाटकाला आज महापौरांनी चपराक दिलेली आहे. राष्ट्रवादीचे नगरसेवक प्रशांत शितोळे यांनी कारण नसताना तहकूबी मांडलेली आहे. त्यांच्या तहकूबीचा मी निषेध करते. काँग्रेसचे नगरसेवक भाऊसाहेब भोईर यांनी सुध्दा या तहकूबीला पाठींबा दिलेला आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर -** सन्मा.सदस्यांच्या भावना लक्षात घेता ही सभा शनिवार दिनांक २०.८.२०१६ रोजी दुपारी १.०० पर्यंत तहकूब करणेत येत आहे.

--------

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपलिका

पिंपरी - ४११०१८

**पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८**

**मा.महापालिका सभा**

**कार्यपत्रिका क्रमांक - ६१**

**सभावृत्तांत**

**(दिनांक २०/०७/२०१६ व दि.५.०८.२०१६ (दु.२.०० व २.२०) ची तहकूब सभा)**

दिनांक - २०.०८.२०१६ वेळ - दुपारी १.०० वाजता

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची (माहे **जुलै-२०१६** ची) दि.५.०८.२०१६ (दु.२.२०) ची तहकूब मा.महापालिका सभा शनिवार दि.२०.०८.२०१६ रोजी दुपारी १.०० वा.महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

१. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब - महापौर
२. मा.वाघेरे प्रभाकर नामदेव - उपमहापौर
३. मा.पौर्णिमा रविंद्र (आप्पा) सोनवणे
४. मा.भालेकर शांताराम कोंडिबा ऊर्फ एस.के. बापू
५. मा.म्हेत्रे सुरेश रंगनाथ
६. मा.भालेकर अरुणा दिलीप
७. मा.साने दत्तात्रय बाबुराव (काका)
८. मा.थोरात वनिता एकनाथ
९. मा.सायकर अजय शंकरराव
१०. मा.जाधव साधना रामदास
११. मा.जाधव राहुल गुलाब
१२. मा.आल्हाट मंदा उत्तम
१३. मा.आल्हाट धनंजय मुरलीधर
१४. मा.काळजे नितीन प्रताप
१५. मा.विनया प्रदिप (आबा) तापकीर
१६. मा.पात्रे राम संभाजी

१७. मा.बाबर शारदा प्रकाश

१८. मा.बहिरवाडे नारायण सदाशिव

१९. मा.सौ.मंगलाताई अशोक कदम

२०. मा.उल्हास शेट्टी

२१. मा.पवार संगीता शाम

२२. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

२३. मा.तानाजी विठ्ठल खाडे

२४. मा.बो-हाडे शुभांगी संजय

२५. मा.मंगेश श्रीकृष्ण खांडेकर

२६. मा.(चिखले) मराठे अश्विनी अजित

२७. मा.भारती फरांदे

२८. मा.आर.एस.कुमार

२९. मा.जावेद रमजान शेख

३०. मा.भालेराव प्रतिभा ज्ञानेश्वर

३१. मा.पांढरकर निलेश शंकरराव

३२. मा.राजू मिसाळ

३३. मा.नंदा विकास ताकवणे

३४. मा.नेटके सुमन राजेंद्र

३५. मा.तरस बाळासाहेब जयवंत

३६. मा.भोंडवे संगिता राजेंद्र

३७. मा.भोईर भाऊसाहेब सोपानराव

३८. मा.सूर्यवंशी आशा ज्ञानेश्वर

३९. मा.शमीम पठाण (पठाणबाई)

४०. मा. ॲड.संदीप गुलाब चिंचवडे

४१. मा.अश्विनी गजानन चिंचवडे-पाटील

४२. मा.अपर्णा निलेश डोके

४३. मा.अनंत सुभाष को-हाळे

४४. मा.शितल उर्फ विजय गोरख शिंदे

४५. मा.जयश्री वसंत गावडे

४६. मा.पवार मनीषा काळूराम

४७. मा.प्रसाद शेट्टी

४८. मा.श्रीमती टेकवडे सुजाता अविनाश

४९. मा.काळभोर वैशाली जालिंदर

५०. मा.सौ.साळुंके सविता सुरेश

५१. मा.सौ.ठाकरे मंदाकिनी अर्जुन

५२. मा.मासुळकर समीर मोरेश्वर

५३. मा.वाबळे संजय मल्हारराव

५४. मा.मडिगेरी वर्षा विलास

५५. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

५६. मा.सौ.गवळी सुनिता (माई) पांडुरंग

५७. मा.सुपे आशा रविंद्र

५८. मा.चंद्रकांत (भाऊ) साहेबराव वाळके

५९. मा.मोहिनीताई विलास लांडे

६०. मा.अजित दामोदर गव्हाणे

६१. मा.गोफणे अनुराधा देविदास

६२. मा.जालिंदर (बाप्पु) शिंदे

६३. मा.गव्हाणे सुरेखा शंकर

६४. मा.श्रध्दा बाजीराव लांडे

६५. मा. ॲड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे

६६. मा.लोंढे शुभांगी संतोष

६७. मा.विश्वनाथ विठोबा लांडे

६८. मा.ननवरे जितेंद्र बाबा

६९. मा.सावळे सिमा रविंद्र

७०. मा.सौ.बनसोडे शकुंतला काशिनाथ

७१. मा.भोसले राहूल हनुमंतराव

७२. मा.पालांडे सुजाता सुनिल

७३. मा.बहल योगेश मंगलसेन

७४. मा.सौ.पानसरे अमिना महंम्मद

७५. मा.कदम सदगुरु महादेव

७६. मा.गिता सुशील मंचरकर

७७. मा.कैलास महादेव कदम

७८. मा.छाया जगन्नाथ साबळे

७९. मा.पहलानी गुरुबक्ष किशनदास

८०. मा.टाक अरुण मदन

८१. मा.आसवाणी सविता धनराज

८२. मा.वाघेरे सुनिता राजेश

८३. मा.आसवानी हिरानंद उर्फ डब्बू किमतराम

८४. मा.ताम्हणकर प्रमोद रघुनाथ

८५. मा.काळे विमल रमेश

८६. मा.पाडाळे निता विलास

८७. मा.विनोद जयवंत नढे

८८. मा.तापकीर अनिता मच्छिंद्र

८९. मा.कैलासभाऊ गबाजी थोपटे

९०. मा.विमलताई सुरेश जगताप

९१. मा.अप्पा उर्फ संपत ज्ञानोबा पवार

९२. मा.बारणे निलेश हिरामण

९३. मा.बारणे झामाबाई बाळासाहेब

९४. मा.बारणे माया संतोष

९५. मा.ओव्हाळ शेखर अशोक

९६. मा.यमुनाताई रमणनाना पवार

९७. मा.विनय उर्फ विनायक रमेश गायकवाड

९८. मा.कलाटे स्वाती मयुर

९९. मा.नांदगुडे विलास एकनाथ

१००. मा.चौंधे आरती सुरेश

१०१. मा.बापू उर्फ शत्रुघ्न सिताराम काटे

१०२. मा.शितल विठ्ठल ऊर्फ नाना काटे

१०३. मा.बोकड रामदास गेणभाऊ

१०४. मा.जवळकर वैशाली राहुल

१०५. मा.जगताप राजेंद्र गणपत

१०६. मा.शितोळे शैलजा बाबुराव

१०७. मा.जगताप नवनाथ दत्तु

१०८. मा.सौ.तनपुरे सुषमा राजेंद्र

१०९. मा.अतुल अरविंद ऊर्फ नानासाहेब शितोळे

११०. मा.जम सोनाली पोपट

१११. मा.प्रशांत शितोळे

११२. मा.ओव्हाळ रमा नितीन उर्फ सन्नी

११३. मा.काटे रोहितअप्पा सुदाम

११४. मा.गायकवाड संध्या सुरदास

११५. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

११६. मा.शेंडगे आशा सुखदेव

११७. मा.मोटे किरण बाळासाहेब

११८. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

११९. मा.संजय केशवराव काटे

१२०. मा.धुमाळ बाबासाहेब निवृत्ती

१२१. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

१२२. मा.लोखंडे गोरक्ष जाकाराम

याशिवाय मा.दिनेश वाघमारे आयुक्त, मा.तानाजी शिंदे-अतिरिक्त आयुक्त, मा.उल्हास जगताप- नगरसचिव, मा.तळदेकर- मुख्यलेखापरिक्षक, मा.चव्हाण-प्र.शहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैदयकीय अधिकारी, मा.ठाकुर-उपसंचालक नगररचना, मा.लांडे-मुख्यलेखापाल, मा.गावडे-सह आयुक्त, मा.पाटील, मा.तुपे, मा.दुधकर, मा.पठाण - सह शहर अभियंता, मा.सुरगुडे-विकास अभियंता, मा.डोईफोडे, मा.माने, मा.खोसे, मा.दंडवते, मा.कडूसकर, मा.दुरगुडे, मा.इंदलकर, मा.आष्टीकर, मा.लोणकर-सहा.आयुक्त, मा.पवार-कायदा सल्लागार, मा.कांबळे- शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.निकम, मा.सवणे, मा.इंगळे, मा.तांबे, मा.चव्हाण, मा.लडकत, मा.पिरजादे, मा.बरशेट्टी, मा.घोडे, मा.कांबळे, मा.ओंभासे, मा.गद्रूवार, मा.शेख, मा.पुजारी, मा.गायकवाड-कार्यकारी अभियंता, मा.बोदडे-प्रशासन अधिकारी, मा.मोरे-सह.व्यवस्थापकीय संचालक पीएमपीएमएल, मा.ऐवले-समाज विकास अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**मा.महापौर -** उपस्थित मा.नगरसेवक व मा.नगरसेविका, मा.आयुक्त, अधिकारी वर्ग, पत्रकार, नागरिक या सर्वांचे स्वागत करुन सभा कामकाजाला सुरुवात करणेत येत आहे.

(मा.कैलास महादेव कदम यांना युएसए इन्टरनॅशनल विदयापिठाने डॉक्टरेट ही पदवी प्रदान केल्यामुळे त्यांचा सन्मान मा.महापौर, मा.उपमहापौर, मा.सभापती-स्थायी समिती, मा.पक्षनेते, मा.विरोधी पक्षनेते, सर्व पक्षाचे गटप्रमुख व सर्व पदाधिकारी यांच्या हस्ते करणेत आला)

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ऑलिंम्पिक स्पर्धा चालू आहेत त्याठिकाणी भारताकडून पी.व्ही.सिंधू हिने बॅडमिंटनमध्ये रौप्य पदक मिळविलेले आहे, त्याचप्रमाणे साक्षी मलिक हिने कुस्तीमध्ये कांस्यपदक पदक मिळविलेले आहे मी त्यांचे सभागृहाच्या वतीने अभिनंदन करण्याचा ठराव मांडतो. काल ज्यावेळेला बॅडमिंटनची फायनल मॅच चालू होती त्यावेळेला देशभरातून सर्वांचे लक्ष त्याठिकाणी लागलेले होते. मग बॅडमिंटन खेळणारे खेळाडू असु दयात किंवा दुसरा स्पोर्टस खेळणारे कबड्डी असू दयात, क्रिकेट असु दयात सगळयांची नजर त्या मॅचवर होती. लोक रस्त्यावरुन जातानाही टिव्ही शोरुममध्ये मॅच बघत होते. ज्यांना बॅडमिंटनच नॉलेज नाही ते सुध्दा लोक त्याठिकाणी बॅडमिंटनची मॅच बघत होते. हॉटेलमधील वेटर पासून गल्ली-बोळातील लोकामध्ये एक वेगळा मॅसेज गेला की भारताच्या या मुलीने सिलव्हर पदक मिळवलेले आहे. खरोखरच त्याठिकाणी टफ मॅच झाली, त्याठिकाणी फायनलचे गोल्ड मेडल मिळण्यासारखी परिस्थिती झाली होती. परंतु खेळामध्ये कोणीतरी जिंकणार, कोणीतरी हारणार. तसेच दोन दिवसापुर्वी आपल्याच भारताची, हरियाणाची साक्षी मलिक यानाही ब्रांझ मेडल मिळाल आहे. सर्वांचीच नजर त्या ऑलिंम्पिक स्पर्धेवर आहे. प्रत्येक नागरीक टिव्ही बघत होते आणि प्रत्येकाला आशा होती की आपल्याला किती मेडल मिळेल. महाराष्ट्राची ललीता बाबर फायनलमध्ये स्टिपलचेसमध्ये ती दहाव्या नंबरला आलेली आहे. खरोखरच सांगायला अभिमान वाटतो की एका खेडयामधुन येणारी हे मुलगी, शेतकरी कुटूंबातील ही मुलगी, त्यांना कुठल्याही प्रकारच्या सुखसुविधा नाही. ललीता बाबर ही मॅरेथॉनची खेळाडू आहे, दोन-तीन-चार वर्षात तीनं डायव्हर्ट केल आणि स्टिपलचेस ऍथेलेटीक्समध्ये तीने कोचींग घेतलं आणि ती फायनल पर्यंत पोहचलेली आहे. पदक मिळणे ही वेगळी गोष्ट आहे. परंतु टॉप लेव्हलला जावुन या जगामध्ये दहावा नंबर आलेला आहे त्यामुळे आपल्याला अभिमान वाटावा अशी कामगीरी त्यांच्याकडून झालेली आहे. त्याचप्रमाणे जिमनॅस्टिक हे देशामध्ये खुप कमी लोक खेळणारे आहेत. ब-याचशा लोकांना त्याच नॉलेजही नसेल, त्याचे रुल्स रेग्युलेशनही नसतील. अशा ठिकाणी दिपा कर्माकर हिने एकदम नॉमीनल जस्ट पॉईंटमध्ये तीच पदक हुकलेल आहे. म्हणजे बघायला गेलतर फक्त पदक मिळालेल नाही पण तीला डेफीनेटली मेडल मिळालेल आहे अशी चांगली कामगीरी आपल्या देशामधुन घडलेली आहे. सांगायच तात्पर्य एवढच आहे की आपण याठिकाणी ठराव करणार, सत्कार करणार, अभिनंदन

करणार आहेत. आज देशभरामध्ये कोणी आडीच कोटी देत, कोणी चार कोटी देत, कोणी ५० लाख बक्षीस त्यांना देतं. सांगायची पार्श्वभूमी अशी आहे की आपल्या देशामध्ये स्पोर्टसला जास्त प्राधान्य नाही, स्पोर्टसला जास्त सवलती नाहीत. हे ज्यांनी मेडल मिळवलेले आहे, जो कोणी त्याठिकाणी गेलेले आहेत ते स्वकतृत्वाने त्याठिकाणी गेलेले आहेत. पी.व्ही.सिंधू हिला मेडल मिळालेले आहे ती पी.गोपीचंदच्या अकॅडमीमध्ये तीच्या स्वत:च्या जीवावर आणि पी.गोपीचंदच्या जीवावर ती आज तिथपर्यंत पोहचलेली आहे. २१ व्या वर्षाच्या एवढया कमी वयामध्ये देशामध्ये मेडल मिळालेली ती एकमेव मुलगी आहे. अशा मुलींला आपल्या महानगरपालिके तर्फे भव्यदिव्य असा सत्कार केला पाहीजे. मागच्या टर्ममध्ये आपण पाच-पाच लाख रुपये वर्धापनदिना निमीत्त तीघाना देवून त्यांचा यथोचित सन्मान केलेला आहे. बिंद्रा, सुशिलकुमार यांना पाच-पाच लाख रुपये देवून सन्मानीत केलेल आहे. मला विनंती करावयाची आहे की व्हॉटसऍपवर मॅसेज फिरत होता की आई-वडील म्हणतात की पहीला अभ्यास कर आणि उरलेल्या वेळेमध्ये त्याठिकाणी जाऊन खेळ, अशा सर्व परिस्थितीमध्ये त्या मुलांनी मेडल मिळवलेले आहेत. कोणीतरी ऑलिंम्पिकला जातात आणि सेल्फी काढून येतात हा एकदम चुकीचा संदेश आहे. म्हणजे ज्या लोकांना याच्यामध्ये नॉलेज नाही, ज्या लोकांना याच्या मधली माहिती नाही असे लोक असे स्टेटमेंट करु शकतात. या लोकांचे कस्ट किती आहेत हे त्या खेळाडूनांच माहीती आहे. याठिकाणी सभागृहात बॅडमिंटन खेळणारे भरपूर लोक आहेत. याठिकाणी योगेश बहल आहेत ते न चुकता रोज खेळणारे आहेत. आज आपण बघतो कितीतरी फिटनेस साठी बॅडमिंटन खेळतात पण आपण याठिकाणी या मुलांना, शाळेच्या मुलांना प्रोत्साहन देण्यासाठी काय केले गेले पाहीजे. आज आपल्याकडे जे काही बॅडमिंटन कोर्टस आहेत, टेनिस कोर्टस आहेत, जिम्स आहेत यामध्ये काही लोक फक्त फिटनेससाठी खेळतात, डॉक्टर, योगेशभाई सारखे अजून खुप लोक याठिकाणी फिटनेससाठी खेळतात. पण आपण दुरदृष्टि चायना, जपान सारखी करतो का की कमी वयामध्ये शाळेमध्ये त्यांना कोचींग देवून असे करतो का. आपल्याकडे गोपाल देवांग सारखा पण आहे. आज त्याची परिस्थिती काय आहे किती लोक त्याला विचारतात. मग अशा परिस्थितीमध्ये खेळाडूकडून अपेक्षा ठेवायला कितपत आपण योग्य आहोत. मग आई-वडील म्हणतात ते काय चुकीचे आहे. स्पोर्टस डिपार्टमेंटमध्ये जितेंद्र ननावरे, समीर मासुळकर असतील त्यांनी त्या पध्दतीने प्रयत्न केले पण स्पोर्टसमध्ये, महापालिकेमध्ये किंवा तुमच्या डिपार्टमेंटमध्ये किती त्याठिकाणी इन्करेजमेंट मिळते, अजिबात नाही, शुन्य आहे. महापालिकेमध्ये, शिक्षणमंडळामध्ये आपण काम करत असताना त्या मुलाना खेळण्याचे काय साहीत्य आपण देतो, काहीही देत नाहीत. महापालिकेच्या सर्व शाळामधुन चेक करा, याठिकाणी सर्व साक्षीदार आहेत की स्पोर्टसमध्ये महापालिकेच्या माध्यमातून त्या गोरगरीब मुलांच काय डेव्हलपमेंट करतो, शुन्य. एसकेएफ सारख्या कंपनीने त्याठिकाणी फुटबॉलला कोचींग करुन स्पेनमध्ये, इटलीमध्ये पाठवितात. या

विषयावर याठिकाणी चर्चा झाली पाहीजे. आज देशामध्ये एवढा मोठा इश्यू झालेला आहे. की आज १२५ कोटी जनतेमध्ये आपण २ मेडल आणलेले आहेत. १०० लोक त्याठिकाणी गेलेले आहेत. काही ठिकाणी जवळपास पोहचलेले आहेत, ललिता बाबर सारख्या मुली पोहचलेल्या आहेत. बाकी आपण का कमी पडलो याच्यावर विचार केला पाहीजे. यांना चांगल प्रोत्साहन दिल पाहीजे फक्त पैसे देवून उपयोग नाही. सिंधूला पैसे भरपूर आहेत. आपण काय करतो त्याला महत्व आहे. कोणीतरी दोन कोटी देणार, कोणीतरी आडीच कोटी देणार, कोणीतरी पन्नास लाख देणार ती स्वत:च एवढी चांगली खेळाडू आहे की त्यांना पैशाचा प्रॉब्लेम नाही. आज त्या मुलीला, त्यांच्या आई-वडीलांना, त्यांच्या स्टेटला, त्यांच्या स्पोर्टस अकॅडमीला मोठा आनंद झालेला आहे की त्यांच आयुष्य सार्थक झालेल आहे. आपण पाहीलं आहे काय कष्ट असतील त्या ऑलिम्पिक मध्ये. आणि काही म्हणतात की तिथं जाऊन सेल्फी घेतात त्यांना माहीती नाही की त्यासाठी किती कष्ट आहे. पी.व्ही.सिंधूचे कष्ट असं आहे की साडेचार ते संध्याकाळी साडेसात वाजेपर्यंत ती स्पोर्टसमध्ये असते. सकाळी साडेसातला उठते दुपारी जेवणाचा ब्रेक परत थोडा रेस्ट परत स्पोर्ट अशा पध्दतीने ती गेली चार पाच वर्षे करते अशा लोकांना आपण प्रोत्साहन दयायला पाहीजे. असे पिंपरी चिंचवड शहरामध्ये किती खेळाडू आहेत. आज आपल्या कबड्डीमध्ये किती खेळाडू आहेत. आमदार महेश लांडगे वारंवार त्या विषयावर जनरल बॉडीमध्ये बोलत होते. ते नेहमीच अग्रही होते. आज आपल दुर्दैव आहे की एक कुस्तिपटूला बॅन करण्यात आलं. त्या मागचे राजकारण काय आहे, किती घाणेरडया पध्दतीने त्याठिकाणी आपण विचार करतो. आज खेळामध्ये सगळे देश एक झाले आहेत. स्पोर्टस असा खेळ आहे की त्याठिकाणी सर्व जाती धर्माचे लोकांना एकत्र करण्याच काम करतो. सिंधू आणि साक्षीसाठी सर्व देश एकत्र झालेला आहे. या मुलीना मेडल मिळालेले आहे. आज आमचे पक्षनेते असु दयात, गट नेत्या असू दयात याठिकाणी त्यांचा रोल महत्वाचा आहे. त्यांचा अधिकार आहे त्यांनी म्हणाव की आपल्या महापालिके तर्फे काय मोलाचे सहकार्य त्यांना देता येईल ते दयाव. प्रत्येकाला वाटेल की खेळण्यामुळे करिअर तयार होतं, खेळण्याने माणसाचे सेटअप होऊ शकतं. आज आपल्याकड मुलं खेळाकड वळत नाहीत, कातर म्हणतात की पहीला अभ्यास कर आणि कुठतरी सेटअप हो, कुठतरी कामाला लाग. पण आज याठिकाणी पी. गोपीचंद कोच असलातरी तो सेट झालेला आहे. तो एक चॅम्पिएनशिप मारलेला खेळाडू आहे. आज त्यांनी सायना नेहवाल, पी.व्ही.सिंधू सारख्याना घडवल आहे, आज कितीतरी त्यांच्या अकॅडमीमध्ये येतात, भविष्यामध्ये त्यांच्याकडून अपेक्षा आहेत. तशाच पध्दतीने कुस्तिमध्ये असू दयात, कबड्डीमध्ये असू दयात, हॉकीमध्ये सेमीफायनल मध्ये प्रवेश करणारे आपले खेळाडू आहेत. त्यांच्यासाठी आपण प्रोत्साहन दिले पाहीजे. महापालिकेच्या माध्यमातून भरीव मानधन दयावे. त्यांना त्याची गरज नाही पण त्यामुळे वेगळा मॅसेज जाईल की खेळामध्ये सुध्दा पैसे आहेत, खेळामध्ये पण करिअर करण्यासाठी एक संधी आहे. आई-वडीलांना सुध्दा सेक्युअर वाटेल की

आपली मुलं पण खेळली पाहीजेत. प्राधिकरणातील स्विमींग पुल चालू करावेत म्हणून सांगीतले होते ते चालू झालेले नाहीत ते मेन्टेनन्स अभावी पेन्डींग आहेत. त्याठिकाणी आपण लक्ष दिले पाहीजे. टेक्निकली लोक, स्पोर्टसची माणस त्या स्पोर्टस मिटींगमध्ये घ्या आणि त्यांना काही कमी पडू देवू नका. करोडो रुपयाचे बजेट आपण शहरामध्ये करत असताना स्पोर्टससाठी मेजर बजेट करा आणि मागेल ते खेळाडूना साहित्य दया, मागेल त्यांना ट्रेनिंग दया, मागेल त्यांना ही व्यवस्था करुन दयावी. बॅडमिंटन कोर्ट असू दया, स्विमींग पुल असू दयात, जिम असू दया, आम्ही फक्त महापौर चषक घेवून, फटबॉल, कबड्डी स्पर्धा घेवून होणार नाही. या विदयार्थ्यांना सवलती दयायला पाहीजे. काही खेळाडूना शुज नसतात, फुटबॉल, शर्ट नसतात. आज एवढे मोठमोठाले खेळाडू युएसए मध्ये आहेत आपल्या लोकांच जर्सी बघीतलेतर मला पण थोडसं वाईट वाटलं. ललिता बाबर ज्यावेळेस पळत होती त्या ग्रूप मध्ये बाकीचेही पळत होते आपल्या आणि त्यांच्या ड्रेसमध्ये सुध्दा किती तरी फरक होता. ही जी आहे ती सायक्लॉजी आहे, त्यांच्यामध्ये आपण गेल्यावर आपल्याला पण त्या पध्दतीने राहीलतर बरं वाटतं. नाहीतर आपण ते वातावरण बघुनच घाबरुन जातो. तरी असं न होता त्यांना प्रोत्साहन दिले पाहीजे. आई-वडीलानी सुध्दा सांगीतले पाहीजे की आम्ही तुमच्या बरोबर आहोत. प्राधिकरणामध्ये टेनिस कोर्ट अशा लोकांना प्रोत्साहन दयायला पाहीजे. आज फस्ट टाईम इन्ट्री करणारी सिंधू चॅम्पियनशिप मध्ये सिलव्हर मेडल मारत असेलतर कदाचित थोडीशी ट्रेनिंग अजून कमी पडली. अजून थोडी ट्रेनिंग केली असतीतर आपल्या देशाला गोल्ड मेडल मिळाल असतं. साक्षी या मुलीने एवढया छोटयाशा मुलीने या देशाची मान मोठी केलेली आहे. अजुन दोन-चार मेडलची अपेक्षा होती, ती भविष्यामध्ये अपेक्षा व्यक्त करतो. तरी सर्व सदस्यांनी बोलून खेळाडूंचे मनोधैर्य वाढविले पाहीजे, धन्यवाद.

**मा.जितेंद्र ननावरे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. याठिकाणी उल्हास शेट्टी यांनी अभिनंदनाचा जो ठराव मांडलेला आहे त्याला मी अनुमोदन देतो. याठिकाणी जगामध्ये ३१ वी ऑलिम्पिक स्पर्धा चालू आहे. त्याठिकाणी भारताच्या दोन सुपूत्री साक्षी मलिक व पी.व्ही.सिंधू यांनी कांस्य आणि रजक पदक पटकावून भारत देशाचा तीरंगा रिओ मध्ये उंचावला आहे. मी सर्व सभागृहाच्या वतीने सर्व पिंपरी चिंचवड शहराच्या वतीने सर्व क्रिडा संघटना व माजी सभापती क्रिडा समिती या नात्याने त्यांचे प्रथम अभिनंदन करतो. उल्हास शेट्टी यांनी आताच सांगीतले की दिपा कर्माकर असेल, सानिया मिर्झा असेल या सगळया खेळाडूने जे यश मिळवलेले आहे ते त्यांच्या वैयक्तिक कामगीरीच्या जोरावर मिळवलेले आहे. मला वाटते कोणत्या शासकीय यंत्रणेची त्यांनी मदत घेतलेली नाही. पिंपरी चिंचवड महापालिकेचा मागील वर्षामध्ये मी क्रिडा समिती सभापती म्हणून काम करत होतो, मी स्वत: एक खेळाडू आहे त्यामुळ मी काही गोष्टी सुचवलेल्या होत्या त्या तुम्ही लक्षात घ्या. साक्षी मलिक, दिपा करमरकर असेल, पी.व्ही.सिंधु असेल या सर्वांनी कोणत्या नां कोणत्या

अकॅडमी मध्ये आपला सराव केलेला आहे. मी सभापती असताना सांगीतल होत की शहरामध्ये दहा खेळांच्या अकॅडमी आपण कराव्यात आणि त्या पीपीपी तत्वावर राष्ट्रीय खेळाडूच्या अखत्यारीत चालवाव्यात. आपल्या जवळ इन्फ्रास्ट्रक्चर एवढ चांगले आहे, आंतरराष्ट्रीय दर्जाचा सिंन्थेटीक्स ट्रॅक आहे, आंतरराष्ट्रीय दर्जाचे हॉकी स्टेडीएम आहे, आपले इन्फ्रास्ट्रक्चर चांगले आहे. नागपूर महानगरपालिकेचे लोक आले होते त्यांनी आपल्या या इन्फ्रास्ट्रक्चरच कौतूक केलं होतं. पण आभावाने आपल्याला आपल्या येथे प्रशिक्षण देता येत नाही. आपल्याकडे ऑलिम्पिकसाठी बजेट होते ते पंधराशे कोटीचे आणि चायनाचे बजेट होतं आडीच हजार कोटीचे. लंडन ऑलिम्पिकला ज्यावेळेस त्यांनी आयोजन केल त्यावेळेस त्यांच्या लक्षात आलं की आपण बजेट हे आता वाढवल पाहीजे. इंग्लंडचे चोवीसे कोटीचे बजेट होते ते त्यांनी आठ्ठावीस हजार कोटीच बजेट केल आणि आज ते ऑलिम्पिक टप्प्यामध्ये दुसऱ्या क्रमांकावर आहेत, चायनाला मागे टाकलेल आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब माझी एवढीच विनंती आहे की आपण बजेट वाढवा. बजेटच आपल्या येथे काही कमी नाही पण आपले जे धोरण आहे ते अतीशय चुकीचे आहे. ८ स्विमींग टॅंक आहेत त्यातील एक स्विमींग टॅंक अकॅडमीला दयावा. धनराज पिल्ले आंतरराष्ट्रीय खेळाडू पुण्यातच आहे, दयानां हॉकी स्टेडीयम त्याच्या ताब्यात. सिन्थॅटीक ट्रेस आडीच कोटी रुपये खर्च करुन असाच पडलेला आहे. एखादी चांगली अकॅडमी असेलतर तीला मदत करा, त्याच्यावर  तुम्ही काम करा. आपल्या येथून पण खेळाडू घडतील. महापालिकेच्या, एमआयडीसीचे ओपन स्पेस कितीतरी खाली पडलेल्या आहेत त्याच्यावर अतीक्रमण झालं आहे, मला वाटत एमआयडीसीने आताच पत्र दिलेल आहे की या ओपन स्पेस आमच्या परत दया, आपल्याला तीथ अशी अकॅडमी तयार करता येणार नाही का. गोरगरीबांचे लोक खेळतील. आपल्या हद्दीमध्ये लोकांच्या मनात खेळा विषयी जागृकता राहील. महापालिकेच्या जवळ जवळ ७६ शाळा आहेत त्या शाळेमध्ये सर्व सभागृहाने लक्ष घातले पाहीजे. ऑलिम्पिक नर्सरी करावी जेणेकरुन ऑलिम्पिक मध्ये जे काही गेम्स आहेत त्या खेळा विषयी त्यांना माहीती मिळेल. कोणत्या खेळामध्ये काय साहीत्य लागते, किती जागा लागते, त्या खेळाचा केव्हा उगम झाला या गोष्टी कळाल्यातर लहान मुलांमध्ये खेळा विषयी आवड निर्माण होईल आणि नक्कीच  पिंपरी चिंचवडमध्ये आंतरराष्ट्रीय दर्जाचे खेळाडू घडतील. आपण त्यांचे अभिनंदन करावे पण त्यांना एखादी अकॅडमी तुम्ही स्थापन करा. ज्ञानप्रबोधिनी शाळा जिम्नॅशियमच्या बाबतीत चांगल काम करते, त्यांना दयानां आपल्या मार्फत साहीत्य ते अतीशय सुंदर शिकवतात, ज्ञानप्रबोधिनी शाळा जिम्नॅशियमच्या बाबतीत अतीशय चांगले काम करते त्यांना मदत करावी. त्याठिकाणी खेळाडूच घडणार आहेत. विशेषत: आपल्या नाशिक फाटयाला आर्मीची अकॅडमी आहे. त्याच्यामध्ये दत्तू नावाचा एक अर्मीचा मुलगा प्रॅक्टीस करत होता तो विहीर खोदून आर्मीमध्ये जॉईन झाला आणि तीन वर्षातच ऑलिम्पिकला गेला. का तर सांगायच म्हणजे आर्मी व्यवस्थीत प्रशिक्षण देते. तसं महापालिकेमध्ये दहा अकॅडमी

पीपीपी तत्वावर याठिकाणी चालू कराव्यात आपल्याला काही दिवसात त्या बाबतीत रिझल्ट दिसेल. पुन्हा एकदा विजेत्या खेळाडूंचे व जे फायनल मध्ये पोहचले असतील किंवा त्यांनी उत्तम अशी कामगीरी केली त्या सर्व खेळाडूंचे मी अभिनंदन व्यक्त करतो आणि थांबतो, जयहिन्द !

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. देशाला आंतरराष्ट्रीय स्तरावर सन्मान मिळवून देणा-या आणि तिरंग्याला सलामी देणा-या या देशाच्या मुली साक्षी मलिक, पी. व्ही. सिंधू, ललिता बाबर, दिपा करमरकर या स्त्रि शक्तिला त्रिवार माझा सलाम. देशाने सुध्दा त्यांना सलामी दिलेलीच आहे. मा.महापौर साहेब, ललिता बाबरच्या संदर्भात एक छोटासा किस्सा सांगते. ललिता बाबर यांनी ज्यावेळेस त्या धावण्याच्या शर्यतीची सराव करत होत्या त्यावेळेस दिवसा झोपायच्या आणि रात्रीच्या वेळेस त्यांचा व्यायाम चालू असायचा. कारण ज्याठिकाणी त्यांना स्पर्धा जिंकायची होती त्या ठिकाणच्या वेळ-काळ, जेवणाच्या वेळा त्यांनी कशा बदलवल्या होत्या आणि शरीराला तशी सवय लावलेली होती. महीलाने जर जिद्दीने ठरवल एखादी गोष्ट करायचीतर त्यासाठी वाट्टेल तो संघर्ष करण्याची तयारी त्यांची असते, हे त्यांच्या एकंदर वर्तनावरुन दिसलं. तीला माझा खुप खुप सलाम. आणि अत्यंत आनंदाने ऊर असा भरुन येत होता तीला पळताना बघीतलेतर असे वाटत होतं की आपण तीच्या बरोबर पळतो की काय. आणि पी.व्ही.सिंधूला तीन बॅट चालविताना बघत होतो असं वाटत होतं की आता जिंकते, आता जिंकते, आता जिंकते आणि ती जिंकली. तीनं जे मेडल घेतल ते नसतं घेतलतरी तीची जी जिंकण्याची जिद्द होती, त्याच्याकड तीची वाटचाल होती त्या वाटचालीला सुध्दा सलाम करावासा वाटतो. ललिता बाबरने जे शारीरीक कष्ट घेतले, ते कष्ट घेत असताना इतरही सर्व सदस्यांनी सांगीतल त्याप्रमाणे अव्हेलेबल करुन दिलंतर निश्चितच आपल्याला गोल्ड मेडल मिळेल. आज गोल्ड मेडल नाही मिळाल म्हणून आज वाईट वाटण्याच काही कारण नाही. पी.व्ही.सिंधू, साक्षी मलिक यांनी मेडल घेतले, ललिता बाबर सुध्दा आहे. कुस्ति हा जो प्रकार आहे हा आजपर्यंत पुरुषाची मक्तेदारी होती ती मक्तेदारी मोडून काढून हे जे मेडल घेतलेले आहे त्यावरुन असं दिसून येतं की महीला सुध्दा कुठेही कमी नाहीत. आम्हांला कमी लेखण्याचा प्रयत्न करु नका, देशाच्या वतीने त्यांच खुप खुप अभिनंदन.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सध्या चालू असलेल्या रिओ ऑलिम्पिकमध्ये साक्षी मलिक, पी.व्ही.सिंधू यांना पदक मिळालेले आहे त्याबद्दल आताच उल्हासभाई शेट्टी यांनी अभिनंदनाचा प्रस्ताव मांडला त्याला अनुमोदन देते. मा.महापौर साहेब, सव्वासे कोटीच्या जनतेमध्ये आपल्याला एका सुवर्ण पदकाची चातका प्रमाणे वाट पहावी लागते. आपल्या पेक्षा कमी लोकसंख्या असलेल्या देशामध्ये सुवर्ण पदकाचा पाऊस पडतो. नव्हेतर त्यांना स्वत:ला एवढ कॉन्फिडेन्स आहे की ते आम्हांला मिळणारच आहे अशी परिस्थिती एकीकडे असताना राज्यसरकार काय करत, केंद्रसरकार काय करतं याच्या पेक्षा

आपण त्या भागातील लोकप्रतिनिधी आहोत त्या भागामध्ये आपण सगळेजण काय करतो हे सगळयांना आत्मपरिक्षणाची गरज आहे. आताच जितेंद्र ननावरे यांनी खुप सुंदर कल्पना मांडलेल्या होत्या. त्याच्यामध्ये ऑलिम्पिक नर्सरी हि चांगली कल्पना आहे. आयुक्त साहेब, आपण आल्या पासून आम्हांला असं वेगळ काही अजून दिसलेले नाही, तुम्ही येवुन तीन चार महीने झाले असतील. प्रत्येक आयुक्तांचा आल्यानंतर एक वेगळा असा ठसा दिसतो काहीतरी काम करण्याची एक वेगळी चुणूक दिसते. आपल्या माध्यमातून आम्हांला अजून काही तसं वाटल नाही. आता आमची घरी जायची वेळ आलेली आहे तोपर्यंत तुम्ही कशाततरी, काहीतरी नावीन्यपुर्ण योजना की जी आता सदस्यांनी ठेवल्या आहेत त्याच्यामध्ये आपण उचल घ्यावी. एवढे मोठे बजेट असलेली महानगरपालिका, एवढे मोठे इन्फ्रास्ट्रक्चर पण फक्त कोचिंगच्या अभावी, फक्त याठिकाणी प्रॅक्टिस, फिटनेस एवढेच चालते किंवा एखादया मंडळाला देवून टाकल, दे दान म्हणून सोडून दिलेलं आहे. महानगरपालिकेचे सगळे प्रोजेक्ट नागरीकांच्या पैशातून बांधलेले धुळखात पडलेले आहेत. मा.महापौर साहेब, महापौर चषक भरवतो ते भरवत असताना आपल्या शहरातील खेळणारे कोणी नसतात. शहरातील एखादा संघ असतो बाहेरचेच जास्त संघ असतात. बघायला शंभरच्या वरती लोक नसतात त्याचे कारण असं आहे की प्रसिध्दीसाठी फक्त दहा हजाराची तरतूद ठेवलेली आहे. खेळाची जी प्रसिध्दी होत असते, जी महापौर चषकची प्रसिध्दी असते ते नागपूरेला विचारा त्याच्यासाठी फक्त दहा हजार रुपये ठेवलेले आहेत. खेळाडूना कळत नाही अशाप्रकारचा महापौर चषक कुठल्या कोप-याला कुठल्यातरी एखादया वॉर्डमध्ये होतो. ज्यांना आवड आहे ते तिथं बघायला जातीलनां. त्यांना दुस-याच्या गेम बघुन त्यांना प्रोत्साहन मिळेल आपल्या काही चुका आहेत त्या सुधारण्याची संधी मिळेल. या रिओ ऑलिम्पिकला मेडल मिळाल्यानंतर बोलणार किंवा मेडल गेल्यानंतर बोलणार. परंतु आपण काय करतो, आपण स्वत:चे आत्मपरिक्षण या माध्यमातून या कारणानी का करु नये. मा.महापौर साहेब आपणही सूचना दया की आपल्या क्रिडा समित्या, आपल्या महिला बालकल्याण समित्या या आपल्या सगळया समित्या नामधारी आहेत. ईच्छा शक्तीचा अभाव आहे. माझे सहकारी नगरसेवक म्हणाले मला आनंद वाटला की साडेचार वर्षानी आपण आता घरी चालल्यानंतर आपल्याला आठवते की आपल्याकडून काही झालेले नाही, परंतु अजूनही वेळ गेलेली नाही, मा.महापौर साहेब, काही योजना करायच्या ठरवल्या आपल्या नेतृत्वाखाली तर आपण आजही करु शकतो. ऑलिम्पिकचे यश आपल्याला काही डायरेक्ट मिळणार नाही. खाशाबा जाधवा सारखे आपल्या शहरातले एक शेतकरी भुमिपुत्र त्यांनी त्याठिकाणी जाऊन आपला झेंडा फडकावलेला होता. आपल्याही शहरामध्ये असे खुप चांगले मुलं आहेत की त्यांना काहीतरी करता येत होत परंतु त्यांच्याकडे तेवढ आर्थीक पाठबळ नव्हतं म्हणून ते करु शकत नाहीत. लिलता बाबरच आताच सिमाताईनी सांगीतलं तीला आठवडयाला प्रॅक्टिस करत असताना ५० हजाराचा बुट लागायचा, म्हणजे ते बुट प्रॅक्टीस करुन करुन

फाटायचे. गाववाल्यांनी, ग्रामस्थांनी कॉन्ट्रीब्यूशन करुन तीला त्याठिकाणी बूट स्पॉन्सर केले असतील किंवा अजून बाकीचा काही खुराक असेल तो केला असेल. एवढूशा गावामध्ये जर या गोष्टी होऊ शकताततर आपण शहर म्हणून किंती लक्ष देतो. आपल्या क्रिडा प्रबोधिनीची अवस्था काय याच्यासाठी एखादी स्पेशल मिटींग घ्यावी. ज्याना ज्यांना यामध्ये इन्ट्रेस्ट आहे त्यांच्याशी बोलून आपल्या इन्फ्रास्ट्रक्चरमध्ये योग्य असे काही प्रशिक्षक नेमलेतर आपणही शहरात काही करु शकतो. ऑलिम्पिकच्या माध्यमातून तेवढ जरी केलंतरी निश्चितपणे साक्षी मलिक असतील किंवा पी.व्ही.सिंधू असेल यांचा सन्मान आपण करतो असं मला कदाचित वाटेल, धन्यवाद.

**मा.चंद्रकांता सोनकांबळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या दोन भारताच्या कन्यांनी देशाला पदक मिळवून दिलेली आहेत साक्षी मलिक आणि पी.व्ही.सिंधू त्यांचे मी अभिनंदन करते. ज्या तळमळीने सभागृहामध्ये हा विषय बऱ्याच जणांनी मांडलेला आहे ही धरपड कायम असते. आपल्या शहरात स्पोर्टसाठी काहीतरी भरीव कामगीरी झाली पाहीजे. कुस्तिचे कैंद्र जरी असलेतरी सुध्दा इतर खेळाना संधी लाभली पाहीजे, त्याच नियोजन झाल पाहीजे ही धरपड कायम असते. परंतु तसं काम आपल्याकडून होत नाही. याठिकाणी माझ घरचच उदाहरण आहे. माझी भाची स्वत: टेनिस खेळते. ती डेक्कनला सध्या खेळते तीथ ती दरमहा पाच हजार रुपये भरते. रॅकेटला, बुटाला पैसे जातात. हे पैसे घरचे आईवडील सर्व्हिस करतात म्हणून ते भरु शकतात परंतु ज्यांच्या घरामध्ये काहीच नाही परंतु मुलं खेळामध्ये हुशार आहेत अशा मुलांना सुध्दा संधी देण्यासाठी आपल्या येथे तेवढया ताकदीचे केंद्र निर्माण होणं गरजेच आहे. टेनिस कोर्ट सुध्दा आपल्याकडे आहेत परंतु जे मुल खेळणारे डेक्कनला असतात त्या ताकदीची मुलं याठिकाणी सापडत नाहीत. आपल्या मुलांना तिथ जाव लागतं. तिथ नियोजनबध्द खेळ खेळले जातात तशाच पध्दतीचे नियोजन आपल्या येथे आखले पाहीजे. त्याठिकाणी जशा स्पर्धा घेतल्या जातात तशा स्पर्धा आपल्याकडे घेतल्या पाहीजेत, स्पर्धक आले पाहीजेत. आपले जे बजेट शिल्लक असते मला वाटते दलीतवस्तीचे पण काही बजेट शिल्लक आहे, आपल्याकड मागासवर्गीयाचे काही बजेट शिल्लक आहे अशा बजेटमधुन सुध्दा खेळासाठी उभे करता आलेतर तो सुध्दा प्रयत्न करावा. जेणेकरुन स्पर्धक याठिकाणी तयार होतील. या दोन मुली जिंकून आलेल्या आहेत, खरंतर अभिमानाने ऊर भरुन यावा अशी गोष्ट आहे. याच्यामध्ये मुलगा किंवा मुलगी, पुरुष किंवा स्त्रि हा विषय आपला नाही. कोणीतरी दोन महत्वाची पदक या देशाला मिळवून दिलेली आहेत. यामध्ये आपला अभिमान आहे. तरी माझी विनंती अशी आहे की या दोन मुलींचा सत्कार पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने घेण्यात यावा. आपल्या शहरातील स्पर्धकाना, आपल्या शहरातील मुलांमुलीना प्रोत्साहन मिळावे म्हणून हे करावे म्हणून सूचेनला पाठींबा आहे याठिकाणी

अकॅडमी तयार व्हावी आणि ती प्रत्येक खेळाची व्हावी अशी विनंती मी याठिकाणी करते, धन्यवाद.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह संपुर्ण देशाचे लक्ष लागलेले ऑलिम्पिकमध्ये आपल्या देशाच्या या दोन कन्या पी.व्ही.सिंधू आणि साक्षी मलिक यांनी गेल्या दोन तीन दिवसात ही कामगीरी केली त्याच्यामुळे संपुर्ण राज्यांच मनोधैर्य अतीशय स्ट्राँग झालेले आहे. परंतु हे सर्व होत असताना कुठतरी सव्वासे कोटीची लोकसंख्या असलेल्या देशामध्ये जास्त पदकाच्या संख्येची अपेक्षा असल्याने त्यासाठी प्रशासकीय यंत्रणा कुचकामी ठरते. एका बाजूला जितेंद्र ननावरे यांनी सांगीतले की चायनामध्ये काय होते, ब्रिटनमध्ये काय होते. विवीध देशामध्ये खेळासाठी असलेल बजेट याठिकाणी सांगण्याचा त्यांनी प्रयत्न केला. प्रत्येक खेळाचे वैशिष्टये हे त्या त्या खेळाडूनां नक्कीच माहिती असतं. खाशाबा जाधव यांनी भारताच नाव ऐतिहासीकरीत्या संपुर्ण जगावर कोरलं गेलं त्यावेळेला देशातले सगळेच पैलवान आनंदीत होते.  त्यानंतर आपल्या देशाला ऑलिम्पिकमध्ये काही अंतराने हे पदक मिळत गेलेली आहेत. यामुळे शहरात इतका आनंद लोकांना झालेला आहे की तो फार मोठया प्रमाणात साजरा करताना दिसतात. हे होत असताना जर आपली क्रिडा यंत्रणा जर त्या पध्दतीने कार्यान्वित झाल्यातर आपल्या शहरात अशाप्रकारचे खेळाडू होवू शकतात याचे भान तुम्हां-आम्हांला पाहीजे हीच सर्वाची मागणी आहे आयुक्त साहेब, आपण हे थोडक्यात लक्षात घ्यावं. त्याचप्रमाणे आपल्याला काही हजारो कोटीच्या बजेटची आवश्यकता नाही. पण आपले असलेले इन्फ्रास्ट्रक्चर ज्या पध्दतीने वापरले जात नाही त्याचे नियोजन, त्याच नियंत्रण हे करणे मात्र आपल्या शंभर टक्के हातात आहे. आज आपल्याकडे सगळ आहे, आपल्याकडे कुठलेही एक क्षेत्र असं नाही की त्याठिकाणी आम्ही विकास केलेला नाही. संत ज्ञानेश्वर क्रिडा संकुलना सारखे क्रिडा संकुलन उभे केलेले आहे. हॉकी स्टेडीएम पॉलिग्रासच आहे. ब-याचवेळा तिथ जास्त प्रमाणात मेन्टेनंन्स कराव लागत. परवाच मगर स्टेडीएमची अवस्था पाहीलेली आहे त्याच नुतनीकरण करण्याच काम पक्क केलेल आहे. हे सगळे होत असताना वेगवेगळया सुविधा आहेत वेगवेगळे नियम आहेत त्याचा वापर आपल्या शहराला होणे गरजेचे आहे. आपल्या शहराला जिल्हयाचा दर्जा प्राप्त नाही तो जिल्हयाचा दर्जा प्राप्त होण्यासाठी पिंपरी चिंचवड शहरामध्ये प्रत्येक खेळाची एक अथेलॅटिक्स समिती तयार केली गेली होती ही २००३ ची गोष्ट आहे. जवळपास याला तेरा वर्षे झालेले आहेत प्रत्येक खेळाची आपल्या शहराची एक कमिटी आली. त्या कमिटीमध्ये आपल्या शहराला जिल्हयाचा दर्जा वेगळा मिळावा याच कारण काय आहे, पुणे शहराची लोकसंख्या मोठी आहे. त्याठिकाणी असलेले खेळाडू, असलेल्या सुविधा, असलेली यंत्रणा, असलेला त्यांचा अनुभव याचा विचार केलातर  पुणे शहरातील जास्त खेळाडू जिल्हा पातळीवर खेळत असतात, सगळया खेळांमध्ये. त्याठिकाणी पिंपरी चिंचवड शहराला दुय्यम स्थान म्हणता येणार नाही, शेवटी जिल्हा जरी आपला असलातरी शहर म्हणून

महापालिकेची वेगळी ओळख म्हणून अस्तित्व आहे त्या अस्तित्वामुळे आपल्याकडे खेळाची संख्या सुध्दा भरपुर आहे. परंतु त्या खेळाडूना त्याठिकाणी स्थान ब-याच वेळेस मिळत नाही. याच कारण काय आहे की, आपल्याला तो दर्जा प्राप्त नाही. खेळाच्या बाबतीतील दर्जा प्राप्त झालातर प्रत्येक खेळाडूला, प्रत्येक गेमला, आपल्याला चांगले खेळाडू शहरात मिळतील परंतु आपण कमी पडतो ही सुध्दा खरी परिस्थिती आहे. ज्या यंत्रणेचा वापर आपण करु शकत नाहीत त्याचा वापर केला गेला पाहीजे. या दोन मुली आहेत त्यांचा सार्क अभिमान तुम्हा-आम्हांला, सर्वांना आहे. उल्हास शेट्टी यांनी सांगीतलेले बरोबर आहे. त्या दोघीना आपल्या शहरात बोलाऊन त्यांचा सत्कार केला पाहीजे. त्यांचा फार मोठया प्रमाणात गुणगौरव झाला पाहीजे. त्याच्यामुळे आपल्या शहरातील प्रत्येक खेळाडूच मनोधैर्य वाढणार आहे. वेंगसरकर अकॅडमीचे उदघाटन करण्यासाठी सचिन तेंडूलकर आपल्या शहरात आला त्यावेळेला महाराष्ट्रातून खेळाडू याठिकाणी आलेले होते. याचा अर्थ काय आहे की खेळाडूंना पाहण्यासाठी, त्यांची हालचाल पाहण्यासाठी हे लोक अतूरलेले असतात, तुम्ही आम्ही अतूरलेले असतो. परंतु असं यश आपल्या देशपातळीवर प्राप्त होतं अशाप्रकारचा खेळाडू शहराला मार्गदर्शक म्हणून मिळालातर भविष्यात नक्कीच आपल्या शहराचा फायदा होईल. विशेष म्हणजे आपल्या महाराष्ट्राची असलेली खेळाडू, साता-याची असलेली ललिता बाबर या तरुणीने सुध्दा आपल्या राज्याचे नाव अतीशय चांगल्या पध्दतीने उज्वल करण्याचा प्रयत्न केलेला आहे. महाराष्ट्रातील प्रत्येक मुल आंतरराष्ट्रीय पातळीवर कारकिर्द गाजवतात त्याना बोलवून त्या मुलीमुळे आपले मनोधैर्य वाढणार आहे. आज पदक मिळविण्याच्या क्रमवारीमध्ये मुली आहेत हे सगळयात महत्वाच आहे. पी.व्ही.सिंधूने चार महीने मोबाईलला हातच लावला नाही. आतातर आपण मोबाईल शिवाय जगूही शकत नाहीत. म्हणजे मोबाईल हा इतकी काळाची गरज झालेला आहे की सकाळी उठल्या बसल्या मोबाईल लागतो. तीच्या प्रशिक्षकांनी हे सांगीतले आहे. की छोटया गोष्टी पासून मोठया गोष्टी पर्यंत स्वत:वरच नियंत्रण, स्वत:च्या गोष्टीवरच असलेल नियंत्रण हे एक खेळाडू लोक ठेवतात आणि म्हणून त्यांना इथपर्यंत पोहचता येतं. मी पुन्हा एकदा विनंती करतो या खेळाडूना महापालिकेमध्ये प्रत्यक्ष बोलवून त्यांचा मान-सन्मान शहराच्या वतीने करावा अशी विनंती करतो आणि माझे दोन शब्द संपवितो.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. रिओ ऑलिम्पिकमध्ये साक्षी मलिक आणि पी.व्ही.सिंधू यांनी जे पदक मिळवलेले आहेत त्याबद्दल आपण सभागृहाच्या वतीने त्यांचे अभिनंदन करतो. अभिनंदन करत असताना त्या महिलांनी आपल्या देशाचे नाव राखण्याचे काम केलेले आहे. हे करत असताना मला उल्हास शेट्टी आणि जितेंद्र ननावरे यांचे धन्यवाद मानले पाहिजेत. अभिनंदन करत असताना काही विषय त्यांनी उपस्थित केलेले आहेत. आज आयुक्त साहेब, माझी विनंती आहे की, आपल्या महापालिकेमार्फत देखील क्रिडा क्षेत्रात लाखो रुपये खर्च होतात व यातून आऊटपुट काहीच निघत नाही. महापौर चषक भरवले

जातात. काम करत असताना टिकाटिप्पणी होतच असते. शहरातून काही स्पर्धक तयार झाले पाहीजेत, खेळाडू तयार झाले पाहीजेत. आज आपण लाखो रुपये अधिकारी/कर्मचारी यांच्या पगारावरती खर्च करतो, शिक्षणावरती खर्च करतो, कार्यक्रमासाठी खर्च करतो. व्यायाम शाळेचे साहीत्य घेण्यासाठी लाखो रुपये खर्च करतो. मागच्यावेळेस मी क्रिडा समितीवर होतो. या विषयी सुध्दा मी आपणास मागच्या मिटींगमध्ये फोन केला होता की आपण थोडा वेळ काढून मिटींगला या. याच्या मागचा उद्देश की क्रिडा समिती जी आहे त्याच्यावर जो खर्च करतो त्यातून काहीही आऊटपुट नाही. उदा. महापालिकेच्या शाळेवर आपण लाखो रुपये खर्च करतो. कपडे आणि इतर वस्तू घेवून देतो, आपल्या महापालिकेच्या शाळा चांगल्या चालल्या पाहीजेत, शहरातील गोरगरीब विदयार्थ्यांना चांगले शिक्षण मिळाले पाहीजे. त्याच गरीब वर्गातील एखादा खेळाडू तयार झाला पाहीजे. याबद्दल सुध्दा आपण लक्ष घातले पाहीजे. आपल्याकडे बरेचसे शिक्षक आहेत परंतु तेथून काहीही आऊटपुट निघत नाही. माझी आपल्याला एक विनंती आहे की या दोन मुलींनी पदक मिळवलेले आहे, अजून सुध्दा स्पर्धा चालू आहेत आपल्याला सुवर्ण पदक मिळावे अशी अपेक्षा आहे. पुढच्या महीन्यामध्ये जीबी मध्ये उत्तर दयावे. क्रिडा विभागा मध्ये असलेले कामगार, अधिकारी यांच्यावर होणारा खर्च आणि यांच्यासह क्रिडा समितीवर होणारा खर्च या सगळया बजेटचे आऊटपुट, की हे काय करतात याची माहीती दयावी. आयुक्त या नात्याने क्रिडा विभागासाठी आपल्या मनात काही करायचे असेलतर ते सुध्दा त्यावेळेस सांगावे, धन्यवाद.

**मा.राजेंद्र काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज साक्षी मलिक व पी.व्ही.सिंधू यांनी उत्तम कामगीरी करुन देशाचे नावलौकीक वाढविलेले आहे अशा खेळाडूमुळे कमीत कमी आपल्या महापालिकेमध्ये असलेल्या सर्वच अकॅडमीचा उल्लेख होतो त्याची दुरावस्था पाहण्याची हीच खरी वेळ आहे. गेल्या दहा वर्षात कुठलीही एक ऑलिम्पिक स्पर्धा झाली आणि त्यात कुठल्यातरी खेळाडूने असं नावलौकीक केलंतर आपल्या पिंपरी चिंचवडच्या खेळा विषयी याठिकाणी बोलण्याची वेळ येते. दहा वर्षात अनेक नगरसेवक या विषयी बोलले असतील परंतु १० वर्षात कुठल्याही प्रकारचा फरक पडत नाही. आज तेवढयापुरतं बोलल जाते परत त्याकड दुर्लक्षीत केलं जातं. आता सुलभाताईनी सांगीतले तुम्ही आल्यापासून वेगळा असा ठसा उमटलेला नाही. या खेळाडूने चांगली कामगीरी केली त्यांना याठिकाणी बोलवा त्यामुळे चांगले प्रशिक्षण याठिकाणच्या खेळाडूना मिळेल अशी योजना याठिकाणी करावी. व्यायाम शाळा पाहील्यातर किती दुरावस्था झालेली आहे, त्या कुठे गळतात, कुठे व्यायामाचे सामान नाही. याठिकाणी नव्यानें जे जे आयुक्त आलेले आहेत त्या प्रत्येक आयुक्तांनी प्रभागाचे दौरे केलेले आहेत परंतु तुम्ही आल्यापासून अजून कुठल्याही प्रभागाचा दौरा झालेला नाही. तरी तो केलातर काही काही गोष्टी तुम्हांला पाहीला मिळतील. गेल्या पाच ते सहा वर्षात रज्जाक पानसरे होते ते आता बदलेले आहेत. कुठले अधिकारी कुठे असावेत हा सुध्दा एक नियोजनाचा

भाग आहे  हे व्यवस्थीत बघावे. त्यामुळे कुठले अधिकारी कुठला स्टाफ कुठे वापरला पाहीजे याचेही नियोजन असले पाहीजे. पुढच्या वर्षात या दुरावस्था बदलून चांगले खेळाडू निर्माण करायची  इच्छा असेलतर या सगळया अकॅडमी चांगल्या चांगल्या खेळाडूच्या हवाली करा आणि त्यांच्या मार्फत हे प्रशिक्षण आपल्या पिंपरी चिंचवडच्या मुलांना दयाव अशी मी याठिकाणी विनंती करतो आणि थांबतो.

**मा.भाऊसाहेब भोईर -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. भारताच्या दृष्टिकोनातून अविस्मरणीय हा क्षण आहे आणि निश्चित आपण देखील त्यामध्ये सहभागी झालेलो आहोत त्याबद्दल मी मनापासून सर्वांना धन्यवाद देतो. साक्षी मलिक आणि पी.व्ही.सिंधू यांनी भारताचे नावलौकीकात भर टाकणा-या यांच्या निमीत्ताने घटना घडलेली आहे. निश्चितच त्यांचे अभिनंदन. कोणत्यातरी गोष्टीला गांभीर्याने चर्चा करण्यासाठी काहीतरी ऐतिहासीक घटना घडायला लागते. परंतु हे परंपरेनी आपण त्याच पध्दतीने चाललेलो आहोत आता राजेंद्र काटे यांनी म्हणल्याप्रमाणे. आपण गांभीर्याने विचार करणे, खेळ म्हणून महापालिकेची नैतीक जबाबदारी आहे जशी वीज, पाणी या मुलभूत सुविधा देण्याची नैतीक जबाबदारी महापालिकेची असते त्याचप्रमाणे सांस्कृतिक असेल, क्रिडा असेल मी देखील एक खेळाडू होतो. त्यामुळे काय त्याची तपश्चर्या असते आणि काय त्याच्या वेदना असतात याची आम्हांला सर्वांना पुर्ण कल्पना आहे. एकतर क्रिडाच्या माध्यमातून, महानगरपालिकेच्या माध्यमातून काही सुखसोई दयायच्या असतीलतर एखादी अकॅडमी किंवा एखाद बजेट देवून खेळाडू घडत नसतो त्यासाठी मुळात अधिका-यांना बोलण्यात काही अर्थ नाही. आयुष्यात कोणतेही खेळ न खेळणारे सुध्दा अधिकारी असू शकतात. परंतु या सर्व गोष्टीचे जे गांभीर्य असत ते गांभीर्य असणारी अकॅडेमी करणं अत्यंत गरजेच आहे त्यासाठी शंभर कोटीच बजेट ठेवलतरी चालेल. कारण आपली परिस्थिती असल्या कारणान आणि या शहरामध्ये आपण ती घडवू शकतो. एखादे चार-दोन प्रोजेक्ट कमी केलेतरी चालेल. मी काल संपुर्ण माहीती घेत होतो. १३ कोटीची अकॅडमी काढण्यासाठी गोपीचंदला स्वत:चे घर गहाण ठेवावे लागले. एखादा पछाडलेला अशी काही जी व्यक्ती असेल की त्याला काहीतरी करायचं आणि त्यावर कंट्रोल मात्र महानगरपालिकेच अजीबात नसाव कोणत्याही अधिका-यांचा त्यावर अजीबात कंट्रोल नसाव फक्त आपली देखरेख त्यावर असावी असे काहीतरी मा.महापौर साहेब आपल्या कालखंडामध्ये करता येईल का हे पहावं. या चर्चा व्यर्थ आहेत कारण पुढच्यावेळेस एखाद पदक मिळाल की परत हीच चर्चा चालू होणार आहे, याच्यातून आऊटपुट काहीच नाही हे मी गेल्या पंचवीस वर्षे पाहतो आहे क्रिडा समितीमध्ये एवढे भाषण झालेले आहेत. कोणाला ग्राऊंड दयायचे म्हणलेतर त्याला नको नको होतं. त्याला काय काय कराव लागतं. आपले अधिकारी त्यांच्या बरोबर कशाप्रकारच वर्तन करतात, एखादा खेळाडू आहे का कोण आहे याच देखील त्यांना भान नसतं. मुद्दा असा आहे की या सगळया गोष्टी व्यर्थ आहेत, कितीही भाषण केलेतर हे प्रोसिंडींगवर येईल आणि ते

प्रोसिडींग फक्त आपल्या माहीतीसाठी असेल की आपण भाषण केलं. वयाच्या दहाव्या वर्षापासून पी.व्ही.सिंधूने सुरवात केली खेळ हा इतका सोपा नाही आणि म्हणून या सर्व परिस्थितीचे भान ठेवून आपण एक अशी अकॅडमी तयार करावी की त्यासाठी पुढच्या बजेटमध्ये १०० कोटीचे बजेट ठेवा अनेक काही विकासाचे काम असतीलतर ते बाजूला ठेवा परंतु शहरातील जे खेळाडू आहेत त्यांनी त्याच्या संघटनेच्या प्रक्रियेतून जाउन अशी कोणतीतरी गोपीचंदच्या अकॅडमी सारखी अकॅडमी करायची का हे बघावे. खरंतर एका महिलेनी कुस्ती जिंकली, कुस्ती हा पुरुषप्रधान खेळ म्हणून आपल्या भारतामध्ये लोकप्रिय आहे परंतु हे क्रांतीकारी ऐतिहासीक पदक घेवून नवीन दिशा देण्याचे सामर्थ्य या मुलींने केलेले आहे. त्यामुळे अशी अकॅडमी त्या संघटनेच्या ताब्यात देवून कोणाचाही कंट्रोल न ठेवलातरच अशा पध्दतीने काहीतरी करता येईल. मी मा.महापौरांना विनंती करतो की पी.व्ही.सिंधू, साक्षी मलिक यांना आपल्या कालखंडात बोलववावे. त्यांना एकवीस-एकवीस लाख रुपये दया काही फरक पडत नाही, पुण्यं भेटेलं आणि नवीन येणा-या क्रिडाप्रेमीला प्रेरणा भेटेल. अशा लोकांना रक्कम देणे फार मोठी गोष्ट नाही. त्यांना रक्कम मिळणारच आहे परंतु आपली सुध्दा नैतीक जबाबदारी आहे त्यांच कौतूक करण्याची. त्यामुळे मा.महापौर साहेब, आपल्या कालखंडामध्ये महापालिकेच्या वतीने त्यांचा सन्मान करावा अशी मी भावना व्यक्त करतो.

**मा.आशा शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरतर काल आपल्याला मिळालेले मेडल पी.व्ही. सिंधूच्या माध्यमातून किंवा मग आपल्याला मिळालेली इतर पदकं याचा विचार केला आणि आजची आपली झालेली जी.बी. ची मिटींग त्यामुळे आज चर्चा होणारच हे अपेक्षीत होते. हे थोडक्यात कागदावर, प्रोसिडींग पुरते मर्यादीत न राहता त्याचे पुढे काय होणार हे बघणे आवश्यक वाटते. कालची मॅच बघीतली असेलतर पी.व्ही.सिंधूच्या विरोधात खेळणारी जी खेळाडू होती ती जगातली एक नंबरची रॅंकर होती. जागतील एक नंबरची रॅंकर असणा-या खेळाडू समोर पी.व्ही. सिंधू खेळत होती की जी कोणत्याही रॅंकीकमध्ये बसत नव्हती जिल्हास्तरावर इतर ठिकाणी तीचं प्राविण्य होतं परंतु जाकतीक रॅंकीक पाहीलतर त्याच्यामध्ये आपली पी.व्ही.सिंधू नव्हती तरी सुध्दा तीने सिल्व्हर मेडल मिळवलेले आहे आणि आपल्या देशाच नावलौकीक वाढवलं. त्यामुळे तीच अभिनंदन करणं, तीच कौतूक करणं हे आपल्या सगळयाच कर्तव्य आहेच. परंतु असं का घडत आमची एखादी मुलगी तीच्यात प्राविण्य आहे ती खेळू शकते हे कालच्या खेळावरुन दिसलं. जगातली एक नंबरची रॅंकर खेळणार आहे त्यामुळे सगळयांच्या मनात धकधक होती. टिव्ही समोर बसल्यानंतर चुकून आपण शुन्यान हारतो का जिंकतो असं वाटत होत आणि पीव्ही.सिंधूनी जेव्हा पहीली सेट जिंकली त्यावेळेस आमच्या सगळयांच्या आशा जिवंत झाल्या होत्या असं वाटत होत की आता काही चान्सेस आहेत बहुतेक आपण गोल्ड मेडल पर्यंत जाऊ शकतो अशा अपेक्षा आमच्या वाढल्या आणि दुस-या सेटला आपण हारलो. तीस-या सेटला पुन्हा एकदा सिंधू

खुप छान खेळली पुन्हा एकदा आमच्या आशा पल्लवीत झाल्या आम्हांला वाटल आम्ही आता निश्चितपणे जिंकू शकतो. ठिक आहे खेळ म्हणल्यानंतर कोणीतरी जिंकणार, कोणीतरी हारणार आहे आपल्या वाटयाला सिलव्हर पदक आलं. मा.महापौर साहेब, कालच्या खेळावरुन एवढच वाटत की, आजच्या मिटींगची चर्चा जी आहे ती निष्फळ ठरु नये. याठिकाणी जे काही क्रिडा अधिकारी आहेत त्यांना आपण आदेश दया, आजपर्यंत आपल्या शहरामध्ये जिल्हास्तरीय आणि राज्यस्तरीयला किती खेळाडू गेलेले आहेत याचा एक त्यांनी चार्ट करावा आणि पुढच्या वर्षीची ऑलिम्पिकची वाट न बघता आपले दहा खेळाडू गेले असतीलतर दहाचे वीस खेळाडू कसे होतील किंवा वीसचे चाळीस खेळाडू कसे होतील यासाठी आदेश मा.महापौर आपण आपल्या क्रिडा अधिका-यांना दयावा अशी मी याठिकाणी विनंती करते. आमची चर्चा अजीबात निष्फळ जाऊ देवू नका. आमची इच्छा जी आहे ती पोटतीडकीची आहे. येथून पुढच्या काळामध्ये क्रिडा अधिकारी यांची जबाबदारी फक्त क्रिडा अधिकारी म्हणून खुर्चीवर बसणे, एसीमध्ये बसणे, काहीतरी तुटपुंजा योजना राबविणं अशी न राहता त्यांनी रिझल्ट दिले पाहीजेत. कोणकोणत्या नवीन योजना राबविल्या आहेत. या सगळया गोष्टींचा आढावा घेवून पुढच्या दर दोन महीन्यानी जीबीला विषय आणलातरी आमची कोणाचीच हरकत नसणार. कदाचित पुढच्या ऑलिम्पिक मध्ये आपल्या पिंपरी चिंचवड शहरा मधील एखादी खेळाडू असेल अशी याठिकाणी अपेक्षा व्यक्त करते आणि थांबते. जयहिन्द जय महाराष्ट्र !

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा आपल्या दृष्टिने आनंदाचा दिवस आहे आणि उत्साहपुर्ण वातावरणा मध्ये आज सगळेजण चर्चेमध्ये सहभागी झालेलो आहोत. आशा या सत्कारमुर्ती आहेत पी.व्ही.सिंधू, साक्षी मलिक, दिपा करमरकर आणि ललिता बाबर या मुलीनी खुप सुंदर कामगीरी ऑलिम्पिक मध्ये केलेली आहे. आणि या ऑलिम्पिकमध्ये कामगीरी करत असताना काल ज्या क्षणाची सगळेजण अतूरतेने वाट बघत होते परंतु तीचा खेळ इतका उत्कृष्ट होता. सर्वानी, प्रत्येक नगरसेवकांनी सांगीतल की त्या कशा खेळल्या, तो खेळ प्रत्येक नागरीकांनी बघीतला आहे. तीन सेटमध्ये सगळेजण बघत होते. खुप उत्कृष्ट बॅडम्िंटन पी.व्ही. सिंधू खेळली आहे. जशी दिवाळी येते तशी आजची ही दिवाळी आपल्या महाराष्ट्र राज्यासाठी, भारतासाठी आहे असे वाटते. पुरुषाला पदक कमी मिळाले आहेत. सगळया पुरुषानी महिलांच कौतूक केल त्याबद्दल मी आभारी आहे. मला तुलना अजीबात करायची नाही कारण खेळाडू हा खेळाडू असतो, स्त्रि किंवा पुरुष हे त्याच्यामध्ये काहीही नसतं. कारण जी मुलं खेळायला जातात त्या मुला-मुलींच्या मनामध्ये कधीही ही भावना नसते, जे खेळाडू असतात त्यांच्या मनामध्ये कधीच ही भावना नसते की हा मुलगा आहे आणि मी मुलगी आहे. एकदम फ्रि मध्ये ते खेळत असतात. जितेंद्र ननावरे यांनी सांगीतले मागच्या वर्षी त्यांन खुप प्रयत्न केला आहे. आपल्यामध्ये टॉपमध्ये आहेत असे धनराज पिल्ले असतील, गोपाळ देवांग असतील पुणे जिल्हयामध्ये ज्या ज्या लोकांनी टॉप

मध्ये कामगीरी केलेली आहे असे प्रत्येकाचे वेगवेगळे खेळ आहेत. धनराज पिल्लेचा हॉकी आहे, देवांगचा कुस्ती आहे, बॉक्सींग आहे. असे ज्या त्या खेळातले लोक आहेत त्यांना आपल्याकडे बोलऊन त्यांच्याकडून एकही रुपया सुध्दा मानधन न मागता म्हणजे आम्ही जी तुम्हांला वास्तु देणार आहेत त्याच्यासाठी पैसे दया असे न करता आपण त्यांना वास्तू देणं गरजेच आहे. त्याठिकाणी लागणारे मटेरीएल देणं गरजेच आहे. कोंडे साहेबांनी आण्णासाहेब मगर स्टेडीएम आले त्यावेळेला त्यांनी स्पोर्टसचा चार्ज घेतला आणि त्यांनी शिक्षक भरले त्याठिकाणी सारख्या क्रिडा स्पर्धा व्हायच्या, स्पोर्टसाठी त्यांनी खुप चालना दिलेली होती. त्यानंतर असे वातावरण आपल्याला पाहायला मिळालेले नाही. आज आपण त्या ज्ञान प्रबोधिनीला दहा शाळा दिलेल्या आहेत. ज्या दिवशी शिक्षणमंडळाचा कार्यक्रम होता त्याठिकाणी आपल्या शाळेतील मुलांनी योगा केला. ज्ञान प्रबोधिनी त्या मुलांकडून योगाची प्रॅक्टीस घेते आहे. जिम्नॅस्टिक हॉल ज्ञान प्रबोधिनीकडे नाही. मी दोन दिवस जिम्नॅस्टिक हॉलच्या तेथे जाते कारण माझे नातवंड तेथे आहेत हे बघत असताना त्यांच्याकडे तसा हॉल नाहीए परंतु पिंपरी चिंचवड शहरात आपल्याला कोच सुध्दा म्हणतात की आम्हांला खुप चांगल्या पध्दतीने मुलांना प्रशिक्षण दयायचे आहे. परंतु चांगल्या मॅट मिळाल्या पाहीजे, त्यांच्या ज्या गरजा आहेत त्या आपल्याला देता येत नाही. जिम्नॅस्टिक हॉलसाठी चांगली जागा संजय कांबळे शोधतात. परंतु आपल्या क्रिडा विभागासाठी चांगले प्रमुख अधिकारी नेमले पाहीजेत. ज्ञान प्रबोधिनीत सोनवणे सर म्हणून आहेत ते सगळ बघतात किंवा कंट्रोलींग एका व्यक्तीकडे आहे. आपण त्यांना दहा शाळा सुपरव्हिजनसाठी दिलेल्या आहेत. चांगल्या शाळा त्यांना सुपरव्हिजनसाठी दिल्या गेल्या पाहीजेत. तानाजी शिंदे साहेब आपण परत एकदा मॉर्डनला विचारावे. मागच्यावेळेस तुमच झाल नाही आता तुम्ही येता का. त्यांचे काही सजेशन असतीलतर ते विचारुन घ्या. ज्ञानप्रबोधिनीवाले आणखी सुपरव्हिजनला यायला तयार आहेत का. मी तर परवाच्या दिवशी असं ऐकल की सुपरव्हिजनसाठी त्यांच्याकडचे लोक गेलेतर आपले लोक त्यांच्याशी उध्दट वागणूक देतात असे मी ऐकलेले आहे. सत्यता पडताळण्यासाठी तुम्हांला मी फोन करुन लगेचच सांगीतल. आपल्या शाळा चांगल्या घडवण्यासाठी जर इतर लोक धडपडत असतीलतर आपण त्यांना शाळा लिहून दिलेल्या नाहीत काही नाही पण एक शेजारधर्म म्हणून आपणच प्रपोजल दिलं आणि त्या पध्दतीने स्पोर्टसमध्ये सुध्दा त्यांनी दहा शाळा घेतलेल्या आहेत ते त्याच्यामध्ये आपल्याला सहकार्य करतात. शिक्षणमंडळातील सदस्य, शिक्षक, नगरसेवक असतील या सगळयांनी सहकार्य केल गेल पाहीजे. खुप चांगल्या पध्दतीच्या ॲक्टीव्हीटीज झाल्या पाहीजेत. असं वाटत होत की चायनामधुन एवढे लहानसे मुलं ऑलिम्पिकसाठी आलेले आहेत. बरोबर आहे त्यांच बजेट तसं आहे, त्यांचा खर्च तसा आहे. आपल्या पिंपरी चिंचवडमध्ये मतीमंद मुलांनी गोल्ड मेडल युएसएला जावून मिळवले आहे आपण त्यांना एक एक लाख रुपये दिले आहेत. आपण त्यांचा सत्कार मा.महापौरांच्या येथे घेतलेला आहे. परंतु ही

कामगीरी करत असताना मतिमंद मुलांना स्विमींग टँक दिला गेला पाहीजे. त्यांचे पालक सांगतात की आमची मुलं खुप चांगल करतात आम्हांला तुम्ही स्विमींग टँक दया, बॅडमिंटनसाठी पैसे घेतात नॅशनल लेव्हलला गेलेल्यांकडून एक रुपया सुध्दा घेऊ नका. इंद्रायणीनगरच्या स्टेडीयमवर प्रॅक्टीससाठी मुलं जातात जे नॅशनल लेव्हलला आहेत त्यांना एक कार्ड बनवून दया. त्यांना फ्रि देता आलं पाहीजे त्याच्यांकडून पैसे घेतले नाही पाहीजे. तासावर फि त्यांना परवडत नाही. कारण आपली ही कामगारनगरी आहे. कितीतरी पालक सुध्दा आम्हांला भेटलेले आहेत परत ते असे म्हणतात ताई तुम्ही त्या सरांना काही बोलू नका. कारण ते आमच्या मुलांवर डयुक धरतील ही सुध्दा पालकांना मोठी भीती आहे. नावासहीत पाहीजे असेलतर मी देवू शकते. हे इंद्रायणीनगरच्या ट्रॅकवरच आहे. तिथ चांगल्या पध्दतीने आपली मुल जर नॅशनल लेव्हलला खेळणार असतीलतर स्विमींगमध्ये असू देत किंवा कोणत्याही क्षेत्रात खेळणारी असू देत या मुलांना प्रॅक्टीससाठी कोच उपलब्ध करुन दिले गेले पाहीजेत. त्यांना आपण प्रोत्साहन दिले पाहीजे. असे आपण त्यांना थोडस खुष केलेतर नक्कीच आपलं पिंपरी चिंचवडचे नाव जागतीक लेव्हलला गेल्याशिवाय राहणार नाही. यांचा सत्कार केला गेला पाहीजे. आपण त्यांना सन्मानन बोलवाव. सगळयांनी ठराव केलातर पैसे सुध्दा आपण त्यांना देवू. पैशासाठी म्हणून नाही पण आपल्या पिंपरी चिंचवडमध्ये आल्यानंतर आपले मुलामुलीना असे वाटेल पाहीजे आपणही यांच्यासारखी काहीतरी चांगली कामगीरी केली गेली पाहीजे त्यादृष्टिने त्यांना बोलावून ज्यांना ज्यांना येता येईल, जमेल म्हणजे जे जिंकले त्यांनी याव असं नाही जे ऑलिम्पिक पर्यंत गेलेले आहेत, किंवा ज्यांना तेथपर्यंत पोहचता आल नसेल त्या सुध्दा मुलामुलीना इथपर्यंत येता येईल त्यांना सर्वांना एकत्रीत आमंत्रण देवून आपल्या महापालिकेचा ११ ऑक्टोबरला कार्यक्रम आहे या दिवशी हा कार्यक्रम ठेवावा. त्यादिवशी बोलवून त्यांचा सत्कार करावा अशी मी विनंती करते आणि थांबते.

**मा.महापौर -** भारताचे नाव उंचावर नेणा-या साक्षी मलिक, पी. व्ही. सिंधू, ललिता बाबर, दिपा करमरकर यांच खरच कितीही कौतूक केलतरी कमीच आहे. यांनी चांगली कामगीरी केलेली आहे. मला वाटत आपल्या देशामध्ये आपल्या महापालिकेचही मोठ नाव आहे. या महापालिकेतून आपण अनेक उपक्रम राबवित असतो परंतु ते यशस्वी होत नाहीत. आयुक्तांनी लक्ष घातले पाहीजे. नगरसेवकांनी ज्या सूचना मांडलेल्या आहेत, अधिका-यांनीही लक्ष घातले पाहीजे. कुठल्याही खेळाडूचा अपमान न होता त्यांना सहकार्य मिळाल पाहीजे, तुमची तक्रार आल्या नाही पाहीजेत याची दखल घेतली पाहीजे आणि आपल्या शहराचे खेळाडू उंचावर कसे जातील हे पाहीले पाहीजे. गोल्ड मेडल जिंकू शकलो नाहीतरी या खेळाडूना येथे आणून कौतूकाची थाप देणारच आहोत. गोल्ड मेडल मिळविण्यासाठी त्यांना सभागृहाच्या वतीने, शहराच्या वतीने खुप खुप शुभेच्छा देते आणि शहराच्या वतीने त्यांचे अभिनंदन करते.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेल्या अनेक दिवसापासून वर्तमानपत्रामध्ये मुर्तीमध्ये भ्रष्टाचार, गॅसदाहिनीमध्ये भ्रष्टाचार. अशा अनेक बातम्या येतात. अर्थातच नागरीकांमध्ये याची चर्चा होते पण याच्याबद्दल प्रशासनाने काय केले हे सांगीतले पाहीजे. शेवटी आपण जी.बी.मध्ये चर्चा करणार नाहीतर कुठे करणार हे सांगावे. आयुक्त साहेबांनी वर्तमानपत्रामध्ये स्टेटमेंट दिलेले होते की पाच दिवसात चौकशी समिती अहवाल सादर करतील, आज पाच दिवसापेक्षा जास्त दिवस झालेले आहेत. गॅसदाहिनीबद्दल सुध्दा सकाळमध्ये बातमी आलेली आहे, ही बातमी चुकीची असेलतर काहीतरी रिझल्ट आपण पत्रकारांना दयायला पाहीजे. यामध्ये काहीतरी तथ्य असणार आहे याच्याबद्दल स्टेटमेंट दयायला पाहीजे. हे खरे आहे किंवा खोटे आहे. खोटे असेलतर खोटे म्हणून सांगावे आणि खरे असेलतर कोण दोषी आहे हे सांगावे. गॅसदाहिनीचे पुर्वी दोनदा टेंडर मागविले. पहीला टेंडर मागविला दोन कोटी आले आणि नंतर एक कोटी छत्तीस लाख आले. तीन लाख रुपये पर महीना मेन्टेनन्ससाठी दिलेले आहे. एक लाख सुध्दा खर्च होत नाहीत आणि कोटेशनमध्ये तीन ते साडेतीन लाख रुपये खर्च आलेला आहे. याठिकाणी यासंदर्भात स्टेटमेंट पाहीजे. याच्याबद्दल माहीती दयावी. या विषयामध्ये चर्चा व्हायला पाहीजे. खरे काय खोटे काय याची नागरीकांना सुध्दा माहीती पाहीजे. पेपरमध्ये येते ते खरे आहे का. आम्हांला सुध्दा आश्चर्य वाटत की मुर्तीमध्ये भ्रष्टाचार झालेला असेल का. ते सुध्दा समजले पाहीजे. बातमी येते त्याच्यामध्ये काही तथ्य आहे का. म्हणून स्टेटमेंटची गरज आहे. आम्ही किती लोकांना फेस करणार. प्रत्येकजण विचारणार का, रे तुमच्या कॉर्पोरेशनमध्ये काय चालल आहे. मुर्तीमध्ये सुध्दा तुम्ही पैसे खातात का, असे नागरीक म्हणतात. गॅसदाहिनीबद्दलतर नुकतच पेपरमध्ये आलेल आहे, कसं कसं झालेल आहे ते. काही ठिकाणी २३ लाखात, ५० लाखात. दाहीनी खरेदी करताना गुजरात, कर्नाटकच उदाहरण दिलेल आहे. ठिक आहे ४५ लाख आणि ५३ लाखात खरेदी केलेली आहे आणि आपल्याकडे एक कोटी ते दिड कोटीमध्ये कशी काय खरेदी केलेली आहे याचे स्टेटमेंट मा.आयुक्त साहेबांकडून दयावे. संजय कुलकर्णी यांना सक्तीच्या रजेवर पाठविलेले आहे. स्थायी समितीने म्हणले परत घ्यावे. एक अधिकारी एवढा मोठा भ्रष्टाचार करु शकतो का. ज्या ज्या टेबलमधुन फाईल जाते त्या सगळया ठिकाणी थोडे थोडे पडते. हे साहजीक आहे मग ते स्टॅण्डींग असो, विधी असो, कार्पोरेटर असो, अधिकारी असो. मग एवढा मोठा भ्रष्टाचार एकटा अधिकारी करणार का. याच्या पाठीमागे कोण पुढारी आहे हे सुध्दा शोधले पाहीजे. मा.श्रीकर परदेशी यांनी सांगीतले होते की माझा अधिकारी चुका करतो त्यावेळी मी त्याच्यावर इन्क्वॉयरी लावतो. पण माझा अधिकारी एवढा मोठा भ्रष्टाचार करणार नाही. ज्यावेळी त्याच्या पाठीमागे फार मोठा पुढारी उभा राहतो त्यावेळेला माझा अधिकारी भ्रष्टाचार करतो आणि सही करणारा अधिकारी अटकतो. माझी अधिका-यांना विनंती आहे की तुम्ही सांगीतल म्हणून सही

कशाला करता. संजय कुलकर्णी एक कुलकर्णी एवढा मोठा भ्रष्टाचार करु शकत नाही. त्याना एकटयाला तुम्ही पनीशमेंट दिलेली आहे. यामध्ये कोण कोण आहे हे काढा, इन्क्वॉयरी रिपोर्ट घ्यायला पाहीजे. का आला नाही पाच दिवसात अहवाल, आयुक्त साहेबांनी पाच दिवसात सांगीतल होतं. आज जनरल बॉडी चालू आहे, जनरल बॉडीमध्ये हा प्रश्न येणार हे तुम्हांला माहीती आहे. याठिकाणी रिपोर्ट तुम्ही वाचून दाखवा. मा.महापौर साहेब, नगरसेवकांच्या माथेवर लावलेला हा कलंक काढावा आणि याच्या बद्दल खरं काय आणि खोट काय याच स्टेटमेंट दयायला सांगाव आणि व चुकीचे काम केलेल्यांवर कारवाई करावी.

**मा.शमीम पठाण -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता ज्येष्ठ नगरसेवक मा.आर.एस.कुमार यांना धन्यवाद देते की त्यांनी रोजचे मरण आज समोर आणलेले आहे. आता आपण नेहमीच म्हणतो ज्या झाडाला फळ असतात त्याच झाडाला लोक दगड मारतात. तस कोणीही काहीही केल, कोणी शिव्या जरी दिल्या तरी ते पुर्वीच्या म्हणजे मलातर असं वाटत ते अस करतील पुर्वजन्मीला, पुर्वाश्रमात अशावेळी ते कोणत्या पक्षाचे होतेतर ते राष्ट्रवादी. कोणीही काहीही केल की राष्ट्रवादी. खरेदी करताना दरपत्रक कोण मागवतं, ते दर तपासून कोण पाहतं. ते दर तपासत असताना तुम्ही याठिकाणी ज्यांना या कामाचा पगार देता ते सन्मा.अधिकारी यांना मी विचारु इच्छिते की कोणते नगरसेवक तुमच्याकडे आले, कधी आले, कोणाची शिफारस केलेली आहे काय. तुम्ही टेंडर मागविता मग त्या टेंडरमध्ये आम्ही कोणी आदलाबदल केलेली आहे का. हे प्रोसिजर अधिकारी राबवित असतीलतर आणि फक्त स्थायी समिती समोर तो विषय मंजूरीसाठी येतो आणि इतक्या घाईघाई मध्ये तो विषय येतो. त्यांना माहीती आहेनां की आषाढ महीना येणार आहे. आपल्याकडे वारी येणार आहे. आपल्या शहरातून सर्व वारक-यांचे पाय आपल्या शहराला लाभणार आहेत. दरवर्षी हा वाटपाचा कार्यक्रम असतो तरी अगोदर सहा महीने हा विषय का आणु नये. आयुक्त साहेब आपण त्यावेळेला नसताल परंतु आपल्या सारख्या उच्च पदस्थ आणि आयएएस अधिका-यांनी सुध्दा सहा महीने अगोदर तो विषय आणावा. प्रत्येक गोष्टीत दिरंगाई, प्रत्येक गोष्टीत अधिका-यांची घाईगडबड. आम्ही तुम्हांला लेखी लिहून दयायचे का, की आषाढी एकादशी येणार आहे. आषाढीवारी सुरु होणार आहे आणि त्यासाठी या वस्तू आपण घ्यायच्या अशी काही पध्दत आहे का. प्रत्येकवेळेस उठसुट नगरसेवक, चाललं काय. आणि एकही अधिकारी हे पुढे येत नाहीत. मा.आयुक्त साहेब, कोणीही आरोप केले की ते काम तुम्ही बंद करता. तुमच्या हातामध्ये एवढी मोठी यंत्रणा आहे. कोणीही पत्र दिले की जागेवर फाईल थांबली. जे काम चालू आहे त्याचे कितीही नुकसान होऊ दया, एखाद छोट पत्र आले की तुम्ही ते काम बंद करता त्याची शहनिशा केली जात नाही. आपल्या अधिका-यांकडून सांगीतल जातय ज्यांनी पत्र दिलय त्यांना भेटा. तरी आपण शहनिशा करावी. आपण सांगावे की या मुर्तीमध्ये कोणी काय केलेल आहे. मा.महापौरांनी एवढेच सांगीतले, जादाच्या घ्या त्या घेतलेल्या नाहीत. जे वर्तमानपत्र

महाराष्ट्रात नव्हेतर भारतामध्ये अग्रेसर आहेत, जगामध्ये त्याच्या प्रती जातात त्यांनी आदि साडेनऊशे, साडेनऊशे, साडेनऊशे आणि नंतर आता साडेसहाशेवर आयुक्त साहेब तुम्हांला कोणी पत्र दिले आहे का तोंडी सांगीतलेले आहे हे अधिका-यांनी आम्हांला स्पष्ट सांगावे. जे कोणी नगरसेवक असतील त्यांना सुध्दा विचारणा केल्याशिवाय राहणार नाहीत. प्रत्येकवेळेस बातमी वाचली की आम्ही सुध्दा निगरगट्ट होत चाललो आहोत. तेच तेच रोजचंच मड आहे. आता सहनशिलता संपत आलेली आहे. आणि म्हणून ज्या अधिका-यांनी हे काम केलेल आहे, इव्हन मुर्ती खरेदीच सुध्दा जे कोणी ठेकेदार आहेत त्यांच्या बाबतीत यापुर्वी काही कारवाई केलेली आहे का आता केलेली आहे का. सर्व माहीती आयुक्त साहेब आपण या अधिका-याकडून ती आम्हांला माहीती करुन दयायची आहे. आमच्या सारख्यानी कोणी पत्र दिलेले आहे का. तसं काही नसताना कोण कोणाकडे गेलय, कोणी पैसे दिलेले आहेत हे जाहीर सांगावे, लगेच नावानिशी सांगा तर ते आरोप खरे. प्रत्येक वेळेस आम्ही किती सहन करायचे यालाही काही मर्यादा असते, आणि कोणाला जर आमच्यावर आरोप करत असताना एखादयाला जर गुदगूल्या होत असतीलतर त्यांनी त्या स्वत:लाच करुन घ्याव्यात. तुम्ही कुठे आहात, काय करतात हे सगळयांनाच सगळ माहीती आहे. मा.आयुक्त साहेब, आपण या महापालिकेचे कायदयान्वये सर्वासर्वे आहात आणि आम्ही जरी काही चुका केल्यातर त्याच्यावर पांघरुन न घालता आपल्याला कायदेशिर अधिकार आहेत की त्यामध्ये आपण काही बदल करु शकता, आपण थांबवू शकता. एखादयावेळेस तो निर्णय फिरवूही शकता. मग असं असताना ऊठसुट आम्ही का म्हणून टिका सहन करायची. त्यामुळे आपण आपल्या प्रशासनाकडून व्यवस्थित आणि ताबडतोब चौकशी करायला हवी होती आणि हे सर्व थांबवायला पाहीजे होते. भंडारातून जी खरेदी होते त्याच्यावर आपल लक्ष केंद्रीत करा. त्याठिकाणी काय चालते ते तुम्ही बघा. त्याठिकाणी निवीदा प्रक्रीयेला कोण नगरसेवक असतो, निवीदा उघडताना कोण नगरसेवक असतो. आमचे कोणी प्रतिनिधी बसतात का आणि यांनाच ती निवीदा दया असे कोणी सांगतात का. तुम्ही तुमच्या नियमाप्रमाणे सगळ करत असताना हे कसे घडते. त्या अधिका-यांचीही जबाबदारी आहे त्यांनी संपुर्ण जबाबदारी घेतली पाहीजे एवढेच सांगावयाचे आहे

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता शमीमताई पठाण यांनी विषय काढला या संदर्भात आयुक्तांनी खुलासा करावा म्हणजे खरे काय खोटे काय हे समजेल. दोन्ही विषयाचा खुलासा करावा त्यानंतर आम्हांला बोलता येईल.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सारख्या सारख्या पेपरला बातम्या येतात. आज जगजाहीर आहे पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये राष्ट्रवादीची सत्ता आहे आणि राष्ट्रवादीची सत्ता असताना याठिकाणी जे काही काम होतात या सभागृहामध्ये असलेल्या सर्व नगरसेवकांना ते माहीती आहे. सभागृहाच्या बाहेरचे काही लोक असतील त्यांनी टिका टिप्पणी केलीतर आपण समजू शकतो की त्यांना काही गोष्टींची कल्पना

नाही. पण सभागृहामध्ये असलेल्या माणसानी आपल्या सभागृहातील लोकांवरती आरोप केलेले आहेत. उदा. मुर्तीचा विषय असेल, गॅसदाहिनीचा विषय असेल, इतरही बरेचसे विषय असतात की त्याच्यामध्ये भ्रष्टाचार झाला म्हणतात, कोणी केला त्यांचे नाव तरी घ्यावे. ज्यांनी केला त्यांचे नाव सांगीतलेतर आम्ही माहीती घेऊ आयुक्त साहेब कारवाई करतील. पण एक सत्ताधारी असताना चुक झाली का, याठिकाणी सभागृहात विषय मंजूर करुन घेणे, वॉर्डातील काम करुन घेण्यासाठी तारेवरची कसरत करावी लागते. आज माहीतीच्या अधिकारामुळे एक एक माणुस त्यात सिमेंट वापरला का, वाळू वापरली का, प्लॅस्टर किती जाडीच आहे, मातीच्या विटा आहेत का सिमेंटच्या विटा आहेत या सगळया गोष्टीला त्याठिकाणचा ठेकेदार आणि जे.ई.ला फेस करावे लागते. झोपडपट्टीचा परिसर आहे आम्हांला त्याठिकाणी बसून काम करुन घ्यावी लागतात. सभागृहातील पेपरमध्ये एखादी बातमी आली की भ्रष्टाचार, राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या नगरसेवकांचा भ्रष्टाचार. लोक म्हणतात काय भ्रष्टाचार, आम्ही आमच्या स्थानिक लोकांशी चर्चा करतो. या सभागृहामध्ये आपले काही पुढारी पण आहेत त्यांनी सांगावे ज्यांनी भ्रष्टाचार केला त्यांचे तोंड बंद केले पाहीजे. ताबडतोब पेपरला बातमी दिली पाहीजे हे खरे आहे का खोटे आहे. भ्रष्टाचार कोणी केला त्याला बुटाने बडवले पाहीजे. त्याला सस्पेन्ड केले पाहीजे. परंतु खोटे म्हणत असेलतर त्याच्याही तोंडात मारले पाहीजे. लोक आम्हांला नांव ठेवतात, तुम्ही चो-या करतात म्हणतात. रेडझोन मध्ये काम कसे करुन घ्यायचे, लोकांना फेस करावे लागते. ४७ टक्के बिलो काम आहेत, मंजूर कोण करतय. ४७ टक्के बिलोची काम आपण मंजूर करतोत. अधिका-यांकडून दर कमी करुन देण्याचे पत्र येते काय करणार तो ठेकेदार. माझ्या भागामध्ये झोपडपट्टीचा भाग आहे. त्याठिकाणी पुजारी कार्यकारी अभियंता आहेत. त्यांच्या हाताखाली शितोळे म्हणून आहेत तो माणूस कामालाच येत नाही. डोईफोडे यांना हजारवेळेस सांगीतले तरी सुध्दा त्या माणसाची बदली झालेली नाही. माझ्या भागामध्ये फडणीस शिक्षक आहे एक नंबरला शाळा चालते, त्याचा शंभर टक्के रिझल्ट असतो, विदयार्थ्याची संख्या वाढलेली आहे. महापालिकेच्या इतर शाळेमध्ये विदयार्थ्याची संख्या कमी आहे, ३०-३० मुलामध्ये एक एक शिक्षक आहे व माझ्याकडे ६० ते ७० टक्के मुल आहेत आणि एकच शिक्षक आहे. विचारलेतर त्या शाळेला मान्यताच नाही. मान्यता घ्यायची कोणी, आम्ही घ्यायची का. दहा ते पंधरा वर्षे झाले आमचा जीव तुटतो आम्ही सत्तारुढ पक्षाचे नगरसेवक आहेत, दोन थोबाडीत मारावे वाटते परंतु नाही मारु शकत. सत्तारुढ पक्षाचे नगरसेवक आहोत. नगरसेवकांची बदनामी होते. माझी विनंती आहे की पेपरमध्ये चुकीच्या बातम्या यायला लागलेल्या आहेत. आताच पठाणताईनी सांगीतल आहे की ज्या झाडाला फळ आहेत त्याच झाडाला लोक दगड मारतात. आंब्याच झाड असेलतर आंबा आहे म्हणूनच दगड मारानां. आंब्याला दगड मारता मारता बाजूला जो पेरु आहे त्याला दगड लागतोनां. करणारे एक असतात पण त्याच्यामुळे तुम्ही बाकीच्या लोकांना का दोष देता, नाव सांगावे. यांनी भ्रष्टाचार

केला म्हणून सांगावे. एक बोट समोरच्याकडे असेलतर चार बोट स्वत:कडे असतात. आयुक्त साहेब चौकशी नेमावी व सभागृहाला माहिती दयावी, धन्यवाद.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. वर्तमानपत्रामध्ये गॅसदाहिनीबद्दल बातम्या येतात त्याबद्दलची टेक्निकली माहीती मी देतो. विषय असा आहे की गॅस पासेस करताना गॅसस्ट्रेन्थ असतो, गॅसस्ट्रेन्थमध्ये वॉल, फिल्टर असतो. ऑल्युमिनीयम असे स्पेशल मटेरीएलमध्ये ते असते आणि हे गॅसस्ट्रेन्थ पास बनवतात त्या जर्मनीच्या स्पेशल कंपन्या आहेत. इंडीयनमेड सुध्दा आहेत त्यांचे आणि याचे दरामध्ये जवळ जवळ दुप्पट फरक आहे. तुम्ही टेंडरींग करताना ज्याची मागणी केली आहे त्याचा खुलासा करणे गरजेचे आहे. गॅस वाहण्यासाठी जे पाईप वापरला जातो त्याच्यामध्येही दोन प्रकार असतात त्याच्या रेटमध्येही डबल टिबल फरक असतो. त्यामुळे असे रेट वाढले जातात. निश्चित स्पेसिफिकेशन बघावे. आपण काय मागविले त्यानुसार रेट आले का नाहीत हे तपासणे आवश्यक आहे. सर्वाचा गैरसमज दुर करणे गरजेचे आहे. त्याच्यामध्ये गॅसस्टोरेज टँक त्याचाही रेट वेगळा असतो, मटेरीयल वेगळ असतं. त्यामुळे किंमती वाढल्या जातात. म्हणून जे कोणी अधिकारी आहेत ते येथे कार्यरत होते त्यांनी कोणते स्पेसिफिक्केशन मागवून कोणते आयटेम त्यासाठी पाहीजे होते त्याची संपुर्ण माहीती सभागृहाला दयावी ज्यांचा गैरसमज झालेला आहे त्यांना देणे गरजेचे आहे, एवढच मी आपल्याला सांगतो, धन्यवाद.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आयुक्त साहेबांना विनंती करायची आहे की खरंच भ्रष्टाचार होत असेलतर त्याचा मी तीव्र शब्दामध्ये याठिकाणी निषेध करतो. आणि त्या संबंधित मग ते अधिकारी असो, पदाधिकारी असो, ठेकेदार असो त्यांच्यावर कारवाईची मागणी याठिकाणी जाहीर करतो. खरे पाहता हा भ्रष्टाचार खरच होतो का, का राजकीय स्टंट आहे. का इलेक्शन आले म्हणून याला काहीतरी गुमजाव करण्याची प्रथा आहे याचे स्पष्टीकरण होणे गरजेचे आहे. जर खरंच भ्रष्टाचार होत असेलतर त्याची सखोल चौकशी करा व संबंधित अधिकारी असेल, संबंधित पदाधिकारी असेल त्यांच्यावर आयुक्त साहेब आपण कारवाई करावी अशी जाहीर मागणी करतो. वर्तमानपत्रामध्ये वाचल्यानंतर आम्हांला असे कळते आणि आता आपल्याला विचारलेल आहे आणि ती प्रथा या महापालिकेत सुरु झालेली आहे. आपले ई-टेंडरींग असताना मग ते सदोष आहे का. मग त्यावेळेला त्याठिकाणी फेर कॉम्पेटेशन होते का नाही. तिथ पण नगरसेवकांचा हस्तक्षेप आहे का. मला एक सांगावे की गुजरात मध्ये एवढयाची, लोणावळयामध्ये एवढयाची, तळेगाव मध्ये एवढयाची, नाशिकमध्ये एवढयाची. मग ई-टेंडरींग झाल त्यावेळेस जे ठेकेदार लोक आहेत ते ब्लँकेट घेवून झोपले होते का. आमच्यावेळेस स्पर्धा का केली नाही. आमचे जे तज्ञ लोक आहेत या तज्ञ लोकांनी त्यांना बोलवायचं आणि त्यांनी येथे कॉम्पेटेशन करत थांबायचं आणि या महापालिकेचे कोटयावधी रुपये वाचवायचे असं चांगल काम करुन त्याच त्यांनी क्रेडीट घ्यावे.

कॉम्पेटेशन करताना ही मंडळी जाते कुठे. आणि मग ई-टेंडरींगमध्ये एवढी पारदर्शकता असेलतर रिंग होती कशी काय. जर आपली ई-टेंडरींग पध्दत चुकीची असेलतर तुम्ही ती ताबडतोब बदला. जास्तीत जास्त लोकापर्यंत ही माहीती जाते का नाही याची पाहणी करावी. प्रशासन काम करणार आणि बदनाम होणार राष्ट्रवादी काही संबंध नाही आमचा. अधिकारी, आयुक्त, प्रशासनाची चुक असेलतर ती दुरुस्ती आपण करावी आमचा काय संबंध आहे. उदया आम्ही ठराव करु शनिवारवाडा विकून टाकातर तो विकणार का. आपल्या या प्रक्रीया जर चुकीच्या असतीलतर त्या दुरुस्ती व्हायला पाहीजेत. मागे मशिनच पण असंच झाल. शिलाई मशीनमध्ये भ्रष्टाचार, शिलाई मशीनमध्ये भ्रष्टाचार मग करा निवीदा परत. त्यावेळेला सुध्दा जी मशिन स्वस्त होती ती मशिन का घेतली नाही. त्यावेळेस त्या महाशयानी का कोट केल नाही. येथून मागच्या दोन वर्षाची तुम्ही मशिन पाहीलीतर गेल्यावेळेस निवीदा मिळाली त्या निवीदेपेक्षा ४५० रुपयानी जास्तचीच दोन वर्षापुर्वी मशिन घेतलेली आहे व ती पण कमी दर्जाची मशिन घेतली. त्यापेक्षा चांगल्या सुविधा असलेल्या मशिनमध्ये भ्रष्टाचार झाला ठिक आहे म्हणलं रिकॉल करा. त्यावेळेला आम्ही काही समर्थन केल का. आयुक्तांनी भीजत घोंगड ठेवलं आणि थांबा थांबा. आणि मग ही कुठली प्रथा आहे. जर तुमच्या निवीदा प्रक्रियेमध्ये दोष असेलतर त्याची दुरुस्ती करावी. आमच्या राष्ट्रवादीचा पदाधिकारी असेलतर त्याच्यावर तुम्ही कारवाई करा. नाहीतर त्यांच नाव या सभागृहामध्ये जाहीर करा आम्ही राष्ट्रवादीमधुन त्यास निलंबीत करु, काढून टाकू परंतु ही आम्ही खोटी बदनामी सहन करणार नाहीत.

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण सगळे पत्रकार ऐकतात, पत्रकार बंधू मला वाटते पंधरा ते वीस वर्षे झाले लिखाण करतात त्यांना बातम्या आपलेच लोक देतात. स्थायी समितीमध्ये एवढे नगरसेवक आहेत त्यांनी सांगावे. "सौ चुहे खाके बिल्ली चले हज को" अरे, काय प्रकार आहे. सांगता आम्ही हे केल नाही ते केलं नाही बाबासाहेब एकटा आहे नां साक्षीदार. कोणी काय केल ते मी सगळ सांगू शकतो. शिक्षण मंडळाची हायकोर्टात केस दाखल केली. कपडे दाखविल्यानंतरही काय केल, का काही करत नाहीत. आयुक्त साहेब काय करणार आहेत, स्थायी समितीचा विषय आहे स्थायी समिती ठराव करते. विधान परिषदेमध्ये एक आमदार बोलले भ्रष्टाचार होतो कसा विचार करुन घ्या. बिलो टेंडर काय चालले. कुठलेही काम करायचे म्हणलेतर आपले ईंजिनीअर लोक आहेतनां. ईंजिनीअर लोकांना सांगा रस्ता करायचा असेलतर त्याला किती खर्च येतो. त्याच्यानंतर तुम्ही ठरवा, हा खर्च १ कोटी येत असेलतर बाकीचे ५० लाख ६० लाख हे चुकीचे आहे. शिलाई मशीन टॉप मोस्ट मशिन याठिकाणी आहे चायनाला कशाला गेले तुम्ही, याठिकाणी आहेत नां शिलाई मशिन. सामनामध्ये डिटेल्स बातमी दिलेली आहे. शववाहीनीचा विषय आहे. आज जीवंत माणसाला गाडता येईल पण मेलेल्या माणसालातरी सोडा. गॅसच आलेला नाही तर त्याच बील कोणी मंजूर केलं. आयुक्त साहेब, तुम्ही आले मी त्यावेळेला सुध्दा तुमचं अभिनंदन केलेले

होते. श्रीकर परदेशी साहेब होते तेथे कोणाचा आवाज चालत नव्हता. एवढया मोठया आवाजात बोलत सुध्दा नव्हते, तेवढी ताकद त्या माणसाने निर्माण केलेली होती. काम शिस्तीत चालू होतं. शववाहीनीचे डायरेक्ट कंपनीचे टेंडर मागवा. त्यात चांगली कोणती आहे ती बघा. सीएनजी किती लागते हे बघा, एक मयत जर जाळायची असेलतर दहा मिनीटे अगोदर ती चालू करावी लागते नंतर पाच मिनीटाने ती मयत खल्लास होते. मग त्याठिकाणी गॅसच पुरविला नाहीतर मयत जाळली कुठून हे विचारा. आयुक्त साहेब, तुम्ही जरा स्ट्राँग बना तरच काम होतील. तुम्हांला सगळे उलटसुलट बोलायला बघतात. तुम्ही काहीतरी तुमची स्ट्रॅचेडी ठरवा. कुठलीही वस्तु मागविताना कंपनी कडून टेंडर मागवावे आणि कुठे थांबवायचे ते थांबवावे एक मिनीटात सर्व बंद होईल. गेली चार पाच वर्षे हे मी बघतो आहे, बघुन मला वीट आलेला आहे. म्हणून हे बोलायला लागल. कोणाला राग आलातर राग मानु नका. भक्ति-शक्तिच्या त्याठिकाणी तुकाराम महाराज, शिवाजी महाराज बघतात सगळं. आयुक्त साहेब तुम्ही स्ट्रेट फॉरवर्ड व्हावे. शिक्षणमंडळात सुध्दा मुलांना चांगले कपडे दयावे कुठलाही असू दया जोपर्यंत जीवंत असतो त्यालाच परवानगी दिली जाते. आहो, तो मेल्यानंतर त्याला कोणी विचारत नाहीत. मारुती माने एवढा मोठा हिन्द केसरी त्यांना औषधाला पैसे नव्हते. शेवटी कोण बघतय. “उगवत्या सुर्याला नमस्कार केला जातो, मावळत्या सुर्याला कोणी नमस्कार करत नाहीत.” ही वस्तुस्थिती आहे. म्हणून त्यांना बोलवा त्यांचा सत्कार करा, पुढ त्यांच्या भविष्यामध्ये काय करायच आहे हे सुध्दा करणे काळाची गरज आहे. एवढच मी बोलतो, जयहिन्द, जय महाराष्ट्र !

**मा.नारायण बहिरवाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कुमार साहेबांनी चांगला विषय चर्चेला घेतलेला आहे तो गेली आठ दिवस झाले वर्तमानपत्रामध्ये सातत्यांने गाजत आहे. याच्यामध्ये स्थायी समिती, राष्ट्रवादी कॉंग्रेस, आयुक्त साहेब तुमच्यासाठी सांगतो प्रशासन आणि संबंधीत पर्यावरण खात्याची मोठया प्रमाणात बदनामी होत आहे. हे मी स्थायी समितीच्या सभेमध्ये सुध्दा सांगीतलेले आहे. स्थायी समितीच्या विषयपत्रीकेवर पिंपरी वाघेरे, वाकड, पिंपळेगुरव, पिंपळेसौदागर आणि दापोडी याठिकाणी गॅस शववाहिनी बसविण्यांचा विषय स्थायी समितीमध्ये विषयपत्रीकेवर आलेला आहे. स्थायी समितीने मांडलेल नव्हतं की या पाच ठिकाणी शववाहीनी बसवा म्हणून. हा विषय पर्यावरण विभागाने याठिकाणी आणलेला आहे. तुमचा फोन आलेला होता विषय मंजूर करा म्हणून. माझ्या वॉर्डातील आहे तेवढा विषय मंजूर करावा म्हणून. ज्या दिवशी विषयपत्रीकेवर विषय होता त्यादिवशी एक मोर्चा आला, आंदोलन झाले. स्थायी समिती पुढे देखील आंदोलन झालं. आमच्या अध्यक्षानी सांगीतल की विषय आताच आमच्यासमोर आलेला आहे विषय आम्ही मंजूर केलेला नाही. विषय विषयपत्रीकेवर आहे आपण मंजूरी दिलेली नाही तुमचे काय निवेदन असेल ते निवेदन तुम्ही आमच्याकडे दया त्याची आम्ही माहीती घेऊ आणि मग नंतर काय ते पाहू. त्याच्यानंतर ही मंडळी तुमच्या

दालनात गेली त्याठिकाणी त्यांनी आपल्याला निवेदन दिलेले आहे. त्यावेळेला आपण त्यांना असं म्हटल ठिक आहे मी याची माहीती घेतो. ज्यावेळेला विषय स्थायी समिती समोर चर्चेला आला त्यावेळेला आम्ही तुम्हांला सांगीतले होते की या विषयाच्या संदर्भात वर्तमानपत्रामध्ये बातम्या येतात. स्थायी समितीवर, राष्ट्रवादी पक्षावर भ्रष्टाचाराचे आरोप होतात. विषय आताच विषयपत्रीकेवरती आलेला आहे. आम्हांला त्याची काहीच माहिती नाही. आम्हांला माहीती देण्यासाठी पर्यावरण विभागाचे जे कार्यकारी अभियंता आहेत संजय कुलकर्णी ते सभागृहामध्ये उपस्थित नसल्यामुळे आम्ही तो विषय तहकूब ठेवला. आम्ही कोणाच्या मोर्चाला घाबरलेलो नाही. कोणी विषय करु नका म्हणून आम्ही विषय तहकूब ठेवलेला नाही. संबंधित विषयाची माहीती जोपर्यंत आम्हांला मिळत नाही तोपर्यंत आम्ही हा विषय मंजूर करणार नाहीत असे आम्ही स्थायी समितीमध्ये सांगीतलं व तो विषय तहकूब ठेवलेला आहे. हा विषय तहकूब ठेवताना मी तुम्हांला विचारल त्यावेळेस मला माहिती अशी मिळाली होती की तुम्ही त्या अंदोलन कार्यकर्त्यांना असं सांगीतल होत की या विभागाचे जे कार्यकारी अभियंता संजय कुलकर्णी आहेत त्यांना मी सक्तिच्या रजेवर पाठवितो आणि हे विषय मागे घेतो. पहील्या मिटींगमध्ये मी तुम्हांला विचारल माझ्या कानावरती असं असं आलं. त्यावेळेस आपण मला सांगीतल की मी अशा पध्दतीचे काहीही करणार नाही. संध्याकाळी प्रशासनाचे प्रमुख डोईफोडे यांनी संजय कुलकर्णी यांना फोन केला की सक्तिच्या रजेवर तुम्हांला पाठवायचे आहे तुम्ही तुमची रजा वाढवून घ्या. तुम्ही स्थायी समितीमध्ये साहेब हे बोललात नंतर तुम्ही डोईफोडे यांना सांगीतल. ज्यावेळेला हा विषय समितीपुढे चर्चेला आला त्यावेळेला आम्ही आपल्याला काय सांगीतले की साहेब, याच्यामध्ये आमच्यावरती आरोप होतात, स्थायी समिती पुढ आरोप होतात, प्रशासनावरती आरोप होतात, पर्यावरण खात्यावर आरोप होतात आपण याची सखोल चौकशी करावी असे बोललो होतो. याच्या मध्ये खरे काय खोटे काय हे एकदा जनतेला कळू दया. म्हणजे विषय प्रशासनाने आणायचे स्थायी समिती फक्त आर्थीक खर्चाला मंजूरी देते. स्थायी समिती म्हणत नाही की तुम्ही हे विषय आणा ते विषय आणा. बजेटमध्ये दहा कोटी तरतूद आहे मग त्यावेळेस तुम्हांला दिसल नाही का. पर्यावरण विभागाने विषय आणलेला आहे. लाकड जाळणे, गौ-या आणणे याच्यामध्ये इतकी क्लिष्टता आहे म्हणून पर्यावरण विभागाचे हे विषय पुढे आलेले आहेत. हे काही आम्ही सांगीतल नाही. ई-टेंडरीग आहे, वर्तमानपत्रामध्ये आपली निवीदा देतो, लघुत्तम ठेकेदार येतात. निवीदा प्रक्रीया पुर्ण झाल्यानंतर जो लोएस्ट येतो आणि त्याची जी किमंत ठरवली जाते मग तुम्हांला पत्र दिल जातं की ही वस्तु एवढयाला न येता एवढयाला येते. मग योगेश बहल म्हणतात ते बरोबर आहे. ज्यावेळेला ई-टेंडरींग आहे, ज्यावेळेला आपण पब्लिश करतो त्यावेळेला हे लोक झोपलेले असतात का. त्यावेळेला हे लोक टेंडर का भरत नाहीत. शिलाई मशिनच्या बाबतीत झालं तस शवदाहीनीच्या बाबतीत झालेल आहे. याच्या अगोदर सुध्दा निवीदा काढलेल्या होत्या आणि प्रशासनाने त्या

मंजूर केलेल्या नाहीत. मुलेपने अनेक आक्षेप त्याच्यावरती नोंदवलेले आहेत की सांगवीच्या गॅसदाहीनीच्या तुलनेमध्ये याचे रेट खुप आहेत. त्यामुळे ते नाकारले त्याठिकाणी मुलेपच आपण कौतूक करायला पाहीजे. त्या निवीदा नाकारल्याच्या नंतर पुन्हा आणल्या आहेत. याच्यामध्ये कॉम्पेटेशन मोठयाप्रमाणावर झालेल आहे. खात्यान विषय मांडला, मुलेप कडे गेलं आणि विशेष म्हणजे साहेब, त्या डॉकेटवर तुमची सुध्दा सही लागते, मग तुम्ही सही करतान पाहीलेले नाही का, की हे चुकीचे आहे, हे बरोबर आहे. तुम्ही थांबवायला पाहीजे. आयुक्त साहेब तुम्ही संपुर्ण खात्याचे प्रमुख आहात प्रत्येक फाईल आपल्याकडे येते आपण डॉकेटवर सही करत असताना आपण नीट विषय वाचला नाही. या सगळया घटनेला साहेब तुम्ही देखील जबाबदार आहात. वर्तमानपत्रामध्ये भ्रष्टाचाराच्या बातम्या येतात. आमचा पक्ष याच्यामध्ये कारण नसताना बदनाम व्हायला लागलेला आहे. मग हे तुम्ही त्याचवेळेला का केले नाही. संजय कुलकर्णी यांना त्यावेळेलाच तुम्ही बोलावून घ्यायला पाहीजे होते. तुम्ही त्यावर लिहायला पाहीजे होत “प्लीज स्पिक”, “चर्चा” का नाही लिहील तुम्ही मग हे भ्रष्टाचाराचे खापर आमच्या माथी कारण नसताना का फोडल जातं. उगीचच साप साप म्हणून भूई धोपटण्यामध्ये काय अर्थ आहे. मागच्या मिटींगमध्येही सांगीतल होत की हा विषय आम्ही मंजूर करणार नाहीत कारण संजय कुलकर्णी जोपर्यंत सभागृहात उपस्थित नाहीत, माहीती देत नाहीत, आम्हांला काय माहीती त्याची. तळेगावला काय आहे, अहमदाबादला काय आहे हे आम्हांला काय माहिती आहे. इंडिका कार सुध्दा आहे आणि मर्सिडीस सुध्दा आहे इंडीका कार आणि मर्सिडीसची तुलना होऊ शकते का. मग याचही तसेच असेलनां. ही माहीती घेण्यासाठी संजय कुलकर्णी जोपर्यंत सभागृहात येत नाहीत तोपर्यंत माहीती आम्हांला कशी मिळणार आहे. संजय कुलकर्णी यांना सक्तिच्या रजेवर आपण पाठवलेले आहे त्यांना बोलावून घ्या म्हणून त्यादिवशी आम्ही ठराव पण केला. आम्हांला माहीती देऊ दया. याच्यामध्ये जर चुकीच झालेल असेल, याच्यामध्ये जर भ्रष्टाचार झालेला असेलतर, याच्यामध्ये जर अनियमीतता असेलतर तुम्ही विषय माघारी घ्या, आम्ही असा विषय तुम्हांला माघारी घेऊ देणार नाहीत. तुम्हाला स्पष्ट केल पाहीजे, तुम्हांला जाहीर केल पाहीजे की हे चुकीचे आहे म्हणून. हा बॉल आता आमच्या कोर्टा मध्ये आहे. आम्ही असा विषय तुम्हांला माघारी घेवू देणार नाहीत. तुम्ही संजय कुलकर्णींना सक्तीच्या रजेवर पाठवुन फार मोठी चुक केली आहे आम्हांला संजय कुलकर्णींना पाठीशी घालायच नाही. आम्हांला कोणाच समर्थन सुध्दा करायच नाही. जो दोषी असेल त्याला शिक्षा झाली पाहीजे. पण तुम्हांला हे जाहीर केले पाहीजे हे चुकीचे आहे, जर चुकीचे असेलतर ते तुम्ही केल, तुम्हीच माघारी घ्या, आम्ही ते घेणार नाहीत. याच्यामध्ये कारण नसताना स्थायी समितीची बदनामी होऊ लागलेली आहे. त्या विषयाला आम्ही मंजूरी दिलेली नाही. कारण नसताना साप साप म्हणून भूई धोपटता हे अत्यंत चुकीच आहे. स्थायी समितीने भ्रष्टाचार केला, स्थायी समितीने भ्रष्टाचार केला म्हणून. स्थायी समितीमध्ये फक्त काही राष्ट्रवादीचेच नगरसेवक

आहेत का, हे आहेतना शिवसेनेचे नगरसेवक. विषय सुध्दा आणखीन मंजूर झालेला नाही. लोकशाहीमध्ये आंदोलन करणे, धरणे धरणं, निवेदन देणे, एखादया गोष्टी मध्ये जर काही डावूट आला असेलतर निश्चितपणे तुम्ही करु शकता आम्ही त्याला कधीही विरोध केला नाही हे स्थायी समितीमध्ये आम्ही जाहीर सांगीतल आहे. तो त्यांचा अधिकार आहे. पण जेंव्हा आरोप होतात तेव्हा तो सुध्दा सिध्द करून दाखवायच त्यांच काम आहे किंवा प्रशासनाने आम्हांला सांगाव की हे चुकीचे आहे, त्यांनी माघार घेवू दया आमच काहीही म्हणण नाही. कुलकर्णींना सक्तीच्या रजेवर का पाठविले याचा खुलासा करावा.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह आज खरतर महीनाभर अनेक विषयावर वर्तमानपत्रामध्ये अनेक बातम्या याठिकाणी प्रसिध्द झालेल्या आहेत. स्थायी समितीमध्ये शिवसेनेचे दोन सदस्य आहेत आणि यापुर्वी सुध्दा होते परंतु गेल्या महीना दिड महीन्यामध्ये ज्या पध्दतीने वर्तमानपत्रामध्ये बातम्या प्रसिध्द होतात. खरच याठिकाणी अनेक बाबतीमध्ये, आरोग्याच्या बाबतीमध्ये, स्वच्छतेच्या बाबतीमध्ये महापालिकेला मोठमोठे पारितोषीक मिळालेले आहेत. परंतु या सगळया बातम्या पाहील्यानंतर सर्वसामान्यांच्या मनामध्ये सुध्दा येतं या संपुर्ण महाराष्ट्रामध्ये ज्या पध्दतीने विषय एक एक पुढे येतो, स्थायी समितीमध्ये असताना आयुक्तांना आणि पत्रकार बांधवाना मी याठिकाणी जरुर नमुद करु इच्छितो की, शिवसेनेच्या वतीने चुकीच्या विषयाला त्याठिकाणी ठामपणे विरोध केलेला आहे. सुरवातीला एका विषयाचे मा.आयुक्तांना माझे त्यासंदर्भातील पंचवीस पत्रे आहेत. परंतु एकाही पत्राचे उत्तर मला मिळालेले नाही. याचा अर्थ शिवसेनेनी कुठल्याही विषयला विरोध केला  नाही असा त्याचा अर्थ होत नाही. ज्या ज्या विषयामध्ये आम्हांला त्रुटी वाटतात ज्या ज्या विषयामध्ये आम्हांला असं वाटत की त्याठिकाणी भ्रष्टाचार झालेला आहे. मग तो ठेकेदारांच्या माध्यमातून असेल, प्रशासनाच्या माध्यमातून असेल, त्याठिकाणी शिवसेनेनी वेळोवेळी भुमिका घेतलेली आहे. माझ्याकडे पंचवीस पत्र आहेत ते मी याठिकाणी मुद्दाम आणलेले आहेत. विठ्ठल-रुक्मिणी मुर्ती खरेदी करण्याच्या विषयाबद्दल त्याठिकाणी वर्तमानपत्राला कोणी पत्र दिलेले असेलतर धनंजय आल्हाटन पत्र दिलेले आहे, स्थायी समितीमध्ये मी पत्र दिलेल आहे. महीनाभरानंतर बाकीच्या लोकांनी त्याची मागणी केलेली आहे. २८ तारखेला स्थायी समिती झाली. ऐनवेळचा विषय सन्मा.महापौर आपल्याच पत्राने आपल्याच सुचनेनी त्याठिकाणी अतीरीक्त ज्या दिवशी तुकाराम महाराजांची पालखी आकुर्डी याठिकाणी आली स्वागतासाठी त्या दिवशी मंगळवार होता, मंगळवार असताना आचानक त्याठिकाणी विषय पटलावरती आला. ऐनवेळचा विषय ३२५ मुर्ती खरेदी करण्याचा विषय आला. मला नारायण बहीरवाडे यांचे सुध्दा यठिकाणी मनापासून कैतूक करावेसे वाटतं. त्याचे कारण असे आहे की त्या विषयाला मी आणि नारायण बहीरवाडे यांनी विरोध केला. जर याठिकाणी अशाप्रकारचा सोहळा संपन्न झाला असेल, अशाप्रकारच्या मुर्त्या खरेदी केल्या

असतीलतर ३२५ मुर्त्या या कशासाठी पाहीजेत. मागणी कोणी केली म्हणून हा विषय आम्ही सगळया पत्रकाराना सांगीतलेल होतं. चुकीच्या पध्दतीने काम होत असेलतर शिवसेनेचा सदस्य म्हणून कधी मी समर्थन करणार नाही. त्यानंतर मी ताबडतोब त्याच दिवशी विषय बाजूला काढून ठेवला. त्याबाबत आयुक्तांना पत्र दिलेले आहे. ते पुढारी पेपरमध्ये प्रसिध्द केलेले होते. निवीदा प्रक्रियेमध्ये तीन संस्था आहेत एकाच कुटूंबातील दोन संस्था आहेत आणि दुसरी साई संस्था आहे. दराबाबत पत्रामध्ये उल्लेख केलेला आहे आणि तो पुढारी वर्तमानपत्रामध्ये प्रसिध्द झालेला आहे. २५०० रुपयाचा दर आणि आपल्या निवीदेमध्ये ३९०० रुपयाचा दर हा फरक मा.आयुक्तांना दाखवून दिला आहे. त्याच्यानंतर त्याच्यामध्ये एकाच कुटूंबातील त्या दोन निवीदा, त्याच्यामध्ये कुठल्याही प्रकारची स्पर्धा झालेली नाही हे सुध्दा पत्रामध्ये मी सन्मा.आयुक्त साहेबांना दाखवुन दिलेल आहे. म्हणून याची पुन्हा एकदा फेर निवीदा काढावी अशी विनंती मी त्याकाळात सुध्दा केलेली होती. जी काही उपसूचना ३२५ मुर्तीला आली त्यालाही माझ पत्र सन्मा.आयुक्तांना होतं की ही उपसूचना तात्काळ रद्द करावी. त्या मुर्तीची कुठलीही आवश्यकता याठिकाणी महापालिकेला नाही. परंतु कोणाचे तरी हीत जपण्यासाठी, कोणालातरी पोसण्यासाठी हा विषय आलेला असावा, मला व्यक्तीश: कोणावर देखील याठिकाणी आरोप करायचे नाहीत. परंतु जनतेच्या भावना, श्रध्दा पांडूरंगावरती, विठ्ठलावर आहेत. म्हणून कुठलाही सदस्य स्थायी समितीवरचा असेल, किंवा कुठलाही नगरसेवक असेल, असं त्याला वाटल नव्हतं. मीतर म्हणेल “दुधका दुध पाणी का पाणी” झाले पाहीजे. ज्यावेळेला अशाप्रकारची मागणी सन्मा.आयुक्त साहेबांना केली, सभागृहात सुध्दा मी विषय उपस्थित केला होता, सन्मा.आयुक्तांना मी सांगीतलं की अशाप्रकारचे काहूर माजले असेलतर अशाप्रकारच्या शंका कोणाच्या मनामध्ये असेल, वर्तमानपत्रामध्ये त्याप्रकारची सल व्यक्त होत असेलतर तुम्ही याच्यावरती समिती नेमा आणि त्याच दिवशी सन्मा.आयुक्तांनी सांगीतल होत की याच्यावरती चौकशी समिती नेमू. परंतु अजून कुठल्याहीप्रकारची चौकशी समिती त्यासंदर्भात झालेली नाही. ३ जुलैला मी पत्र दिलेल आहे त्याचे उत्तर अजूनही मला आलेले नाही. शिवसेनेच्या नगरसेवकांनी आंदोलन केले, मागणी केली याची चौकशी झाली पाहीजे. नेमका दोष कोणाचा आहे, प्रशासनाचा आहे का कोणाचा आहे हे सांगण्यासाठी आम्ही आंदोलन केलेले आहे. याच्यामध्ये कोणी कोणाचा स्वार्थ साधून घेतला हे चौकशी अंती आपल्या समोर येईल. त्यामुळे कोणी कोणावरती आरोप करायचे आणि कोणाला बदनाम करायचं हा धंदा आता याठिकाणी बंद झाला पाहीजे. प्रशासन म्हणून आपले काम महत्वाचे आहे. अशाप्रकारचा विषय आम्ही आणतो, आम्ही पत्र देतो त्याचे उत्तर जर आम्हांला मिळत नसेलतर माझा ओघ हा पहीला प्रशासनावरती राहील. परंतु ही माहिती दडविण्याचा कोणी प्रयत्न करत असेलतर तेही आम्ही सहन करणार नाहीत. गॅसदाहीनीच्या बाबतीत विषयपत्रीकेवर विषय होता, अशाप्रकारची चर्चा झाल्यानंतर मी विषय मांडला अशाप्रकारच्या वर्तमानपत्रामध्ये बातम्या आलेल्या आहेत.

नारायण बहीरवाडे आणि सर्व सदस्यांनी त्याला पाठींबा दिला, सन्मा.चेअरमनने त्याला पाठींबा दिला आणि सांगीतले की अशाप्रकारची चर्चा होत असेलतर याची चौकशी झाली पाहीजे. जोपर्यंत चौकशी होत नाही तोपर्यंत हा विषय पटलावरती तुम्ही आणू नका, त्याचा सगळा अहवाल आमच्या समोर सादर करा म्हणून त्याठिकाणी चेअरमनने आदेश दिलेले आहेत आणि सन्मा.आयुक्तांनी सुध्दा सांगीतलं की पाच दिवसात मी अहवाल सादर करतो, पण पाच दिवस आज उलटून गेलेले आहेत अजूनही मा.आयुक्तांनाचा अहवाल आलेला नाही. ज्यांना त्याठिकाणी नियुक्त केल त्यांना फोन करुन विचारलेतर ते म्हणाले माझ्याकडे कुठल्याही प्रकारचा असा आदेश आला नाही असं त्या अधिका-यांनी सांगीतलेल आहे. म्हणजे प्रशासन नेमक करतय काय. मी तर म्हणतो गॅसदाहीनीच्या विषयाच्या मुळावरती मी जातो. पर्यावरणाच रक्षण करायच आहे, पर्यावरणाच रक्षण करण्याचा मक्ता महानगरपालिकेमध्ये फक्त ईथ कोणालाही त्याचा कळवळाच नाही फक्त संजय कुलकर्णी यांनाच कळवळा दिसतो त्यामुळे अशाप्रकारची गॅसदाहीनी सांगवीमध्ये लागली गेलेली आहे, ठिक आहे तुम्ही मध्यवर्ती ठिकाणी गॅसदाहीनी करता त्याच्या आजूबाजूच्या लोकांना फायदा होतो पण एकाच ठिकाणी त्याच भागामध्ये पाच दाहीन्या मग शहरामध्ये अन्य ठिकाणी सहा क्षेत्रीय कार्यालय आहेत त्याठिकाणी तुम्ही ते करु शकत होता. सांगवीची मी आकडेवारी घेतलेली आहे त्याठिकाणी गॅसदाहीनीमध्ये महीन्याला तीन लाख खर्च होतो. सांगवीच्या गॅसदाहीनीमध्ये ज्यांचा अंत्यविधी केलेला आहे त्याची आकडेवारी सुध्दा माझ्याकडे आहे. सांगवीच्या गॅसदाहीनीमध्ये महीन्याला सरासरी तेरा ते चौदा लोकांचे दहन केले जाते. तीन लाखाला तेराने डिव्हाईड केलेतर हा आकडा जवळ जवळ तीस हजाराच्या पुढ जातो. म्हणजे माणसाला दहन करण्यासाठी पाच हजार रुपये जर खर्च होत असेतीलतर गॅसदाहीनीमध्ये जवळ जवळ तीस हजार रुपये एका व्यक्तीचा खर्च होतो. ही माझ्याकड पर्यावरण विभागाने दिलेली आकडेवारी आहे, वैदयकीय विभागाने दिलेली आकडेवारी आहे. त्या आकडेवारीनुसार केवळ तेरा ते चौदा लोकांना त्याठिकाणी दहन केल जातं. केवळ एकच गॅसदाहीनी त्याठिकाणी आहे परिसरामध्ये जवळ जवळ वीस कि.मी.च्या रेंजमध्ये सगळया अंत्यविधी त्याठिकाणी होतात. तुम्ही त्याठिकाणी प्रत्येक प्रभागामध्ये एक घेतलेली आहे खरच त्याचा उपयोग होणार का. आपण दोन लाख रुपये महीन्याला मेन्टेनन्सला खर्च करतो. या सगळया परिसरामध्ये एक गॅसदाहीनी असताना त्याठिकाणी १३ ते १४ अंत्यविधी केले जातात आणि त्याला ३० हजार रुपये खर्च येतो. मग या गॅसदाहीनीच मेन्टेनन्स आपण काही फुकट देणार आहेत. मग आपण कोणाला पोसण्यासाठी हे करतोय. ज्यावेळेस तुम्ही दुस-याकडे एक बोट दाखवता त्यावेळेस तुमच्याकडे चार बोट असतात हे सुध्दा सगळयानी पाहीलेल आहे. प्रत्येक गोष्टीला शिवसेनेनी विरोध केलेला आहे. शिवसेना विरोध करत राहणार. जनसामान्याची संघटना आहे, अशाप्रकारचा भ्रष्टाचार कधीही शिवसेना सहन करणार नाही. प्रत्येक विषयामध्ये अनेक बोलण्यासारखे आहे ज्यावेळेला गॅसदाहीनीचा मुद्दा येईल त्यावेळेला

भूमीका सांगेल. म्हणजे झलक सभागृहामध्ये दिली की या गॅसदाहीनीमध्ये कुटील काहीतरी राजकारण आहे. कोणालातरी पोसतात, कोणीतरी जाणुनबुजून हा विषय स्थायी समिती समोर आणलेला आहे. चांगल्या कामासाठी चांगल्या माणसाच अभिनंदनही केलच पाहीजे. मा.चेअरमननी तात्काळ चौकशीचे आदेश दिले आणि हा विषय थांबविलेला आहे हा त्यांचा चांगूलपणा आहे. चांगल्याला चांगल म्हणल पाहीजे, वाईटाला वाईट म्हणल पाहीजे. हे सुध्दा याठिकाणी एक चांगल्या लोकप्रतीनिधीच लक्षण आहे. शेवटी आपण या शहराचे विश्वस्त आहोत त्यामुळे प्रत्येकाला वाटते आपल्या हातून चांगले काम घडले पाहीजे जनहीताच काम घडल पाहीजे. शहराच्या विकासाच काम घडल पाहीजे. म्हणून याठिकाणी या सगळया प्रकरणाची सन्मा.आयुक्त साहेब आपण चौकशी करावी अशी मागणी करतो आणि आपला हा रेंगाळलेला प्रस्ताव लवकरात लवकर पटला समोर येऊ दयात आम्ही त्याची वाट पाहतोत. खरंतर हे जे काही आज वातावरण निर्माण झालेले आहे त्यामुळे लोकांच्या मनामध्ये शंका निर्माण झालेली आहे. शेवटी प्रशासन म्हणून आयुक्त साहेब आपण अगदी निर्भीडपणाने याठिकाणी हा प्रस्ताव सादर करावा आणि त्याच्यावरती काही झाल असंलतर जाहीर करावे. पर्यावरणाचाही विषय याठिकाणी आहे. एकटया संजय कुलकर्णी यांनाच पर्यावरणाची काळजी आहे. पर्यावरणाच्या अहवालावर बोलण्यासारख भरपुर आहे, पण आता त्यावर बोलणे शक्य होणार नाही. पर्यावरण हे खातं म्हणजे या महापालिकेच्या भ्रष्टाचाराचा सर्वोच्च बिंदू आहे कारण त्याठिकाणी त्यांना पर्यायी अधिकारी नाही. एकतर ते पर्यावरणाचे ईंजिनिअर आहेत त्यामुळे त्यांना पर्याय नाही, त्यांच्या विषयी बोलण्याची कुठली सोय नाही. परंतु सर्वात जास्ती भ्रष्टाचार त्याच भागात आहे. त्यामुळे पर्यावरणाचा विषय आल्यानंतर पर्यावरण अहवाला संदर्भात मी नक्कीच चर्चा करीन एवढेच मी सांगतो, जयहिन्द जय महाराष्ट्र !

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गेल्या अधिवेशनामध्ये मा.मुख्यमंत्री यांनी एक डायलॉग मारला होता, म्हणजे अशा प्रकरणात बोलले होते “शिशोके घरो में रहीनेवाले दुसरों पे पत्थर नही फेका करते” आज ओपनमध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेसच्या नगरसेवकांनी प्रशासनाला चॅलेंज केलेले आहे त्यामुळे आता प्रशासनाची वेळ आलेली आहे. की कुठलाही भ्रष्टाचार हा लेखी स्वरुपात होत नसतो, दाखवुन होत नसतो, कुठला पुरावा ठेवून होत नसतो. वाल्हया कोळयाप्रमाणे चो-या करुन आणत असताना घर चालवतो सगळे आनंदीत असतात पण जेव्हा परमेश्वर म्हणतो की तुला कुठली शिक्षा देऊ आणि घरातल्याना म्हणतो की तुम्ही पण चोरीच्या मार्गातल खाल्ल्याल आहे त्यामुळे तुम्हांलाही शिक्षा होणारतर बायको, मुलांसकट म्हणतात आमचा काहीही संबंध नाही चोरी तुम्ही केलेली आहे. पश्चाताप म्हणून परमेश्वर त्याला सांगतो की तू राम नामाचा जप कर म्हणजे तुझी सगळी पाप धुऊन जातील. तर तो मरा मरा करता करता कधीतरी तो राम म्हणतो तर तुमच्यावर सुध्दा राम म्हणण्याची वेळ आलेली आहे. मा.महापौर साहेब, राष्ट्रवादी

काँग्रेसची नैय्या भर समुद्रामधुन आता भरकटलेली आहे त्याला आर.एस.कुमार यांच्या माध्यमातून एक होल राष्ट्रवादी काँग्रेसला पडलेलं आहे. मा.महापौर साहेब, मी फक्त झालेल्या चर्चेची प्रतिक्रीया याठिकाणी देते. एक पक्षाची गटनेता म्हणून मला या विषयावर बोलणं तेवढ गरजेच वाटतं. आज आर.एस.कुमार साहेबांच धारिष्ठये आहे की त्यांनी या सभागृहात चर्चेला वाचा फोडलेली आहे. त्यानंतर सन्मा.स्थायी समितीचे सभासद नारायण बहीरवाडे यांनी बोलताना सांगीतले की शिवसेनेचे सभासद सुध्दा स्थायी समितीमध्ये असतात, ती आता पर्यायी व्यवस्था नाहीतर ते कायदयानेच केलेले आहे. की जेवढे ज्यांच बहुमत आहे, जेवढे ज्यांचे सभासद आहेत तेवढे त्याठिकाणी बसतील. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आमची यापुर्वीची मागणी आहे की, स्थायी समितीमध्ये प्रोसिडींग चालू ठेवावे ही मागणी आमची गेल्या अनेक वर्षापासूनची आहे. प्रोसिडींग ठेवता येत नाही, बाहेरच्या लोकांना अलौड नाही, आतमध्ये काय चालतं ते कोणालाही बाहेर कळत नाही. असे असेलतर प्रत्येकजण एकमेकावरती आरोप करणारच आहे. डायरेक्ट स्थायी समितीमध्ये विषय येत नसतो, याची सगळयांना जाणीव आहे. दोन विषयावर चर्चा झाली. पहीला विषय की ज्या विषयामुळे आपल्या महापालिकेतील सर्व अधिका-याना, सर्व नगरसेवकांना, सर्व कर्मचा-यांना शर्मेनी मान खाली घालावी लागली. खरा विषय काय आहे, पालखी सुरु झाली, पालखी गेली, पालखी परत आली सगळे शेतकरी, सगळे आपले भक्तगण आपआपल्या कामामध्ये रुजू झाले परंतु आमच्याकडन काही तो विषय संपलेला नाही. हा प्रशासनाचा नाकर्तेपणा आहे. कुठला विषय किती दिवस भीजत ठेवायचा त्या विषयाची जर तुम्ही याठिकाणी चिरफाड केली नाही, खरं खोट सांगीतल नाहीतर नुसती राष्ट्रवादी काँग्रेस बदनाम होत नाहीतर नगरसेवकांना सुध्दा प्रश्न विचारले जातात. प्राधिकरणातील एक ज्येष्ठ नागरीक सरदेसाई म्हणून आहेत त्यांनी गावडे साहेबांना मुर्ती परत आणून दिली आहे. जेव्हा भावनेची सांगड एखादया विषयाची बसते त्याच्यामध्ये प्रत्येक नगरसेवक नापास झालेला आहे. मा.महापौर साहेब, आपल्याला माहीती आहे की ही परंपरा आजची नाही. पालखी काही या वर्षी आलेली नाही. ही प्रशासनाची दिरंगाई आहे की पालखी येण्याच्या अगोदर एवढी धावपळ करुन निवीदा काढायची, रिकॉल करायची, एकाच घरातल्यानी चारवेळा भरायची ही प्रशासनाची दिरंगाई आहे. मा.शकुंतला धराडे महापौर झाल्या म्हणून त्यांनी काही ही नवीन प्रक्रीया सुरु केलेली नाही. पण ज्याप्रकारे घाई केली गेली, जेव्हा पालखी निघाली आणि मग काय दयायचं, आदि आमच्या समितीची मिटींग असते त्याच्यामध्येही कोणी काही ठरवीत नाही सगळ अगोदरच ठरलेल असतं. त्यामध्ये जेंव्हा मुर्त्या दयायच ठरलं तेंव्हा आठ दिवसाच्या मुदतीमध्ये जर आपण त्यांना मुर्त्या मागीतल्या महीनाभराच काम आठ दिवसात पुर्ण करायच असेलतर त्या एकटयानी काय करायच. का त्याची स्वत:ची मोनोपॉली तयार झाली की मी करु शकतो. मी पाहीजे त्या किमंतीला या महापालिकेला मुर्त्या पुरवू शकतो आपल्यालाही माहीती असेल की दिंडी प्रमुख कोकाटे साहेब

आहेत त्यांनी सांगीतले की आम्हांला टँकर दया. त्यांनी जी ख-या अर्थाने मागणी केली होती कलेक्टर पर्यंत ती मागणी केली होती, तरी आपण गांभीर्याने या गोष्टीचा विचार का केला नाही. आपण दिंडीतल्या एका माणसांना ती मुर्ती देणार, एक माणूस ती मुर्ती डोक्यावर घेणार त्याच्या अंतरंगात पांडूरंग आहे, त्या माणसामध्ये पांडूरंग आहे त्याला आपण मुर्ती देवून त्यांची भक्ती सिध्द करणार होतो का, आपली भक्ति त्याच्यावर लादणार होतो. याच्यामध्ये नार्को टेस्ट करा असे मी म्हणेल. कोण खरं जबाबदार आहे. ठेकेदार जबाबदार आहे की ज्याला तुम्ही आठ दिवसात मुर्त्या मागीतल्या का महापौर जबाबदार आहेत की ज्यांनी फोन करुन सांगीतले म्हणतात, देवाच काम आहे, मुर्तीच काम आम्हांला फटाफट केल पाहीजे. कोण जबाबदार आहे या सगळयांचा खुलासा करावा व आयुक्त साहेब लवकरात लवकर चौक्शी केली पाहीजे. का निर्णय होत नाहीत. आयुक्त साहेब तुमच्यावर सारख हॅमरींग या गोष्टीच होतं. मुर्ती विषयावरती आताच आयुक्तांनी सभागृहात खुलासा करावा. दुसरा विषय की जो शवदाहीनीचा, म्हणजे किती दुर्दैव आहे बघा एकीकडे देवाची चर्चा, तर एकीकडे मयताची चर्चा. दोन्ही एकाच वेळेस एकाच विषयी बोलण्याची वेळ सभासदांवरती आलेली आहे. शवदाहीनीमध्ये भ्रष्टाचार झाला किंवा काय यासाठी आपण स्वत: याठिकाणी सक्षम अधिकारी आहात. तुम्ही तपासणी करणार आहात. परंतु शवदाहीनीचा दर एक मृत्यूचा २० ते २५ हजार येत असेल, आपल्याला माहीती आहे पुणे महानगरपालिका किंवा पुण्याची लोकसंख्या आपल्यापेक्षा तीप्पट आहे त्याठिकाणी वैकूंठ स्मशानभूमी नावाची एकच स्मशानभूमी आहे त्याठिकाणी लोक लांबून येतात व अंत्यविधी करतात. परंतु आपल्याकडे राजहाट्ट आहे. सत्ता जेवढया मोठया प्रमाणात आहे एवढं बहुमत आहे की माझ्याच वॉर्डात शवदाहीनी पाहीजे माझ्याच वॉर्डात स्विमींग पुल पाहीजे, माझ्याच वार्डात स्नेकपार्क पाहीजे, माझ्याच वॉर्डात आहे नाही ते सगळच पाहीजे. अशी भूमीका असेलतर याची चौकशी झाली पाहीजे. शवदाहीनीची मागणी कोणी कोणी नगरसेवकांनी केली. का पाहीजे त्याठिकाणी शवदाहीनी. जर मृत्यूचा दर तेवढा नाही आणि आजही आपण हिंदू संस्कृतीमध्ये राहतो आजही आपल्याकडे लाकडावरती, सरणावरती जाळलं जातं ही परंपरा आपली आहे. ग्रामीण गांव आपल्या या शहराला जोडली गेलेली आहेत. कोणीही त्या दाहीनीमध्ये जात नाही. जर तुम्हांला एवढी लोकांच्या मृत्यूची काळजी होतीतर मा.महापौर, मागच्यावेळेस तुम्हांला आठवत असेल की आम्ही जेव्हा बेवारस मयतांच्यावरती अंत्यसंस्कार करत असताना मी स्वत: रात्री ११ वाजता तीन डेडबॉडी निगडीच्या स्मशानभूमीमध्ये नेऊन जाळल्या, त्या गेटवरती मला कोणीही हाटकले नाही. मला पास मागीतला नाही, ही डेडबॉडी कशी नेता ते मला विचारल नाही. सगळा अंत्यविधी झाल्यानंतर दुस-या दिवशी ही गोष्ट मी सांगीतली त्याच्या नंतर त्याच्यावरती चौकशी झाली. म्हणजे सुरक्षेला तुमच्याकडे काहीही व्हॅल्यू नाही. कोणालातरी डोळयासमोर ठेवून टेंडर काढायचे, महापालिकेनी जन्म दयायचा आणि दुस-याने पोसायच. अशाप्रकारचा कारभार चालू

असेलतर आपण कोणाला जबाबदार धरणार आहोत. शवदाहीनी करण्याची गरजच नाही, काहीही आवश्यकता नाही, सगळे विषय दप्तरी दाखल करा. आहे तेवढया स्मशानभूमी, शवदाहीन्या पूरे झालेल्या आहेत. आर.एस.कुमार प्राधिकरणामध्ये राहतात उगीच बोलले नाहीत. सगळे रिटायर्ड लोक तेथे राहायला आहेत, सगळे क्लास-१ सरकारी अधिकारी तेथे राहतात. असे असताना का बदनामी सहन करायची. ज्यांनी आरोप केले त्यांनी त्यांच्या पध्दतीने आरोप मांडले तुमच काम होतं त्यांच्या त्या आरोपांच त्या त्या ठिकाणी खंडण करण्याच किंवा त्याच्यातली जर खोटी परिस्थिती असेलतर लगेच सामोर आणायच. अशा परिस्थितीस आपण स्वत: जबाबदार आहोत. याठिकाणी कुठलेही काम खालीपासून वरपर्यंत प्रत्येक टेबलावर ही फाईल जाते. शवदाहीनीचा विषय दप्तरी दाखल करावा. अशा कुठल्याही शवदाहीनीची गरज नाही. मुर्तीच्या प्रकरणामध्ये नार्को टेस्टची मागणी आम्ही सभागृहाच्या वतीने करतोत. खरा आरोपी कोण आहे त्याला समोर आणा आणि आपली जी काही बदनामी होते ती थांबली पाहीजे. कारण जे करणारे आहेत ते नामानिराळे राहतात आणि बाकीच्या लोकांना समोर येवून टिकेला तोंड दयाव लागतं. आयुक्त साहेब आपल्याला विनंती आहे की आपण चुप्पी तोडा आणि काहीतरी बोला. तुम्ही काहीच बोलले नाहीतर तुम्ही कशाप्रकारे काम करु शकता हे आम्हांला कळेनाही. निवडणूकीचे वर्षे आहे, सगळेजणच आता तावातावाने असणार, काही विषय आपल्यासमोर येत नाहीत परंतु सावधरितीने सगळया भूमिका तुम्ही मांडा. आणि या विषयाला पुर्णविराम आजच्या सभेत मिळाला पाहीजे अशी मी मा.महापौर साहेब, आपल्याला विनंती करते.

**मा.सिमा सावळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. गॅस शवदाहीनीवरती गरमा गरम चर्चा. चांगले काम केलेतरी नाव ठेवतात, भ्रष्टाचार काढला तरी नाव ठेवतात, बोलायचच नाहीतर मग यायचं कशाला निवडून. चांगल काम केलंतर आम्ही केलं, आम्ही केलं, आम्ही केलं, आम्ही केलं, आम्ही केलं. आमची विकासनगरी. भ्रष्टाचार केलातर आम्ही नाही बाबा त्यातले, आम्ही नाही केला. दो-हया मानसीकतेत जगतात. एक काहीतरी ठरवा. विकास केलातर आम्ही केला, भ्रष्टाचार केलातर आम्ही केला, चांगल केल तरी आम्ही केलं, वाईट केलीतरी आम्ही केलं. वाईट केलंतर अधिका-यांनी केल, चांगल केलतर आम्ही केलं. शहराची विकासनगरी म्हणून घेता त्या विकासनगरीचे शिल्पकार सुध्दा जे तुमच्या म्हणण्याप्रमाणे जे अधिकारी आहेत तेच त्या विकासनगरीचे शिल्पकार आहेत. त्याच क्रेडीट नाही दयायच त्याच क्रेडीट मात्र आपण घेता हे योग्य नाही. एक तुमची जी काही भूमिका असेल ती स्पष्टपणे ठरविली पाहीजे. आज आसं, उदया तसं., आज आसं, उदया तसं. सारख इकडून तीकड, तीकडून इकड, इकडू-तीकड, तीकडून इकड कोलांटउडया मारायच्या हे काही योग्य नाही. तुमच्या म्हणण्याप्रमाणे अनेक वर्ष परंपरा लाभलेला जर तुमचा पक्ष असलेतर आपली भुमिका ही ठामच असली पाहीजे या मताची मी आहे. गॅस शवदाहीनीमध्ये भ्रष्टाचार झाला का, त्याठिकाणी टेंडर केल गेल का, तर शंभर टक्के भ्रष्टाचार झाला. जर त्याठिकाणी आयुक्तांनी

बोटचेपेपणाची भुमिका घेतली, प्रशासनाने जर कोणालाही पाठीशी टाकायचा प्रयत्न केलातर आपणा सगळयांना माझा इतिहास माहीतीच आहे हायकोर्टाचे दार वाजविणार यश येओ अथवा अपयश येओ, दार वाजविल्याशिवाय राहणार नाही. मग आता दार वाजवण्याचा आदि पहीली फौजदारी दाखल करेल, ऍण्टी करप्शन ब्यूरोकडे जाईल आणि मग हायकोर्टाच दार वाजवणार. इतक्या दिवस विचार करत होतो की चला, बरोबर काम करतो थोडस कमी जास्त होत असतं. एकमेकाला सांभाळून घेतल पाहीजे. काही गोष्टीकडे कानाडोळा करायचा, काही गोष्टीकड दुर्लक्ष करायचं. चांगले काम करत असताना, मोठ काम करत असताना, मोठया शहरात राहत असताना छोटया छोटया गोष्टीकडे दुर्लक्ष करायचे परंतु छोटया छोटया गोष्टी करता करता देवापासून तर मरणापर्यंत जर त्याठिकाणी भ्रष्टाचार होत असेलतर आम्ही बोलायचे नाही का? माझ असं स्पष्ट मत आहे की जे जे लोक याठिकाणी निवडून येतात, लोकांच्या मतावरती निवडून येतात, लोकांना भाबडी आशा असते आपल्याकडन की चुकीच काम झालं माझ्या कारकीर्दीमध्ये जर भ्रष्टाचार होत असेल तर मी निवडून दिलेला नगरसेवक हा त्या ठिकाणी त्याच्या विरोधात बोलेल ही भाबडी अपेक्षा त्या गरीबानी करण आमच्याकडन चुकीचे आहे का, अजीबात चुकीच नाही, मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब. त्यांनी ती अपेक्षा आमच्याकडनच करावी. कारण की आम्ही त्यांच देणं लागतो आणि म्हणून ते आमच्याकडन आपेक्षा करत असेलतर निश्चितपणे त्याठिकाणी मी असेल, माझ्या बरोबर अनेक नगरसेवक असतील ते सगळे नगरसेवक त्यासंदर्भात बोलतात आणि त्यांनी बोलल पाहीजे नव्हेतर त्यांच ते कर्तव्यच आहे. मग कोणी म्हणत होते उकीरडयात हात घालतात, पोतडी घेवुन फिरतात, दिवसभर या त्या अधिका-यांच्या मागे लागतात, माहीती दया, माहीती दया म्हणून करतात, तुमचा कुठलाही अधिकारी साहेब आम्हांला फुकट माहीती देत नाही. पैसे भरुन आम्ही माहीती नेतो, येथे या चार-पाच फाईली आहेतना त्या सगळया पैसे भरुन घेतल्या आहेत, त्याचे बील आमच्याकडे आहे. कोणीही फुकट देत नाही. बाहेर लोकांना असं काहीतरी गम आहे की महापालिकेत गेले की पैसे कमवतात पण आम्ही महापालिकेत येवुन या कागदाचे पैसे देतो आणि मग तुम्ही हे कागद आम्हांला देता. त्यामुळे कोणी आम्हांला आरोप करण्याच्या अगोदर आपण काय आहेत ते आदि तपासा. याठिकाणी भाषण करताना माझ्या सहकारी भगिनी ज्येष्ठ नगरसेविका, शिक्षीका ज्यांच्या बद्दल मला प्रचंड आदर आहे त्या शमिम पठाणताई म्हणाल्या की, दरपत्रक कोण मागवतं, दर कोण तपासतं. ज्यांनी पत्र दिले त्यांना भेटा असं अधिकारी कोण कोणाला सांगतं. या सगळया गोष्टीमध्ये दरपत्रक कोण मगवतं, अधिकारी मागवतं. त्यांना काम कोण सुचवततर मला वाटत अधिका-यांना स्वप्न पडतं म्हणून ते करत असतील, विषय नसेल म्हणून करत असतील, हे त्यांनाच माहीत आहे. परंतु आम्ही निगरगट्ट होत चाललो हा जो त्यांनी शब्द वापरला, तर निगरगट्ट आम्ही निश्चित होत नाहीत. काही नगरसेवक होत असतील, काही लोक होत असतील. आम्ही तरी निदान त्यातले नाही आहोत.

तुम्ही आम्हांला निंदा, वंदा आमचा एकच धंदा जो कोणी चोरी करणार त्याला आम्ही पकडणार. तुम्ही काहीही म्हणालात तरी आम्हांला त्यातून फरक पडत नाही कारण की जो मतदार माझा आहे, ज्यांनी मला निवडून दिलेलं आहे त्याला निश्चितपणे माझे कौतूक आहे, त्याला वाटत  माझी जी नगरसेवक होती ती चांगले काम करते आणि तीच्याच पाठीशी मी उभे राहावे आणि म्हणून तो माझ्या पाठीशी गेली दहा वर्षे उभा आहे. याठिकाणी सन्मा. माझे बंधु तानाजी खाडे साहेब म्हणाले भ्रष्टाचार कोणी केला त्याला बुटाने बडवले पाहीजे. मी बुट काढून त्याला मारणार, नक्की काढला पाहीजे, वेळ आली आता. कोणाकोणाला मारायच ते आता बघा. आपल्याकडे से-२२ मधील बोगस लाभार्थ्यांची मी पाच ते सात वर्षे झाले मागणी करते. ती यादी दया, अहवाल दया. मा.मुख्यमंत्र्यांनी तो अहवाल मागीतला होता. मा.प्रथ्वीराज चव्हाण असतील, आताचे मा.मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस असतील त्यांनी सुध्दा पत्र दिलेल आहे. दया तो अहवाल एकदा म्हणजे काय आहे जे कोणी बोलत असतील त्यांचे तोंड आम्हांला पण कायम बंद करता येईल नां. कोणाच्या संगनमताने होते हे मला सुध्दा बघायला मिळेल. ज्येष्ठ नगरसेवक योगेशभाई बहल यांनी अत्यंत तीव्र शब्दात अधिका-यावरचा निषेध व्यक्त केला, राग व्यक्त केला. नेहमीच कुठलाही विषय असु देत जोपर्यंत माझ्याकडे त्यांचा रोख येत नाही तोपर्यंत त्यांचे भाषण संपत नाही, मला आनंद आहे. ते गेली पंचवीस वर्षे झाले नगरसेवक आहेत, आम्ही गेली दहाच वर्षे नगरसेवक आहोत. मला आनंद आहे की किमान आमची दखल घ्यावी असे विषय आम्ही काढतो आणि मग ते आमच्यावरती बोलतात.  बोलत असताना त्यांनी असं सांगीतल की इलेक्शन आले म्हणून स्टंट करतात का, तर ते अजीबात नाही. आपल्या माहीतीसाठी सांगते या भ्रष्टाचारावरती पुस्तक प्रसिध्द केलं पब्लिकला ते ओपन ठेवल होतं म्हणून फुकट वाटतोत की हे वाचा. त्यात काही फोटो असेल, तुम्हांला वाटल की आम्हांला मुद्दामहुन गुंतवल असेलतर तुम्ही माझ्यावर आब्रूनुकसानीचा दावा दाखल करु शकता मी ईथच आहे. तुम्ही काय शिक्षा दयाल ती मी भोगायला तयार आहे, कायदयाच्या चौकटीत राहून. इलेक्शन आले म्हणून स्टंट करत नाहीत. आम्ही आपल्याकडे मोर्चा घेवून आलो त्या दिवशी आपण शब्द दिलेला होता. नव्हेतर आता आयबीएन लोकमत असेल, टिव्ही 9 असेल, एबीपी माझा असेल सगळया वृत्त वाहीनीनां सांगीतले होते की मी सक्तिच्या रजेवर त्यांना पाठवतो हे आम्ही नव्हतो बोललोतर आपण बोलला होतात त्यामुळे आपण आपल्या शब्दाशी ठाम राहीलात पहीला शब्द बदलला परत आपण आपल्या शब्दाशी ठाम राहीलात. आपले मनापासून अभिनंदन. परंतु हे इलेक्शन आल्यामुळे मी करत नाही तुम्हांलाही माहीत आहे भाई म्हणले की ज्यावेळेस टेंडर निघते त्यावेळेस ब्लँकेट घेवून झोपला होतात का. भ्रष्टाचार व्हायच्या आदि कसं बोलायच, भ्रष्टाचार झाला, भ्रष्टाचार झाला, भ्रष्टाचार झाला. ईटेंडरींग होताना तुम्ही प्रत्येकाला की वेगवेगळी देता. आम्हांला कसं कळणार, कारण आम्ही त्या की मध्ये नसतो. आम्हांला कसा कळणार तेथे भ्रष्टाचार होतो म्हणून. ज्यावेळेला टेंडर

ओपन होणार, ज्यावेळेस ते स्थायी समिती समोर जाणार त्यावेळेला विषय वाचायला येणार. स्थायी समिती समोर जाताना, चेअरमनने सांगावे एक अपशब्द त्यांना वापरला का. त्यांना विनंती केली यात घोटाळा झाला असे आमच म्हणणे आहे, भ्रष्टाचार झाला असं आमच म्हणणं आहे एकदा ते तपासून बघा. तोपर्यंत विषय स्थगीत करा, नाही केलातर आपल्या सुध्दा अशाप्रकारचे आम्ही आरोप करायला मोकळे आहोत. एवढच त्यांना सांगीतल व त्यांनी सुध्दा पत्र घेतले आणि अभ्यास करुन सांगतो असे सांगीतले. आंदोलन करायची ही काही आजची परंपरा आहे. देशानी ९ ऑगष्टला क्रांतीदिन साजरा केला. ज्या महात्मा गांधीच आपण उदाहरण देतो त्यांनी साहेब, इंग्रजाना सत्याग्रह करु नका, आंदोलन करु नका त्यांना देश सोडायला लावला आणि आम्ही आंदोलन केल. ठिक आहे मी महात्मा गांधीच उदाहरण यासाठी दिलं की त्यांच्या बरोबरी करण्याची माझी पात्रता सुध्दा नाही परंतु ज्या देशाला आंदोलन आणि सत्याग्रहाची इतक्या वर्षाची परंपरा आहे. आंदोलकाना तुम्ही म्हणतात चाकु, सु-या घेवून येणार आणि सभागृहात सदस्य पिस्तूल लावून येतात त्यांचे आपण काय करतो. पर्समध्ये जर्मन मेडच पिस्तुल घेवून येतात त्याच काय करता. आपलं मेटल डिटेक्टर काय करतो. पाच-पंचवीस कार्यकर्ते जे नेहमीचेच असतात त्यांनाच घेवून आंदोलन केलं, तुमच्याकडे आलो, तुम्हांला अपशब्द वापरला नाही. तानाजी शिंदे साहेबाना अपशब्द वापरला नाही. तीरडी केली, शंभर टक्के केलीनां. ती देखील कुठले आणले लागडं, तुमच्या येथील वर फर्निचरच काम होतना तिथ पडलेली लाकडं तीच उचलली आणि आम्ही फक्त कापड बरोबर आणल होत. पहील्या दिवशी बघुन गेले होते. मी छत्रपती यांच्या विचाराना माणणारी बाई आहे. मी डॉ. आंबेडकरांची पाईक आहे. छत्रपतीने जसा एक एक किल्ल्यासाठी गणीमी कावा वापरला तोच गणीमी कावा मी त्या दिवशी वापरला. तुमच्या येथीलच लाकड घेतले, मडक आणल होतं ते त्यांच्या लक्षात आल नाही. लोण्याचा गोळा काय त्यांना वाटल बाई रोज डबा घेवून पालिकेमध्ये जेवायला येते आणला असेल. मग तिरडी आणलीतर रागवायच काय कारण आहे. का तर गॅस शवदाहीनीचा विषय होता. ठिक आहे, विठ्ठलच्या मुर्ती साठी तीरडी आणली असती, तुम्ही माझ्या नावाने बोलला असतातर शंभर टक्के माझ चुकल असतं. मग गॅस शवदाहीनीसाठी तिरडी आणलीतर त्याच्यासाठी गदारोळ. पालीकेमध्ये तिरडी आणली कशी. पालिकेच्या सभागृहात, पटलावरती, स्थायी समितीच्या पटलावरती विषय होतात. तिरडी घेवून कुठं जाऊ. पोलीस होतेना, जाऊच शकत नाही. आपले अधिकारी एवढे तत्पर की आंदोलन करायचे म्हणले की पोलीसांची दादागीरी. पोलीस आले, मॅडम, आताची आता तुम्ही केबीनच्या बाहेर निघायचं. मी म्हणाले माझ केबीन आहे मी माझ्या पालिकेमध्ये आहे मी या संस्थेची ट्रस्टी आहे तुम्ही का मला बाहेर काढणार, मी म्हणलं मी आंदोलन कस कराव. मी जाळपोळ करत असेल, चाकु-सु-या घेवून फिरतेतर शंभर टक्के मला बाहेर काढाव. पण एखादा अभिनव पध्दतीने जर आंदोलन करत असेल आणि ते जर तुम्हांला झोंबत असेलतर, म्हणजे मी किती

परफेक्ट होते हे आजच्या कामगीरीवरुन मला दिसतं. आणि त्यामध्ये भ्रष्टाचार झाला नाही असे जर कोणी म्हणत असेलतर माझा त्यांना चॅलेंज आहे शब्द सांभाळून वापरा, भ्रष्टाचार झालेला आहे, ठामपणे सांगते झालेला आहे. रोज उठून स्थायी समितीची पिळवणूक काय करता, दया राजिनामा बाहेर पडा एखादा कोणीतरी गरीब नगरसेवक येईल तुमच्या पक्षाचा अन्यत: तानाजीला पाठवा त्या गरीबाला पाच वर्षात काहीच दिल नाही तुम्ही. मागासवर्गीय असल्यामुळे तुम्ही बसून ठेवलय त्याला त्याला पाठवल पाहीजे. मा.महापौर साहेब, राग येतो म्हणून बोलले. स्थायी समितीचा नगरसेवक दिवसभर कुठल्या कुठल्या अधिका-याकड असतो हा विषय आणा, तो विषय आणा असतं. यादी, जंत्री आमच्याकडे पण आहे हो पण आम्हांला त्यामध्ये नाही पडायच. सगळयांच्यावर लक्ष ठेवायला नाही होत, परत बाई म्हणतील उकीरडयावर हात घालायला जाती. स्थायी समितीला आहात शंभर टक्के स्थायी समितीच्या बजेटला आम्ही मान्यता दिलेली आहे आम्ही सुध्दा त्याच्यामध्ये आहोत. म्हणून का दिवसाढवळया चो-या करायला अधिका-यांना परवानगी दिलेली नाही. त्याठिकाणी अशाप्रकारच फसवणूकीच काम होत असेलतर निश्चितपणे बोलण्याची जबाबदारी आमचीच आहे, नव्हेतर ती आम्ही पार पाडतो. तुम्ही काहीही म्हणलात तरी त्यामध्ये आम्हांला आनंद आहे, तुम्ही टिका करा तुम्ही चांगल व्हा. मा.महापौर साहेब, सांगवीमध्ये आपण शवदाहीनी बसविली त्यावेळेला त्या कामामध्ये रेट होता १ कोटी ३६ लाख रुपये. जे ॲण्ड जे हॉटमिक्स या कंपनीला काम दिलं. त्याना ऑपरेशन आणि मेन्टेनन्ससाठी ३ लाख रुपये. त्यांच काम झाल, ती शवदाहीनी बसवताना खरतर ती शवदाहीनी १ कोटी ३६ लाखाची नव्हतीच. नवीन प्रयोग होता, आम्ही म्हणालो माहीती घेऊ तोपर्यंत तीन चार महीन्यात दुसरा प्रस्ताव. या शवदाहीन्याच टेंडर झालेल आहे, याचा रेट २ कोटी रुपये. पहीली शवदाहीनी जी आहे त्याची माहीती घेवूस्तोवरच दुस-या शवदाहीनीचा विषय आला. एकदा १ कोटी ३६ लाख रुपये व दुस-यांदा २ कोटीचा दर. त्यांनी दर वाढवला. तत्कालीन आयुक्त मा.जाधव यांच्याकडे गेलो, तक्रार केली, पत्र दिलं त्यांना सांगीतल साहेब, एक चोरी पचली म्हणून हा दुसरी चोरी करण्याचा प्रयत्न करतो याला आवर घाला. तत्कालीन आयुक्तांनी सगळया निवीदा रद्द केल्या, फेर निवीदा केल्या. फेर निवीदा केल्यानंतर आता जो रेट आला तो सगळया शवदाहीनीचा आमच्या तक्रारी नंतरचा आला. मग आता हा तर खोट बोलला, पहीली शवदाहीनी १ कोटी ३६ लाखाची परत आपण निवीदा केल्या त्यात त्यांनी परत दोन कोटीचे टेंडर भरलं, आपल्या लक्षात आल की यांनी आपल्याला फसवलं. आयुक्त साहेब, कुठे गेले होते आपले अधिकारी. का नाही यांनी त्याच्यावर फौजदारी दाखल केली, का नाही शोध घेतला. की खरंच ही किती रुपयाला ही मिळते. माझी विनंती आहे मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब आपल्याला पोमण साहेबांचा विभाग आहे ज्याठिकाणी सगळी आपली महापालिका ई-टेंडरींग वर चालते असं त्यांनीच आम्हांला समजावुन सांगीतलेल आहे. इन्टरनेट त्यांनी आम्हांला सांगीतलेल आहे. सगळया अधिका-यांचे इन्टरनेट

कनेक्शन बंद करा. पोमण साहेबांचा विभाग बरखास्त करा. ई-टेंडरींग रद्द करा. कारण जर इन्टरनेटवर तुम्हांला सरफींग करायला जमत नाही तर महानगरपालिका महीन्याला जे पाच ते सात लाख रुपये बील सगळया क्लास-१, क्लास-२ अधिका-याच भरतंय मग यांचे नेमक बील येतं कशाच. एखादी गोष्ट सर्च करायची असेलतर आपण आपल्या घरात एखादी वस्तु घेत असताना चार ठिकाणी आपण सर्च करतो, मग हे का नाही बघत. एक शवदाहीनी १ कोटी ३६ लाख रुपयाची, दुसरी शवदाहीनी लगेच २ कोटीला येते, का नाही हे ऑब्जेक्शन घेतलं. आम्हांला ऑब्जेक्शन का घ्याव लागल. आम्ही यायच, आम्ही तुमच्याकडे भांडायच, आमची अवस्था लई वाईट. आम्ही तुमच्या नजरेत नालायक, आम्ही यांच्या नजरेत नालायक. आम्ही करायच काय. नाही भ्रष्टाचार काढत तर मग आमचे पत्रकार बंधु माग बसलेले आहेत ठोक ठोक ठोकतात विरोधी पक्ष त्यांची योग्य भूमिका पार पाडत नाहीत. आमचतर असं झाल की कधी कधी असं वाटत की कशाला निवडून आलोत. जो सोबत नगरसेवक आहे तो चांगल म्हणत नाही. अधिका-याकड गेलोतर कपाळाला आटया पडलेल्या असतात आता बाई काय तमाशा घेवून आली काही माहीती नाही, काय माहीती मागेल हे माहीती नाही. करायच काय. परत एकदा विचार करतोत की नाही, आपली भूमीका काय आहे आपण सुरक्षारक्षक आहोत आपण आपल काम करायचं. नाही चांगल म्हणलतर काय फरक पडतो आपल्याला. आम्ही हे करत असताना आम्हांला जो त्रास होतो. आम्हांला ऑब्जेक्शन का घ्याव लागल. १ कोटी ३६ लाखाला घेतलेली मशीन २ कोटीला घेतात साहेब, हे थांबवा. आम्हांला का थांबवाव लागल. त्यांनी का नाही थांबवल. आणि म्हणून मला असं म्हणायच मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, हा संगणक विभागच बंद झाला पाहीजे. सगळया अधिका-यांचे इन्टरनेट कनेक्शन बंद करुन टाका. बील कशाचे आपण भरतो. त्यांनी सहभागी व्हायला पाहीजे. त्यांनी सर्च करायला नको का. ग्लोबल टेंडर जर केल असेल ती काय परिस्थिती होती शिवणयंत्रा मध्ये. शिवणयंत्रणाच उदाहरण सांगीतले, शिवणयंत्र रद्द केल ते तुम्हांला कळल्याशिवाय काय. तिथला भ्रष्टाचार दिसल्या शिवाय ते रद्द केलं नाही. वस्तुस्थिती मांडली म्हणून रद्द केलं फेर निवीदा केली आहे. येथे आता चायनामेड आणि त्यावेळेस घेतलेली उषाची, राजेशची व याच्यामध्ये फरक आहे. आता आपण स्वान्टेक्स मशिन घेत होतो त्याचा डेमो आयुक्तांना आम्ही दाखवला होता आणि मग ते टेंडर रद्द केलं. निश्चितपणे यामध्ये तुमच्या लेखा विभागाचा हात आहे. मागे बसलेले आपले अतिरीक्त आयुक्त असतील, वैयक्तिक तुम्ही घेवू नका मी पदाला सांगते, आयुक्त असतील त्या प्रक्रीयेमध्ये असलेले सगळे लोक दोषी आहेत त्यांच्या सगळयावर कारवाई झाली पाहीजे. परंतु एखादया माणसाची चोरी पकडल्यानंतर तो कशी उघडपणे चोरी करतो हे संजय कुलकर्णीना याचवेळी नाहीतर तत्कालीन आयुक्त श्रीकर परदेशी यांनी कचरा डेपोच्या प्रश्नावर पाच-पाच मेमो बजावलेले होते, सहाव्या मेमोला तर संजय कुलकर्णी घरीच गेले असते. कोणीतरी म्हणणार त्यांना काही बोलायचच नाही आमचा

आणि त्यांचा काही बांधाला बांध आहे. त्यांची पोरगी आमच्या घरी का आमची पोरगी त्यांच्या घरी नांदायला आहे. काय संबंध आहे आमचा, काही संबंध नाही. चुकीच केल म्हणून बोललोत. शिवण यंत्रामध्ये शंभर टक्के भ्रष्टाचार झालेला होता. आताही ओपन काय केलं, स्पेसिफीकेशन नाही टाकल त्या मशिनमध्ये. कंपनीचे नाव टाकले. नाव टाकून टेंडर भरल, नाव टाकून टेंडर कस भरु शकतो, स्पेसिफीकेशन टाकानां. मगाशी बहिरवाडे काका आणि म्हेत्रे काका दोघ जण म्हणाले की जपानला, जर्मनीला अशाप्रकारच्या शवदाहीन्या आहेत. अशाप्रकारचा पत्रा वापरला जातो. याच्यामध्ये तसे काही जर्मनी, जपानचे स्पेसिफीकेशन नाहीत. असतेतर निश्चितच आरोप केला नसता. परंतु ते स्पेसिफिकेशन सुध्दा असतेतरी त्याचा रेट एवढा आला नसता. तळेगावला काय बसविले. एखादी वस्तुजर आपण घेत असू, पर्यावरणाच रक्षण जर तुम्हांला करायचं असेलतर आणि तुम्ही जर का अधिकारी म्हणून एवढं तत्पर असालतर खास करुन सन्मा. कुलकर्णी साहेब, सन्मा.अतिरीक्त आयुक्त तानाजी शिंदे साहेब आणि तळदेकर मॅडम तुमच काम आहे तळदेकर मॅडम कागदपत्र तपासायचे, त्याची शहानिशा करयची. आपण याची शहानिशा का केली नाही. मग तळेगावला आहे का आम्हांला माहीती नाही. पुण्याप्रमाणे याठिकाणी असं असं करण्यात येईल असं आपण बोलून लगेच मोकळ होता. परंतु एखादी वस्तू घ्यायची असेलतर मग शेजारच्या पाजारच्या महापालिकेला कोणालाही विचारायचे नाही. नेटसर्फिंग करायचे नाही. कोणी बसवल, कोणी नाही बसवलं काही देणंघेणं नाही. याच कंपनीने दिल्लीमध्ये सहा मशिन अवघ्या दोन कोटीमध्ये दिलेल्या आहेत, विथ मेन्टेन्ससह. म्हणजे एक मशिन कितीला आली, सतरा ते आठरा लाखला येईल. तळेगावची शवदाहीनी बसवली ती रोट्री क्लबने भेट दिलेली आहे. त्यांनी २३ लाखाला दिलेली आहे. ३० हजार रुपये मेन्टेनन्स महीन्याला आहे, फक्त ३० हजार रुपये. त्यांच्या मेन्टेनन्समध्ये आणि आपल्या मेन्टेनन्समध्ये निश्चितपणे फरक असू शकतो. कारण ती तळेगाव नगरपरिषद आहे, छोटेगाव आहे, त्याठिकाणी मृत होणाऱ्यांची संख्या कमी असेल पण त्यांच्याकडे एकूण मयती किती झाल्या त्या मयतीवरती ते लोक त्याठिकाणी बील आदायगी देतात. आपल्याकडे उलटाच कारभार आहे. माणस मरो ना मरो माझं पोट भरलं पाहीजे, माझं पोट भरलं पाहीजे. याठिकाणी भ्रष्टाचार झाला असं म्हणण्यास वाव आहे. कारण की या कंपनीने जर का दिल्लीसारख्या महानगरामध्ये सहा मशिन्स २ कोटीला रु. ला दिलेल्या आहेत. त्यांनी खोट स्टेटमेंट मांडल एक मशिन त्यांनी दिड कोटीला दिलं. सीएचा जो रिपोर्ट आलेला आहे त्यात २ कोटीच्या वरतीच टॅक्स आहे सहा मशिन्सचा. मग खोट करायचतर निटतरी करायचं. मग एकीकडे टॅक्स भरतो म्हणून दोन कोटीवरतीच टॅक्स भरला. दिल्ली महानगरपालिकेन त्यांनी ई-मेलवरती पत्र लिहीले आणि आख्खी फाईल स्कॅन करुन पाठवलेली आहे. त्यामध्ये २ कोटीमध्ये सहा शवदाहीन्या बसतात आणि ईथ १० कोटीमध्ये आपण पाच शवदाहीन्या घेतो. किती भ्रष्टाचार करायचा, किती खायचं काही मर्यादा. देवाकडच्या जाण्याच्या रस्त्यापासून जर भ्रष्टाचार असेल आणि त्या जर

तुम्ही आम्हांला नाव ठेवणार असालतर तुमचे शंभर जोडे आमच्या डोक्यावर. काय फरक पडत नाही आणि म्हणून जर तुम्ही म्हणत असाल भ्रष्टाचार झाला नाहीतर माझ असं म्हणण आहे या ठिकाणी आलेल्या सगळया नगरसेवकांना याच्या झेरॉक्स दया त्या झेरॉक्सचे पैसे मी देते का तर त्यांनी पण वाचून घ्यावं. पाच-पाच, दहा-दहा हजार रुपये झेरॉक्स काढायला लागतात. त्यांना पण वाचू देत, त्यांनाही कळू देत, खरच झाला का नाही यात भ्रष्टाचार. परंतु साहेब, याठिकाणी आपण संजय कुलकर्णीच नव्हेतर त्याला तीतकेच जबाबदार तानाजी शिंदे सुध्दा आहेत आणि तळदेकर मॅडम सुध्दा आहेत. यांच्यावर सुध्दा कारवाई झाली पाहीजे, यांनी कागदपत्र तपासायला पाहीजे होते ते तपासले नाहीत. यांनी का ऍनेलिसेस केल नाही त्यांचच हे काम होतं. कुलकर्णी साहेबांनी जे काही मांडलेल असेल ते यांनी तपासायलाच पाहीजे होते. यांनी का तपासले नाही. यांनी तपासल नाही त्यामुळे त्यांची हिम्मत वाढली. त्यांची हिम्मत वाढली म्हणण्यापेक्षा संबंधीत नगरसेवक, स्थायी समितीचा माजी चेअरमन यामध्ये आहे आणि ते मी सिध्द करु शकते. माझ्याकडे पेपर्स आहेत, वेळ आलीतर आणि ते बोललेतर निश्चितपणे मी सिध्द करणार आहे. त्यांच्या कृपेने हा झालेला भ्रष्टाचार हा त्यामध्ये झालेला आहे आणि अधिकारी सुध्दा तेवढेच सामील आहेत हे सांगायला मला काहीही भिती बाळगण्याचे कारण नाही. याठिकाणी एका व्यक्तिला आपण जवळपास २२ हजार रुपये खर्च करतो. सांगवीच्या शवदाहीनीची आम्ही बील आदायगी घेतली. तेथे रोजच्या सरासरी सहा मयती होतात. तेथे गॅस शवदाहिनीवर आजही शव करतो. तत्कालीन आयुक्त श्रीकर परदेशी साहेबांच येथे पत्र आहे. त्यांनी सांगीतलेल आहे कुत्रे मेल्यानंतर सुध्दा त्याची विल्हेवाट व्यवस्थीत व्हावी म्हणून आपण गॅस शवदाहीनी घेतली होती ती अजून तशीच पडून आहे, वापरात नाही. श्रीकर परदेशी साहेबांचे पत्र मी वाचून दाखविते. "सीएनजी जोडणी व सीएनजी गॅसपुरवठा नियमानुसार झाल्याशिवाय व अपेक्षित निर्धारित तापमान साधले जात असल्याची चाचणी यशस्वी झाल्याशिवाय पुरवठादाराला कोणतेही देयक किंवा अग्रीम दिला जाणार नाही, या अटीवर प्रस्ताव मंजूर" त्याचबरोबर आताच सांगीतल कुत्र्यांच्या देहाची विल्हेवाट व्यवस्थीत लावण्यासाठी गॅस शवदाहिनी घेतली त्याबद्दलच पत्र आहे. "पशु वैदयकीय विभागाकडून अशाचप्रकारे दोन वर्षापुर्वी पाळीव प्राण्यासाठी सीएनजी वर आधारीत शवदाहिनी खरेदी केली तथापि अदयाप सीएनजी सप्लाय न मिळाल्याने संपुर्ण खर्च निष्फळ ठरला आहे. कार्यकारी अभियंता, पर्यावरण हे वरिष्ठ अधिकारी आहेत प्रस्ताव सादर करताना अशा सर्व बाबींचा संपुर्ण अभ्यास करुन सादर करणे आवश्यक आहे जेणेकरुन मनपा करदात्यांच्या करातून जो पैसा उभा राहतो तो खर्च निष्फळ ठरणार नाही व अपेक्षीत लाभ तात्काळ मिळेल. शवदाहिनी आर्थिकदृष्टया व गुणात्मकदृष्टया अधिक जास्त असेल. याच्यापेक्षा काय स्पष्ट लिहायच. आजही आपण सांगवीमध्ये एलपीजी वापरतो. मग आयुक्तांच्या पत्राला, आयुक्तांच्या त्या टिप्पणीला काही किमंत नाही का, काहीच किमंत नाही. आपण ज्यावेळी त्यांना

शवदाहीनीचे काम देतो त्यात अटि, शर्तीमध्ये लीहीले की जोपर्यंत त्याठिकाणी सीएनजीचा पुरवठा होत नाही तोपर्यंत तुमच काम पुर्ण झालं असं आम्ही समजणार नाही. तरी त्यांना बील आदायगी होते आणि तरी म्हणतात भ्रष्टाचार झालेला नाही. म्हणजे आयुक्तांनी दिलेल्या टिप्पणीवर सुध्दा आपण त्याठिकाणी फुली मारुन आजही आपली बिल अदायगी चालू आहे. त्याठिकाणी ३० दिवसात १८०, वर्षाला २१०० मयती होतात असं पुरवठाधारकांनी दिलेले आहे. जे ऍण्ड जे हॉटमिक्स यांनी सांगीतले वर्षाला २१०० मयती होतात. याला स्वप्न पडलेले आहे का, माणस किती मरतात ते. महीन्याला सहाच मयती होतात, यांना कुठून हा आकडा मिळाला हे माहीती नाही. महीन्याला १८० होतील म्हणून. महीन्याला सहाच आहेत त्यातील निम्म्या आपण पारंपारीक पध्दतीने जाळतो. तुमची बील अदायगी, तिथले रिपोर्ट हे सर्व काढून आणलेले आहेत त्यावरुन सांगते. यांना कसं माहिति आहे २१०० मयती होतील. २१०० मयती प्रमाणे आपण कोट केलं. काम तर पुर्ण केलं नाही. काम अर्धवट करायचं, सीएनजीचा सप्लाय नाही. बील आदायगी चालू आहे. २१०० चा आकडा आणला कुठून. जन्मदर काय आहे त्यासाठी डॉ.रॉय बसलेले आहेत, मृत्यूदर पण ते सांगतील. एकटया सांगवीमध्ये जर २१०० मयती होत असतीलतर आख्ख्या शहरातून किती मयती होत असतील. काय बोलतो, काय करतो, कुठून पैसे काढायचे, कशात मिळेल त्यातून काढायचे आणि मग आंदोलन केल की आंगावर काटे येतात. मग राग येतो, तिरडी का काढली, तिरडी नाही काढूतर काय करु. मयतीचे पैसे तुम्ही खाता. कुणाकड जाऊ मी. काय करायच. भ्रष्टाचार झाला नाही कसं म्हणायच. संजय कुलकर्णी असतील, तानाजी शिंदे असतील, तळदेकर मॅडम असतील त्यांना का सक्तीच्या रजेवर पाठऊ नये. पाठवल पाहीजे त्यांना सुध्दा. ते वरिष्ठ अधिकारी आहेत. आपल्या हाताखालचा अधिकारी काय बघतो, काय करतो हे आपल्या लक्षात आल पाहीजे, आणि स्वत: तुमच्या सुध्दा आम्ही काही नुसतं प्रेशर निर्माण करत नाहीत. इलेक्शन आल म्हणून राजकारण करणारी ती आमची जात नाही. मी मागच्यावर्षी सुध्दा म्हणाले होते निवडून आले तर ठिक आहे नाही आलेतर काय केल असत माहीत नाही. त्याच्यापेक्षा तीव्र आंदोलन केले आणि आजही इलेक्शन म्हणून काही करत नाही. जर कोणाला वाटत असेल राजकारण म्हणून करतो. शहराच पंचवीस टक्के राजकारण म्हणे ताब्यात घेतलं, घेतलय. भ्रष्टाचारावरती बोलतो, पैसे कमावतो काय, ज्या कोणाला वाटत असेलतर पुराव्यानिशी सादर कराव. येथून पुढच राजकीय सन्यास घेण्याची तयारी आहे. उगच आरोप करताना आणि आपल्या हातात आपण काहीतरी चांगले लिहीतो म्हणून कोणालाही लिहायचे योग्य नाही. आम्ही खुप कष्टाने, आम्ही खुप मेहनतीने काढतो साहेब, आमच्या बरोबरचे नगरसेवक, आम्हांला कोणीच चांगल म्हणत नाहीत. कोणीच चांगल म्हणत नाहीत, कशासाठी करायच, तरी करतोनां. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, २१०० मयतीचे पैसे आपण देतो कसे याचा सुध्दा आपण खुलासा केला पाहीजे. त्यांनी हा आकडा कुठून काढला त्याचा सुध्दा खुलासा झाला पाहीजे. मा.महापौर साहेब, यामध्ये आपल्याला ज्या

ज्या ठेकेदारांनी फसवलेलं आहे त्यांच्यावर सुध्दा फौजदारी दाखल झाली पाहीजे. त्यांना सुध्दा सोडले नाही पाहीजे. ज्या ज्या ठिकाणी २१ लाखमध्ये, २३ लाखमध्ये, ३० लाखामध्ये शिवसेनेचे सन्मा.खासदार मा.शिवाजीराव आढळराव पाटील यांनी एक पत्र दिलेल आहे पर्यावरण विभागाचे संजय कुलकर्णीना. त्यांनी सांगीतल ३० लाखात मशिन घेतलेली आहे त्यांच्याही पत्राला वाटाण्याच्या आक्षता. ज्येष्ठ आहेत, पदाने मोठे आहेत, आमदार असतील, खासदार असतील यांच्याही पत्राला जुमानत नाहीत. श्रीकर परदेशी यांच्या पत्राला जुमानले नाही, राजीव जाधव यांच्या पत्राला जर जुमानले नाहीतर मग आम्ही तर लोकप्रतिनिधी, आम्हांला तर तुम्ही अजीबात जुमानत नाहीत. तुम्हांला जर खरच ठसा उमटावयाचा असेलतर जोपर्यंत तुमची आणि आमची सांगड घालत नाहीत तोपर्यंत तुम्ही चांगला कारभार करु शकणार नाहीत, साहेब. सन्मा.खासदार यांनी जर पत्र दिलेल असेलतर त्यांच्या पत्राचा विचार का केला गेला नाही. ते त्यांच पत्र घ्या आणि त्यांना तुम्ही पत्र लिहा. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, गॅस शवदाहिनी असेल, विठ्ठलांच्या मुर्त्या असतील, विठ्ठलाच्या मुर्त्या मध्ये आम्ही शिवसेनेचा नगरसेवक बोलत नाही म्हणालेनां मगा. धनंजय आल्हाट यांनी सगळे पत्रच घेवून आले काय काय पत्र दिले ते. आम्ही त्यातून शोधून काढल एकाच व्यक्तिने तीन वेगवेगळया नावाने निवीदा भरल्या. आपल्या समोर सगळ आणलं. आपण त्याच्यावरची शाहनिशा करुन, खरतर विठ्ठल-रुक्मिणीच्या मुर्ती एखादयाला भेट देतो तेव्हा त्याच्या घरात नवचैतन्य येतं. या पहील्या महापौर नाहीत मागणी करणा-या, प्रत्येक महापौरांनी मागणी केलेली आहे. मा.महापौरांनी काय मागणी केली आणि ध चा मा आपले अधिकारी कसे करतात याच सुध्दा उदाहारण आम्ही या महापालिकेत गेल्या दहा वर्षापासून बघतोत. त्या काही पहील्या महापौर नव्हत्या. त्यांनी ३५० मुर्त्याची मागणी केली त्यानंतर पुढच्या ६०० वाढविल्या आहेत. त्यांनी सुध्दा मागणी करताना महापौरांना वाटले असेल या मी मुर्त्या दिल्या पाहीजेत. निश्चितपणे त्यामध्ये पैशामध्ये गैरव्यवहार झालेला आहे. मुर्ती कमी किमंतीला होती ती जास्त किमंतीला घेतली. ६५० ची मुर्ती आपण आज काय रेटने घेतली आहे ते रेट आपल्याला माहीती आहे. दुर्दैव असं आहे, ज्या दिवशी तळदेकर मॅडम आणि डोईफोडे साहेब माझी सुनावणी घेत होते त्या मुर्तीच्या प्रकरणावरुन त्यांच्या समोर बसलेलं असताना सन्मा.ठेकेदाराचा फोन आला, ताई जयभिम, तुम्हांला भेटायला आलो. मी म्हणलं, जयभिम घालणारा पहीलाच कोण आहे तो. वॉर्डातल्यातर नागरीकांचा फोन नाही. मी म्हणाले कोण बोलताय तर त्यांनी सांगीतल मी आल्हाट बोलतो, मला बोलायच होतं. मी म्हणाले माझी सुनावणी चालु आहे, तर नाही तुमची सुनावणी चालू आहे म्हणूनच फोन लावला मी म्हटल फोन ठेव, माझ्या मोबाईल मध्ये बोलण्याच रेकॉर्ड होईल, रेकॉर्डर लावलेल आहे माझ्या मोबाईलला. घरी पोराला फोन केलातरी रेकॉर्ड होतं, नव-याला केलातरी रेकॉर्ड होतं. हे फक्त सुरक्षेसाठी म्हणून करतो. कारण काही महाभाग आहेत बोलणारे, आसं बोलली, शिव्या दिल्या. त्यादिवशी पोलीसांची आणि आमची

त्याठिकाणी तकतक झाली. साहेब, तुमच्या सुरक्षारक्षकाने ज्यावेळेस पोलीस बोलावले. आंदोलन करणार आहे कळाल्या कळाल्या जसे सुरक्षारक्षकानी पोलीस बोलवले, पोलीसांची गरज काय पडली तुम्हांला. आमच आंदोलन वेगळया अभिनव पध्दतीने होणार होतं, का बोलवलं. आणि ज्या प्रकारची पोलीसांची आरेरावीची भाषा होती. की तुम्ही करतात म्हणजे ते बरोबर असतं हे मला सांगण्याचे कुठल्याही पोलीस अधिका-यांना अधिकार नाहीत साहेब, त्यांना मी एकदाच सांगीतल साहेब तुम्हांला जर एवढ वाटलतर की मी करते ते बरोबर नाहीतर या सगळया लोकांवर फौजदारी दाखल करण्याचा मला येथे शब्द दया माझ काहीही म्हणणं नाही मी येथून उठून जाते, नाही दिला साहेब त्यांनी शब्द. आंदोलन करायचे नाही, का करायचे नाही. संविधानाने अधिकार दिलेला आहे मला आंदोलन करायचा. आजच्या लोकमत पेपरला आहे, चाकू घेवून लोकमतने स्टिंग ऑपरेशन केल आहे, कुठं होते आपले सगळे सुरक्षारक्षक त्यांच्या कसं लक्षात आलं नाही. ते नाही लक्षात येणार. तुमच्या तिथल्याच त्या बांबूच्या काठया घेतल्या, कापड पर्स मध्ये आणलातर त्याच्यासाठी केवढा दगदग. तुमची  यंत्रणा किती ढिसाळ आहे, तुमच ते मेटल डिटेक्टर एकदा तपासून बघा आज लोकमतमध्ये खुप सुंदर लिहीलेल आहे की त्या मधल्या स्पेसमधून गेलतरी तुमच्या कोणत्याही सुरक्षारक्षकाचे लक्ष पण नव्हतं. तशाच पिस्तूल पण सभागृहात येतात सभागृह चालू असताना कुठलेही हत्यार सभागृहात येता कामा नये. शिवसेनेचे नगरसेवक अनिल हेगडे. महापौर पदाचे सभागृहात ओपन इलेक्शन होतं. त्या दिवशी त्यांचा मर्डर झाला. त्यादिवशी त्यांच्याकडे सुध्दा परवाना होता पिस्तूलचा. पिस्तूल नसेल त्यादिवशी झाला, महापौर पदाच इलेक्शन होतं त्यादिवशी सभागृहात पिस्तूल नेऊच शकत नाही हे माहीती होतं म्हणून त्यादिवशी असं झाल. आपण काय करतो आंदोलनकर्ते येतात, टाळकोट वाजवल असेल, ढोलकी वाजवली असेल परंपरा आहेना संताची या भूमिला. भ्रष्टाचार थांबवा आमचे काहीही म्हणणे नाही. स्थायीला वाटल की या या विषयात काळबेरं दिसतय विषय बाजूला ठेवा आमच्या आंदोलनाची वेळच येऊ देवू नका आम्ही येणारच नाहीत, तुमच्यापर्यंत. परंतु ते न करता एखादयावर वाट्टेल तशा भाषेत टिका करणं हे योग्य नाही. आणि मग आपण सत्ताधारी आहोत म्हणून वाट्टेल तसं तोंडसुख घेणार असालतर आम्ही सुध्दा असे विषय काढतच राहणार हे सुध्दा या निमीत्ताने सांगते. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आता जे आपण टेंडरींग केलेल आहे, याच्यामध्ये ॲनिलेसेस व्हावं. ज्या ज्या महानगरपालिकेमध्ये अशाप्रकारच्या शवदाहिन्या खरेदी केल्या असतील त्या त्या सगळया महापालिकेचे आपण त्यांचे टेंडरींग याठिकाणी कॉल करण्यात यावे.  त्या सगळया लोकांचे पेपर घेवून आपण तुलनात्मक जो काही रेट येईल त्या रेटवरती आपण खरेदी करावं. पर्यावरणाचे आम्ही सुध्दा रक्षणकर्ते आहोत. आपण काय करतो पर्यावरणाचा विकास आम्ही भकास म्हणून तो पर्यावरणाचा अहवाल दरवर्षी प्रसिध्द करतो. संजय कुलकर्णीला गॅस शवदाहिनी बसविली म्हणजे पर्यावरणाचा विकास होतो हे कोणी सांगीतल परमेश्वराला माहीती. आज जर आपण

चिंचवडला गेलोततर सगळया नदीच्या कडेने आपण फिरुन बघा साहेब, काय अवस्था झालेली आहे नदयाची. वाट लागली सगळया पर्यावरणाची. आणि त्या पर्यावरणाची वाट लागलेली असताना शंभर टक्के प्रयत्न केला पाहीजे. पर्यावरणाचे रक्षण करताना छोटयातला छोटा तुमचा जो मुद्दा असेल तो वापरा. पण म्हणून सगळ तुम्हांला चोरी करण्याची मुभा नाही. पर्यावरणाचा विषय आज आहे. कचरा डेपोवर आपण वर्षाला ५० ते ६० कोटी रु. खर्च करतो तीन ते चार कि.मी. चे जे पाणी जमिनीच्या खालून झिरपून येत त्याच्या संदर्भात आपण काही केलेले नाही. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, ज्या शवदाहिन्या खरेदी करताना ज्या ज्या कंपनीने याठिकाणी टेंडरींगमध्ये  भाग घेतला त्या सगळयांना ब्लॅकलीस्ट करा. रेट ॲनिलेसेस करुन ज्यांनी कोणी आपल्याला फसविण्याचा प्रयत्न केलेला असेलतर त्यांच्यावर फौजदारी दाखल करा. कारण की अशाप्रकारची फौजदारी एकदातरी कोणावरतरी दाखल झाल्याशिवाय हे सुधारणार नाही.  ऑपरेशन आणि मेन्टेनन्ससाठी ऑपरेशन खर्च सगळीकडे समान असताना जे टेंडरींग झालेल आहे त्यामध्ये जे ॲण्ड जे हॉटमिक्सला १ लाख २५ हजार रु., मे.ऍडॉर वेल्डिंगला १ लाख ९० हजार रु., काय संबंध आहे एकाला १ लाख २५ हजार आणि एकाला १ लाख ९० हजार. माणूस मरो अथवा न मरो पैसे मिळणार आहेत. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, अशा या सगळया ठेकेदाराला आपण ब्लॅकलीस्ट करा. मे.ऍडॉर वेल्डिंग लिमिटेड, जे ॲण्ड जे हॉटमिक्स यांच्याकडून फेब्रूवारी २०१६ मध्ये दुप्पट दराच्या निवीदा सादर केलेल्या आहेत यांच्यावर तर शंभर टक्के आपण फौजदारी दाखल करा. यांनी आपली फसवणूक केलेली आहे. देखभाल-दुरुस्तीच ॲनेल्सिस करा. सांगवी स्मशानभूमीतील गॅस शवदाहिनीच्या देखभाल-दुरुस्तीमध्ये जी लुट चालू आहे ती सुध्दा थांबविली पाहीजे. सीएनजी जोडणी उपलब्ध नसतांना ज्यांची ज्यांची बील आदायगी झालेली आहे त्यांच्यावर सुध्दा कारवाई करणे तेवढच गरजेच आहे. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, बोलण्याच्या ओघामध्ये एखाद-दुसरा शब्द वाईट गेला असेलतर तो शब्द मी आता याठिकाणी मागे घेते. परंतु एकच सांगते हे फक्त हिमनगाच एक टोक आहे. आपण सुध्दा आमच्या बद्दल माहीती घ्या. आम्ही मुद्दामहुन आपल्याला त्रास देण्यासाठी असा कुठलाही विषय करणार नाहीत हे सुध्दा याठिकाणी ठामपणे सांगतोत. आपण मुर्ती खरेदीच्या संदर्भातील अहवाल दिलेला नाही. काल मला कळाल की अहवाल आपल्यापर्यंत तयार झालेला आहे पण पोहचविला गेला नाही तो तातडीने दयायला पाहीजे होता. आमच्या कानावर ठामपणे बातमी आहे की त्यामध्ये आदेश झाले की उदयाच्या जीबी नंतर तो अहवाल प्रसिध्द करावा म्हणून. पण चोरी झालेली असेल, त्यामध्ये दामदुप्पट दराने केलं असेल, एकाच व्यक्तीने तीन निवीदा भरल्या असतीलतर पैशाची वसूली व्हावी त्यांच्यावर कारवाई व्हावी. सीएनजी गॅस शवदाहिनीमध्ये आपल्याला एक पत्र दिलेल आहे की आमची सुनावणी घेतली रिपोर्ट तयार करताना आम्हांला कळवा कारण की आम्ही आरोप केलेले आहेत. आमची जबाबदारी आहे ते सिध्द करण्याची. कारण की ज्या

अधिका-याची सुनावणी घेणार आहेत ते अधिकारी आहेत. सर्वांना एकमेकांना बरोबर घेवून चालण्याचा प्रयत्न करतो. तरी त्यामुळे त्याठिकाणी आमचे म्हणणे मांडण्याची आम्हांला संधी दयावी. एवढच याठिकाणी सांगते आणि ज्यांना कोणाला संशय असेल गॅस शवदाहिनी प्रकरणामध्ये आणि मुर्तीच्या प्रकरणामध्ये त्यांनी कैंव्हाही यावे, कागदपत्र सगळयांसाठी खुले आहेत, धन्यवाद.

**मा.अजित गव्हाणे -** मा.महापौर साहेब, मा. आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी आर.एस.कुमार साहेबांनी या विषयाला सुरवात केली. आपल्या पिंपरी चिंचवड महानपगरपालिकेमध्ये गॅसदाहिनी व मुर्त्यांच्या बाबतीमध्ये ही चर्चा गेले दोन तास झाले सभागृहापुढे चाललेली आहे. मा.महापौर साहेब, आपणही सगळयांना त्या विषयावर बोलण्याची संधी दिलेली आहे. बोलत असताना प्रत्येकांनी आपआपल्या भावना व्यक्त केल्या आणि कोणीही याठिकाणी भ्रष्टाचाराचे समर्थन केलेले नाही. मग तो कुठल्याही पक्षाचा असो, प्रत्येकानी हीच भूमिका मांडलेली आहे की जर याच्यामध्ये भ्रष्टाचार झालेला असेलतर त्याच्यामध्ये शंभर टक्के कारवाई झाली पाहीजे. मग तो कोणीही असो, अधिकारी असो, पदाधिकारी असो, नगरसेवक असो अशाप्रकारची भूमिका याठिकाणी प्रत्येकानी मांडलेली आहे. हे मांडत असतांना, कोणीही जर काही करत असेलतर त्याला राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष जबाबदार नाही. व्यक्तीगत कोणी काही ज्या त्या गोष्टी करत असेलतर या अशाप्रकारे पक्षाची बदनामी करणं ते योग्य नाही असं माझ्यासारख्या कार्यकर्त्यांना वाटत कारण की प्रत्येक नगरसेवक आपल काम करत असताना आपआपल्या वॉर्डात चांगले काम व्हावीत या दृष्टिकोनातून तो प्रामाणीकपणे प्रयत्न करत असतो आणि ज्या विभागातून तो नगरसेवक होत असतो त्या विभागातील अडचणी त्याला माहीत असतात. म्हणून ते त्या त्या पध्दतीने त्या त्या वॉर्डामध्ये काय काम व्हावेत अशाप्रकारची त्याची अपेक्षा असते आणि तशाप्रकारचा पाठपुरावा नगरसेवक मंडळी करत असतात. याच्यामध्ये मी सुध्दा गेली पंधरा वर्षे या सभागृहात नगरसेवक आहे. याठिकाणी भ्रष्टाचार होत असताना अनेकदा भ्रष्टाचाराचे आरोप होतात परंतु प्रत्येकक्षात जे महापालिकेमध्ये कामकाज चालते त्याच्यामध्ये सुरवातील एखादया विषयाचां विषय ठेवला जातो. यावर्षीच्या बजेटमध्ये कुठला विषय करायचा आणि तशाप्रकारची मागणी असते. प्रशासनाकडून असते, लोकप्रतीनिधी कडून असते किंवा नागरीकांकडून असते. आणि मग ती मागणी केल्यानंतर बजेटमध्ये जेव्हा त्याची प्रोव्हीजन केली जाते तेव्हा प्रत्यक्षात त्याचे इस्टीमेट केले जाते आणि इस्टीमेट करत असताना त्याच्यामध्ये मला वाटत कुठलाही पदाधिकारी किंवा कुठलाही नगरसेवक त्याच्यामध्ये सहभागी नसतो. हे इस्टीमेट करण्याचा पुर्णपणे अधिकार त्या त्या विभागाच्या संबंधित ईंजिनीअरला असतो. त्याची तपासणी अनेकदा होत असते. आयुक्तांच्या पातळीपासून या सगळया गोष्टी केल्या जातात त्यानंतरच त्याची निवीदा काढली जाते. निवीदा काढल्या जातात त्याच्यामध्ये दोन, तीन, चार, पाच किती पण

लोक जेव्हा येतात तेव्हा त्याच्यामध्ये निवीदा उघडली जाते. माझ्या माहीतीप्रमाणे एक किंवा दोन निवीदा आल्यातर ती निवीदा  रिकॉल करतो. यासंदर्भात जेव्हा निवीदा काढल्या जातात तेव्हा त्याच्यामध्ये कुठलाही पदाधिकारी, नगरसेवक इन्व्हॉल्व्ह नसतो. असं असताना अशाप्रकारे एखादयावरती गालबोट लावणे, एखादयाची बदनामी करणं हे काही योग्य नाही. खर म्हणजे सुलभाताई, सिमाताई खुप चांगल काम करतात, गेल्या अनेक वर्षे ज्या चुकीच्या गोष्टी त्यांच्या निदर्शनास येतात त्या प्रशासनाच्या निदर्शनास आणून देण्याचा सातत्याने त्यांनी प्रयत्न केलेला आहे. मागच्या काळामध्ये सुध्दा मारुती भापकर सारखे अनेक नगरसेवक होते या सभागृहामध्ये चुकीच्या गोष्टीला त्यांनी निश्चितपणे विरोध केलेला आहे आणि विरोध करुन त्या चुकीच्या गोष्टीबाबत चुकत असतीलतर त्या दुरुस्त करण्याचे काम सुध्दा त्यांनी केलेले आहे. ही मंडळी चांगले काम करतात. परंतु याच्यामध्ये राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्ष किंवा विरोध पक्ष अशाप्रकारची भुमिका यापुर्वीच्या काळामध्ये कधीच नव्हती. मला वाटत पिंपरी चिंचवड महानगरपालिका ही महाराष्ट्रातील एकमेव महापालिका असेल कि त्याच्यामध्ये जरी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची सत्ता असलीतरी सगळया पक्षाला न्याय देण्याचे काम या महानगरपालिकेमध्ये झालेले आहे. अमुक एखादया वॉर्डामध्ये विरोधी नगरसेवक आहे म्हणून त्याच्या वॉर्डात काम करायच नाही अशा प्रकारची भुमिका या पिंपरी चिंचवड महापालिकेमध्ये घडलेली नाही त्याच्यामुळे आता इलेक्शन आले म्हणून हे राजकारण केले जाते अशाप्रकारची भावना दोन्ही बाजूने दिसते ती मला वाटते चुकीची आहे. त्यामुळे सगळ्याच पक्षाच्या लोकांना सांगायच आहे मग शिवसेना असेल, भाजप असेल, मनसे असेल, राष्ट्रवादी असेल, कॉंग्रेस पक्ष असेल आपण सगळयांनी मिळून हा जो भ्रष्टाचार आहे तो कोणीही नदर्शनास आणू मग तो आर.एस.कुमार यांनी आणू, सिमाताई सावळे यांनी आणू किंवा सुलभाताईनी आणू आपण सगळयांनी मिळून हा भ्रष्टाचार थांबविण्याचा प्रयत्न केले पाहीजेत आणि त्यादृष्टिकोनातून आपल्या सगळयांचा पुढाकार असला पाहीजे. आयुक्त साहेब आपण याठिकाणी नवीन आलेला आहात कदाचित आपल्या पुढे वेगळ चित्र या निमीत्ताने निर्माण होऊ शकते की याठिकाणी अशाप्रकारे भ्रष्टाचार चालतो. परंतु वस्तुस्थिती लक्षात आली की पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये ख्या अर्थानं आखख्या महाराष्ट्रात नव्हेतर देशामध्ये चांगल्या प्रकारचे काम या महापालिके मध्ये झालेले आहे. खरोखरच ही विकासनगरी म्हणून उभी आहे. सगळयात चांगले शहर म्हणून आपल्याला पुरस्कार मिळालेला आहे. कच-याच्या बाबतीत सुध्दा आपल्याला पुरस्कार मिळाला. मी म्हणत नाही शंभर टक्के परंतु अनेक गोष्टीमध्ये आपण खुप चांगले काम केलेले आहे. येथून पुढच्या काळामध्ये सुध्दा ज्या काही त्रुटी राहीलेल्या आहेत त्या पुर्ण करू सगळयांनी मिळून या पिंपरी चिंचवडचा विकास करायचा आहे. चांगले काम या सभागृहाच्या वतीने या शहरात झाले पाहीजे आणि त्यादृष्टिने  प्रयत्न केले पाहीजे. याठिकाणी सुलभाताईनी मुद्दा मांडला, तो मलाही मान्य आहे की काही नगरसेवक असे करतात की माझ्याच वॉर्डामध्ये सगळया गोष्टी झाल्या पाहीजे

हे थांबले पाहीजे. मी सुरवातीला सुध्दा बोललो होतो या शहराचा विकास समतोल झाला पाहीजे. आपण जर या शहराच्या एकूणच भौगोलीक स्थितीचा विकासाच्या दृष्टिकोनातून एकूण विचार केलातर आपण जर पाहीलतर नदीच्या पलीकडचा जो परिसर आहे त्याठिकाणी जास्तीत जास्त काम झालेली आहेत. त्याठिकाणी अधिकृत डेव्हलपमेंट मोठया प्रमाणात झालेल आहे. विशेषत: आपण भोसरी मतदारसंघाच्या भागात जर आलातर त्याठिकाणी मोठया प्रमाणात ग्रामीण भाग आहे. तो नव्यान पिंपरी चिंचवड शहरात आलेला भाग आहे त्याठिकाणी आणखीन म्हणावा असा विकास झालेला नाही. ग्रामीण भागातील जनतेची अशी अपेक्षा आहे आमच्याकडे सुध्दा या गोष्टी व्हाव्यात. उदाहरणार्थ मा.आयुक्त साहेब आपल्याला काही गोष्टी सांगू इच्छितो की, आपल्या शहरात मेट्रो करण्याचा निर्णय चालला होता आणि त्याच्यामध्ये अशाप्रकारची भूमिका मांडण्यात आली की, पिंपरी पासून स्वारगेट असा मेट्रो होता त्यानंतर काही लोकांनी अशी सूचना मांडली की निगडी पर्यंत त्यावेळेस मी पुढाकार घेतला आणि म्हणलो की आमच्या मोशीपर्यंत सुध्दा अशाप्रकारची मेट्रो झाली पाहीजे. त्या वॉर्डातली लाईन करायची म्हणलेतर पहील प्राधान्य त्या भागात जातं. नदीसुधार प्रकल्प करायचा म्हणलतर पहीला पवनानदीचा प्रकल्प केला जातो. माझी विनंती आहे की आपण येणा-या काळात पिंपरी चिंचवड शहराचा विकास समतोल होईल यादृष्टिकोनातून प्रयत्न केले पाहीजेत. या शहराचे पुर्वीचे नेते कै.रामकृष्ण मोरे ते नेहमी सांगायचे जो काम करतो तो चुकत असतो आणि जो काम करत नाही तो चुकत नाही. या शहरात अनेक चांगल्या गोष्टी घडतात. काही चुकाही त्याच्यामध्ये होतात परंतु त्या चुका मोठया करुन आपण आपल्या शहराची, आपल्या महापालिकेची बदनामी करु नये अशाप्रकारची माझी विनंती सगळयाच सदस्यांना आहे. आपल्या शहरामध्ये चांगल्या गोष्टी झालेल्या आहेत. तुमच्या प्रत्येकाच्या वॉर्डामध्ये काही चांगल्या गोष्टी झालेल्या आहेत. त्या गोष्टी जनतेसमोर आणल्या पाहीजेत, आपल्याला विश्वासाने लोकांनी नगरसेवक म्हणून काम करण्याची संधी दिलेली आहे आणि त्यांच्या विश्वासाला तडा जाऊ न देता आपल्या सगळयांच एक कर्तव्य आहे की आपण या शहरामध्ये चांगल्याप्रकारे काम कराव. कोणी अधिकारी चुकत असेलतर तुम्ही त्याच्यावर निश्चितपणे कारवाई करा. तुम्ही सक्तीच्या रजेवर कुलकर्णी यांना पाठविलेले आहे. आम्हांला माहीती नाही की नेमक काय तुमच्या निदर्शनास आलं, म्हणून तुम्ही त्यांना सक्तीच्या रजेवरती पाठविलं परंतु याच्यामध्ये खरोखर दोषी असतीलतर त्यांच्यावर शंभर टक्के कारवाई करा आम्ही सर्व नगरसेवक तुमच्या पाठीशी आहोत अशा पध्दतीच्या चुकीच्या गोष्टीला आम्ही कधीच समर्थन करणार नाहीत. अशा लोकांना निश्चितपणे त्यांची जागा दाखवली गेली पाहीजे. म्हणजे येथून पुढच्या काळामध्ये अशाप्रकारचे चुकीचे काम या शहरामध्ये होणार नाहीत. नारायण बहीरवाडेनी सांगत असताना आता हा विषय त्यांच्या विषयपत्रीकेवर आहे. आणखी तो मंजुर केलेला नाही अशाप्रकारची भुमिका मांडली याचा अर्थ निश्चित आहे की स्थायी समितीने अजून मंजूरी

दिलेली नाही. आंदोलन करण्याचा अधिकार सर्वांचाच आहे. सिमाताईना मी शंभर टक्के अनुमोदन देतो की आपल्या देशामध्ये आंदोलनातून अनेक चांगल्या गोष्टी घडलेल्या आहेत. उदयाच्या काळामध्ये हा प्रत्येकाचा लोकशाहीतला अधिकार आहे. त्यामुळे आंदोलन हे निश्चितपणे झालच पाहीजे. पण त्या निमीत्ताने काही गोष्टी सभागृहापुढे आलेल्या आहेत की काही हात्यारे घेवून लोकमतने स्ट्रिंग ऑपरेशन केलं अशाप्रकारची बातमी आहे. अशाप्रकारे जर कोणी काही घेवून येत असेलतर हे भविष्याच्या दृष्टिने चांगल नाही. उदया जर एखादी दुर्दैवी घटना घडलीतर त्याला नेमक जबाबदार कोण असेल यामुळे सुरक्षा व्यवस्था अधिक कडक करणे गरजेच आहे. सभागृहामध्ये सुध्दा घेवून येत असतीलतर ते निश्चितपणे चुकीच आहे आणि हे कुठंतरी थांबल पाहीजे. याच विषयावर बराच वेळ चर्चा केलेली आहे. या दोन्ही विषयाच्या संदर्भात खुलासा करावा अशी माझी पण अपेक्षा आहे. तरी हे कुठेतरी योग्य ते व्हाव अशाप्रकारची अपेक्षा आहे. मा.आयुक्त साहेब तुम्ही याठिकाणी येवून आता दोन ते चार महीने झालेले आहेत. या महापालिकेमध्ये नेमक काय चालतंय याचा आपला अभ्यास झालेला आहे. तरी आयुक्त म्हणून आमची तुमच्याकडन अपेक्षा आहे येणाऱ्या काळामधे आपल्याकडून जास्तीत जास्त पिंपरी चिंचवडची काम व्हावीत. जो काही विकास चालू आहे त्याला अधिक गती दयावी. चार ते पाच महीने झाले बजेट मंजूर होवून तरी अजूनही वर्कऑर्डर कुठल्याही विभागाची दिलेली नाही. तेव्हा आयुक्त साहेब, आपण याच्यामध्ये लक्ष घालाव आणि लवकरात लवकर सगळया वर्क ऑर्डर देवून पिंपरी चिंचवड शहरातील सगळयाच्याच वॉर्डातील सर्व काम आपण मार्गी लावावीत अशाप्रकारची मी विनंती करतो.

**मा.जावेद शेख -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला एवढीच विनंती करायची आहे की, आर.एस.कुमार साहेबांनी जो मुद्दा उचलला त्याच्यामध्ये मुर्तीच असेल किंवा विदयुत शवदाहीनी असेल, नारायण बहीरवाडे यांनी चांगला खुलास केला त्याप्रमाणे मुर्तीमध्ये खुलासा झाला. परंतु फक्त आपण याच्यावर चर्चा करत राहीलोतर मला एवढच सांगायच आहे की सगळयात पहीली पालखी ही माझ्या वॉर्डात थांबते. त्यासाठी दोन वेळा पालखी नियोजनाची मिटींग आपण ठेवतो, मिटींगच्या दरम्यान मला आठवत नाही की आपले हे मुर्त्या दयायच ठरले होते असे माहीती नाही. परंतु महापालिका प्रत्येकवर्षी काहीनां काही पालखीवाल्यांना देते. दिंडीप्रमुखाना आपण काहीना काही तरी वस्तु देतच आलो आहोत यावेळेस दिलतर काही वावग नाही आणि ते दिल पाहीजे. परंतु या गोष्टी करित असताना आमच्या वारक-याची किंवा आपल हरिभक्त पारायण ठेवलेल आहे त्यांची आपल्यावरची श्रध्दा उठू नये. यदाकदाचित पुढच्या वर्षी ते म्हणतील तुमच आम्हांला काहीच नको तुमचे सभागृह इतके पापी असेलतर, आम्हांला काहीच नको. आपण कुठतरी ठाम विचार केला पाहीजे की याच्यामध्ये आमचा विठ्ठल आणि आपला विठ्ठल बदनाम होतो. सकाळ, संध्याकाळ, दुपार आपला विठ्ठल बदनाम होतो. माझ्या समोर मंदीरात इतके हरिभक्त पारायणातले लोक दर्शनाला येतात आणि हे

मुर्तीच प्रकरण काय चालले आहे. नऊ वर्षे झाले मी पालखीच्या स्वागताला आहे. फक्त याचवर्षी रमजान महीना आसल्यामुळे शेवटचे दहा दिवस मी मंदीरमध्ये नव्हतो आणि बाहेर आल्यानंतर ही गोष्ट समोर आली. अक्षरश: खुप वाईट वाटल की काय हा प्रकार आहे. आपण देवदर्शनाला जातोत साईबाबाला किंवा शिर्डीला, बालाजीला किवा गणपतीच्या काळात आपण लालबागच्या राजाला जातो. लोक काहीही बघत नाहीत तेथे श्रध्देपोटी सोन्याच घडयाळ असेल काय, आकरा हजार काय, एक्कावन्न हजार काय असे टाकून देतात. आपल्याला दिंडीप्रमुखाना मुर्ती दयायची ही आपली चांगली भावना आहे. त्यातून आपण काय केल आपण तयारीला लागलो, काही निवीदा काढली असेल आणि जे मुर्ती घडविणारे लोक आहेत त्यांच्या डोक्यामध्ये आले असेल शॉर्ट टाईमामध्ये आपल्याला ऑर्डर पुर्ण करायची म्हणून आपल्यालाही शॉर्ट मारायचे. एकाच घरामध्ये निवीदा तीन चार भरल्या असतील आणि त्यावेळेला जो अधिकारी असेल तो सुध्दा मजबूर झालेला असेल की आपणतर आता मुर्त्या दयायचा शब्द देवून बसलोत यातर आपल्याला दयायच्या आहेत आणि त्यांनी तो रेट कोट केला असेल. कुठलीही वस्तू ज्यावेळेस माल प्रॉडक्शन आपण करतो त्यावेळेला ती स्वस्तात पडते. यांनी आदिच्याही मुर्त्या करुन ठेवलेल्या असतील. जस गणपती मध्ये मोठमोठे गणपती असतील किंवा छोटेछोटे गणपती असतील आपण तो विकत घ्यायला जातो त्यात कुणाची किंमत आकरा हजार असेल कुणाची किंमत एक्कावन्न हजार असेल, कुणाची एक्केवीस हजार असेल. पण गणपती बसविण्याचा मुहूर्त जेंव्हा संपून जातो त्याच्यानंतर मात्र त्या मुर्तीला कोणीही किमंत मोजत नाही. जसा शेवट शेवटचा टाईम येतो तशी त्याची किमंत कमी कमी होत जाते आणि ज्या माणसाकडे गोडावुनच नाही तो चार हजाराची मुर्ती ५०१ र.ला देऊन टाकतो. असे बरेच मंडळ आहेत की ज्यांची वर्गणी कमी जमते त्यांच्या मनामध्ये भावना असते आपल्याला गणपती बसवायचा आहे १० दिवस आपल्याला देव देव करायचे आहे तर आपण हा प्रयत्न करतो. तरी माझी एक सगळयांनाच विनंती आहे की भ्रष्टाचार झाला किंवा नाही हे मला माहीत नाही परंतु कुठतरी आपल्या महाराष्ट्राची परंपरा आहे. ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखीची आपण इज्जत करतो, तुकाराम महाराजांच्या पालखीची आपण इज्जत करतो. हिन्दू-मुस्लिम सगळे त्याच्यामध्ये सामील होतात आणि विठ्ठल विठ्ठल विठ्ठल म्हणतो या विठ्ठलाला आपण कागदावर घेतो. मनाला खुप वेदना देणारी याचना आहे ही. याच्यातून आपण काहीतरी आत्मपरिक्षण केले पाहीजे. या गोष्टी कुठतरी थांबल्या पाहीजेत अशी माझी सगळया सभागृहाला विनंती आहे. सत्तेतील जरी कोणी चुक करत असेलतर शंभर टक्के आम्ही प्रशासनाच्या बरोबर राहू आणि विरोधकांच्याही बरोबर उभे राहू. याच्यामध्ये अनेकांनी स्पष्टीकरण दिलेले आहे. ज्यांच्याकडून आपण मुर्ती विकत घेतली असेलतर त्यानी जर मुळात जास्त भाव दिलेला असेलतर त्यांना पंधरा-वीस दिवसात त्याला ऑर्डर मिळते आणि त्याला चान्स मिळतो. एखादयानी विठ्ठलाच्या नावावरती कमावलही असेल. आणि आपण श्रध्देच्यापोटी देत असतो. या मुर्तीच्या प्रकरणात

जरी आपल्या महापालिकेला फटका बसलाही असेलतर एवढ मनाला लावून घेवू नका. विठ्ठलाच्या नावाने आपली महानगरपालिका बदनाम होणार नाही परंतु आमच्या विठ्ठलाला बदनाम करु नये अशी माझी सर्वांना विनंती आहे, प्रार्थना आहे एवढच मी बोलतो, जयहिन्द, जयमहाराष्ट्र !

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज साडेतीन तास झाले आपल्या महानगरपालिकेच्या बाबतीत जे काही वादातीत विषय गेल्या आठ-दहा दिवसापासून आहेत त्याच्यावर चर्चा करतो. त्यामध्ये भक्ति-शक्ती शिल्प असेल, किंवा शिल्पाच्या प्रतिकृती असतील, शवदाहिनी असेल, महानगरपालिकेच्या सुरक्षेच्या बाबतीतील चर्चा असेल प्रत्येक गोष्टीत महानगरपालिकेत अविश्वासाच वातावरण होत की काय किंवा आहे याबद्दल गेली तीन ते साडेतीन तास आपण याच्यावर चर्चा करतो. प्रशासन आणि लोकप्रतीनिधी ही एका रथाची दोन चाक आहेत हे माझ्यासारख्यांनी आज सांगायची गरज नाही. ज्यावेळेला प्रशासन चुकत त्यावेळेला कुठे नां कुठे तरी फटका आमच्या सारख्या नगरसेवकांना जे निवडून आलेले आहेत त्यांना बसतच असतो आणि लोकप्रतीनिधी जेंव्हा चुकीच्या पध्दतीने झालेल्या कामाला पाठिंबा देतात किंवा त्यांचे जे प्रस्ताव आहेत ते मान्य करतात अशा प्रस्तावानेच मान्यता दिली, त्यामुळे सुध्दा चुकीचा संदेश समाजामध्ये जात असतो. सगळया प्रशासकीय कामकाजाच्या यंत्रणेचे आयुक्त म्हणून महानगरपालिकेच्या स्टाफवर नियंत्रण तुम्ही करत असाल, परिसरात किंवा शहरात ज्या उणिवा आहेत, ज्या गरजा आहेत माझ्या परिसरात काय पाहीजे, माझ्या परिसरात काय गरज आहे हे सांगण्याचा अधिकार नक्कीच त्या लोकप्रतीनिधीनां आहे. आणि त्यामुळच विवीध प्रकारच्या विकास कामाची मागणी यासभागृहाच्या माध्यमातून म्हणा किंवा त्यांच्या पत्रव्यवहाराच्या माध्यमातून म्हणा हे आयुक्तांपर्यंत पोहचविले जाते आणि ती मागणी पुर्ण कराण्याचा प्रयत्न प्रशासनाचा असतो. आपल्या शहरामध्ये केवळ विकास कामेच नव्हेतर इतर अनेक अशा गोष्टी आहेत की त्याच्यामध्ये सहभागी होणं महानगरपालिकेच कर्तव्य आहे. मग त्यामध्ये संततुकाराम महाराजांची पालखी असू दयात, संत ज्ञानेश्वर महाराजांची पालखी असू दयात, गणेश उत्सव असू दयात, नवरात्र महोत्सव असू दयात, एवढेच नव्हेतर जे महामानव झाले, महापुरुष झाले त्यांच्या जयंत्या असतील, पुण्यतिथी असतील हे सुध्दा आपण गुण्यागोविंदाने साजरे करण्याचा प्रयत्न करत असतो. पण अनेक वर्षाची परंपरा या महापालिकेत असताना विठ्ठल-रुक्मिणीच्या ज्या पवित्र महीन्यामध्ये पालखी निघते आणि त्या पालखीचे प्रस्थान ज्यावेळी येथून होते त्या प्रस्थानाच्या वेळी आपण भव्यदिव्य स्वागत करतो. आजपर्यंतच्या इतिहासामध्ये असा वाईट प्रसंग या महापालिकेवरती नक्कीच आलेला नव्हता. ब-याच लोकांनी सांगीतले की किंबहूना ज्या कागदावरच्या गोष्टी आहेत त्या तुम्ही-आम्ही टाळू शकत नाहीत. मग त्यामध्ये तुमची ई-टेंडरींग सिस्टम असेल, ई-टेंडरींग पध्दतीत झालेल्या चुका असतील, ई पध्दतीमध्ये संबंधीत

ठेकेदारांने मॅनेमिनेट करुन ती निवीदा स्वत: भरुन, स्वत:च्या कुंटूंबियाच्या नावाने भरुन त्या बीचा-या देवाला बदनाम करण्याचे काम याठिकाणी केलेले आहे. त्याचे भोक्ते मात्र आपण सगळे आहोत. या शहराचे नागरीक म्हणून आम्हांला त्याचे दु:ख आहे. एका ठिकाणी एका बाजुला हजारो, लाखो वारकरी संपुर्ण महाराष्ट्रातून येतात आणि पंढरीला जातात आणि दुस-या बाजुला आपण मात्र आडीच ते तीन हजाराच्या मुर्ती वरुन प्रचंड गदारोळ होतो आणि आपल्या लोकांच्या भावनेला त्यामुळ काही प्रमाणात तडा गेलेला आहे. आषाढी वारीला जात असताना प्रस्थानाच्यावेळी जी काही स्वागताची तयारी केली, जी काही त्यांना वस्तू दयायची ठरवली आहे ती काही आजच ठरवली का, नक्कीच नाही. सुलभाताईनी सांगीतल की तुम्ही महापौर आहात म्हणून आजच पायंडा पडला असं आहे का, तर अजीबात नाही. अनेक वर्षे झाले या महापालिकेत एक काळ असा होता की या पालखीला दापोडीपर्यंत जाण्यासाठी कितीतरी वेळ लागायचा. आज ती परिस्थिती राहीली का, नाही राहीली. पण आज रस्ते जरी चांगले झालेले असलेतरी आजच्या दिवशी मलातरी वाटते मन मात्र कलूशीत झालेले दिसतात यात काही शंका नाही. एक भावनीक प्रश्न आहे. आमचे बंधु जावेद शेख यांनी ज्या पध्दतीने विवेचन केले. खरोखरच वाईट गोष्ट आहे की आपल्या शहरातील एका धार्मीक गोष्टीला बांधलो गेलेलो, अशा गोष्टी मध्ये चुकीच्या पध्दतीने व्यवहार होवून चुकीच्या पध्दतीने या शहराची बदनामी होते ती सुध्दा कुठतरी थांबली पाहीजे. माध्यमाला माझीही विनंती आहे की चुकीच्या गोष्टीला कधीही आमचा पाठींबा नसणारच आहे. पण ज्या गोष्टी या शहरात वारंवार होतात आपल्या शहराची बदनामी होते ही बदनामी होत असताना आपल्या शहराला आपणच कुठतरी काळीमा फसतो की काय असे सुध्दा आमच्या मनामध्ये येते. आज १२८ जण निवडून आलेलो आहेत ते या शहराचे याठिकाणी विश्वस्त म्हणून काम करतो. विश्वस्त असताना महानगरपालिकेकडून ज्या काही या धार्मीक प्रचलीत पध्दती आहेत त्यांची सुध्दा जोपासणा करत असताना जर अशा चुका होत असतीलतर ते मात्र नक्कीच चुकीच आहे यात काही शंका नाही. याच्यामध्ये जी काही पध्दत अवलंबीली गेलेली आहे त्या पध्दतीमध्ये रितसर बदल असेलतर त्यामध्ये चुका का झाल्या, कशामुळे झाल्या याची चौकशी नक्कीच झाली पाहीजे. त्यामध्ये अतिरीक्त आयुक्तांचे नाव घेतले गेले, मुलेपचे नाव घेतले गेले ज्या ज्या अधिका-याच्या माध्यमातून या प्रकारणास मंजूरी दिली गेली त्यांच्या समोर सुनावणी झाली आणि त्याच्यामुळे शहरामध्ये अशाप्रकारची परिस्थिती तयार झाली ती पुसणे तुमचे आमचे कर्तव्य आहे. आयुक्त साहेब, केवळ दुस-या एखादया प्रकरणावरुन कोणालातरी रजेवर पाठविणे, डी.ई.लावणे एवढयावर तुमच काम भागणार नाही. त्याचा अहवाल, त्याचा व्हाईट पेपर तुम्हाला येथे पब्लिश केलाच पाहीजे. आज शहरामध्ये अनेक काम झालेली आहेत. आमच्या भगीनेने सांगीतले विकास नगरी, विकासनगरी, विकासनगरी ती कोणी केली आणि अधिका-यांन केलं ते काय होतं त्याच क्रेडीट जर तुम्हांला तुमचं असेलतर चुकीच्या कामाचे क्रेडीट अधिका-यांना का

देता, बरोबर आहे, अगदी बरोबर. अधिका-यांची मानसीकता जर चांगली नसती मग हे शहर इतक्या नावारुपाला आलच नसतं. तुम्ही सगळेजण अधिकारी एकदम चांगल्या नजरेचे अधिकारी आहात तुमच्या प्रत्येक अधिका-याकडे सांगीतलेल काम चोखपणे बजावण्याची मानसीकता आहे म्हणून या शहराचा कायपालट होण्यास मदत झाली आहे हे माझ्यासारख्या किंवा सभागृहातील कुठल्याही माणसाला विसरुन चालणार नाही माझ्या शहरातल्या ६४ वॉर्डापैकी एकही वॉर्ड, एकही प्रभाग आज असा नाही त्याच्यामध्ये प्रत्येक, मग तो कुठल्याही पक्षाचा नगरसेवक असू दया की त्याला त्याच्या वॉर्डामध्ये वैशिष्ठयपुर्ण काम केले नाही असे त्याला म्हणता येणार नाही. प्रत्येक जण छाती फुगवून सांगणार मी माझ्या प्रयत्नातून अमुक काम केले, तमुक काम केले. असा एकही प्रभाग नाही की मी माझ्या प्रभागामध्ये माझ्या मनासारख काम करुन घेत नाही. १२८ जण तुम्हांला सांगतील. याचे कारण काय त्याला भेटलेला प्रत्येक अधिकारी त्याचे ऐकतो हे सुध्दा कुठतरी आपण लक्षात घेतले पाहीजे. कदाचित चार-दोन लोक जिथ नगरसेवकांचा आणि सबंधित अधिका-यांचा संबंधच नाही असेही काही विभाग तुमच्याकडे आहेत. उदा. एसआरए आहे आमच्या सगळया नगरसेवकांचा तिथं काहीही संबंध येत नाही. का तर वॉर्डामध्ये झोपडपट्टीच नसते, स्लम ऐरीया नसतो, त्यामुळे त्यांचा कदाचित तिथ जाण्याचा योग कमी येत असेल. पर्यावरण सारखा विभाग आहे की तिथ प्रत्येक ठिकाणी जायची गरजच नाही, महिला बालकल्याणमध्ये आमचे १२८ ची १२८ लोक संबंधीत आहेत परंतु सगळेच जण तिथ जात नाहीत. अग्निशमन सारखा विभाग त्याठिकाणी १२८ लोकांना त्यांचा कारभार करण्याची माहीती नसेल. पण प्रत्येक विभागामध्ये राजकीय सहभाग नाही याचा अर्थ तो विभाग चुक्तोय असे नाही. काही विभागच असे आहेत की त्याठिकाणी राजकारण्यांची गरजच नसते. काही विभाग असे आहेत की तिथ शंभरवेळा लक्ष घालूनही पाहीजे तसं कामच करु शकत नाहीत, रिझल्टही देवू शकत नाहीत. पहीला अर्धा एक तास आपण खेळाडूवर घालवला, खेळाडूचा विभाग तसाच आहे. कितीही तुम्ही करा, आपल्या शहरातील खेळाडूना, स्पर्धकांना किती दया म्हणलतरी त्या विभागाची मानसीकता नाही बदलू शकत. आम्ही लोकांनी किती मागणी केलीतरी नाही सुधरु शकत तो विभाग. ही कुठतरी आपली कमतरतेची बाजू आहे. हे सगळ असताना या शहरामध्ये गेल्या पंधरा-वीस दिवस केवळ महानगरपालिकेची बदनामी बघायला मिळते हे वाचलतर मनाला सुध्दा कुठतरी वेदना होतात. मग त्यामध्ये मुर्तीच्या मधला भ्रष्टाचार असू दयात, शवदाहीनी मधला ज्या प्रकारे निवीदेच्या बाबतीत गोंधळ झाला, फेरनिवीदा करण्यात आल्या अधिका-यांना सक्तीच्या रजेवर पाठविण्यात आले. सांगवीतल्या शवदाहीनीच्या बाबत संबंध त्याला जोडण्यात आले. सांगवीमधील शवदाहीनी ही शहरातील पहीली शवदाहिनी आहे. ५ जुन या पर्यावरण दिवसाच्या दिवशी मागच्या वर्षी एक वर्षा पुर्वी त्याच लोकार्पण मा.महापौरांच्या हस्ते झाले त्यांच्या उपस्थितीमध्ये केलं. त्याठिकाणी आल्यानंतर सांगवीच्या स्मशानभूमी बाबतीतील संदर्भ चालू

निवीदा प्रक्रीयेला जोडले गेले. कायदेशिररीत्या अगदी बरोबर आहे, दिल्लीचे संदर्भ याठिकाणी जोडले गेले हे सगळे जोडत असताना दिल्लीच्या कॉन्ट्रॅक्टरचा रेटटार्गेट नाही टाकू शकत त्यांनी त्याच त्या ठिकाणाहून निवीदा भरु शकता अशी टेन्डर सिस्टीम आपण आपल्या ठिकाणी केली. ते सुध्दा आपण कुठतरी विसरता कामा नये. हे अगदी बरोबर आहे की राजकीय लोकांच काम नाही. निवीदा प्रसिध्द झाली की ते बघणे, निवीदा कशी प्रसिध्द झाली बघणे हे माझे काम नक्कीच नाही पण जी व्यक्ती त्याठिकाणी हे काम करण्यासाठी असतात त्या लोकांचे काम आहे. मग कोणी गुजरात मध्ये निवीदा भरली, कोणी लोणावळयाची, तळेगावची भरली असेल, कोणी दिल्लीला भरली असेल अंतरराष्ट्रीय स्तरावरील नाही पण आपल्या येथे नोंदणी झाल्यानंतर ते रजिष्ट्रेशन आपल्या येथून झाल्यानंतर तो ठेकेदार आपल्या येथे निवीदा भरण्यासाठी जर पात्र असेलतर त्याला तुम्ही-आम्ही कोणीच रोखू शकत नाही ही सुध्दा काळया दगडावरची रेष आहे. आज डॉ.श्रीकर परदेशी आयुक्त म्हणून होते त्याच आयुक्तांनी सांगवीतील संपुर्ण प्रक्रीयेच्या बाबतीत ती प्रक्रीया वर्षेभर चालवली होती. सांगवीची पुर्णपणे शवदाहिनी प्रक्रीया ही त्या काळात अतीशय संतगतीने चालू होती. माझा स्वत:चा पाठपुरावा त्याला होता. मी जाहीरपणे सांगतो स्मशानभूमीची सांगवीची जागा महापालिकेच्या ताब्यात नाही. आमच्या कुटूंबाची जागा आहे. त्याठिकाणी मुळातच स्मशानभूमी आहे, माझ्या आजोबानी ती जागा महापालिकेला त्या काळात दिलेली आहे, रेकॉर्डवर आहे. आज जी शवदाहिनी झाली ती जागा महापालिकेच्या ताब्यात नाही तरी सुध्दा आपल्या शहरात अशाप्रकारचे काम होणार असतीलतर करायला हरकत नाही शेवटी तिथ दुसर काहीच करु शकत नाहीत. त्यामुळ त्या जागेवरती स्मशानभूमी उभी आहे. हे सगळे होत असताना ब्ल्यू लाईनचा प्रश्न आला, अनेक अडचणी आल्या. परंतु एसटीपी, ब्ल्यू लाईन या गोष्टी त्यामध्ये अलौड असल्यामुळे मला जरा काम करायला सोप झाल. सांगवीच्या ज्येष्ठ नागरीक संघाची त्यावेळेस मागणी होती की आपल्या शहरात कुठेतरी गॅसदाहिनी व्हावी म्हणून. दापोडीमध्ये मागणी झाली, पिंपळेगुरव याठिकाणी मागणी झाली, पिंपळेसौदागर, वाकड, पिंपरीमध्ये मागणी झाली. निर्णय घेताना प्रभागाच्या स्तरावर निर्णय व्हायला पाहीजे होता. प्रभागाच्या पातळीवर तो निर्णय होताना तसाच झाला होता हेही तुम्हांला सांगतो. परंतु आज संपुर्ण प्रक्रीया होत होती त्या प्रक्रीयेच्या दरम्यान जे काही चुकीचे दर प्रशासनाला वाटले त्याच्यानंतर प्रशासनाने एक फेरनिवीदा केली त्याच्यामध्ये संबंधीत कॉन्ट्रॅक्टर लोकांनी एकाच माणसाने २ कोटी भरले दुसऱ्या वेळेस मात्र ते ७५ लाखा ते ५० लाखानी कमी कोट केलेले आहे असं झाल्यानंतर मात्र या प्रकारणात शंका येण्यास शंभर टक्के वाव आहे यात काही वाद नाही. सांगवीच्या बाबतीत स्थायी समितीमध्ये डॉ.श्रीकर परदेशी यांनी सांगीतलं मी या माणसाचे पेमेंट तोपर्यंत देणार नाही जोपर्यंत ते काम कायदेशीररित्या पुर्ण होणार नाही. हे ॲग्रीमेंटमध्ये सुध्दा आहे. याचे बील आदायगी काम पुर्ण झाल्यानंतर करावी. त्या दरम्यान डॉ.श्रीकर परदेशी यांनी सांगवीच्या

स्मशानभूमिबाबत अधिका-यांना, कॉन्ट्रॅक्टरला वारंवार सूचना दिल्या, ताकीद दिली शहरातील जर पहील काम होणार असेलतर ते तेवढे चोक झाले पाहीजे, चांगले झाले पाहीजे ही जबाबदारी संबंधीताची राहील. डॉ.श्रीकर परदेशीनी जर या प्रकरणाला मंजूरी दिलेली असेल तर आज मला त्यांच्यावर सुध्दा जर कोणी शंका घेत असेलतर, त्यांच्यावर सुध्दा ताशेरे ओढावे लागले. हे काम करुन घेताना मला डॉ.श्रीकर परदेशी यांच्याकडून फार वेळा कायदेशिर बाबी सांगण्यात आल्या. याला एमएसईबीचा प्रॉब्लेम आहे, याला एमपीसीबी अलौड करेल का, मी सांगीतले साहेब, ते पर्यावरण पुरक असेलतर ते तुम्ही बघा, ते तुमच काम आहे. या गोष्टी कोणी काय कोट करायच, कोणी काय करायच हा त्यांचा प्रश्न आहे. नगरसेवक म्हणून आमच्या १२८ लोकांची नोंद तुमच्या टेंडरींग सिस्टीमला नाही. त्यामुळे संबंधित जे जे कोणी रजिष्टर्ड लोक असतील त्या लोकांनी आताच्या निवीदा प्रक्रीयेत अशाप्रकारचा गलथान कारभार का करायचा हा एक प्रश्न माझ्या सारख्यांना पडतो. एका बाजुला दोन ते आडीच कोटी रुपयाची निवीदा कोट करायची दुस-या बाजूला परत फेरनिवीदा झाल्यानंतर तो कोट सव्वा कोटी किंवा दिड कोटीवर आणायचा तीस-या बाजूला मात्र मागणी करणा-या नगरसेवकांनी तसच रहायचं. मग आमचे शत्रुघ्न काटे असतील, प्रभाकर वाघेरे असतील, मयुर कलाटे असतील या प्रत्येकानी आमच्या परिसरामध्ये, वाकड, पिंपळेसौदागर इतका विकसीत परिसर झालेला आहे. त्याठिकाणी जेंव्हा अंत्यविधी होतो त्या अंत्यविधीला काही लोकां बरोबर तर पाच ते सात लोक सुध्दा नसतात. पारंपारीक पध्दतीने लोक अंत्यविधी करु शकत नाहीत ही वास्तव परिस्थिती आहे, फॅक्ट आहे हे तुम्हां-आम्हांला सगळयांना माहिती आहे. काही वेळेस ज्याठिकाणी आमच्यासारखा गावठाण परिसर आहे स्थानिक लोक आहेत त्याठिकाणी काही अडचण येत नाही आजुबाजूचे सगळे लोक मदत करतात. परंतु पिंपळेसौदागर, वाकड सारखा एकदम हायफाय ऐरीया डेव्हलप झालेला आहे तरी फ्लॅट मध्ये शेजारी सुध्दा शेजा-याला ओळखत नाहीत. त्याला माहितीच नसतं कोण आपल्या शेजारी आहे. त्यामुळे अशावेळी अशा ठिकाणी जर मागणी झालीतर त्या मागणीचा पाठपुरावा करणे त्या संबंधीत नगरसेवकांचे काम असणार त्यामुळे ज्या ज्या भागात ज्या पाच ठिकाणी ही प्रक्रीया केली गेली त्या प्रक्रीयेमध्ये जर काही चुका झाल्या असतीलतर त्या चुकाला नक्की पाठीशी घालू देऊ नका. आज पुर्ण सिस्टीम कॉम्प्युटराईज झालेली आहे. जर तुमची नोंदणी येथे झालेली असेलतर जगात कुठल्याही ठिकाणी बसून आपल्या महानगरपालिकेत कॉन्ट्रॅक्टर म्हणून काम करता येतं. याचा अनुभव ब-याच लोकांनी घेतला. जर त्यामुळ परस्पर काही उदयोग कॉन्ट्रॅक्टर लोकांमध्ये झालेले असतीलतर चांगल्यापणान बघण्याची भूमिका ही प्रशासनाचीच राहणार आहे. हे आयुक्तांनी लक्षात घेतल पाहीजे. आयुक्त नवीन नवीन म्हणतो किती दिवस नवीन तरी राहणार. कुठना कुठ तरी आपल्याला या निर्णया पर्यंत आलं पाहीजे. आम्हांला सुध्दा रोजच उठायच आणि पेपरला काहीतरी वेगळच वाचत बसायचं हे आम्हांला सुध्दा नको वाटू लागलेले आहे. रोजच

अशाप्रकारच्या बातम्या येत असतीलतर त्याला कुठना कुठतरी थांबवण्याच काम आपण केल पाहीजे. आज लोकमतला स्टिंग ऑपरेशन झाले, चाकू घेवून फिरत होते कोणीही आडवले नाही. याला नक्कीच कुठेतरी आळा बसला पाहीजे. मध्यंतरी मा.महापौर साहेब, आयुक्तांशी माझ बोलन झालं. आयुक्तांनी सांगीतल की आपला सुरक्षा विभाग हा ढिसाळ आहे. ढिसाळ म्हणजे काय आम्ही थांबायच का ईथ, त्यांनी नाही सांगायच ढिसाळ. ते ढिसाळ म्हणजे तुम्ही ढिसाळ तुम्ही नाही ढिसाळपणा दाखवायचा. त्यामुळे या ढिसाळपणाला जर कुठ थांबवायच असेलतर तुम्हांला सुध्दा ज्या कायदेशीर बाबी, जे आयोग्य आहे ते गेटबाहेरच राहीले पाहीजे. आम्ही या महानगरपालिकेचे विश्वस्त आहोत, आम्हांला याठिकाणी पाच वर्षे कालावधीसाठी निवडून दिलेल आहे त्या कालावधीमध्ये आम्हांला जर येथे बंधन असेलतर त्या बंधनाची पुर्वकल्पना आम्हांला दया. आता येथे सांगीतले बरेचसे जण रिव्हॉल्व्हर लावून सभागृहात येतात आणि ते अधिकृत आहे. पण या सगळया ख-या-खोटया गोष्टी असल्यातरी आपल्या बरोबर महानगरपालिकेत येत असताना काय आसाव आणि काय नसाव याचा विचार करण्याची सुध्दा आज आपल्यासारख्याची वेळ आलेली आहे. त्यात बातम्यामुळे सर्वसामान्य लोकांमध्ये काय परिणाम होतो. असा ढिसाळ कारभार चालणार असेलतर येथून पुढे महानगरपालिकेचा विकास खुंटेल असे म्हणलेतरी वावगे ठरणार नाही. पण हे जर कुठं थांबवायचे असेलतर प्रशासनावर तुमचा वचक पाहीजे. आम्हालाही वाटल पाहीजे की आम्ही एखाद काम चांगले घेवून गेलोतर नक्की होईल आणि वाईट घेवून गेलोतर नक्की होणार नाही. यामध्ये दोघांचीही जाणीव जेंव्हा आपल्यासारख्याना असेल तेव्हा प्रशासन नीट राहील. मगाशी सुलभाताई म्हणाल्या तुम्ही बोलतच नाहीत त्यामुळे काय आहे काय नाही काही कळतच नाही. आयुक्त साहेब बोलले पाहीजे. आज पर्यावरणवाल्यांना पाठविले, परवा भांडारवाल्यांना पाठविणार, परवा स्थापत्यवाल्यांना पाठवा, नंतर ड्रेनेजवाल्यांना पाठविणार. तुम्ही अधिका-यांना सक्तीच्या रजेवर पाठविलेतर महापालिकेचे अधिकारी कमी होतील. हा पर्याय होऊ शकत नाही त्यामुळे सक्तीच्या रजेवर पाठविण्यापेक्षा जो कोणी दोषी असेलतर त्याला येथे बसवा, इथ इथ तु चुकलास, हे बरोबर आहे असे त्याला इथ बसून सांगा. त्याला शिक्षा दया. सक्तीची रजा म्हणजे काही शिक्षा नाही. घरी आरामात बसलेले असतीलतर यापेक्षा तुम्ही याठिकाणी बोलवा. संबंधित विभागाच जे काम आहे तेवढच काम त्याला नाही. मी मागे तुम्हांला नदीवर घेवून गेलो होतो आमच्या मुळा नदीचा, पवना नदीचा प्रश्न आहे. हे काम पर्यावरण विभागाशी संबंधित येते. बाकीचे लोक काम करत नाहीत. माझी मागणी तीच आहे. पेपरला येते राष्ट्रवादी अधिका-याच्या पाठिशी आहे. राष्ट्रवादी नाही, राष्ट्रवादीला काही एकच दुकान आहे का. तो काही फक्त स्मशानभूमि घेवून बसलेला नाही. त्यांच्याकडे एसटीपी प्लॅन्ट, नदी सुधार आहे, कचराडेपो आहे. इतर गोष्टी सुध्दा आहेत. जो वादातीत विषय आहे त्या वादातीत विषयावर सक्त ताकीद दया. एकदा तुम्ही अशी भूमिका घेतल्यानंतर आपल प्रशासन सुध्दा खच्चीकरण करण्यास

तुम्हीच कारणीभूत राहाल. त्यामुळे आपल्या महानगरपालिकेत जो चुकीचे काम करतो त्याला शिक्षा पण दिली पाहीजे. परंतु त्याला अशी शिक्षा नको की ते समोरच नाहीत मग तुमच्या प्रश्नाचे उत्तर दयायचे कोणी. त्यांनी केलतर त्यानाच विचारल पाहीजे. डीई लावा, इथे बोलवा, चौकशी होऊ दया, समोर येऊ दया तुमच्या समोर सुनावणी घ्या त्याशिवाय आपण या प्रकरणाचा छडा कसा लावणार. आपल्याला जर त्या प्रकरणाच्या मुळाशी जायच असेलतर नार्को टेस्ट करा. त्यांचे पण काहीतरी नियम, अटि, शर्ती असतीलनां. नार्को करायच्या, पण नार्को कधी करणार ते कामावर तरी असले पाहीजेत. तुम्ही त्याला सक्तीच्या रजेवर पाठविलेले आहे तर तो कसा येथे नर्कोला येऊ शकेल. जे वादातीत प्रकरण आहेत, मग त्यामध्ये महानगरपालिकेमध्ये हात्यारासह येणा-या या सगळयांना लेखी ताकीद दया. इतकी भयानक बदनामी महानगरपालिकेची होते. ती आपण रोज रोज वाचू शकत नाहीत. वाईट वाटत की आपली महानगरपालिका एका बाजूला तुमच्या सगळयांच्या साथीने एवढी सुंदर झालेली आहे व दुस-या बाजूला काहीतरी असे विषय येतात त्याला थांबविण्याचे काम तुम्ही केलं पाहीजे. वाईट कामाला आळा घालण्यास आमचे सहकार्य नक्कीच असेल. अतीशय दुर्दैवी गोष्ट अशी आहे की आज बोलतोय कशावर आपण तर देव आणि ज्याठिकाणी मानव संपतो त्या गोष्टीवर आपण बोलतो. महापालिकेसाठी या लाजीरवाणी गोष्टी आहेत. महानगरपालिकेमध्ये या गोष्टीची चर्चा होणं सुध्दा अतीशय दुर्दैवी आहे अशाप्रकारच्या चर्चेस आपण चार-चार, पाच पाच तास वेळ देतो. काहीतरी घडण्या सारख्या गोष्टी दिसतात. त्याच्या ओरडण्याला काही किमंत नसेलतर ठिक आहे त्यांच तोंड बंद करा. परंतु जे काही आरोप-प्रत्यारोप होतात याच्यासाठी तुम्हांला या महापालिकेचे आयुक्त म्हणून ठाम भूमिका घेतली पाहीजे ती भूमिका लवकरात लवकर घेणे गरजेचे आहे. आमच्या सारख्याना प्रत्येकाला वाटतय चार महीन्यानी इलेक्शन आलेले आहे. प्रत्येकाच्या अंगात आता वाजायला लागलयं त्यामुळे आम्हांला वाटतय की प्रत्येकजण याच्यावर अशी भांडवल करतय. अशी भांडवल पण ठरावीक ठरावीक मर्यादेपर्यंत असावीत. याच्यामध्ये तीन महीन्याचा कालावधी जो आहे, रोजच उठून अशा गोष्टीना सामोरे जाण्यापेक्षा तुमची भूमिका एकदा कणखर राहीलीतर आम्हांलाही लक्षात येईल. प्रत्येकजण जे काही करतय ते राजकीय हेतूनेच आहे, असा दृष्टिकोन राहणारच आहे. हा सगळा संभ्रम जर तुम्हां-आम्हांला थांबवायचा असेलतर तुम्हांला ठाम भुमिका घेतली पाहीजे. शंभर टक्के ज्या प्रमाणे योगेश बहल यांनी मगाशी मागणी केली जे कर्मचारी दोषी असतील त्या प्रत्येकावर याठिकाणी कारवाई झाली पाहीजे त्याच्यांही या सुचनेला मी अनुमोदन देतो. मा.महापौरांनी तसे योग्य ते आदेश मा.आयुक्तांना दयावेत अशी विनंती करतो.

**मा.आशा शेंडगे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर मी या सभागृहामध्ये कुमार साहेबांच मनापासून कौतूक करेल, त्यांचे अभिनंदन करेल. चुक झाली, नाही झाली याची शहानिशा करण्या आदि त्यांनी या विषयाला छेडल आणि सगळयांच्याच

आतमध्ये जी काही खद्खद् होती ती एकदाची बाहेर पडण्यास सुरवात झाली. मगा पासून आल्या आल्या आप-आपली मत मांडण्याचा प्रयत्न केला. मगाशी म्हणले गेले की येथे प्रशासनाच चुकीचे आहे. जर सत्ता आमची, सत्तेची फळं चाखयला गोड लागत असेल, तर त्याचे काटे सुध्दा सहन करण्याची मानसीकता सुध्दा आपल्या मध्ये निर्माण झाली पाहीजे. सत्ता जर का तुमची आहे तर प्रशासनाच्या चुकीच्या कामावर अंकुश ठेवण्याची तयारी सुध्दा आपलीच आहे नाहीतर तुम्ही या सत्तेतून बाहेर पडायला हरकत नाही. सत्ताच तुमची आहे, जर सत्तेत तुम्ही बसता तर प्रशासनावर अंकुश ठेवण्याची जबाबदारी निश्चितपणे याठिकाणी या सभागृहामध्ये किंवा या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये आपण जर काही सत्तेत बसलोतर आपण निश्चितपणे त्याचे असणारे आरोप सुध्दा स्विकारण्याची मानसीकता ठेवली पाहीजे. आता खरंतर सन्मा.अजीत दादा पवार यांच्या वाढदिवसा निमीत्त आख्ख्या शहरामध्ये बॅनर्स लागले होते, खुप कौतूक वाटले, आम्हांला की आपली विकासनगरी आणि तिथे मोठमोठे उड्डाण पुल असतील, शहराचा विकास आपण त्याठिकाणी लावला. निश्चितपणे कौतूकास्पद बाब होती म्हणून तुम्ही त्याच राजकीय भांडवल केलं, केलच पाहीजे, आमच्यामुळे झाले म्हणलेच पाहीजे. त्याच ठिकाणी लावा, सिमाताई सावळे यांनी भ्रष्टाचार बाहेर काढला त्याचेही कात्रण लावा. ते सिध्द करा आणि ते आम्ही सिध्द नाही करु शकलोतर निश्चितपणे मगाशी सिमाताई म्हणाल्या त्याप्रमाणे राजकीय सन्यास घेण्याची मानसीकता आमच्यामध्ये निश्चितपणे आहे आणि दिलेला शब्द पाळणारे निश्चितपणे आम्ही आहोत. लावा त्याठिकाणी कात्रण आणि सांगा की यांनी इतके इतके भ्रष्टाचाराचे मुद्दे काढले आहेत अनेकांच मगापासून म्हणणं आहे की २०१७ आलं, आंगत आलं, वाजतयं, घुमतंय. आहो काय आंगत येतं, काय घुमतय आणि काय वाजतयं. मला वाटत २०१२ ला या सभागृहात आम्ही पाऊल ठेवल, खरंतर यशवंतराव चव्हाण सभागृह याठिकाणी लोकशाहीचे मंदीर म्हणले जाते, खुप तळमळ घेवून याठिकाणी आलो होतो. मला वाटत अजूनही पहील्या जीबीचा विषय आठवतोय. विषय २ कोटी रु. खर्चाचा आपण विषय केलेला होता आणि त्या विषयावर सुध्दा त्या सभागृहामध्ये बोलल्या होत्या. नवी होते, पहीली जीबी होती माझ्या आयुष्यातली तरी इतक बोललो होतो. त्यामुळे आता कुणी सांगू नका २०१७ आलय म्हणून घुमतय, ज्याच्या अंगात घुमतयं त्याच्याच अंगात ते घुमू दयात आम्हांला घुमायची गरज नाही. जोपर्यंत भ्रष्टाचार करत राहणार तोपर्यंत भ्रष्टाचार आम्ही शोधतच राहणार. जे अपंग लोक आहेत त्यांना आपण श्रवणयंत्र देतो. लोकांना मदत करतो अशी भावना तुम्ही दाखवता. यात निश्चितपणे अपंगाना मदत केली पाहीजे. त्यात सुध्दा काय झाल, त्याठिकाणी आमचा विजय निश्चिपणाने आहे त्याठिकाणी भ्रष्टाचार थांबला आणि त्यांना साहीत्य देण्याऐवजी पैसे देण्याचा विषय मंजूर केला, कौतूक आहे ज्याठिकाणी तुम्ही स्विकारल. शिवणयंत्र विषय काढला, गुगलवर सर्च मारलातर हवी ती माहीती आपल्याला ताबडतोब उपलब्ध होते. श्रवणयंत्र, शिवणयंत्र मधील

भ्रष्टाचार स्वानटेक्स मशीन ३०७३/- रु. ला नेटवर सहज उपलब्ध होते. त्यासाठी कोणतही संशोधन, कोणाला पत्र पाठवायच का, इस्टीमेट करायच का कशाचीही गरज लागत नसताना सांगा. मग हे काय प्रशासन दोषी नाही. तीथले अधिकारी फाईलवर सहया करतात ते दोषी नाहीत, कस शक्य आहे असं म्हणणं. प्रशासनाने निश्चितपणे विषय समोर आणायचे असतात आणि या सभागृहामध्ये विश्वस्त म्हणून आम्ही त्याच्यावर सहया करतो. त्यांनी त्याची शहानिशा करुनच सही करायची असते. म्हणूनच ट्रस्टी म्हणतात आपल्याला. म्हणूनच आपण याठिकाणी मानधनावर काम करतो, येथे आपल्याला पगार नाही. आपण मानधनावरती काम करतो, लोकशाहीच्या मंदीरामध्ये आपण विश्वस्त म्हणून याठिकाणी आलेलो आहोत. मग का बरं तिथे सिमा सावळे, आशा शेंडगेना सापडत की ३०७३/- रुपयाला मशीन मिळते आणि तीच मशीन, तेच स्पेसिफीकेशन, तोच नंबर असलेली मशीन आमच प्रशासन ४७७७/- रु. ला घेते काय कारण आहे. त्यानंतर काय, सायकलचा मुद्दा म्हणजे आंगात घुमतंय का आम्ही बळच विषय काढतोय का तर याच्यावर निश्चितपणे नकार्थी उत्तर आहे. कोणी खोटे आरोप, उचलली की लावली टाळाला समजण्याच कारण नाही. प्रत्येकवेळेला ज्या ज्या ठिकाणी आम्हांला चुकीच्या गोष्टी दिसतात, आमच्या निदर्शनास येतात, तुमच्या सारखे डोळे बंद करुन दुध पिण्याची भुमिका आम्ही कधीच कदापीही करुच शकत नाहीत. आणि करणा-यांना त्यांचे डोळे उघडायला लावल्या शिवाय आम्ही याठिकाणी थांबणारही नाही. सायकलीचाही मुद्दा होता. त्यावेळेस सांगीतल सर्व्हिस स्टेशन उघडावीत व ते त्याठिकाणी रिपेअरींग झाले पाहीजेत अशी मागणी केली ती मान्य झाली. त्यानंतर त्या विषयाला ग्रीन सिग्नल तुमच्या माध्यमातून दिला गेला. आम्ही सायकलचे स्पेसिफीकेशन आमच्या अधिका-यांना मागीतले तर त्याच्यामध्ये स्पेसिफीकेशन होत की सायकलला मुठ असली पाहीजे. सायकलला मुठ असणारच आहे. सायकलच्या चैनीच मडगाड असलं पाहीजे. सायकलला स्टॅण्ड असले पाहीजे, शीट असले पाहीजे असे चार स्पेसिफीकेशन आहेत. लाज वाटते सांगताना. अधिकारी शिकलेले आहेत असे आपण म्हणतो, ईजिंनीअर्स आहेत, त्या खुर्चीवर ते बसतात त्याठिकाणी त्यांनी स्पेसिफीकेशन काय मांडल पाहीजे. सायकलचा पत्रा किती जाडीचा असला पाहीजे, कशाप्रकारचा असला पाहीजे. ते सगळ बाजूला ठेवल आणि शीट असले पाहीजे, मुठ असली पाहीजे, हे काही मुद्दे आहेत मांडायचे. हे आमच प्रशासन स्पेसिफीकेशन माडतं आणि सत्ताधारी म्हणून, ट्रस्टी म्हणून आम्ही त्याच्यावरती सहया करतो. आणि तरी म्हणायच की आम्हांला कोणी दोषी धरायच नाही. आम्ही सत्ताधारी आहोत म्हणून आमची काही चुक आहे का, निश्चित चुक आहे का नाही याच अवलोकन त्याचा विचार आपण स्वत: करायचा. त्यानंतर मुर्ती प्रकरण आल, शवदाहिनी प्रकरण आलं. ईकोमॅन मशिन मला वाटत मगा आपले बहिरवाडे काका म्हणाले, खरंतर ते ज्येष्ठ नगरसेवक आहेत, ते खुप चांगल्याप्रकारे क्यिार मांडतात, ते अभ्यासू आहेत ते म्हणाले विनाकारण तुम्ही संजय कुलकर्णीना सक्तीच्या रजेवर पाठविले आहे ही चुक झाली.

आता प्रशांतभाऊ शितोळे सुध्दा म्हणाले संजय कुलकर्णी यांना सक्तीच्या रजेवर पाठविलेले आहे ही अत्यंत मोठी चुक आहे, त्यांना खरंतर समोर बसून सांगीतल पाहीजे. ईकोमॅन प्रकरण मला वाटत पिंपरी चिंचवड शहराला नवीन नाही. खुप त्यावेळेला सुध्दा बातम्या आल्या. त्यांना त्यावेळी सहा वेळेस नोटीस सुध्दा सन्मा.श्रीकर परदेशी साहेब यांच्या वतीने बजावण्यात आलेल्या होत्या. त्यांना मेमो दिले होते. जर ईकोमॅन मशीन मध्ये ते दोषी नव्हते आणि त्यांना क्लीनचीट आजही देण्यात आली नाही. मग ईकोमॅन मशीनमध्ये काय झालं. पुन्हा ईकोमॅन मशीन कोणाच्या येथे लागली होती हे सांगायच का सभागृहात पुन्हा एकदा का असं होत सगळया गोष्टी स्पेशल लोकांसाठी होतात. प्रत्येक गोष्ट स्पेशल लोकांसाठी करतात. बाकी नगरसेवक नाहीत, आम्ही नगरसेवक निवडून आलेलो नाहीत, आम्ही सुध्दा लोकांचे मते घेवूनच या सभागृहामध्ये सन्मानाने आलेलो आहोत. आमच्या येथे कोणत्या गोष्टी करत नाहीत आणि पुन्हा म्हणायच की आम्ही सगळयांना बरोबर घेवूनच काम करतोत निश्चितपणे करतात आणि म्हणूनच ईकोमॅन मशीन कोणा कोणाकडे सापडली. संजय कुलकर्णी यांना सक्तीच्या रजेवर पाठवा म्हणून आम्ही मा.आयुक्तांना विनंती केलेली होती आणि आयुक्तांनी ती मान्य केली. संजय कुलकर्णीशी आमच काही वैमनस्य नाही. एखादया वाघाच्या तोंडाला रक्त लागल्यास त्याची कशी अवस्था होते की पुन्हा पुन्हा त्या गोष्टीची अपेक्षा, ईकोमॅन मशीन आहे हे त्यांना कळलं, काही झाल नाही चार काय सहा मेमो चलताय. यहाँ ता सबकुछ चलता हैं. अशाप्रकारची भूमिका त्यांच्या मनामध्ये आली आणि नंतर त्यांनीच या सभागृहामध्ये पहील्यांदा सांगवीच शवदाहिनीचा विषय आणला. सांगवीच्या शवदाहिनीमध्ये मगाशी प्रशांत दादा म्हणाले की खरंतर सांगवीची शवदाहिनी आणली. मी खुप काळजी घेतली होती निश्चितपणे पहील्यांदा आलेला विषय होता. आम्हांलाही त्यात चुका काढायच्या नव्हत्या. किंबहूना बरोबर असेल असे गृहीत धरले त्यामुळे ती फाईल आम्ही वाचण्याचा सुध्दा त्रास घेतलेला नाही. चला पर्यावरणपुरक शवदाहिनी आपल्या शहरामध्ये येते, चांगली गोष्ट आहे, अभिमानाची गोष्ट आहे, कुणाच्या सजेशनननी आली, कुणाच्या भागीदारीनी आली का कशाप्रकारे आली, आम्ही आजीबात चर्चा करण्याचा विचारही केला नाही. परंतू ५ जून २०१५ रोजी ती शवदाहिनी सांगवीमध्ये बसली. पर्यावरण दिनाचे औचित्य साधले खुप चांगली गोष्ट आहे. परंतु २०१५ ला ती शवदाहिनी बसवली आणि अवघ्या वर्षभरामध्ये किंबहूना वर्ष सुध्दा नाही जून महीन्यामध्ये आणि लगेचच फेब्रूवारी २०१६ मध्ये पुन्हा पाच शवदाहिनी बसविण्याचा विषय आणला. लाज वाटते, जर सांगवीमध्ये १ कोटीची शवदाहिनी त्यावेळेस आणलेली होती. पुढच्या आठ महीन्यामध्ये असा काय दामदुप्पटीचा विषय झाला. १ कोटीची मशिन आपण २ कोटीला घेण्याचा प्रस्ताव या सभागृहापुढे आला आहे आणि त्यावेळेला मात्र मग आम्ही येथे काही तरी चुकतंय, कुठतरी पाणी मुरतंय आणि मग शोध मोहीम सुरु झाली आहे. त्यावेळेला सन्मा.आयुक्त राजीव जाधव यांना सांगीतलं की साहेब, आपण एक मशिन १ कोटी ३६

लाखाला जून महीन्यामध्ये घेतो आणि पुढच्या अवघ्या सात-आठ महीन्यात त्याची किमंत दामदुप्पट कशी होते याचा जरा खुलासा दया. राजीव जाधव यांनी सांगीतले समोरच्या ठेकेदाराला बोलावून घेतले त्यावेळेला ते रेट ५४ टक्के वरुन २५ टक्के कमी केले तरी त्यामध्ये सन्मा.राजीव जाधव यांनी लिहीलेल होतं यामध्ये संगणमत झालेचे सकृतदर्शनी दिसून येत आहे असे राजीव जाधव यांनी लिहीलेले आहे आणि ती निवीदा रद्द करण्यात आली. तरी म्हणा की, संजय कुलकर्णी दोषी नाहीत, त्यांना जाणीवपुर्वक सक्तीच्या रजेवर पाठविले आहे. मगाशी आमचे खाडे भाऊ म्हणाले की चुक असेलतर हा बुट घ्या. त्यांची तळमळ मला कळते. रोज रोज पेपरला चुकीच्या बातम्या वाचायच्या, पक्षाची बदनामी वाचायची, वेदनातर होणारच मग थांबवाना चुका, थांबवा भ्रष्टाचार, प्रशासनावर अंकुश का ठेवू शकत नाहीत. त्यावेळेला सन्मा.आयुक्तांनी ती निवीदा रद्द केली आणि तेथून पुढच्या काळामध्ये पुन्हा अवघ्या चार महीन्यातच परत निवीदा काढल्या. पुन्हा निवीदा भरायला तीच माणस. आपल्याकडे सिजन येतो की पावसाळयामध्ये सेल, सेल, सेल तसे यांच्याकडे सेल सुरु झाला आणि पुन्हा ती २ कोटी ९ लाखाची मशीन आपण १ कोटी ९ लाख आणि १ कोटी ३४ लाखाला त्यांनी देण्याचा प्रस्ताव याठिकाणी मांडला आणि आम्ही लगेच त्याला हो म्हणालो. पाच मशिन घेणार, पाच पैकी जे ऍण्ड जे हॉटमिक्सवाला आणि मे.ऍडॉर या दोघांचे रेट आले. एकाचा रेट आहे १ कोटी ९ लाख आणि दुसऱ्याचा रेट आहे १ कोटी ३४ लाख असे रेट आहेत तरी सुध्दा जे ऍण्ड जे हॉटमिक्स बिलो होता तरी सुध्दा त्याला तीन मशिन आणि मे.ऍडॉरवाल्याला दोन मशिन्स देण्याची परवानगी का दयायची. १ कोटी ९ लाख, १ कोटी ३४ लाखाला हे मशिन घेतले, म्हणजे पुन्हा एकदा हे २० ते २५ लाख तुमच्या खिशात येणार का, कुणाच्या. एक रुपयाची वर्गणी कुणी मागीतली तर तुमच्या खिशाला त्रास होतो तसच आमच्या सामान्य करदात्यांच्या खिशाला त्रास होतो त्यांच्या पै-पै तून पुर्ण लोकशाहीच मंदीर चालतं. या महापालिकेचा गाडा चालविला जातो आणि त्यांच्या पैशाला आपण मात्र कवडी मोलाची सुध्दा किमंत देत नाहीत. आम्ही त्याठिकाणी एकाला तीन आणि एकाला दोन मशिन घेण्याची ऑर्डर देतो. पिंपरी चिंचवड शहरात ज्या लोकांची मयत होते अशा लोकांचा अंत्यविधी खर्च महापालिकेनी करावा असा ठराव झालेला आहे त्याच्यावर कारवाई नाही. कारण पाच हजार खर्च होतो. मोठे विषय झाले पाहीजेत, मोठी टक्केवारी आली पाहीजे. आमची घर त्याच्यावर चालली पाहीजेत, आमचा संसार त्याच्यावर चालला पाहीजे. आमच्या यशाची गाडी त्याच्यावरच चालली पाहीजे. त्यामुळे पाच हजारामध्ये कोणालाच इन्ट्रेस्ट नाही, कोटयावधी रुपयाचे विषय असेलतर त्याच्यामध्ये आम्हांला इन्ट्रेस्ट आहे आणि म्हणून पाच शवदाहिनी खरेदी करण्याचा घाट याठिकाणी संजय कुलकर्णींनी घातला, प्रशासनाने घातला. त्याला मात्र सगळयांची सांगड होती. निश्चितपणे आम्ही दाखवल्यानंतर ते थांबलय. त्याची शहानिशा सन्मा. आयुक्तांच्या माध्यमातून केली जाईल. परंतु तोपर्यंत मात्र आपली विकासनगरी म्हणणाऱ्यांना मात्र तुम्ही सांगा ते यश ईथ

जसं घेता तसं हे अपयश सुध्दा आमचचं आहे आम्ही चुकलोत, आम्ही अंकुश ठेवायला हवा होता, अंकुश ठेवण्याची जबाबदारी सुध्दा आमचीच आहे. मगाशी आमचे सन्मा. प्रशांत शितोळे म्हणाले की याच्यामध्ये आम्ही दिल्लीचे उदाहरण सांगीतले, तळेगावचे उदाहरण सांगीतले मग तिथली लोक का नाही आली. सन्मा.प्रशांत शितोळेजी तुम्हांला सांगते की आपल्या फाईलमध्ये तीन पत्र आहेत. मुंबई महानगरपालिका, नाशिक महानगरपालिका आणि पुणे महानगरपालिका आम्ही सुध्दा किती बिनधास्त निर्लज्जपणे काम करतो आपल प्रशासन बघा, साहेब. अशा ठिकाणी पत्र पाठविले की ज्या ठिकाणी अशा शवदाहिन्या बसविलेल्याच नाहीत. पुन्हा आमच आज्ञान. आठवी नववीचा मुलगा गुगलवर सर्च मारतं तस गुगलवर तुम्ही सर्च मारा कुठे कुठे अशाप्रकारच्या शवदाहिन्या लावल्या त्या ठिकाणी आम्हांला शोध घ्यायची गरज नाही. अमुक एकावरती क्लिक केले तर आम्हांला सापडलं दिल्ली मध्ये आशाप्रकारच्या शवदाहिन्या बसविल्या आहेत आणि ईथ मात्र आमच्या कॉन्ट्रॅक्टरने पत्र देवून टाकल की अशाप्रकारच्या शवदाहिन्या तीन ठिकाणी बसवलेल्या नाहीत. मग कॉन्ट्रॅक्टरने काय पत्र दिलं की मी अहमदाबाद याठिकाणी आणि आणखीन एक दोन ठिकाणचे पत्र दिली की अशा ठिकाणी मी शवदाहिनी बसविलेली आहे आणि प्रशासन बघा किती छुपे रुस्तूम आहे त्यांनी सांगीतले की या या ठिकाणी शवदाहिनी बसविलेली आहे त्यांचे काम समाधानकारक आहे. तेवढच पत्र आहे म्हणजे यांच काम चांगल आहे, व्यवस्थीत आहे. परंतु ती किती रुपयाला शवदाहिनी घेतली याचा विचारण्याचा त्रास कोणी घेतलेला नाही. इस्टीमेशन सुध्दा याच्यामध्ये नाही. अटी, शर्ती मध्ये म्हणलेले होते की त्यांचे टर्नओव्हर कमीत कमी २ कोटीच्या वरचा असला पाहीजे. जे जे यामध्ये भाग घेणार असतील त्या सगळयांचा टर्नओव्हर २ कोटीच्या वरती असल पाहीजे. त्याच्यामध्ये मला एक पत्र दिलेल आहे आल्फा नावाच्या ठेकेदाराचे पत्र आहे. त्यांनी सांगीतले की मी ३८ ठिकाणी शवदाहिनी बसविली. त्याचा टर्नओव्हर होतो एक कोटी दोन लाख रुपये. मग ३८ ठिकाणी शवदाहिन्या बसविल्या असतीलतर मग ३८ कोटीचा टर्नओव्हर असायला पाहीजे होता. परंतु त्यांचा टर्नओव्हरचा जो चार्ट आहे त्याच्यामध्ये मागच्या पाच वर्षीचा २ कोटी टर्नओव्हर पाहीजे होता हे तीघेही शवदाहिनीच्या स्पर्धेमध्ये पात्र होऊ शकत नाहीत. कारण तीघांचाही टर्नओव्हर जो आहे तो एक कोटी पेक्षा जास्त नाही फक्त एकाचाच दोन कोटी पर्यंत गेला आहे. तोही २०१५-१६ मध्ये मग पाच वर्षाची अट कोणाला विचारुन गाळली त्याचा खुलासा सुध्दा दयावा. आणि जे सभागृहात म्हणतात की संजय कुलकर्णी दोषी नाही त्यांला घरी बसवण चुकीच आहेतर काय चुकीच आहे यात कोणतीही चुक करण्यास आम्ही ईच्छूक नाहीत. आम्हांला कुणाला त्रास दयायचा नाही अशातला कोणताही मुद्दा नाही आणि अंगात येण्याच काही कारण सुध्दा नाही. कुणीतरी पत्रकार बंधु बातम्या लावतात, त्याच्यातली सत्यता त्यांना माहिती असते आणि म्हणूनच ते सुध्दा बातम्या लावतात त्यांच्यावर विश्वास निश्चितपणे आम्हांला आहे आणि तुम्हांलाही असला पाहीजे. आम्ही सरळसरळ म्हणतो

आम्हांला पेपर वाचून वेदना होतात, निश्चितपणे वेदना व्हायला पाहीजेत, माझ्या पक्षाला जर कोणी नाव ठेवात असेलतर वेदना झाल्याच पाहीजेत. मग त्या वेदना होऊ नयेत म्हणून आपण काय करता. चेअरमन तुमचे आहेत म्हणून आम्हांला म्हणाव लागत की राष्ट्रवादी भ्रष्टाचारी आहे, बदला मग तुमच देवून टाका दुसयाला तुम्हांला नको असेलतर. नाहीतर चुकीचा कारभार तुम्ही याठिकाणचा थांबवला पाहीजे. याठिकाणी महापालिकेच्या वतीने आपण ठराव केलेला आहे पुन्हा एकदा सांगते की याठिकाणी महापालिकेच्या आवारामध्ये ज्या काही नागरीकांचा मृत्यू होतो, त्यांचा अंत्यविधी करण्याची वेळ येते तो पुर्णपणे खर्च प्रशासनाने करावा अशी उपसूचना करावी आणि ही उपसूचना मनावर घ्यावी आणि आयुक्तांना आपण आदेश दयावेत. खरच पाच-सहा अंत्यविधी करण्यासाठी २२ हजार रु.खर्च करतो. तीन लाख रुपये एका महीन्याला आपण ठेकेदाराला देतो. का नाही आपण याचा विचार केला की ख-या अर्थाने २१००० मयत सांगवी सारख्या परिसरामध्ये होतात. २१०० मयत सांगवीसारख्या परिसरात होत असतीलतर निश्चितपणे त्याठिकाणी कोणता आजार पसरला आहे का हे तातडीने लक्ष घालावे. की सांगवीमध्ये नेमके काय झाले आहे कोणता आजार पसरला आहे. मयत किती होतात ते आपण आदिच ठरवतो आणि त्याप्रमाणे आपण रेट कोट केला आणि महीन्याला तीन लाख ठेकेदाराला देतो. त्या तीन लाखावरन कॉन्ट्रॅक्टर हे म्हणतात की आम्हांला फक्त १ लाख ९० हजार येतात. आता यांचा रेट पण पुन्हा ५० टक्केनी सेल लागलेला आहे. वाईट वाटत, आज या सभागृहामध्ये चर्चा करतो ती कोणत्या विषयावरती. एक विषय तो म्हणजे मुर्त्यांचा की जिथं आम्ही देवाची पुजा करतो, असा विषय आणि दुसरा ज्याठिकाणी अंत्यविधी झाल्यानंतर देवाला भेटण्यास माणूस जातो त्याचा अंत होतो आणि ज्याठिकाणी असं म्हणल्या जातं अशा दोन्ही ठिकाणी भ्रष्टाचार होतो तरी आम्ही म्हणायचे नाही भ्रष्टाचार होतो आणि त्या अधिका-याला सोडाव, त्यांला तुम्ही सक्तीच्या रजेवर पाठवाव असं आम्ही म्हणलो म्हणून आम्ही चुकीच ठरलो. अंगात येतं असं म्हणण्याचा यापुढच्या काळात कोणीही प्रयत्न करु नये. मा.आयुक्त साहेब आपण सन्मा. सर्व अधिका-यांना सांगाव की आपण एखादा मोबाईल फोन घ्यायचा असेलतर त्याचा रेट गुगलवर शोधतो, माहिती घेतो मग महानगरपालिकेची विषय करत असताना आम्ही का त्याचा विचार करत नाहीत. याच उत्तर याठिकाणी प्रशासनाने दयाव अशी याठिकाणी मी अपेक्षा करते आणि थांबते जयहिन्द जय महाराष्ट्र !

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सभागृहालही ज्ञात आहे की महा सभेमध्ये मी शेवटी बोलत असतो. परंतु मी माझा खुलासा करत असताना मी आदिच सांगीतल की आता मी काही पदाधिकारी नाही आणि सध्या कमी बोलतो. आणि पक्षाची भूमिका म्हणून ज्यावेळेला मी मांडल त्यावेळेला मा.महापौर साहेब, मी आपल्याला मा. आयुक्तांना अशी विनंती केली की जो कोणी दोषी असेल त्यांच्यावर कारवाई करा. भ्रष्टाचाराचं

समर्थन आम्ही करणार नाहीत. मग तो अधिकारी असो किंवा पदाधिकारी असो जो कोणी असेल त्याच आम्ही मुळीच समर्थन करणार नाहीत, त्याच्यावर कारवाई व्हायलाच पाहीजे. ही मागणी करण्यास मी उभा होतो. याचा अर्थ सिमाताईना अनुमोदन दिल्यासारखे आहे त्यांच्या त्या मोर्च्याला समर्थन केल्या सारख आहे. त्यादिवशी हा मोर्चा सभागृहामध्ये आला त्यादिवशी मी पुण्यात होतो, मला डब्बू असवाणीनी फोन करुन सांगीतल की भाई ऐसा ऐसा हैं, बीजेपी के लोक ऐसा ऐसा मोर्चा लेके आयें हैं त्यावेळेस मी त्यांना बोललो की त्यांना आतमध्ये बोलून घे. त्यांच काय म्हणंण आहे ते बघ आणि त्यांना सांग की याच्यात काही गैर असं होणार नाही याची आम्ही काळजी घेऊ. असं मी डब्बू आसवाणीला सांगीतल आता सभागृहामध्ये डब्बू उपस्थित आहे. एवढ डिटेल्समध्ये मी मघाशी बोललो नाही आणि त्यानंतर डब्बू स्वत: बाहेर गेला आणि त्यांन त्या मोर्च्याला सांगीतल की तुम्ही आतमध्ये या ते काही आले नाही आणि त्यांनी ते निवेदन घेतले. पुन्हा डब्बूनें मला फोन केला, मी डब्बूला तेच सांगीतल की असं असेलतर तू आजच्या मिटींगमध्ये घाईगडबडीने विषय मंजूर करु नको. त्याची शहानिशा करुन आम्ही निर्णय घेऊ असं सांग आणि तसं घडल सुध्दा. याचा अर्थ आम्ही समर्थन केल का, आम्ही समर्थन केलं नाही. मी हीच भूमिका मांडली आणि मघाशी सांगताना अजून एक त्यांनी चुकीच ऐकल मी त्यांना असे म्हणलो ज्यावेळेला तळेगावची असतील, लोणावळयाचे असतील किंवा नाशिकचे असतील किंवा कमी रेटवाले असतात ती मंडळी घोंगडे घेऊन झोपते का, हे तुम्हांला नाही म्हणलं सिमाताई. जे ठेकेदार लोक आहेत ना ते घोंगड घेऊन झोपतात का. मी आयुक्तांनाही म्हणल की जर आपल्या सिस्टीममध्ये दोष असेलतर तो तुम्ही दुरुस्त करा. कारण आपण पेपरमध्ये देतो, आपण ऑनलाईनवर देतो, आपण ई-टेंडरींग करतो. असे असताना ही मंडळी त्यावेळेस कॉम्पेटेशन मध्ये का भाग घेत नाही, हा माझा साधा प्रश्न होता. आणि त्यावेळेला ही कॉम्पेटेशन करणारी मंडळी घोंगड घेवुन झोपतात का. मी तुम्हांला नाही म्हणल. हेल्दी कॉम्पेटेशन व्हायला पाहीजे, क्वॉलीटीच वर्क व्हायला पाहीजे. असे आमचे म्हणणे आहे आणि म्हणून हे करत असताना निकृष्ट दर्जाचे काम करणा-यावर कारवाई करा. त्याला ब्लॅकलीस्ट मध्ये टाका. हे लोक ३० ते ४० टक्के बीलो मध्ये जातात. त्यां लोकांच्या कामाच्या क्वॉलीटीवर नियंत्रण ठेवा. त्यांच्यावर कारवाई करा हे सुध्दा आम्ही सभागृहामध्ये सांगतो. मा.आयुक्त साहेब, आमची विनंती आहे की असे विषय किती असतात. समजा ओव्हरऑल आपल्या बजेटमध्ये समजा १०० टक्के पैकी ९० टक्के काम जे आहे ते आपण पीडब्ल्यूडीच्या डीएसआर नुसार करतो त्यामुळे त्याठिकाणी रेटचा काही संबंध येत नाही. परंतु अशाप्रकारच्या ज्या नवीन गोष्टी आहेत त्यामध्ये मात्र तुम्ही तुमच्या व्हिजीलन्स डिपार्टमेंटला स्टॅण्डींग इन्स्ट्रक्शन दया. की सीमाताईन येथे सुचना केल्यात तेव्हा तुम्ही नेटवर जा, माहिती घ्या. तुम्ही देशभरामध्ये कुठ काय चालल आहे त्याची माहिती घ्या. आपोआप भ्रष्टाचार कमी होईल. आणि हे तुमच्या विभागाकडन येतं. कारण तो शेवटी अधिकारी अनॅलेसिस करतो आणि

मग तुमच्या व्हिजीलन्स डिपार्टमेंटला टिप्पणी करु दया. आम्हांला काम होण्याशी मतलब आहे, आम्हांला क्वालीटीचे काम होण्याशी मतलब आहे. काम क्वालीटीच व्हायला पाहीजे, वेळेत व्हायला पाहीजे. स्पर्धात्मक दराने व्हायला पाहीजे. आम्ही असं म्हणल का तुम्ही हायर रेटला दया. हे करत असताना अशाप्रकारच्या ज्या पाच ते दहा टक्के गोष्टी आहेत नवीन एखादा ऍटम असेलतर, तुमच स्टोअर्स डिपार्टमेंट असेल किंवा वायसीएम मधली खरेदी असेल किंवा अशा नवीन गोष्टी असतील की जिथ डीएसआर नाही अशाठिकाणी मात्र कॉम्पेटेशन होते का नाही, अशा ठिकाणी मात्र आपले रेट बरोबर येतात की नाही. मगाशी पठाणताईन जे सांगीतल किंवा इतरांनी सांगीतल आता मा.महापौरताईनी सांगीतल, त्या सरळ आहेत, त्यांची काय मुर्ती खरेदीमध्ये चुक आहे. आपल्या लोकांना आपल्या अधिका-यांना हे कळायला पाहीजे होतं की आषाढचा महीना कधी आहे, कधी आपल्याकडे वारी येते त्याची पुर्व तयारी आपण केली पाहीजे. हेल्दी कॉम्पेटीशन व्हायला पाहीजे. आदि निर्णय व्हायला पाहीजेत, ऐनवेळेस निर्णय घ्यायचा, घाईघाई करायची आणि मग कोटेशन मागवायचे हे नगरसेवक सांगत नाहीत कोटेशन भरायला मग एका घरातील तीघानी भरले का चौघानी भरले हे सगळ बघण्याच प्रशासनाच काम आहे. प्रशासनाला मदत लागलीतर प्रशासनाला सहकार्य करण्याच काम सुध्दा लोकप्रतिनीधीच आहे. परंतु हे होत असताना ज्यावेळेला आपण गाडीची दोन चाक म्हणतो, त्या शिवाय रथ चालत नाही म्हणतो, त्यावेळेला त्यामध्ये पारदर्शकता असणे गरजेच आहे. असं असताना आपल्या लोकांमध्ये सुध्दा कुठल्या प्रकारचे डिस्टन राहता कामा नये. म्हणुन मी तुम्हांला म्हणल की तुम्हांला माहीती असेलतर त्यांची नाव तुम्ही जाहीर करा. जो अधिकारी चुकीचे वागत असेलतर त्याच्यावर कारवाई करावी. आम्ही अजीबात समर्थन केलेल नाही की अमुकला काही करु नका. मी सुध्दा याठिकाणी राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाची भूमिका ठामपणे मांडलेली आहे. ही विकासनगरी आहे हे आम्ही अभिमानाने सांगतो. कारण हे पाप आमचे नाही ते आम्ही आमचं कशाला म्हणू. चांगल केल ते आम्ही चांगल म्हणणारे, आम्ही ते पाप केलेले नाही, आम्ही ते मान्य केलेल नाही. अजून एक सिमाताईंनी उदाहरण दिलं की शिलाई मशिनमध्ये कंपनीचे नाव टाकले आता ते काही आम्ही टाकण्यास सागीतले का. मग तुम्ही स्पेसिफीकेशन का प्रॉपर्ली टाकले नाहीत. दुसरं शेंडगेताईंनी उदाहरण दिलं की त्याला शिट असंल पाहीजे. खरोखरच वाईट गोष्ट आहे. चांगली कंपनी असायला पाहीजे, त्याचा दर्जा चांगला असला पाहीजे, क्वॉलीटी असली पाहीजे अशी आमचीही मागणी आहेनां. आम्ही असं म्हणल का तुम्ही त्या किमंती मध्ये दया वगैरे काय संबंध आहे आमचा. आमच म्हणणं आहे की आमच्या शहराचा विकास व्हायला पाहीजे. मग तो विकास होत असताना शेंडगे ताईंच्या वॉर्डातला असो, सीमाताईंच्या वॉर्डातला असो, सुलभाताईच्या वॉर्डातील असो कुठलाही विकास होत असताना कुठलही काम करत असताना ते दर्जेदार व्हायला पाहीजे, चांगले व्हायला पाहीजे. ही आमची ओपन भूमिका आहे. मी सुरवातीला म्हणालो याच्यावर खुप चर्चा होणार आहे,

आणि ही चर्चा होत असताना वर्तमानपत्रामधन ज्यावेळेला अशा बातम्या येतात त्यावेळेला निश्चितच फक्त राष्ट्रवादीची नाही तर काँग्रेसची असेल, मनसेचे असतील, भाजपचे असतील, शिवसेनेचे असतील सर्वाची बदनामी आहे. अशाप्रकारचे जेंव्हा रखानेची रखाने पेपरमधून भरुन येतात त्यावेळेला लोक विचारतात, ते काही आम्हांला विचारत नाहीत अशातला भाग नाही, आम्हांलाही विचारतात शेवटी आम्हांलाही जनतेसमोर जायचे आहे, असे असताना ज्या पापाचे धनी आम्ही नाहीत ते कशाला आम्ही ऐकून घ्यायच म्हणून स्पष्ट भूमिका मी मांडली की जो कोणी दोषी असेल त्यां दोषीवर तुम्ही कारवाई करा. चुकीच्या कामाला आम्ही समर्थन करणार नाहीत आणि मी जे बोललो नव्हतो त्याचा मला खुलासा करायचा होता, धन्यवाद.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. खरंतर कधीतरी विषयाला तोंड हे फुटलच पाहीजे आणि म्हणून सिनीअर नगरसेवक, माजी महापौर आर.एस. कुमार बोलले. पक्षामध्ये पध्दत आहे की कोणतेही विषय घ्यायचे असतीलतर अगोदर आपण एकमेकांशी चर्चा करतो आणि मगच तो विषय घेतो. त्याच पध्दतीने ज्यांना ऑल्मिपीकमध्ये पदक मिळालेली आहेत त्यांच्या अभिनंदनाचा ठराव करायचा हे अगोदर पक्षाच्या पार्टी मिटींगमध्ये ठरलं. आदरणीय आर.एस.कुमार यांनी सुध्दा सांगीतलं की ज्या पेपरमध्ये बातम्या येतात त्याचा खुलासा हा झाला पाहीजे. आणि म्हणूनच आज आपण सभागृहामध्ये ठरवून विषय घेतलेला आहे की ती चर्चा घडली पाहीजे. प्रत्येक वेळेला जर आपण असं म्हणत गेलतर जाऊ दे नां कशाला कुणाचे नांव असं आपण म्हणतो आणि विषय पुढे ढकलतो. कुठेतरी एकदा त्याचा निर्णय लागायला पाहीजे. म्हणून सिनीअर नगरसेवकांना आम्ही मान-सन्मान दिला आणि आर.एस.कुमार यांनी तो विषय मांडला. आम्हांला कोणत्या गोष्टीची जर पक्षाला भिती असतीतर आम्ही त्यांना म्हणल असतं तुम्ही तो विषय मांडू नका. आर.एस.कुमार हे राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे, आजपर्यंत त्यांनी काम केलेले नगरसेवक आणि मोठया पदावर पद भुषविलेले पदाधिकारी आहेत. त्यांनी हा विषय मांडला की भ्रष्टाचार पेपरला येतो, पहील्यांदा मुर्तीचा विषय निघाला. महापौरांचा अधिकार आहे, ३५० मुर्त्या घ्यायच्या का ६०० घ्यायच्या का ८०० घ्यायच्या. महापौरांना वाटल जर दिंडया जास्त आल्या. आम्ही महापौरांना विचारल महापौर तुम्ही असा कसा आकडा जास्तीचा सांगीतला. महापौरांनी त्यादिवशी आम्हांला असा खुलासा केला की मला वाटल दर वर्षी जास्ती दिंडया वाढत असतात आणि जर दिंडया वाढल्यातर आपल्याच महापालिकेची नाचक्की नको म्हणून त्यांनी स्टॅण्डींग कमिटीला सांगीतल की तुम्ही मुर्त्या जास्ती खरेदी करा. याच्यात महापौरांचा काय दोष आहे. त्यांचा अधिकार त्यांनी सांगीतला. हे कोणत्या रेटमध्ये घेणार आहेत ही बघण्याची जबाबदारी महापौरांची आहे का. टाटा, बिर्ला, बजाज एवढया मोठमोठया कंपन्या चालतात खालची लोक बघतात कुठल्या गेजचा पत्रा आला, कुठ वापरला, फिटींग झाली का हे त्या त्या विभागाचे काम आहे त्यासाठी पगार त्या त्या लोकांना दिले जातात. पिंपरी चिंचवड महानगरपालिका अस्थापनेवर किती खर्च करते

हे बघीतल गेलं पाहीजे. अस्थापनेचा खर्च एवढा आपण का करतो. कशासाठी अस्थापनेचा खर्च करतो. प्रत्येक गोष्ट नगरसेवकांनी वाचायची का. या टेंडर मध्ये हे दिलं का तीनच कोटेशन काढली का. हे करण्याच काम नगरसेवकांच नाही. याच्यासाठी आपण पगार त्या त्या अधिका-यांना देतो. साहेब, आम्ही मुळीच म्हणणार नाहीत तुम्ही त्यांना सस्पेन्ड करा नेहमी आम्ही म्हणत असतो रथाची दोन चाक आहेत. माणूस काम करतो तो चुकतो त्याला दुरुस्त करायच काम आहे. आम्ही असं सांगीतल, तो जर दोषी आढळला, त्याला रजेवर का पाठविल असं आम्हांला म्हणायच नाही. साहेब, पहील्यांदा मी तुम्हांला सांगीतल की प्रत्येक फाईल ही शांतचितेने बघा, तुम्हांला योग्य वाटलीतरच तुम्ही पुढे पाठवा स्थायी समितीने, जनरल बॉडी जरी काहीही विषय मंजूर केलेतरी ती फाईल तुमच्याकडेच येते. जरी स्थायीने काहीही विषय घेतलेतरी सुध्दा परत ती फाईल वर्क ऑर्डरसाठी तुमच्याकडेच येते. निर्णय कोणी घ्यायचा. तुम्हांला योग्य वाटत नाही, तुम्हांला वाटत असेल याठिकाणी भ्रष्टाचार झाला आहे, येथे काहीतरी खोट आहे, तुमच्या मनात पाल चुकचुकते तर ते तुम्ही नक्कीच थांबवा. आम्ही म्हणले का तुम्हांला, अशा कोणत्या एका नगरसेवकांन तुमच्याकड येऊन प्रेशर केल का, की ही फाईल तुम्ही काही विचार न करता आताची आता सोडा असं कोणी बोलल आहे का. हे काम तुमच आहे याच्यासाठी तुम्ही हेड आहात, तुम्ही हे काम केल पाहीजे. ज्या ज्या वॉर्डामध्ये जे जे नगरसेवक आहेत त्या प्रत्येकांच एक व्हिजन असत आणि त्या त्या व्हिजन प्रमाणे त्या त्या वॉर्डातील ते नगरसेवक काम करत असतात. प्रत्येकाला प्रत्येक गोष्टीत आवड असते अशातला भाग नाही. कोणाला स्ट्रॉर्म वॉटर लाईनमध्ये आवड असते, कोणाला गार्डन मध्ये असेल, कोणाला शवदाहिनीमध्ये असेल, त्या त्या विभागाच्या गरजेनुसार ते ते नगरसेवक त्या त्या गोष्टीची मागणी करतात. त्या भागामध्ये किती जागा आहे याच्याप्रमाणे त्यांच्या वॉर्डाच व्हिजन ठरतं. जर मी माझ्या वॉर्डामध्ये म्हणल एसआरएची स्किम करा तर साहेब तुम्ही ती करु शकता का. नाही करु शकत. आणि म्हणूनच माझ्या वॉर्डात त्यांना काय करायच हे त्या त्या लोकांच्या कल्पनेतून साकार झालेला त्यांचा तो वॉर्ड असतो. त्यांची बुध्दीमत्ता किती आहे यावर सगळया गोष्टी अवलंबून आहेत, ज्याला जे आवडेल ते करावं. ज्याला जसं आवडत तसं तो माणूस खातो, ज्याला जे आवडतं ते बलीदान करतं. त्याच पध्दतीने स्वत:च्या वॉर्डात काय करायचे हा ज्याचा त्याचा प्रश्न आहे. वॉर्डाचा विकास करण्यासाठी महापालिकेचा निधी असतो आणि तो हक्क आहे की तो निधी कुठे, कसा वापरायचा हा प्रत्येक नगरसेवांचा हक्क आहे. अशा कॉमेण्ट करण्यापेक्षा आपला हाक्क काय आहे, आपण कशा पध्दतीने काम केले गेले पाहीजे हे आपण बघीतले पाहीजे. आणि म्हणून त्या नगरसेवकाला आपण बजेट कशासाठी तयार करतो. आज शहरामध्ये सगळीकडे समतोल राखण्यासाठी २००२ च्या आदि समाविष्ठ गाव झाले त्याच्या अगोदर पिंपरी चिंचवड शहर होते त्या भागामध्ये पुर्वी झालेल डेव्हलपमेंट जे आहे १९८५ सालापासूनचे त्याच्यामध्ये रिन्यूएशन

करायला नको का. आप्पूघर जुनं झाल त्याच रिन्यूएशन करायला नको का. ते जर एखादया नगरसेवकांनी सांगीतल की आप्पूघरच रिन्यूएशन झाल पाहीजे मग ती त्याची चुक आहे का माझ्याकडे आता ट्रॅफीक वाढलेल आहे माझे येथे सुध्दा उड्डाणपुल व्हायला पाहीजे. का नको व्हायला पाहीजे. त्या नगरसेवकांची संकल्पना आहे. त्याची ईच्छाशक्ती आहे आज आमच्या काही नगरसेवकांनी सांगीतल की सेक्टर नं. २२ च्या तेथून उड्डाणपुल झाला पाहीजे, बीआरटी झाल पाहीजे. नुसतच जर असं म्हणत, एवढीशी तोटकी भूमिका जर ठेवलीतर मला वाटत नाही, शहराचा विकास एवढया मोठया प्रमाणावर होईल म्हणून. कशाला आम्ही घाबरत नाहीत, आम्ही कोणालाही म्हणत नाही घुमतंय, घुमतंय, ज्याच घुमायच त्याच घुमल त्याच काय व्हायच असेल ते होईल. त्यामुळे आम्हांला आमची आवकात काय आहे ती चांगली माहिती आहे. आम्ही काय काम करतो हे आम्हांला चांगल माहिती आहे त्याच्यासाठी आम्हांला कोणाची दुसऱ्याची पावती नको. आम्ही काय काम करायला पाहीजे हे आमची आम्हांला कळतं. त्यामुळे मुर्तीच्या खरेदीचा जो प्रश्न आहे तो मा.महापौरांचा हक्क होता, महापौरांनी सांगीतल मुळात महापौरांचा मान ठेवण्याचे काम सुध्दा स्टॅण्डींग कमिटीने करायला पाहीजे होतं. मगा एका सदस्यांनी सांगीतल की मी तो थांबवला. महापौर या शहराच्या प्रथम नागरीक आहेत, महापौर इतर विषयात कधी लक्ष घालत नाहीत. तुम्हांला असं का वाटल आपण काही चुकतोय का हे बोलण्यापेक्षा तिथ मात्र लगेचच शंका दिसली आणि पत्र दयायच काम केलं. मा.महापौरांचा अधिकार नाही, महापौरांचा शहरामधला सन्मान नाही, त्या प्रथम नागरीक नाहीत. त्यांचा अधिकार त्यांनी वापरला त्यांना मान हा दिलाच पाहीजे. आयुक्त साहेब, माझ्या माहीतीप्रमाणे स्थायी समितीने त्या ठेकेदाराला ब्लॅकलीस्ट केलेले आहे. आणखीन तुम्हांला जी काही कारवाई करायची असेल ती करा. पत्रकार बंधुना पण माझी विनंती आहे स्थायी समितीने त्या ठेकेदाराला ब्लॅकलीस्ट केलेले आहे. अजूनही आयुक्तांना काहीही करायचे असेलतर ती राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाच्या सगळया नगरसेवकांची मी तुम्हांला हामी देते तुम्ही काहीपण त्याच्यावर कारवाई करा. ज्याच काम त्यांनी कराव दुसऱ्यांची काम आम्ही नाही करणार. साहेब, आपण त्या दिवशी शहरामध्ये फिरलो, जसं आपण बघीतल की शहरामध्ये खड्डयामध्ये कोणाचाही मृत्यू होऊ नये तुमचीही सुट्टी होती, आमचीही सुट्टी होती. आपण या पिंपरी चिंचवडचे कोणीतरी आहोत म्हणून आपण सकाळपासून शहरात सगळीकडे फिरलो. आम्हांला गाजावाजा करायचा असतातर आम्ही लगेच फोटो काढला असता, पेपरला दिला असता. आम्ही व्हिजीट केली, आम्ही असं केल, आम्ही तसं केलं असंत, आम्ही तुम्हांला विनंती केली साहेब, आम्हांला पहायच आहे, आम्हांला बघायच आहे, आम्हांला दुरुस्ती केली गेली पाहीजे. आम्ही सत्ताधारी आहोत म्हणून आम्हांला फोटोची गरज नाही. आम्हांला अजीबात अपेक्षा नाही की आम्हांला हे प्रेसला दयायच आहे, आम्ही व्हिजीट केली, आमचा फोटो आला पाहीजे. अजीबात नाही. आम्ही सगळी कडे व्हिजीट केली, साहेब तुम्हांला सांगीतलं आरोग्याचा प्रश्न होता त्याच्यावर मार्ग

आणि पर्याय काढला पाहीजे. एखादया अधिका-याला नाही जमत, एखादया अधिका-याला चार-चार खाती दिलीतर त्याना नाही जमू शकत. शासनाचे अधिकारी किंवा आमचे अधिकारी असतील त्यांना आपण असं म्हणू शकता का तुम्ही चार खाती सांभाळा. त्या माणसाची कपॅसिटी नाही. तुम्ही त्यांचा चार्ज काढला दुसयाना विचारले तुम्हांला ॲडीशनल चार्ज दिलातर चालणार का. त्यांनी हो म्हणलं, त्यांनी काम आनंदाने घेतले, आऊटपुट काही निघतो का हे नंतर बघा साहेब. पण आपण बदल करण्याचा प्रयत्न केलात. शहर स्वच्छ कसं होईल, कचराकुंडया कशा स्वच्छ झाल्या पाहीजेत. स्वच्छ झाल्या पाहीजेत. कच-याची विल्हेवाट लागली पाहीजे. नदीमध्ये लोक काय टाकतात त्या कच-याच्या आपण काय दुरुस्त्या केल्या गेल्या पाहीजेत. ही सगळी चर्चा आपण केली. याच्यासाठी आम्ही उठसुठ प्रेसनोट, झाल आमच बोलण की दया प्रेसनोट असं आम्ही आजपर्यंत कधीही केलेलं नाही. आमच कर्तव्य आहे आमच ते काम आहे आणि म्हणून आम्ही ते करतो आणि करायला पाहीजे त्या दृष्टीकोनातून आम्ही केलं. गॅसदाहिनीचा प्रश्न आहे. ज्या ज्या नगरसेवकांना वाटले असेलतर त्यांनी एखादया नगरसेवकांनी पत्र दिलेले असेलतर त्यांची ती चुक आहे का. पण एखादया नगरसेवकांना वाटलं की गॅसदाहिनीच्या विषयामध्ये जर आमच्या काही नगरसेवकांना वाटल की आम्ही पर्यावरणपुरक पिंपरी चिंचवड करण्यासाठी म्हणून आम्हांला असं कराव वाटतं हे करत असताना त्यांनी पत्र दिले त्यांच्या येथे स्मशानभूमि आहे त्यांना कराव असे वाटलं. पहील्यांदा टेंडर जास्त आले, तुम्ही ते बदली केले, आम्ही कोणी तुम्हांला विचारले का, की ते बदली केलं. तुम्ही नेटवर बसा, गुगलवर बसा त्यासाठी तुम्ही पगार घेता. आम्ही म्हणलं का तुम्हांला की याच लेव्हलची गॅसदाहिनी बसवा असे आम्ही सांगीतले का, नाही सांगीतलं. तो फक्त तुमचा हक्क आहे त्याच्यानंतर स्थायी समितीला फाईल आली, स्थायीला काही पक्षातील लोकांनी आंदोलन केलं, आंदोलन केल्यानंतर स्थायी समिती चेअरमनने सांगीतले की हा आमचा विषय जोपर्यंत क्लेअर होत नाही तोपर्यंत आम्ही हा विषय करणार नाहीत. मग याच्यामध्ये कुठल्या पक्षाची कुणी जबाबदारी घ्यायचा काय संबंध आहे. परत परत रिपीट रिपीट बोलून विकासाचे तुम्ही शिल्पकार असालतर अपयशाचे व्हा. आम्हीतर दुरुस्ती करणार आहोत, आमची जबाबदारी नाही. जी जबाबदारी अधिका-यांची आहे त्यांनी चेक कराव तुम्ही त्याच्यामध्ये काय काय टाकले. मग फक्त गॅसदाहिनी टाकली का त्याचे आजुबाजूच स्ट्रक्चर टाकलय का त्याच्यात तुम्ही आणखीन काही वेगळवेगळ टाकलय का. ती आख्खीच स्मशानभुमी दुरुस्त करायची आहे का. हा तुमचा प्रश्न आहे, तुम्ही त्या गोष्टी मांडता तुम्ही ते बघायचं. मी ठेकेदाराची बाजू घेत नाही. ज्या एक्स वाय झेड ठेकेदारांनी भरले. ज्याला शंका वाटली ते परत रिटेंडर केलं. आम्ही त्याच्यात विचारायला आलोत का, आलो नाही. ज्याची त्याची ती मर्जी आहे. मी काही ठेकेदाराची बाजू घेत नाही एखादा ठेकेदार दिल्लीतून भरेल, एखादा ठेकेदार गुजरात मधुन भरले, एखादा ठेकेदार युएसए मधुन भरले, एखादा ठेकेदार कोल्हापूर मधुन

भरेल. कोणी कुठूनही भरले तरी तुम्ही तुमच्या अटि, शर्ती मध्ये बसल्यानंतरच तुम्ही टेंडर ओपन करता. मग ही जबाबदारी कोणाची आहे ती तुम्ही ठरवा. याच्यासाठी मी पत्रकार बंधुना पण विनंती करेल की याच्यामध्ये मी काळजीपुर्वक असं सांगते की तुम्ही हे बघा. ही जबाबदारी आमची आहे का. आम्ही येथे भ्रष्टाचार करायचा काय प्रश्न येतो. तुम्ही बघा टेंडरमध्ये काय काय टाकलेल आहे. पिंपरी चिंचवडचा विकास करताना ज्यावेळेला आम्ही सकाळी सहा वाजता उठून खड्डे बघतो, कचरा बघतो, नाले साफ झाले का नाही ते बघतो आणि ज्यावेळेला जर अशी चुकीची बातमी जर पक्षाच्या नावे आलीतर दु:ख होणारच. माणसाला मन असावे लागते दु:ख होण्यासाठी आणि ते आमच्याकडे आहे आणि म्हणूनच ज्यावेळेला जी माणस निर्लज्ज होतात त्यावेळेला त्यांनाही या गोष्टी कळत नाहीत.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** मधे मधे कोणी बोलू नये. तुम्ही बोलत होत्या त्यावेळेस कोणीही बोलत नव्हतं. कृपया सर्वांनी शांत बसावे.

**मा.मगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, कोण म्हणलं तोंड झोडून घेण्याची वेळ आली, कुणावर, कशासाठी, काय गरज पडली, तोंड झोडून घ्यायची. आमच्यावर नाही वेळ आली तोंड झोडून घ्यायची. आणि म्हणून आज जो शहराचा विकास आहे आज पिंपरी चिंचवड मध्ये पुर्वे कडून, पश्चिमेकडून, दक्षिणेकडून, उत्तरेकडून आलाततरी तो विकास दिसतोना तो केलेलाच आहे. जसं अजीत गव्हाणे यांनी सांगीतल की जो माणूस चालतो तोच ठेचकाळतो. जो चालतो तोच ठेचकाळतो. ज्यावेळेला आमचे काही नगरसेवक अधिका-यांच्या बाजूने बोलत होते, आज काम करत असताना एका हाताने टाळी नाही वाजत. दोन्हीना बरोबर घेवून काम कराव लागतं. अधिका-यांना बरोबर घेवून आपल्या वॉर्डात काय करायला पाहीजे, कसे करायला पाहीजे हे दोघांच्या सुचनेनुसार काम होत असतात. असं नाहीए की नुसत आम्हीच म्हणायच आणि अधिका-यानी कुठलीच प्रोसिजर करायची नाही, असं होतं का. म्हणजे याचा अर्थ काही सगळया नगरसेवकांचे लागेबांधे आहेत का. कोणी कोणाकडे कुठल्या गोष्टी मागायला जात नाहीत. माझ्या वॉर्डामध्ये कच-यासाठी एका सीएसआर कंपनीने मागणी केली त्या कंपनीचे मला नाव सुध्दा माहीत नाही. त्या कंपनीने सांगीतले आम्हांला दया प्रभाग क्रमांक ९. लोकांना तो वॉर्ड आवडतो, मागणी करतात. त्यांला मी काय करणार. त्या कंपनीला मी काही भेटलेही नाही, त्यांना कुणाला मी सांगीतले नाही काही निर्णय घ्यायचे असतील, कुठला कर लावायचा असेल, तिकीट लावायचे असतीलतर मी आयुक्तांना म्हणल माझ्याकडन काहीही अडचण नाही नागरीकांना या सगळया सवयी लागायला पाहीजेत. योग्य ठिकाणी जर आपण पैसे घेणार असू तर काहीच हरकत नाही. जर चुकीच काम शहरामध्ये होणार असेलतर ते शंभर टक्के चुकीच होणार आहे. याच्यासाठी प्रत्येकाच काम आहे, असं नाही की ज्याच सरकार आलं त्यानीच बोलल पाहीजे बाकीच्यानी नाही बोललं पाहीजे. प्रत्येक नगरसेवक निवडून येताना त्या

प्रत्येकाची जबाबदारी आणि बांधीलकी आहे. तुम्ही बोला आम्ही नको म्हणलो नाहीत. परंतु ज्यावेळेला आम्ही असं स्पष्टीकरण करतो की अधिका-यांनी अधिका-याची भुमिका बजवावी. शंभर टक्के अधिका-यांनी अधिका-यांची भूमिका बजवावी. काही वेळेला पीएमपीएमएलचा मा.श्रीकर परदेशी यांनी चार्ज घेतलेला होता त्यावेळेला तेथील अधिकारी काम करत नव्हतेतर त्यांचा पगार थांबवला होता. आम्ही त्यांना म्हणालो का तुम्ही पगार का थांबवला. ज्याची त्याची कामाची पध्दत आहे ज्याची त्याची स्टाईल आहे. त्याच्यामध्ये आम्हांला इन्टरफेअर करायचे नाही. तुम्हांला वाटलं तुम्ही पाठवलं रजेवर आम्हांला त्याच्याशी पण काही म्हणायच नाही. त्यातील कोण दोषी आहे ते तुम्ही जाहीर करा. कोण नगरसेवक तुम्हाला त्याच्यातून दोषी वाटतो, कुठल्या नगरसेवकांनी तुम्हांला पत्र दिल की याच लोकांना कॉन्ट्रॅक्ट दया म्हणून. किंवा याच ठेकेदाराला दया. तीन अधिका-यांचे नाव घेतलेले आहे. ते अधिकारी म्हणाले माझ्याकडे हा चार्ज नाही. तुम्ही डिक्लेअर करा, सांगा की आता हे रजेवर आहेत यांचा चार्ज यांच्याकडे आहे हे त्या अधिका-यांना सुध्दा माहीती असलं पाहीजे की तो चार्ज आपल्याकडे आहे आणि आपल्याला ते काम केलं गेलं पाहीजे. त्यांच्या पर्यंत त्यांना ते समजल नसेल म्हणून त्यांनी सांगीतले असेल की मला अजून माहीती दिलेली नाही. आम्ही तुम्हांला त्या दिवशी सुध्दा सांगीतल की साहेब, अधिकारी तुमचे आहेत तुम्ही त्यांचे वडील आहात आणि हे तुमचे अधिकारी मुलं आहेत. जसे आम्ही सगळे नगरसेवक एकत्रच आहोत तसं तुम्ही तुमच्या मुलांना तुमच्या अधिकाऱ्यांना कशी ट्रिटमेंट दयायची हा तुमचा प्रश्न आहे. संजय कुलकर्णींना विचारा, तीन वर्षापुर्वी सुध्दा ज्यावेळेला पर्यावरण अहवाल दाखवत होते त्यावेळेला मी त्याच्यावर ऑब्जेक्शन घेतलेल आहे. की हा अहवाल आम्हांला मान्य नाही म्हणून. स्थायी समितीमध्ये मिटींग चालली होती त्यावेळेस त्या पर्यावरणाच्या अहवालावर सुध्दा ऑब्जेक्शन घेतलं होतं. आमचा प्रत्येक नगरसेवक कार्यक्षम आहेत. त्यामुळे पत्र दिलेच पाहीजे असे नाही तो तुमचा अधिकार आहे. तुम्ही कुठल्या कुठल्या गोष्टीमध्ये काय काय करता कशा कशा पध्दतीने काय काय केले पाहीजे हे त्या पध्दतीने तुम्ही ठरविले पाहीजे. मगाशी कोणतर म्हणल की २१०० मयती होणार, कोण म्हणलं २१ हजार होणार, मी लगेच सांगवीच्या लोकांना विचारलं, एकदम काय झाल २१०० चे २१ हजार काही प्रॉब्लेम झाला का. डॉ. रॉय यांना विचारले, चुकला नाहीनां आकडा. जसं आपल्या बोलण्यातून २१०० चे २१ हजार पण होऊ शकतं. कोण म्हणतं २२ हजार खर्च येतो, कोण म्हणतं ३० हजार खर्च येतो. जे लोक गॅसदाहिनी वापरणार आहेत त्यांचा मयत खर्च महापालिकेनी घेऊ नये. हा विषय जीबी मध्ये आपण मंजूर केलेला आहे. त्याच्यावर अंमलबजावणी करण्याचे काम कोणाचे आहे. मा.महापौरांनी सही करुन दिली अंमलबजावणी व्हावी म्हणून. त्याची कारवाई कोणी केली पाहीजे. प्रशासनाने अंमलबजावणी केली पाहीजे. अधिका-यांनी ते बघीतले पाहीजे. प्रत्येक गोष्टीवर अंकुश पाहीजे हे बरोबर आहे. आयुक्त साहेब, जी.बी. मध्ये जे ठराव होतात

त्याच्यानंतर चौथ्या ते पाचव्या दिवशी मा.महापौर सहया करुन देतात व ते तुमच्याकडून ज्या त्या विभागाकडे जाते आणि त्याच्यानंतर त्याच्यावर पुढची कारवाई होते. त्या पध्दतीने आजपर्यंत चालत आलेले आहे. ज्यावेळेला कोणाला शंका वाटेल त्यावेळेला शंभर टक्के त्या विषयाची आपण माहीती घेतली पाहीजे. दत्तात्रय साने यांना मी म्हणले दत्ता साने तुम्ही यावेळेला आंदोलन केल नाही तर ते म्हणाले, ताई यावेळेला मला असं वाटल नाही आंदोलन करावे म्हणून, मी नाही केलं. मी म्हणाले बरोबर आहे. तानाजी खाडे यांनी सांगीतले नार्को टेस्टला मी तयार आहे. आणि म्हणून अशा पध्दतीने कुठले विषय कशा पध्दतीने होतात आज एवढा वेळ झाला मा.महापौर साहेब मी तुमचे सुध्दा आभार मानते. कोण भ्रष्टाचारी, कोण भ्रष्टाचारी, कोण भ्रष्टाचारी आपण ज्यावेळेला गप्प बसतो याचा अर्थ समोरच्या माणसाना असे वाटते की आम्ही गप्प बसतो म्हणजे की काय आम्ही गुन्हेगार आहेत. आयुक्त साहेब, याची शहानिशा, याचा खुलासा करावा. या वादावर पडदा पडला पाहीजे. याच्यामध्ये भ्रष्टाचार झाला का, याच्यामध्ये तुम्हांला काय वाटले हे सगळ तुम्ही बोलल गेलं पाहीजे. तुम्ही विचारपुर्वक निर्णय घेणार आहात त्यामुळे आमचा पुर्ण तुमच्यावर विश्वास आहे. तुम्ही त्या पध्दतीने निर्णय सभागृहाला सांगावा. येथून पुढच्या कुठल्याही फाईली मध्ये तुम्हांला वाटलं की ईथे कुठतरी गडबड दिसते तर ती फाईल तुम्ही थांबवावी. आम्ही म्हणणार नाहीत ही फाईल कशासाठी थांबवली आहे. अजीबात म्हणणार नाहीत. या सभागृहाच्या साक्षीने मी तुम्हांला सांगते आमचा राष्ट्रवादीचा एकही नगरसेवक तुम्हांला विचारायला येणार नाही की तुम्ही ही फाईल का थांबवली म्हणून. तुम्हांला अयोग्य वाटलेतर ती फाईल शंभर टक्के तुम्ही थांबवा. तुम्ही तुमच्या पध्दतीने काम करा. तुम्ही चांगले काम करुन पिंपरी चिंचवडमध्ये आलेला आहात त्यामुळे आमचा सर्वांचा तुम्हांला पाठिंबा आहे. तुम्ही विश्वासपुर्वक जे सत्य आहे ते सांगाव एवढच मी सांगते आणि थांबते.

**मा.महापौर-** आयुक्तांनी याच्यावर खुलासा करावा.

**मा.आयुक्त -** सन्मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. दोन विषयावर आज आपण चर्चा केलेली आहे. पहीला विठ्ठल मुर्ती खरेदीचा विषय आहे व दुसरा गॅसदाहिनी खरेदीचा विषय आहे. विठ्ठल-रुक्मिणी मुर्ती खरेदीचा विषय स्थायी समितीमध्ये झाला. गॅस शवदाहिनीचा विषय स्टॅण्डींग कमिटीकडे प्रलंबीत आहे. या दोन खरेदीच्या प्रक्रीया मध्ये शासनाने विहीत केलेली प्रक्रीया राबविली गेली आहे. त्याच्यामध्ये विशेष करुन गॅस शवदाहिनी खरेदी बाबत त्यामध्ये मुदतवाढ पण देण्यात आलेली आहे. दोन्ही खरेदीच्या फाईलीमध्ये आपण बेसीकली ई-टेंडरींग करतो, त्याच्यानंतर ई-टेंडरींग ओपन करणे त्यांच्या रेटचा तुलनात्मक अभ्यास करणे याची कार्यवाही ही आपली टेंडर कमिटी करते. त्याच्यानंतर विभागप्रमुखांकडून ती फाईल चिफ ऑडीटर यांच्याकडे जाते त्यांच्याकडून क्लेरन्स घेवून त्याच्यानंतर ती फाईल माझ्याकडे येते. या दोन्ही केसेसमध्ये चिफ ऑडीटरचे जे रिमार्क आहेत ते एकदम क्लिअर आहेत. चिफ

ऑडीटरनी त्याच्यामध्ये स्वत: व्हेरीफाय केलेले आहेत दोन्ही केसेसमध्ये कुठल्याही प्रकारचा याच्यामध्ये गैरव्यवहार झालेला आहे किंवा याच्यामध्ये अनियमीतता झालेली आहे, किंवा याच्यामध्ये कुठले डॉक्युमेंटस कमी आहेत किंवा यामध्ये पुन्हा रिटेंडरींग करण्याची आवश्यकता आहे असे कुठेही डेलीगेट केलेले नाही. त्याच्यामुळे या दोन्ही फाईली स्थायी समिती समोर आलेल्या आहेत. त्यानंतर बेसीकली वर्तमानपत्रामध्ये विठ्ठल मुर्ती खरेदी आणि गॅस शवदाहिनीच्या बाबतीत बातम्या प्रसिध्द झाल्या आहेत. बेसीकली अशाप्रकारचे टेंडरींग प्रोसेस आपल्याकडे अनेक कामामध्ये होते. स्थापत्य विभागच्या कामा मधील डेली माझ्याकडे ३५ ते ४० फाईली रोज साईन होऊन जातात. यामध्ये प्रत्येक फाईली मधील सर्व कागदपत्रे जर आपण तपासत गेलोतर महापालिकेचे कामकाज ठप्प होईल. त्याच्यामुळे त्याच्यासाठी जे अधिकारी नेमून दिलेले आहेत, त्याच्यामध्ये विभागप्रमुख आहेत, चिफ ऑडीटर आहेत अन्य अधिकारी राईट फॉर्म क्लेरीकल लेव्हल पासून या संपुर्ण स्टेजेस मधुन ताऊन-सुलाखून ती फाईल शेवटी माझ्याकडे येते नंतर स्थायी समिती, जीबी पुढे येते. यामध्ये बेसीकली अनियमीतता झाली अशाप्रकारची तक्रार आल्यानंतर दोन्ही केसेसमध्ये चौकशी समिती मी नेमलेली आहे. विठ्ठल-रुक्मिणी मुर्तीची चौकशी समिती नेमल्यानंतर त्यांना त्या चौकशीमध्ये अधिक ईव्हीडन्स घेण्याची आवश्यकता भासल्यामुळे त्यांनी त्यासाठी मुदतवाढ मागीतलेली होती ती मुदतवाढ सुध्दा मी त्यांना दिली. माझ्या माहितीप्रमाणे आता त्यांचा अहवाल फायनल झालेला आहे आणि ते लवकरच त्यांचा अहवाल मला सादर करतील. गॅस शवदाहिनी खरेदीच्या बाबतीत सुध्दा अशाप्रकारची चौकशी समिती नेमलेली आहे. त्यामध्ये जॉईंट कमीशनर श्री.गावडे हे या चौकशी समितीचे अध्यक्ष आहेत आणि चिफ अकौंटंट श्री.लांडे हे फायनान्स डिपार्टमेंट कडून आहेत आणि आयुबखान पठाण यांना मी कार्यकारी अभियंता, पर्यावरण विभागाचा चार्ज दिलेला आहे.  ही जी कमिटी आहे ती कमिटी बेसीकली पुढच्या पाच दिवसामध्ये त्यांनी त्यांचा अहवाल मला सादर करणे अपेक्षीत आहे. या अहवालामध्ये ज्या काही बाबी आढळून येतील किंवा जे कोणी दोषी आढळून येतील मग ते ठेकेदार असो, कर्मचारी असो, अधिकारी असो यामध्ये  कोणालाही स्पेअर केल जाणार नाही, कारवाई केली जाईल. आता या स्टेजला दोन्ही केसेसमध्ये गैरव्यवहार झाला हे मी सांगू शकत नाही. पण एक जनरल मला असं वाटत की आपण जेंव्हा मार्केटमध्ये जातो तेंव्हा मार्केटचे जे डायनामीस असतं मार्केटचे जे रेट असतात ते फ्लॅच्यूएट होत असतात. उदाहरण एअर तिकीट हे पिक सिजनमध्ये एअर तिकीट १५००० रु. असते तेच एअर तिकीट आपण लो सिजनमध्ये घेतलेतर १५०० रु. ला मिळते काही वेळा वर्षापुर्वी ते एक रुपया मध्ये तिकीट दयायचे....

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, एअर तिकीट आणि हा विषय वेगळा आहे.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** धुमाळ साहेब तुम्ही खाली बसावे, आयुक्त साहेब बोलतात.

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, एअर तिकीट आणि हा विषय वेगळा आहे.

**मा.महापौर-** सगळयांनी शांत रहावे, आयुक्त बोलतात.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, मी उदाहरण म्हणून एअर तिकीटाचे सांगीतलेले आहे. मी हे उदाहरण देतो आहे याचा अर्थ त्यांचे समर्थन दिले असे नाही.

(सभागृहात गोंधळ)

**मा.महापौर-** हे सभागृह आहे, सर्वांनी खाली बसून घ्यावे. धुमाळ साहेब आपण जागेवर बसावे. आयुक्त साहेब बोलतात, तुम्ही बोलताना ते बोलतात का. सर्वांनी खाली बसावे. अजीबात कोणीही मधे बोलायच नाही, आयुक्त बोलतील.

(सभागृहात गोंधळ)

**मा.आयुक्त-** मा.महापौर साहेब, गॅस शवदाहिनीमध्ये पहीला २ कोटी १० लाख रेट आलेला होता त्यावेळेला मी नव्हतो. माझ्या पिरीएडमध्ये तो आलेला नाही. त्याच्यानंतर जो रेट आलेला आहे तो १ कोटी १० लाखाच्या दरम्यान आलेला आहे त्या अनुषंगाने ही फाईल स्थायी समितीकडे गेली. त्याच्यामध्ये ईन्क्वॉयरी कमिटी नेमलेली आहे, ईन्क्वॉयरी कमिटी ज्याप्रमाणे रिपोर्ट देईल त्याप्रमाणे त्या रिपोर्टमध्ये जे जे आढळून येईल, जे जे कर्मचारी आहेत, जे अधिकारी आहेत किंवा ठेकेदार दोषी असतील त्यांच्यावर आपल्याला कारवाई करता येईल. एफआयआर लॉण्च करण्याची वेळ आलीतर एफआयआर लॉण्च करु. पुढे सस्पेन्ड करण्याची वेळ आलीतर सस्पेन्ड सुध्दा करु.

**मा.महापौर-** विषय क्रमांक १ घ्यावा.

मा.विशेष महापालिका सभा क्रमांक-५६ दिनांक १६/३/२०१६, १७/३/२०१६ व २१/३/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मामहापौर यांनी प्रकट केले.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक -१

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/२२/२०१६ दि.२३/०५/२०१६

२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.१६३८४ दि७/६/२०१६

३) मा.महापालिका ठ.क्र.८८२ दि. २०/६/२०१६

राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी करणेअंतर्गत महाराष्ट्र शासनाचे उपसचिव नगरविकास विभाग यांचेकडील दिनांक ०८/०६/२०१२ चे पत्रान्वये राष्ट्रीय फेरीवाला धोरण अंमलबजावणी सुरु करणेत आलेली आहे. त्यावेळी मा.शहर फेरीवाला समितीची बैठक दि. ०५/०४/२०१३ नुसार फेरीवाल्यांची नोंदणी फी, विक्रेता फी, नुतनीकरण फी, देखभाल फी आणि दंड ठरविणेत आले आहे. नोंदणी फीचे दर र.रु. १०००/- प्रमाणे ठरविणेत आले होते यास मा. स्थायी समिती सभा ठराव क्रमांक ३३८२ दि. २१/०५/२०१३ व मा.महापालिका सभा ठराव क्रं.२९८ दि. २७/०६/२०१३ अन्वये मान्यता देणेत आली आहे. व आदेश क्रं. भूजि/१/कावि/३५७/२०१३ दि. १३/०९/२०१३ अन्वये आदेश निर्गत केलेले आहेत. प्रस्तुत आदेशान्वये ठरविणेत आलेले दर जादा असल्याने सदर दर कमी करणेबाबत फेरीवाला संघटना वारंवार मागणी करीत आहेत. तसेच दि. ३०/०१/२०१६ च्या शहर फेरीवाला समितीचे सभेमध्ये झालेल्या निर्णयानुसार पुणे मनपाकडील नोंदणी फी र.रु.२००/- प्रमाणे शहरातील फेरीवाल्यांची बायोमेट्रीक नोंदणी करणेकामी नोंदणी फी र.रु.२००/- व ओळखपत्र फी र.रु.२००/- करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.नंदा ताकवणे-** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.निता पाडळे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८९२ विषय क्रमांक -१

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ:- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.भुजि/१/कावि/२२/२०१६ दि.२३/०५/२०१६

२) मा.स्थायी समिती कडील ठ.क्र.१६३८४ दि७/६/२०१६

३) मा.महापालिका ठ.क्र.८८२ दि. २०/६/२०१६

विषय क्रमांक १ चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक -२

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बीआरटीएस/४२८/२०१६ दि.६/६/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६४२० दि.१४/०६/२०१६

महाराष्ट्र शासनाचे अवर सचिव, नगरविकास विभाग, यांचे पत्र क्रमांक एमआरव्हीसी /३३१६/प्र.क्र.४४/नवि-७ दि.१२/१/२०१६ पत्रान्वये पुणे-लोणावळा दरम्यान ३ री व ४ थी उपनगरीय रेल्वे लाईन, रेल्वे मंत्रालय व महाराष्ट्र शासन यांच्या ५०%:५०% सहभागाने सुरु करण्यास मध्य रेल्वेने मान्यता दिली असल्याचे मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि. यांनी महाराष्ट्र शासनास कळविले आहे. या प्रकल्पासाठी जमिन अधिग्रहन (LA) सोडून सुमारे र.रु.२३०६ कोटी खर्च (Feasibility Report) प्रमाणे येणार आहे. त्यानुसार प्रति किमी खर्च सुमारे ३३ कोटी रुपये इतका येतो. सदर प्रकल्पासाठी मुंबई नागरी परिवहन प्रकल्पाच्या (MUTP) धर्तीवर राज्य शासनाकडून ५०% आर्थिक सहभाग अपेक्षिलेला आहे. या संबंधी अवर सचिव, नगरविकास विभाग, महाराष्ट्र शासन यांनी ज्याप्रमाणे मुंबई नागरी परिवहन प्रकल्पामध्ये (MUTP) राज्य शासनाच्या वतीने दयावयाची ५०% रक्कम मुंबई महानगर प्रदेश विकास प्राधिकरण (MMRDA) मार्फत दिली जाते त्याप्रमाणे पुणे - लोणावळा दरम्यानच्या विषयांकित प्रकल्पासाठी (PUTP) राज्य शासनाकडुन अपेक्षिलेली ५०% रक्कम पुणे व पिंपरी चिंचवड मनपा/ प्राधिकरण/पुणे महानगर प्रदेश विकास महामंडळा मार्फत सोसण्याबाबत अहवाल देणेकामी शासनाने आदेशित केले आहे. पुणे लोणावळा दरम्यान ३री व ४थी उपनगरीय रेल्वे लाईन पुणे मनपा, पिंपरी चिंचवड मनपा व पुणे महानगर प्रदेश विकास

प्राधिकरण यांनी आपआपल्या हद्दीतील लांबीच्या प्रमाणातील खर्चाप्रमाणे (Pro-rata basis) महाराष्ट्र शासन देय असलेला ५०% खर्च दयावा असे मत आहे. विषयांकित प्रकल्पातील ३ री व ४ थी उपनगरीय रेल्वे मार्गाची पुणे ते लोणावळा लांबी ७०.०० किमी इतकी असून त्यावर १७ स्टेशन्स आहेत. त्यापैकी पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या हद्दीत सदर रेल्वे मार्गाची लांबी सुमारे १६.७१ किमी असून त्यावर ०५ स्टेशन्स असुन विषयांकित प्रकल्पाचा मनपा हद्दीत होणा-या खर्चामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिका लांबीच्या प्रमाणातील (Pro-rata basis) एकूण खर्च सुमारे र.रु.५५०.४७५ कोटी अपेक्षित आहे. पुणे - लोणावळा दरम्यान ३री व ४थी उपनगरीय रेल्वे लाईनचा नागरीकांना लाभ होणार असल्यामुळे पिंपरी चिंचवड मनपाच्या हद्दीतील लांबीमध्ये होणा-या खर्चातील महाराष्ट्र शासनाचा हिस्सा (५०%) पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने द्‌यावयाचा आहे (Pro-rata basis). पिंपरी चिंचवड महानगरपालिका मनपा हद्दीत १६.७१ किमी लांबीसाठी एकूण खर्च सुमारे र.रु.५५०.४७५ कोटी अपेक्षित आहे. रेल्वे लाईनच्या मनपा हद्दीतील लांबीच्या प्रमाणातील खर्चाप्रमाणे ५०% खर्च महाराष्ट्र शासनाचा हिस्सा र.रु.२७५.२३७५ कोटी देणेबाबतचा विषय आहे. सदर प्रकल्पासाठी जागा अधिग्रहन (LA) सोडून एकूण र.रु.२३०६.०० कोटी खर्च येणार असल्याचे मुंबई रेल्वे विकास कॉर्पोरेशन लि. यांनी कळविलेले आहे. त्यापैकी ५०% रक्कम म्हणजेच रु. ११५३.०० कोटी रु.राज्य शासन देय आहे. पिंपरी चिंचवड मनपा हद्दीतील १६.७१ किमी लांबीसाठी एकूण खर्च सुमारे र.रु. ५५०.४७५ कोटी अपेक्षित आहे. त्यापैकी पिंपरी चिंचवड महानगरपालिका (PCMC) महाराष्ट्र शासनाचा हिस्सा ५०% म्हणजेच र.रु.२७५.२३७५ कोटी देणे आवश्यक आहे. सदर प्रकल्पाचे खर्चामध्ये पिंपरी चिंचवड मनपा प्रमाणेच महाराष्ट्र शासन देय असणा-या ५०% खर्च रेल्वे लाईनच्या लांबीच्या प्रमाणातील खर्चाप्रमाणे (Pro-rata basis) हिस्सा देणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.निता पाडळे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक २ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.नंदा ताकवणे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते

यानंतर सुचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक- ८९३ विषय क्रमांक -२

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे जावक क्र.बीआरटीएस/४२८/२०१६ दि.६/६/२०१६

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६४२० दि.१४/०६/२०१६

विषय क्रमांक २ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक -३

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६६५२ दि.५/०७/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमध्ये मुख्य लेखापाल हे पद महापालिकेतील लेखासंवर्गातील असून या पदावर आत्तापर्यंत महापालिकेतील अधिका-यांना सेवाज्येष्ठतेनुसार पदोन्नती देण्यात येत होती. या पदावर श्री.लोंढे एन.एन. सन १९९१ ते २०१२ पर्यंत व श्री.व्ही.टी.भोसले सन २०११-१२ पर्यंत सेवाजेष्ठतेनुसार पदोन्नतीने कामकाज करीत होते. या पदावर श्री.सुरेश आव्हाळे सेवाजेष्ठतेनुसार पात्र आहेत. प्रशासन विभागाकडील आदेश क्र.प्रशा/२/कावि/३११/२०१६ दि.२३/०६/२०१६ अन्वये यापुर्वी काम करित असलेल्या श्री.प्रमोद भिमराव भोसले यांची सोलापूर येथे बदली झाल्याने त्यांना कार्यमुक्त करुन मुख्य लेखापाल या पदाचा पदभार श्री.सुरेश आव्हाळे, लेखाधिकारी पदाचा पदभार सांभाळून देण्यात आलेला होता. तदनंतर नियमानुसार पदोन्नती देण्याची कार्यवाही मनपामध्ये चालू होती. त्या दरम्यानच्या काळात शासनाकडूल १५ जुन २०१६ च्या आदेशान्वये श्री.राजेश गोपाळराव लांडे यांची प्रतिनियुक्तीने नेमणूक केली. तथापि सदरची बाब योग्य नसून महापालिका कर्मचा-यांवर अन्याय करणारी तसेच कर्मचा-यांना घटनेने दिलेल्या पदोन्नतीच्या मुलभूत हक्कास बाधा निर्माण करणारी आहे. म्हणून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेत श्रीराजेश गोपाळराव लांडे यांची प्रतिनियुक्तीने केलेली बदली रद्द करण्यात येऊन मा.आयुक्त यांनी शासनाला तसे

कळविण्यास व महापालिकेतील लेखासंवर्गातील सेवाजेष्ठ असलेले श्री.सुरेश आव्हाळे यांना मुख्य लेखापाल पदावर नियमानुसार पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. श्री.राजेश लांडे हे शासनामधुन येथे आलेले आहेत. त्यांना परत पाठवू शकत नाहीत. विषय क्रमाक ३ मध्ये श्री.सुरेश आव्हाळे यांचे नाव रिकमण्ड केले गेलेले आहे. मला प्रशासनाकडून माहिती पाहीजे की, सेवाजेष्ठता यादीमध्ये गवळी संजय जर्नादन एक नंबरला आहेत. प्रमोशन पॉलीसीप्रमाणे चिफ अकौंटंट हे पद आहे. हे एक तर तुम्ही डेप्युटेशनवर फायनान्शिअल डिपार्टमेंट कडून आणू शकता किंवा चिफ अकौंटंट पद दयायच असेलतर ते डेप्युटी चिफ अकौंटंट मधुनच दयायला पाहीजे असं येथे आहे. ज्या चॅनल मधुन आपण प्रमोशन घेतो त्यामध्ये ऍडमिनिस्ट्रेशनने गवळीच नाव दिलेल आहे. मग आव्हाळे यांचे नाव कुठून आले हे समजत नाही. उपलेखापाल मधुन मुख्यलेखापाल यांचे प्रमोशन व्हायला पाहीजे. ज्यावेळेला गवळीला प्रमोशन दिले ही ऑर्डर महाराष्ट्र शासनाने १३ ऑक्टोंबर २०१० प्रमाणे प्रमोशन दिलेले आहे. या प्रमोशनमध्ये स्पष्ट दिलेले आहे. आयुक्त व प्रशासकीय यंत्रणेच्या दैनंदिन बाबीची तपासणी करणे, मागण्या, देयके इ. तपासणी करणे. व आयुक्तांना अंतीम निर्णय घेण्यास मदत करणे या करिता ते प्रमोशन देण्यात आलेले आहे. मग हे सर्व पेपर डेप्युटी चिफ अकौंटंट कडून चिफ अकौंटंटकडे जायला पाहीजे पण डेप्युटेशनवर येणारा प्रत्येक माणूस आपल्या अधिका-याला दाबून टाकतात. त्यांच्या थ्रू पत्र देत नाहीत ते डायरेक्ट चिफ अकौंटंटकडे देतात. जी प्रमोशन दयायचे ठरलेतर यादीमध्ये पहील कोणाचे नाव आहे. जे मुख्यलेखापाल पदाच प्रमोशन दिलेल आहे त्यामध्ये जीआर प्रमाणे त्यांना कामकाज दिल जात नाही. खुलासा करावा.

**मा.डॉ.डोईफोडे (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताचा जो विषय आहे तो स्थायी समितीमधील सदस्य पारीत ठराव आहे. याला प्रशासनाची टिप्पणी नव्हती. सदस्य ठराव स्थायी समितीला केलेला आहे. त्याच्यामध्ये सुरेश आव्हाळे यांना मुख्यलेखापाल पदावर पदोन्नतीसाठी रिकमण्ड केलेले आहे. सेवाजेष्ठता यादी आणि त्या पदाच्या बाबतीत कदाचित हा ठराव करत असताना सदस्य पारीत असल्यामुळे त्यांनी याची पडताळणी केलेली नाही. हा सदस्य पारीत ठराव आहे. त्यामुळे त्याचे डिटेल्स याठिकाणी नाही.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. चिफ अकौंटंटचे प्रमोशन कसे दिले जाते आणि डेप्युटी चिफ अकौंटंटचे काम कसे दिलेले आहेत याबद्दल मी अनेकवेळा तुम्हांला ऍप्रोच केलं आहे. शासनाचा जीआर असताना सुध्दा तुम्ही डेप्युटेशन अधिका-यांना सपोर्ट करता. येथील कर्मचा-यांना सपोर्ट करत नाही.

**मा.डॉ.डोईफोडे (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा ठराव सदस्य पारीत ठराव आहे. लेखधिका-यांची जी सेवाजेष्ठता आहे त्याच्यामध्ये एक नंबरला श्री.गवळी आहेत त्यांना आपण यापुर्वी उपमुख्यलेखापाल तथा अंतर्गत लेखापरिक्षक म्हणून पदोन्नती दिलेली आहे. त्याच्यानंतर दोन नंबरला श्री.सुरेश आव्हाळे व तीन नंबरला श्री.इनामदार हे आहेत आणि चार नंबरला श्री. जगदाळे आहेत.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रमोशन चॅनेलची माझ्याकडे लीस्ट आहे. याच्यामध्ये कसे प्रमोशन दिले जातात चिफ अकौंटंटचे प्रमोशन डेप्युटी चिफ अकौंटंट मधुन दयायला पाहीजे. आपल्याकडे एकच डेप्युटी चिफ अकौंटंट आहे आणि म्हणून त्यांना प्रमोशन दयायला लागेल.

**मा.डॉ.डोईफोडे (सहा.आयुक्त) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपण ज्या कागदपत्रावरुन सांगता ते बघीतलेतर तपासून सांगता येईल. सन्मा.सदस्यांनी आपल्या सेवाप्रवेशाची प्रत दिलेली आहे. त्याच्यामध्ये असे आहे की प्रमोशनचे चॅनेल जे आहे त्याच्यापुढे असे आहे डेप्युटी चिफ अकौंटंट त्याच्यापुढ असं लिहीलेलं आहे OR अकौंटंट ऑफिसर. बी.कॉम. परिक्षा हे पुर्ण वाक्य आहे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा प्रस्ताव स्थायी समितीने केलेला आहे. हा ठराव विधी समितीनेही केलेला आहे. नंतरच्या २.०० ची जीबी आहे त्यामध्ये मा. आयुक्तांकडून रितसर डॉकेट आलेले आहे, त्याला उपसूचना दयावी. हा विषय दप्तरी दाखल करावा.

**मा.सविता साळुंके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ३ दप्तरी दाखल करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, सूचनेस अनुमोदन देते

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८९४ विषय क्रमांक -३

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.सुमन नेटके, मा.विमल काळे यांचा प्रस्ताव...

२) मा.स्थायी समितीकडील ठ.क्र.१६६५२ दि.५/०७/२०१६

विषय क्रमांक ३ दप्तरी दाखल करणेत येत आहे.

अनुकूल-८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ४ वर मी पुढीलप्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ४

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५३/२०१६, दि.०९/०२/२०१६
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६२ दि.१.०४.२०१६
३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८४७ दि.२०/४/२०१६
४) मा.महापालिका सभा ठ.क्र.८६५ दि.२०/५/२०१६
५) मा.महापालिका सभा ठ.क्र.८८३ दि.२०/६/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३, ३७६ व उपविधीनुसार उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाने देण्यात येतात.

सद्यस्थितीत याविभागामार्फत देण्यात आलेल्या एकूण परवान्यांची संख्या दि. ३०/११/२०१४ अखेर ६१३९ एवढी आहे व सन २०१५-२०१६ मधील माहे नोव्हेंबर २०१५ अखेर मिळालेले एकूण उत्पन्न र.रु. १५,८४,४५६/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख चौ-याऐंशी हजार चारशे छपन्न फक्त) एवढे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ चे तरतुदीस आधीन राहून प्रति वर्षी परवाना फीचे दर निश्चित करण्यात येतात त्यानुसार सन २०१६-१७ साठीही ते निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१३-२०१४ चे उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी निश्चित करताना सन २०१२-२०१३ चे दरात १०% वाढ केलेली आहे. ही बाब विचारात घेता सन २०१४-२०१५ साठी कोणतीही फी वाढ न करता सन २०१३-२०१४ चे दर कायम ठेवण्यात आले आहेत. सन २०१५-२०१६ चे उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी निश्चित करताना सन २०१४-२०१५ चे दरात १०% वाढ केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने परिपत्रक क्रमांक पीसीसी-३०१५/प्र.क्र.७५(१)/नवि-२२ दिनांक २४/४/२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३ मध्ये महानगरपालिकेच्या अधिकारितेतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाव्दारे अधिसूचित केलेल्या क्षेत्रामध्ये कारखाने, कर्मशाळा किंवा कामाच्या जागेच्या बाबतीत अशा परवानगीची आवश्यकता असणार नाही अशी सुधारणा केलेली आहे. त्यामुळे एम.आय.डी.सी. क्षेत्रातील उद्योगांना यापुढे म.न.पा. परवाने देता येणार नाहीत. तसेच म.न.पा.चे उत्पन्नाचे प्रमुख साधन एल.बी.टी. हे शासनाने रद्द केलेने म.न.पा.

उत्पन्न वाढविण्यासाठी सन २०१६-१७ साठी प्रचलित सन २०१५-१६ दरामध्ये २०% दरवाढ उपरोक्त व्यवसाय व साठा परवान्यासाठी करणेत यावी. तसेच उद्योगधंदा परवान्यासाठी प्रपत्र अ प्रमाणे परवाना फी असे सूचविण्यात येत आहे. त्यानुसार सन २०१६-१७ साठी प्रस्तावित दर दर्शविणारे, उद्योगधंदा परवाना फी साठी प्रपत्र - अ, व्यवसाय परवाना फी साठी प्रपत्र - ब व साठा परवाना फी साठी प्रपत्र - क सोबत सादर केलेप्रमाणे मा.आयुक्त यांनी प्रस्तावित केले असले तरी उद्योगधंदा परवाना, व्यवसाय परवाना व साठा परवाना फी चे सन २०१५-१६ साठी निश्चित केलेले दर हे सन २०१६-१७ साठी कायम करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर-** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- साठा परवाने ज्या वस्तूंकरिता व्यावसायिकांना लागू आहे त्या सोडून पिंपरी चिंचवड शहरामध्ये जे भंगार व्यावसायिक वेगवेगळया वस्तू अथवा मालाचा साठा करतात, उदा.जुने टायर्स, वाहनांचे सुटे भाग, लाकडाच्या फळया, जुने फर्निचर, लोखंडी माल अथवा वस्तू, कागद, काच, प्लॅस्टिक, अथवा कचरा, कागदी पुठ्ठे, इ. अशा मालाची साठवणूक ते विक्रीसाठी करतात. अशा सर्व वस्तुंचा परवाना विभागाच्या यादीमध्ये सामावेश करुन त्यावर नियमानुसार साठा परवाना फी आकारावी तसेच औदयोगिक वस्तू उत्पादित करणा-या व त्यासाठी लागणा-या मालाचे साठयावर कोणतीही फी न आकारण्यास मान्यता देणेत यावी.

**मा.प्रसाद शेट्टी -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मला या विषयावर सांगायचे आहे की हा विषय अत्यंत महत्वाचा आहे. उदयोगधंदा परवाना वाढविणे विषया सोबत आकाशचिन्ह परवाना वाढीच्या विषयाकडे मी सभागृहाचे लक्ष वेधितो. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आर्थिक उत्पन्न वाढविण्याच्या दृष्टिने आकाशचिन्ह परवाना दरवाढीच्या दृष्टिने तत्कालीन आयुक्त मा.राजीव जाधव साहेबांनी २०१६-१७ साठी १५ टक्के दरवाढ दिली होती. सर्वसाधारण सभेमध्ये विषय मंजूरीसाठी आलेला असताना तहकूब करण्यात आला होता त्यामुळे पुर्वीचे दर सध्या अस्तित्वात असल्यामुळे महानगरपालिकेचे मोठे आर्थिक नुकसान होत आहे. सभागृहातील सर्व सदस्यांना माझी विनंती आहे की या विषयात कोणतेही राजकारण न करता महापालिकेची सध्याची आर्थिक परिस्थिती व भविष्यकालीन परिस्थितीचा विचार करता ही दरवाढ होणे गरजेचे आहे. आपण केवळ ही दरवाढ १५ टक्के करत आहे. पुण्याच्या तुलनेमध्ये आपली दरवाढ कमी आहे. त्यामुळे येणा-या भविष्यकाळात शहरातील विवीध विकासकामे व नागरी सुविधा देताना आर्थिक भार पडणार आहे. त्यामुळे आतापासून नवीन उत्पन्न वाढीचे साधन शोधणे गरजेचे आहे. असे न केल्यास प्रशासनाने मिळकतकर हा पाणीपट्टी असेल यामध्ये करवाढ केल्यास प्रशासनाला नागरीकांच्या समस्याला सामोरे जावे लागणार आहे. सर्व सदस्यांना विनंती आहे की, आकाशचिन्ह दरवाढीचा प्रस्ताव सर्वानुमते

मजूर करावा. तसे न केल्यास त्याची किमंत आपणा सर्वाना मोजावी लागणार आहे. त्यामुळे विषयाचे अर्थिक राजकारण न करता करवाढीचा प्रस्ताव मंजूर करावा. मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, आता आपण पाहील की, या दरवाढीच्या विषयाला शहराबाहेरच पाहील तेथे रेट वाढवून आलेले आहेत. आपली वायसीएम मध्ये जी मशिन आहे त्याठिकाणी सुध्दा अनेक टेंडर रेट वाढवून आलेले आहेत. पण आपण या आकाशचिन्ह व परवाना मध्ये धिरेंद्र यांच्या जवळ जवळ ४५ संस्था आहेत. या ४५ मध्ये त्याचे चारच आहेत त्यापैकी ४१ संस्था तोच चालवतो. होर्डींग्जची आपण मोजणी करत नाहीत. त्याच्यावर आयुक्त साहेब, आपले लक्ष गेल पाहीजे. याच्यामध्ये सखोल चौकशी करावी. मी मा.मुख्यमंञ्यांना सुध्दा पत्र दिलेले आहे याच्यामध्ये फार मोठा काळा बाजार आहे याची चौकशी करुन आपण याच्यावर कारवाई केली पाहीजे. शहरामध्ये बेकायदेशिर होर्डींग्ज भरपूर आहेत. ते किती दाखवतात त्यांच किती आपल्याकडे रजिस्ट्रर आहेत त्याचा सर्व्हे झाला पाहीजे. त्यावर कारवाई झाली पाहीजे. ब-याचशा वर्षापासून पुर्वीची तुलना पाहीलीतर आपला किती रेट कमी आहे. पुण्यामध्ये ११ रु. ५० पै. आणि आपल्याकडे ७ रु. ८० पै. आहे. या रेटमध्ये तफावत पाहीलीतर आयुक्त साहेब आपण निश्चितपणे त्यांच्या बरोबरीने तरी जायला पाहीजे. एवढया वर्षे झाले हाच रेट ठेवला आहे यापेक्षा जास्त रेट वाढलेले नाहीत म्हणून तो रेट वाढला पाहीजे. महापालिकेच्या उत्पन्नात भर पडली पाहीजे.

**मा.मंगलाताई कदम -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, चांगल्या सुचना केलेल्या आहेत परंतु हा वेगळा विषय आहे. हा साठयाचा विषय आहे आणि ते जे सांगतात तो वेगळा विषय आहे. सविस्तर त्यांनी मा.आयुक्तांना पत्र दयावं त्यात त्यांना जर काही वाटलेतर तो रितसर प्रस्ताव दयावा. त्यांनी मा.मुख्यमंञ्यांना पत्र पाठविलेल आहे असं त्यांच्या बोलण्यातून आलं. त्यामुळे त्यांनी तयार केलेला कागद आयुक्तांकडे दयावा आणि आयुक्त साहेब तुम्ही त्याच्यात शहानिशा करा, चौकशी करा, तुम्हांला त्याच्यात आणखीन काही वाटलतर तो विषय रितसर आमच्याकडे यावा अशी मी महापौरांना विनंती करते व आताचा विषय उपसूचनेसह मंजूर करावा.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारलेली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ८९५ विषय क्रमांक - ४

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.आप/२/कावि/१५३/२०१६, दि.०९/०२/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.६२ दि.१.०४.२०१६

३) मा.महापालिका सभा ठ.क्र.८४७ दि.२०/४/२०१६

४) मा.महापालिका सभा ठ.क्र.८६५ दि.२०/५/२०१६

५) मा.महापालिका सभा ठ.क्र.८८३ दि.२०/६/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे आकाशचिन्ह व परवाना विभागामार्फत महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३, ३७६ व उपविधीनुसार उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाने देण्यात येतात.

सद्यस्थितीत याविभागामार्फत देण्यात आलेल्या एकूण परवान्यांची संख्या दि. ३०/११/२०१४ अखेर ६१३९ एवढी आहे व सन २०१५-२०१६ मधील माहे नोव्हेंबर २०१५ अखेर मिळालेले एकूण उत्पन्न र.रु. १५,८४,४५६/- (अक्षरी र.रु.पंधरा लाख चौ-याऐंशी हजार चारशे छपन्न फक्त) एवढे आहे.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३८६ चे तरतुदीस आधीन राहून प्रति वर्षी परवाना फीचे दर निश्चित करण्यात येतात त्यानुसार सन २०१६-१७ साठीही ते निश्चित करणे आवश्यक आहे.

सन २०१३-२०१४ चे उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी निश्चित करताना सन २०१२-२०१३ चे दरात १०% वाढ केलेली आहे. ही बाब विचारात घेता सन २०१४-२०१५ साठी कोणतीही फी वाढ न करता सन २०१३-२०१४ चे दर कायम ठेवण्यात आले आहेत. सन २०१५-२०१६ चे उदयोगधंदा, व्यवसाय, साठा परवाना फी निश्चित करताना सन २०१४-२०१५ चे दरात १०% वाढ केलेली आहे.

महाराष्ट्र शासनाने परिपत्रक क्रमांक पीसीसी-३०१५/प्र.क्र.७५(१)/नवि-२२ दिनांक २४/४/२०१५ अन्वये महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ३१३ मध्ये महानगरपालिकेच्या अधिकारितेतील महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाव्दारे अधिसूचित केलेल्या क्षेत्रामध्ये कारखाने, कर्मशाळा किंवा कामाच्या जागेच्या बाबतीत अशा परवानगीची आवश्यकता असणार नाही अशी सुधारणा केलेली आहे. त्यामुळे एम.आय.डी.सी. क्षेत्रातील उद्योगांना यापुढे म.न.पा. परवाने देता येणार नाहीत. तसेच म.न.पा.चे उत्पन्नाचे प्रमुख साधन एल.बी.टी. हे शासनाने रद्द केलेने म.न.पा. उत्पन्न वाढविण्यासाठी सन २०१६-१७ साठी प्रचलित सन २०१५-१६ दरामध्ये २०% दरवाढ उपरोक्त व्यवसाय व साठा परवान्यासाठी करणेत यावी.

तसेच उद्योगधंदा परवान्यासाठी प्रपत्र अ प्रमाणे परवाना फी असे सूचविण्यात येत आहे. त्यानुसार सन २०१६-१७ साठी प्रस्तावित दर दर्शविणारे, उद्योगधंदा परवाना फी साठी प्रपत्र - अ, व्यवसाय परवाना फी साठी प्रपत्र - ब व साठा परवाना फी साठी प्रपत्र - क सोबत सादर केलेप्रमाणे मा.आयुक्त यांनी प्रस्तावित केले असले तरी उद्योगधंदा परवाना, व्यवसाय परवाना व साठा परवाना फी चे सन २०१५-१६ साठी निश्चित केलेले दर हे सन २०१६-१७ साठी कायम करणेस मान्यता देणेत येत आहे. तसेच साठा परवाने ज्या वस्तूंकरिता व्यावसायिकांना लागू आहे त्या सोडून पिंपरी चिंचवड शहरामध्ये जे भंगार व्यावसायिक वेगवेगळया वस्तू अथवा मालाचा साठा करतात, उदा.जुने टायर्स, वाहनांचे सुटे भाग, लाकडाच्या फळया, जुने फर्निचर, लोखंडी माल अथवा वस्तू, कागद, काच, प्लॅस्टिक, अथवा कचरा, कागदी पुठ्ठे, इ. अशा मालाची साठवणूक ते विक्रीसाठी करतात. अशा सर्व वस्तुंचा परवाना विभागाच्या यादीमध्ये सामावेश करुन त्यावर नियमानुसार साठा परवाना फी आकारावी तसेच औदयोगिक वस्तू उत्पादित करणा-या व त्यासाठी लागणा-या मालाचे साठयावर कोणतीही फी न आकारण्यास मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ५

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४०२/२०१६, दि.१७/०६/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.७५ दि.१७/६/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सह शहर अभियंता(स्था.) अभिनामाची 3 पदे पे बॅन्ड र.रु. 15600-39100 ग्रेड वेतन र.रु. 7600 या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गात रिक्त होणारे 01 पद पदोन्नतीने भरण्याकरीता दि.30/05/2016 रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व कार्यकारी अभियंता(स्था)/उपशहर अभियंता पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, गोपनीय अहवाल आणि सेवाज्येष्ठता इ. सेवाविषयक तपशील या बाबींची पडताळणी करुन श्री.दुधेकर रविंद्र विनायक यांचा कार्य. अभियंता(स्था.) पदावरील पदोन्नती नियमित होण्यापूर्वीचा 10.9 वर्षे आणि

पदोन्नती नियमित झाल्यानंतरचा 8.5 वर्षे असा एकूण 19.2 वर्षे इतका अनुभव कालावधी विचारात घेऊन श्री.दुधेकर यांची कार्यकारी अभियंता(स्था.) पदावरील नियमित झाल्यानंतरची सेवा 8.5 वर्षे झाली असली तरी त्यांचा त्या पदावरील एकूण कार्यकाल व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-2005/प्र.क्र.1/2005/12, दि.25/02/2005 मधील तरतूद पाहता, श्री.दुधेकर रविंद्र विनायक यांना अनु. जाती प्रवर्गामधून सह शहर अभियंता (स्था.) पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्यास सर्वानुमते शिफारस केलेली असल्याने श्री.दुधेकर रविंद्र विनायक, कार्यकारी अभियंता यांना अनु.जाती प्रवर्गातून सह शहर अभियंता (स्थापत्य) पे बॅन्ड र.रु.15600-39100 ग्रेड पे 7600 या वेतनश्रेणीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.भारती फरांदे -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो- पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहे जून २०१६ च्या मा.महापालिका सभेमध्ये महानगरपालिकेचा आकृतीबंध मंजूर झाला आहे. सदयस्थितीत स्थापत्य विभागासाठी सह शहर अभियंता अभिनामाची ३ पदे मंजूर आहेत. स्थापत्य BRTS Housing पाणीपुरवठा व जलनि:स्सारण, पर्यावरण आणि बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, या विभागांचा वाढता पसारा व शहराचा वाढणारा विकास या पार्श्वभूमीवर मा.महापालिका सभेने आकृतीबंधामध्ये सह शहर अभियंता अभिनामाची ३ नवीन पदे (एकूण ६) मंजूर केली आहेत.

सदय:स्थितीत कार्यरत असलेल्या सह शहर अभियंत्यांना दुहेरी पदभार असल्याने दैनंदिन कामकाजात अडचणी येत आहेत. मा.महापालिका सभेने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार सह शहर अभियंता अभिनामाची ३ नवीन पदे व श्री.अंबादास चव्हाण यांचे शहर अभियंता पदावर पदोन्नतीमुळे रिक्त होणारे १ पद असे मिळून एकूण ४ सह शहर अभियंता अभिनामाच्या पदावर सध्या महानगरपालिकेतील सेवाजेष्ठ कार्यकारी अभियंता / उपशहर अभियंता यांची पदोन्नतीने नेमणूक केल्यास म.न.पा.च्या कारभारात सुसूत्रता व सुलभता येईल.

म.न.पा.ने सादर केलेल्या आकृतीबंधास, “महाराष्ट्र शासन मान्यता देईल", या उमेद मान्यतेवर सह शहर अभियंता अभिनामाच्या ४ पदांवर, शैक्षणिक अर्हता तसेच अनुभवाचे निकष धारण करीत असल्याने श्री.अयुबखान पठाण, श्री.मकरंद निकम, श्री.श्रीकांत सवणे व श्री.रामदास तांबे यांना सह शहर अभियंता या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात यावी, तसेच मा.आयुक्त यांनी तात्काळ विभागीय पदोन्नती समितीची (D.P.C.) बैठक घेऊन या उपसुचनेनुसार, नियमांनुसार पडताळणी करुन ठरावाची अंमलबजावणी करावी. तसेच रिक्त होणारे कार्यकारी अभियंता या पदावर पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्यता देणेत यावी.

**मा.उल्हास शेट्टी -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.आर.एस.कुमार -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह या उपसूचनेला विरोध नाही. त्यांना प्रमोशन मिळावे ते अनेक वर्षे महापालिकेमध्ये काम करतात त्यांना प्रमोशन मिळाले पाहीजे माझ अनुमोदन आहे. पण त्याच बरोबर आपल्याकडे बारा डेप्युटी ईंजिनीअर आहेत आणि चार ते पाच एक्झिक्युटिव्ह ईंजिनीअरची पोस्ट रिक्त आहेत. अनेकवेळा रिमाईण्ड करुनही प्रशासन या गोष्टी करत नाही. का प्रमोशन देत नाही. अनेकवेळा प्रशासनाला विचारलतर ते म्हणतात आयुक्त साहेबांकडे फाईल पेन्डीग आहे. ग्रॅज्युएट आणि डिप्लोमाच मॅटर अनेक वर्षापासून पेन्डीग आहे. हे प्रमोशन का दिले जात नाहीत. माझ्या कडे अ प्रभागामध्ये एक डेप्युटीची व्हेकेन्सी आहे दोन ते तीन महीन्यापासून पाणीपुरवठयामध्ये अशा अनेक ठिकाणी अनेक डेप्युटी ईंजिनीअरची व्हेकेन्सी आहे. डेप्युटी ईंजिनीअरचे प्रमोशन दयायला काय प्रॉब्लेम आहे. सरकारने स्टे दिलेला आहे का किंवा कोर्टाने स्टे दिलेला आहे का. मग स्टे नसताना कसे प्रमोशन दयायचे हे तुम्ही ठरवायचे आहे. तुम्हांला निर्णय घ्यावा लागेल, निर्णय तुम्ही पुढे ढकलू शकत नाहीत. कोर्टाचा स्टे नाही, शासनाचा स्टे नाही. पुर्वी प्रमाणे एक ग्रॅज्युएट एक डिप्लोमा असं आहे आणि आता आकृतीबंधामध्ये आम्ही सांगीतल की लीस्ट प्रमाणे प्रमोशन दयायच. तुम्ही कुठल्याही परिस्थितीत हे डेप्युटी ईंजिनीअरचे प्रमोशन दयायला पाहीजे. अपंगाना प्रमोशनचे सेपरेट चॅनल आहे आणि सुप्रीम कोर्टाच्या ऑर्डरप्रमाणे रिझर्व्हेशन आहे. आपल्याकडे ४० ते ५० टक्केमध्ये एक डेप्युटी ईंजिनीअर अपंग आहेत. त्यांना सुप्रिम कोर्टाच्या आदेशाप्रमाणे एक्झिक्यूटीव्ह ईंजिनीअरचे प्रमोशन दयायला पाहीजे. असे अनेक प्रमोशनचे कॅडरची व्हेकेन्सी असताना आपण प्रमोशन कमिटीची मिटींग घेवून प्रमोशन देवुन टाका. व्हेकन्ट ठेवण्यामध्ये काही अर्थ नाही. पाणीपुरवठा डिपार्टमेंटमध्ये पोस्ट व्हेकेन्ट ठेवणे फार चुकीच आहे. हे कधी पोस्ट भरणार याचे उत्तर दयावे. शासनाने स्टे दिला का, कोर्टाने स्टे दिला आहे का याची सुध्दा माहीती दयावी.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह याठिकाणी उपसूचना मांडलेली आहे. अकृतीबंध शासनाच्या नवीन मार्गदर्शक तत्वानुसार आपण निर्णय घेणार आहोत. प्रशासनाच अशा पध्दतीच लक्ष असणे गरजेचं आहे. कुठल्या नियमाच्या आधारे कोणाला प्रमोशन दयायचे हा प्रशासनाचा अधिकार आहे. खरंतर याठिकाणी एकतर्फी कोणी कोणाची वकीली करत असेलतर ते अतीशय अयोग्य आहे. त्यामुळ मा.आयुक्तांना माझी अशी सूचना आहे की ही उपसूचना आहे ती जरी याठिकाणी मंजूर झालेली असलीतरी पुढे त्याचा आपण अभ्यास करावा. एकूणच व्यक्तीश: माझा आणि याठिकाणी आमचे जे सदस्य आहेत त्यांचा विरोध आहे.

**मा.सुलभा उबाळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज याठिकाणी रविंद्र दुधेकर साहेब यांच्या पदोन्नतीचा विषय आहे. त्यांची ब-याचशा वर्षे सेवा आपण सगळयांनी बघीतली आहे, चांगल्याप्रकारचे काम ते करतात, त्यांची कधीही तक्रार आलेली नाही आणि जास्तीत जास्त काम पाणीपुरवठयामध्ये त्यांनी केलेले आहे. आणि त्यांनी कधीही असं सांगीतल नाही की माझी बदली करुन दया. आताही एम.टी.कांबळे यांचा पाणीपुरवठयाचा चार्ज त्यांच्याकडे आलेला आहे. त्यांची डीपीसी झालेली आहे. अधिकृत त्यांचा विषय याठिकाणी आहे. अकृतीबंध शासनाकडून कधी मंजूर होईल हे आपणाला माहीत नाही. या विषयाला उपसूचना दिल्यामुळे अयूबखान पठाण यांचे कार्यक्षम अधिका-यामध्ये एक नंबरला नाव घ्याव अशा पध्दतीन त्यांच कामकाज आहे. सवणे साहेब यांचे सुध्दा कामकाज चांगले आहे. कोणाच्या बाबतीतही आमची तक्रार नाही. परंतु जर कोणी एकानी या विषयाची उपसूचना दिलीतर परत बांधीलकी येते किंवा संशयाला जागा राहते की माझा विषय यांनी केला परत पक्षाला बोलायच नाही. त्यामुळे हा चुकीचा पायंडा पडतो. एक अधिकृत डीपीसीचा विषय आला जो अकृतीबंधचा विषय शासनाकडे मंजूर झालेला नाही तरी हे तुम्ही देऊ शकता का. याला मान्यता मिळण्यामध्ये दुधेकर साहेबांची पदोन्नती अडकऊ नये. म्हणजे तुम्हांला जर या गोष्टीला उशिर लागणार असेल, तो कराच याला विरोध नाही. त्यांना दयायलाच पाहीजे. ते बरेच वर्षे काम करतात. या लोकांनाही आमचा पाठींबा आहे. परंतु हे करत असताना आंबादास चव्हाण विदाऊट डीपीसी बसतातनां. आंबादास चव्हाण हे त्यांच्या मेरीटमुळे याठिकाणी बसलेले आहेत, मेरीट नसतीतर ते या जन्मी त्यांना शक्य नव्हतं सिटी ईंजिनीअर म्हणून. परंतु मेरीटमुळे ते इथे बसलेले आहेत. त्याच्यामुळे कोणाचेही काही येथे चाललेले नाही. म्हणजे त्यांना डीपीसी न करता ॲडीशनल बसविलेले आहे. ॲडीशनलचा अर्थ म्हणजे रिमोट कंट्रोलच्या चाव्या सगळया आपल्याकडे. जास्त बोलल्यावर सुध्दा जागेवरन काढणार अशी त्यांच्या मनामध्ये भिती आहे. कदाचित त्याच्यामुळे ते चांगल काम करतील का नाही यामुळे आमच्या मनामध्ये शंका येते. त्यामुळे त्यांची पण डीपीसी व्हावी. जर त्यांची डीपीसी झाली नाही ते जर कन्फर्म सिटी ईंजिनीअर म्हणून बसले नाहीततर उदयाच्या येणा-या काळामध्ये एम.टी.कांबळे सारखे रिटायर्ड झालेतर आमच्या डोक्यावर कायम राहणार की शासनाचा सिटी ईंजिनीअर कधीही तेथे येवुन बसू शकतो. आता आमच पुढच्या काळात इलेक्शन आहे, त्या काळात तुम्ही शासनाचे आणलेतर आम्ही काहीच करु शकणार नाहीत. त्यामुळे त्यांची पण डीपीसी झाली पाहीजे. आणि ते तिथे गेलेतर आयुबखान पठाण वगैरे जे आहेत ते पुढे सिटी ईंजिनीअर होण्याची शक्यता आहे. तरी तो रस्ताच आपण नीट डांबर टाकून केला नाहीतर काही उपयोग नाही त्याची दिशाभूल होते. दुधेकर साहेबांचा विषयामध्ये ही उपसूचना दिली त्याच्यामुळे काहीही अडथळे निर्माण होता कामा नये. या तीघालाही ॲडीशनल पदोन्नती म्हणून देता येत असेलतर आमचे काहीही म्हणणे नाही. परंतु तुमच्याकडून विषय येऊ दया. आंबादास चव्हाण

साहेब यांची डीपीसी व्हायला पाहीजे एवढा उशिर का केला हे सांगा. आम्हांला त्यांच्या बाबतीत शंका वाटते तुमच्या हेतूमध्ये की तुम्हांला शासनाचा सिटी ईंजिनीअर आणायचा की काय असं वाटतं. त्यामुळे त्यांचा सुध्दा खुलासा याठिकाणी करावा

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आताच ज्या सुलभाताई बोलल्या, डीपीसी लावत नाही. ज्यावेळेला विधी समितीमध्ये हा विषय आलेला होता आणि मुख्यलेखापाल मा.लांडे साहेब आले त्यावेळेला मागील आयुक्तांनी डीपीसी करिता प्रस्ताव ठेवलेला होता आणि तुमच्याकडेही प्रस्ताव ठेवला होता. असे असून सुध्दा डीपीसी न लावल्यामुळे शासनाचा अधिकारी याठिकाणी पाठविलेला आहे. आतापण सुलभाताईनी शंका उपस्थित केली की जर आपण डीपीसी लावली नाहीतर परत शासनाचे शहर अभियंता येतील. तरी डीपीसी का लावली जात नाही. योग्य वेळी डीपीसी लावावी आणि संपुर्ण चार्ज त्या अधिका-यानां दयावा अशी विनंती आहे, धन्यवाद.

**मा.राजेंद्र काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय प्रशासनाचा आहे. आम्ही सभासदांनी यामध्ये बोलणे खरंतर उचित नाही. परंतु खरतर अभियंत्यामध्ये एक अन्यायाची भावना तयार होते. आज कित्येक वर्षापासून आपण पाहतो आहोत याठिकाणी कुठल्याच प्रकारचे आपण अभियंता, उपअभियंता यांची श्वेतपत्रिका तयार केलेली नाही. त्यामुळे या अभियंत्यांवर निश्चितपणे अन्यायाची भावना होत चालली आहे आणि त्याचाच परिणाम ख-या अर्थाने त्यांच्या कामावर होत आहे. कोणाच अभियंत्यांना याठिकाणी शाश्वती नाही की जरी तो मेरीटमध्ये असलातरी आपलाच नंबर लागेल याची शाश्वती कुठल्याच अभियंत्यांला राहीलेली नाही. हि एक संस्था आहे आणि या संस्थेच्या नियमाप्रमाणे काम केले जावे अशी धारणा सर्वांची असते. निश्चितपणे त्यांच्या अनुभवाचा फायदा याठिकाणी व्हावा. परंतु प्रत्येकवेळेस जर प्रत्येकावर अन्याय होत गेला तर कालांतराने याठिकाणी अभियंत्यांची भावना या संस्थेबद्दल विचीत्र होऊन जाईल आणि जे काम चांगल्या प्रकारे व्हायला पाहीजेत ते कधीच होणार नाहीत. रिक्त जागा आहेत त्या का भरत नाहीत. श्वेतपत्रीका जाहीर करण्यास प्रशासनाला काय अडचण आहे. श्वेतपत्रीका जाहीर झाल्यानंतर निश्चितपणे सगळयांना कळवून जाईल आणि ॲटोमॅटीकली आपल कुठतरी प्रमोशन होईल याची काळजी कर्मचा-यांना राहणार नाही याची नोंद घ्यावी.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. प्रमोशन देत असताना आता जी उपसूचना आलेली आहे त्याला अनुमोदन देतो. सुलभाताईनी चांगला विषय मांडलेला आहे. दुधेकरांना अडचण होता कामा नये. अंबादास चव्हाण यांची सुध्दा डीपीसी झाली पाहीजे. हे करत असताना आयुक्त साहेब आपल्याकड अपगांना आरक्षण आहे आपल्याकडे अपंग आहेत ते प्रमोशनसाठी कोर्टात गेलेले आहेत. कोर्टाकडून आपल्याला नोटीस पण आलेली

आहे तरी देखील आपण त्याच्यावर दुर्लक्ष केलेले आहे. त्यामुळे त्यांना लोकप्रतिनीधी समोर काही गोष्टी सादर कराव्या लागतात. तरी लवकरात लवकर प्रमोशन दयावे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याठिकाणी उपसूचना दिलेली आहे. उपसूचना देण्या मागे दुधेकर साहेबांबद्दल सर्वांना आदर आहे त्यांचा विषय ठेवत असताना प्रशासनाने अशी चुक केलेली आहे की त्यावेळेला दुधेकर साहेबांच्या विषया बरोबर वास्तविक पाहता अंबादास चव्हाण यांचा सुध्दा विषय एकत्रीत यायला पाहीजे होता. आता सुलभाताईन सांगीतल की तो विषय झाला नाही म्हणून आणि उदया प्रशासन परत असे म्हणेल की आता जी.बी.चा ठराव व्हायला पाहीजे मग परत डीपीसी होणार परत तुमच्या समोर येणार. म्हणून आम्ही दुधेकर साहेबांच्या विषया बरोबरच अंबादास चव्हाण साहेबांचा विषय ठेवलेला आहे. त्यात आम्ही स्पष्ट असे म्हणलेल आहे की जे सिनीअर मोस्ट आहेत ज्याच्याकडे क्वॉलीफिकेशन आहे जो तुमच्या आरक्षणाच्या नियमामध्ये बसतो, जो बिंदु नामावलीमध्ये बसतो अशाच अधिका-यांना रितसर प्रमोशन दया असे सांगीतलेले आहे. चुकीच काम करुन कोणाची वकीली केलेली नाही. ही फुकटची वकीली आहे. अधिका-यांना न्याय मिळावा म्हणून. विधी समिती वेळोवेळी ठराव करते ते केल्यानंतर विधी समितीचा सन्मान केला जात नाही प्रशासनाकडून ही खुप मोठी चुक आहे. कारण की जे लॉ कमिटीने डायरेक्शन दिले आहेत त्याप्रमाणे प्रशासनाने सुध्दा त्याच्यावर ऍक्ट केले पाहीजे. मग ते का ऍक्ट करत नाहीत. एम.टी.कांबळे क्वॉलीफिकेशनमध्ये बसत नव्हते म्हणून ते सिटी ईंजिनीअर झालेले नाहीत. पण आता अंबादास चव्हाण हे क्वालीफिकेशन पाहीजे ते धारण करतात ते सिनीअर मोस्ट आहेत. आपण आता जे काही आरआर पाठविलेले आहेत त्या आरआर मध्ये आपण सर्वच्या सर्व सहा पद सह शहर अभियंत्यांची ही आपल्या अधिका-यांना मिळावेत असे शंभर टक्के आपण केलेले आहे. त्या उमेदवामान्यतेवर करायचे आहे. आता काही काही अधिका-यांकडे दोन-दोन, तीन-तीन चार्ज आहेत. पठाण साहेबांना सुध्दा चार्जच आपण दिलेला आहे. आणि आंबादास चव्हाण यांना सुध्दा चार्जच दिलेला आहे. जर आपण आंबादास चव्हाण साहेबांना जर रितसर प्रमोशन दिलतर त्यांच्या व्हेकेन्ट होणा-या जागेवर आपल्याला दुसरा अधिकारी प्रमोटेट करता येतो. त्यामुळे आम्ही नावानिशी असं केलेल आहे की जे सिनीअर मोस्ट आहेत, त्यांना प्रमोशन मिळणार आहे अशा लोकांची नाव आहेत. आमची विनंती अशी आहे की पुन्हा शासनाचा माणूस येणार आम्ही सभागृह देखील काहीतरी वेगळा ठराव करणार. ही आमची स्वायत्ता आहे त्या आमच्या स्वायत्तेवर कृपया गदा आणु नका. आमची स्वायत्ता आमच्याकडून हिराऊन घेऊ नका. आयुक्त साहेब, तुम्ही जनरल बॉडी झाली की ताबडतोब डीपीसी लावावी. तुम्हांला जर त्यांच्या पेक्षा मोठं कोणी आणायच असेलतर तुम्ही चिफ ईंजिनीअर मागवावा आमच काही म्हणणं नाही. परंतु सिटी ईंजिनीअर पर्यंतच आमच्या अधिका-यांच प्रमोशनच चॅनल आहे त्याची दक्षता प्रशासनान घ्यावी. डीपीसी लावून रितसर

प्रमोशन करावे. पठाण, निकम, तांबे हे चांगले अधिकारी आहेत त्यांना पदभार देवू शकता. पदभार देण्याचा अधिकार तुमचा आहे. जीबीनेही मान्यता दिलेली आहे. शेवटी निकष तुम्ही ठरवायचे, चार्ज कोणाला दयायचा तो तुम्ही ठरवायचा आहे. परंतु तोपर्यंत तुम्हांला कामामध्ये सुसूत्रता आणता यावी. काम लवकर व्हावे, इलेक्शनचा काळ जवळ आहे, आपल्याकडे बजेट भरपुर आहे. या बजेटमध्ये एक एक पान चाळणं सोप नाही. तुम्ही जबाबदारी वाटून दिल्यातर निश्चितच तुमचे काम सुकर आणि सोईच होणार आहे. प्रशासनाचे काम सुकर आणि सोईच व्हावे हाच त्याच्या मागचा हेतू आहे. याच्या पलीकड आम्हांला वकीली करायच काहीही कारण नाही. हे तपासून तुम्ही रितसर डीपीसी लावावी. मा.महापौर मी आपल्यालाही विनंती करतो की तशाप्रकारचे आदेश आपण प्रशासनाला दयावेत.

**मा.आयुक्त -** मा.महापौर साहेब, सन्मा.सभागृह. डेप्युटी ईंजिनीअर, एक्झिक्युटीव्ह ईंजिनीअर, जॉईंट सिटी ईंजिनीअर, सिटी ईंजिनीअर या पोस्टची डीपीसी लावण्या संदर्भात मी प्रशासनाला सुचना दिलेल्या आहेत. आपण पीडब्ल्युडीचे जे नॉर्म्स आहेत त्याप्रमाणे ३३ टक्के ते डिप्लोमा मधुन, ३३ टक्के डायरेक्ट आणि ३३ टक्के डिग्री मधुन घेतात. आता ऍकच्युली आपण पीडब्ल्यूडीचे नॉर्म्स ऍडॉप्ट केले आहेत आपण डायरेक्टली ३३ परसेन्ट घेतच नाहीत. एक्झिस्टींग जी व्हेकन्सी आहे त्यात ५० टक्के डिप्लोमा मधुन घेतात आणि ५० टक्के डिग्री मधुन घेतात. त्याच्यामध्ये काही लोक कोर्टात गेले, काही लोक महाराष्ट्र एसएससी कमीशनकडे गेले याच्यामध्ये सर्व गोष्टीचा विचार करावा लागेल. डीपीसी घेण्यामध्ये काहीच अडचण नाही. प्रशासन विभागाला त्याप्रमाणे मी सूचना दिलेल्या आहेत. येत्या आठवडयामध्ये त्या डीपीसी होतील.

**मा.महापौर -** सेवाजेष्ठते नुसार ज्यावेळेला सुरवातीला ज्यांच शिक्षण कमी आहे ते लागलेले आहेत आणि आता नवीन भरती केलेली आहे त्यांचे शिक्षण जास्त असेलतर आणि तुम्ही त्यांना प्रमोशन देत असालतर जुन्या अधिका-यांचाही आपण विचार केला पाहीजे.

**मा.सुजाता पालांडे-** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता–

ठराव क्रमांक - ८९६ विषय क्रमांक - ५

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४०२/२०१६, दि.१७/०६/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.७५ दि.१७/६/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर सह शहर अभियंता(स्था.) अभिनामाची 3 पदे पे बॅन्ड र.रु. 15600-39100 ग्रेड वेतन र.रु. 7600 या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर

आहेत. या संवर्गात रिक्त होणारे 01 पद पदोन्नतीने भरण्याकरीता दि.30/05/2016 रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नतीपूर्व कार्यकारी अभियंता(स्था)/उपशहर अभियंता पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, आरक्षण, गोपनीय अहवाल आणि सेवाज्येष्ठता इ. सेवाविषयक तपशील या बाबींची पडताळणी करुन श्री.दुधेकर रविंद्र विनायक यांचा कार्य. अभियंता(स्था.) पदावरील पदोन्नती नियमित होण्यापूर्वीचा 10.9 वर्षे आणि पदोन्नती नियमित झाल्यानंतरचा 8.5 वर्षे असा एकूण 19.2 वर्षे इतका अनुभव कालावधी विचारात घेऊन श्री.दुधेकर यांची कार्यकारी अभियंता(स्था.) पदावरील नियमित झाल्यानंतरची सेवा 8.5 वर्षे झाली असली तरी त्यांचा त्या पदावरील एकूण कार्यकाल व शासन परिपत्रक क्र. एसआरव्ही-2005/प्र.क्र.1/2005/12, दि.25/02/2005 मधील तरतूद पाहता, श्री.दुधेकर रविंद्र विनायक यांना अनु. जाती प्रवर्गामधून सह शहर अभियंता(स्था.) पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्यास सर्वानुमते शिफारस केलेली असल्याने श्री.दुधेकर रविंद्र विनायक, कार्यकारी अभियंता यांना अनु.जाती प्रवर्गातून सह शहर अभियंता (स्थापत्य) पे बॅन्ड र.रु.15600-39100 ग्रेड पे 7600 या वेतनश्रेणीमध्ये तात्पुरत्या स्वरुपात पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या माहे जून २०१६ च्या मा.महापालिका सभेमध्ये महानगरपालिकेचा आकृतीबंध मंजूर झाला आहे. सदयस्थितीत स्थापत्य विभागासाठी सह शहर अभियंता अभिनामाची ३ पदे मंजूर आहेत. स्थापत्य BRTS Housing पाणीपुरवठा व जलनि:स्सारण, पर्यावरण आणि बांधकाम परवानगी व अनधिकृत बांधकाम नियंत्रण विभाग, या विभागांचा वाढता पसारा व शहराचा वाढणारा विकास या पार्श्वभूमीवर मा.महापालिका सभेने आकृतीबंधामध्ये सह शहर अभियंता अभिनामाची ३ नवीन पदे (एकूण ६) मंजूर केली आहेत.

सदय:स्थितीत कार्यरत असलेल्या सह शहर अभियंत्यांना दुहेरी पदभार असल्याने दैनंदिन कामकाजात अडचणी येत आहेत. मा.महापालिका सभेने मंजूर केलेल्या आकृतीबंधानुसार सह शहर अभियंता अभिनामाची ३ नवीन पदे व श्री.अंबादास चव्हाण यांचे शहर अभियंता पदावर पदोन्नतीमुळे रिक्त होणारे १ पद असे मिळून एकूण ४ सह शहर अभियंता अभिनामाच्या पदावर सध्या महानगरपालिकेतील सेवाजेष्ठ कार्यकारी अभियंता / उपशहर अभियंता यांची पदोन्नतीने नेमणूक केल्यास म.न.पा.च्या कारभारात सुसूत्रता व सुलभता येईल.

म.न.पा.ने सादर केलेल्या आकृतीबंधास, “महाराष्ट्र शासन मान्यता देईल", या उमेद मान्यतेवर सह शहर अभियंता अभिनामाच्या ४ पदांवर, शैक्षणिक अर्हता तसेच अनुभवाचे निकष धारण करीत असल्याने श्री.अयुबखान पठाण, श्री.मकरंद निकम, श्री.श्रीकांत सवणे व श्री.रामदास तांबे यांना सह शहर अभियंता या पदावर पदोन्नती देण्यास मान्यता देण्यात येत

आहे, तसेच मा.आयुक्त यांनी तात्काळ विभागीय पदोन्नती समितीची (D.P.C.) बैठक घेऊन या उपसुचनेनुसार, नियमांनुसार पडताळणी करुन ठरावाची अंमलबजावणी करावी. तसेच रिक्त होणारे कार्यकारी अभियंता या पदावर पदोन्नतीने नेमणूक करणेस मान्यता देणेत येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८९७ विषय क्रमांक - ६

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४०३/२०१६, दि.२०/०६/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.८४ दि.१/०७/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'अस्थिरोग तज्ञ' अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०७/२०१५ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.२३९/२०१५ प्रसिध्द करुन तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते.

'अस्थिरोग तज्ञ' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.२०/१२/२०१५ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.२८/०३/२०१६ रोजी पाचारण करण्यात आले होते.

उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'अस्थिरोग तज्ञ' या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची

प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.२९/०४/२०१६ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.वाघमारे सुधीर गोपाळराव यांना अनु. जाती प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये 'अस्थिरोग तज्ञ' या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेअधीन नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली असलेने डॉ.वाघमारे सुधीर गोपाळराव यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'अस्थिरोग तज्ञ' अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८९८ विषय क्रमांक - ७

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४०४/२०१६, दि.२०/०६/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.८५ दि.१/०७/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर 'सर्जन'अभिनामाची पदे र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत. या संवर्गामध्ये रिक्त असणारी पदे सरळसेवा प्रवेशाने भरण्याकामी दि.२८/०७/२०१५ रोजी वर्तमानपत्रात आणि महापालिकेच्या संकेतस्थळावर जाहिरात क्र.२३९/२०१५ प्रसिध्द करुन तसेच महापालिका आस्थापनेवर कार्यरत असलेल्या अर्हताधारक अधिका-यांकडूनही ऑनलाइन अर्ज मागविण्यात आले होते.

'सर्जन' पदाकरीता प्राप्त झालेल्या अर्जानुसार उमेदवारांना कोणत्याही कागदपत्रांच्या छाननीशिवाय केवळ उमेदवाराने ऑनलाइन अर्जामध्ये नमूद केलेल्या माहितीच्या आधारे दि.२०/१२/२०१५ रोजी लेखी परीक्षेकरीता पाचारण करण्यात आले होते. सदरच्या लेखी परीक्षेत

उमेदवारांनी प्राप्त केलेल्या गुणांच्या आधारे एकत्रित सर्वसाधारण गुणानुक्रम व प्रवर्गनिहाय गुणानुक्रम यादी यानुसार आरक्षण निहाय संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी विषयक व इतर कागदपत्रांची तपासणी करण्याकरीता दि.२८/०३/२०१६ रोजी पाचारण करण्यात आले होते.

उमेदवारांकडून प्राप्त झालेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर कागदपत्रांचे आधारे 'सर्जन'या संवर्गाकरीता आरक्षणनिहाय गुणानुक्रमे संभाव्य निवड क्षेत्रात (Zone of Consideration) येणा-या उमेदवारांचे गुण व त्यांच्या इतर माहितीनुसार उमेदवारांची प्रवर्गनिहाय गुणानुक्रमे निवड यादी व प्रतिक्षा यादी तयार करण्याकरीता दि.२९/०४/२०१६ रोजी कर्मचारी निवड समिती आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या कर्मचारी निवड समितीने उमेदवारांचे लेखी परीक्षेतील गुण, धारण केलेली शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी आणि इतर तपशील पडताळून रिक्त पदसंख्या, अनुशेष/आरक्षण व गुणानुक्रम विचारात घेऊन निवड यादीवरील डॉ.वायकोळे कंचन पंकज यांना खुल्या प्रवर्गातून पे बॅन्ड र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० या वेतनश्रेणीमध्ये 'सर्जन'या पदावर मा.विधी/महापालिका सभेच्या मान्यतेअधीन नियुक्ती देण्यास सर्वानुमते शिफारस केली असलेने डॉ.वायकोळे कंचन पंकज यांना वेतनश्रेणी र.रु.१५६००-३९१०० ग्रेड पे ६६०० मध्ये 'सर्जन'अभिनामाचे पदावर नियुक्ती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ८९९ विषय क्रमांक - ८

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.प्रशा/१/कावि/४०५/२०१६, दि.२०/०६/२०१६

२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.८६ दि.१/०७/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिका आस्थापनेवर ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी अभिनामाची 16 पदे पे बॅन्ड र.रु.15600-39100 ग्रेड वेतन र.रु. 6600 या वेतनश्रेणीमध्ये शासन मंजूर आहेत.

या संवर्गात रिक्त असणारी पदे पदोन्नतीने भरण्याकरीता दि.29/03/2016 रोजी पदोन्नती समिती सभा आयोजित करण्यात आली होती.

प्रस्तुतच्या पदोन्नती समितीने पदोन्नती पूर्व वैद्यकीयअधिकारी पदावरील अधिका-यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव कालावधी, गोपनीय अहवाल, सेवाज्येष्ठता इ. सेवाविषयक तपशील पडताळून खालीलप्रमाणे अधिका-यांना त्यांचे नावासमोर नमूद प्रवर्गातून वेतनश्रेणी ररु. 15600-39100 ग्रेड पे 6600 मध्ये ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी पदावर मा. विधी/महापालिका सभेच्या मान्यतेने पदोन्नती देण्याबाबत शिफारस केलेली आहे.

| **अ.क्र.** | **अधिका-याचे नाव** | **प्रवर्ग** |
| --- | --- | --- |
| 1. | डॉ.माटे सुहास चंदीराम | खुला(वि.मा.प्र.) |
| 2. | डॉ.आंबेडकर विजया अविनाश | खुला(अनु. जाती) |
| 3. | डॉ. पाटील मिनाक्षी राजाराम | खुला |

उपरोक्त अधिका-यांना त्यांचे नावासमोर नमूद प्रवर्गातून'ज्येष्ठ वैद्यकीय अधिकारी'या पदावर र.रु.15600-39100 ग्रेड वेतन र.रु. 6600 या वेतनश्रेणीमध्ये पदोन्नती देण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ९ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९०० विषय क्रमांक - ९

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :- १) मा.भारती फरांदे, मा.गोरक्ष लोखंडे यांचा प्रस्ताव -
२) मा.विधी समितीकडील ठ.क्र.८८ दि.१/०७/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या आस्थापनेवर शहर अभियंता व सह शहर अभियंता या पदनामाची पदे एकाच संवर्गातील व एकच वेतनश्रेणी रक्कम रु.१५६०० - ३९१०० मध्ये मंजूर असून त्यास शासन मान्यता आहे. सदर पैकी शहर अभियंता हे पद सध्या रिक्त असून शहर अभियंता या पदावर व र.रु.१५६०० - ३९१०० या वेतनश्रेणीत कार्यरत सेवाजेष्ठ व

अर्हताधारक असलेल्या श्री.ए.व्ही.चव्हाण यांची शहर अभियंता पदावर नेमणूकीस मान्यता देणेस आणि त्यांचे रिक्त होणा-या सह शहर अभियंता (स्थापत्य) या पदावर श्री.अय्युबखान ए. पठाण (उप शहर अभियंता) यांची नेमणूक करण्यास तसेच या कामी आवश्यक शासन मान्यतेबाबतची कार्यवाही प्रशासनाने तात्काळ करणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १०

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१००८/२०१६, दि.२८/०३/२०१६

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र. ६१ दि.२१/४/२०१६

३) मा.महापालिका सभा ठ.क्र. ८६८ दि.२०/६/२०१६

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमधील ड क्षेत्रीय कार्यालयाच्या कार्य क्षेत्रातील मौजे वाकड येथील स.नं. २१० मध्ये पार्क स्ट्रीट हा गृहप्रकल्पआहे. सदर गृहप्रकल्पात औंध रावेत हा पोहोच रस्ता आहे. सदर गृहप्रकल्पाचे पाठीमागील बाजूने नाशिक फाटा ते वाकड मुंबई बेंगलोर हायवे हा रस्ता आहे. सदरच्या रस्त्यापर्यंत पोहोच रस्ता आवश्यक आहे. सदरचा नाशिक फाटा ते वाकड मुंबई बेंगलोर हायवे रस्ता व पार्क स्ट्रीट या गृहप्रकल्पादरम्यान पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचे पिंपळे निलख स.नं. २७ मधील आरक्षण क्र. ३८७ उद्यान आरक्षण आहे. सदरचे उद्यानचे आरक्षण भागश: विकसित झालेले आहे.

मा.ड प्रभाग समिती मध्ये ठराव क्र. ५६ दिनांक – १३/०३/२०१५ नुसार खालीलप्रमाणे ठराव मंजूर झालेला आहे.प्रभाग क्र. -५४ पिंपळे निलख प्रभागातील मौजे वाकड येथील स.नं २१० रहिवासी विभागातील मिळकतधारकांसाठी रस्त्याची आवश्यकता असल्याने महापालिकेच्या मंजूर आराखड्यातील ४५.०० मी डी.पी.रस्त्यापर्यंत मौजे पिंपळे निलख येथील स.नं. २७ मधून १८.०० मी रुंद रस्ता हा मौजे वाकड येथील स.नं. २१० मधून ४५ मी. रस्त्यापर्यंत मुंबई प्रांतिक

अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १८.०० मी नॉन डी.पी. रस्ता घोषित करणेकामीच्या प्रस्तावास मान्यता देणेत येत आहे. सदरचा ठराव सर्वानुमते मान्य झाला आहे.”

मा. आयुक्तसो. यांचेकडील दि. ०९/०९/२००४ चे कार्यालयीन मंजूर टिपणी अन्वये कलम २०५ खालील सर्व कार्यवाही प्रभागामार्फत करण्यात येते. ही कार्यवाही म्हणजे नविन रस्ते करण्यासाठी ठराव मंजूर करणे. त्यानंतर नगररचना विभागाकडून नविन प्रस्तावित रस्त्याबाबत वर्तमानपत्रात जाहीरात देऊन लोकांकडून/सुचना/हरकत मागविण्यात येतात जर सुचना/हरकती आल्या तर त्यावर सुनावणी घेऊन मा. आयुक्तसो यांची अंतिम मंजुरी घेण्यात येते. त्यानुसार सदरचा ठराव मंजूर झालेला आहे.

सदर ठिकाणी या विभागाने साईट व्हीजीट केली असता, उपरोक्त मंजूर ठरावानुसार सदर ठिकाणी मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम २०५ अन्वये १८.०० मी नॉन डी.पी. रस्ता घोषित करावयाचा झाल्यास आरक्षण क्र. ३८७ च्या पश्चिम बाजूकडील ऐश्वर्यम या गृहप्रकल्पाच्या शेजारील व पिं.चिं.मनपाच्या आरक्षण क्र. ३८७ मधील अंदाजे २६०.९३ चौ.मी. जागा प्रस्तावित रस्त्याने बाधित होईल.त्याबदल्यात उद्यानास लागून अंदाजे २६१.०० चौ.मी. क्षेत्र रामा को-ऑफ हौ.सो.वाकड ही मनपास देणेस तयार आहे. (सोबत अवलोकनार्थ नकाशा जोडला आहे. कृपया अवलोकन व्हावे.) तसेच सदर ठिकाणी मनपाने सिमाभिंतीचे काम पुर्ण केलेले आहे. मनपाचे ताब्यात द्यावयाचे क्षेत्र सिमाभिंतीच्या बाहेर असून सदरची वाढीव सिमाभिंतही बांधून देणेस रामा को-ऑफ हौ.सो.वाकड तयार असलेबाबत मनपास कळविले आहे.बांधकाम परवानगी विभागाकडील मंजूर आराखड्यातील २६१.०० चौ.मी. क्षेत्र अर्जदार मनपाचे ताब्यात देणार आहेत.तरी सदर क्षेत्राचा चटई क्षेत्र निर्देशांकातून वगळणेत यावेत.सदरबाबत अर्जदार यांनी दिनांक – २४/०९/२०१५ चे हमीपत्रान्वये एफएसआय/टीडीआर अथवा इतर कोणताही मोबदला पिं.चिं.मनपाकडे मागणार नाही असे हमीपत्र सादर केलेले आहे. तसेच सदर क्षेत्रास मनपाचे नांव ७/१२ उता-यावर लावण्यात यावे या अटीवर मान्यता देण्यास हरकत नाही.

सदरचा रस्त्याचा उपयोग पार्क स्ट्रीट या गृहप्रकल्पाबरोबर ऐश्वर्यम या गृहप्रकल्पाच्या पाठीमागील मिळकतधारकांसाठी सुध्दा होईल. तसेच सदरबाबत मा. ड प्रभाग समितीनेही १३/३/२०१५ रोजी ठराव मंजूर केलेला आहे.सदरचा प्रस्ताव मान्य झालेनंतर मुंबई प्रांतिक अधिनियम १९४९ चे कलम २०५ अंतर्गत मनपा रस्ता घोषित करणेबाबतची पुढील कार्यवाही करीता हरकती/सुचना मागविणेत येतील.

अर्जदार यांचे निवासी भागातील २६१.०० चौ.मी. क्षेत्र मनपाचे ताब्यात घेऊन त्याचे १८.०० मी.रस्त्यासाठी मनपाकडून आरक्षण क्र. ३८७ मधील अंदाजे २६०.९३ चौ.मी. जागा अदलाबदल करणेसाठी धोरणात्मक निर्णय घेणेस मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.आरती चौंधे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेचा विकास झपाटयाने होत आहे. हा विषय माझ्या प्रभागातील आहे. वाकड येथील पार्कस्ट्रीट सोसायटी, हिंदु सोसायटी येथे जवळ जवळ तीन हजार फ्लॅट आहेत. त्याठिकाणी राहणारे नागरीक हिंजवडी आयटी पार्कला जाणारे लोक आहेत त्यांच्या सोईसाठी हा विषय मांडलेला आहे. त्यांच्या शेजारी सावित्रीबाई फुले उदयान आहे त्याचा लाभ या लोकांना मिळत नाही कारण तेथे वळून याव लागते तरी महिला आणि मुल वळून येवू शकत नाहीत त्यामुळे त्याना या उदयानाचा लाभ घेता येत नाही. तरी हा विषय मंजूर करावा. जेणेकरुन नागरीकांच्या हितासाठी आपण हा विषय मांडलेला आहे. यासंबंधी सूचना व हरकती नंतर मागविण्यात येणार आहेत. हा विषय मंजूर करावा.

**मा.राजेंद्र जगताप -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय ब-याचशा दिवस आपल्या शहरात गाजतो आहे. चिंचवड परिसरातला विषय असल्यामुळे ब-याचशा वेळा यात खडाजंगी झालेली आहे. या विषयी राजकारण न करता विषय मंजूर व्हायला पाहीजे. हा विषय कायम चर्चेत येतो. याच्यावर चर्चा वाढते. हा विषय चिंचवड परिसरामधील असलातरी ड प्रभागामध्ये सगळयात जास्त करसंकलनाची वसुली होत असते. टॅक्स जास्त ड प्रभागामधुन भरला जातो. ब-याचशा सदस्यांकडून ऐकल की नदी पलीकडच्या गावात फार विकास झालेला आहे आणि आपल्या बाजूचा विकास झालेला नाही असे सदस्यांनी म्हणलेले आहे. टॅक्स बघीतलातर त्या परिसरामधील टॅक्स जास्त येतो. या विषयी राजकारण होत चाललेले आहे हा विषय मंजूर व्हावा.

**मा.निलेश बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय एका बिल्डर्सचा आहे. हा बिल्डर कोण आहे तर पुण्यामध्ये ज्यांची बिल्डींग पडली व नऊ लोक मेले त्याच्यानंतर चार लोक पण मेले आहेत त्याच बिल्डर्सचे हे पार्क स्ट्रीट आहे. मा.महापौर साहेब, ज्यावेळेस मारुती भापकर सभागृहामध्ये होते. सभागृहामध्ये असताना प्लेग्राऊंड त्याच ओपन स्पेस मध्ये विस्डम शाळा बांधली. त्यांच्या नियमावलीत चेंज करुन तुम्ही शाळेला परमीशन दिली. मा.महापौर साहेब, २०१२ साली आम्ही निवडून आल्यानंतर आम्ही नवीन होतो, आम्हांला या सभागृहाची जास्त जाणकारी नव्हती. मा.महापौर साहेब, तुम्ही ब्रीटीश काळा पासून असलेला तलाव सुध्दा पार्क स्ट्रीटसाठी बुजवला मा.महापौर साहेब, आता तेथे गार्डन आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिका ड प्रभाग कार्यालयामध्ये मौजे वाकड सर्व्हे क्र.२१० मध्ये पार्क स्ट्रीट गृह प्रकल्प आहे. सदर गृहप्रकल्पास औंध, रावेत या रस्त्यालगत मान्यता देण्यात आलेली आहे. या प्रकल्पासाठी बांधकामाचा व्यावसायीक फायदा होण्यासाठी या ४५ मी. रस्त्याला तुम्ही परमीशन देता. तुम्ही परमीशन का देता. परमीशन देण्याचे कारण सोप आहे. आता त्याठिकाणी चार बिल्डींगचे काम चालू आहे त्याला एवढा आत्मविश्वास आहे की माझी

तिथं बिल्डींग टॉवरच्या २२ मजलीच्या हिशोबान फुटींग वगैरे केलेली आहे. त्या बिल्डरला ८०० प्लॉटचा फायदा होणार आहे. मा.महापौर साहेब, याच्यामध्ये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या २० टक्के नेत्यांचा याच्यामध्ये सहभाग आहे. सन्मा. सदस्य कोण असेल त्यांना पाच कोटी रु. देण्यात आलेले आहे. कारण मी शहर सुधारणामध्ये या गोष्टीला गेली नऊ महीने झाले विरोध करतो. विरोध असतानाही हा विषय मान्य केला आहे.

**मा.आरती चौंधे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. माझ्यावर हे आरोप करतात त्यास मी विरोध करते.

**मा.महापौर-** आरोप जर केलेतर ते सिध्द करावे लागतील. तुम्ही तुमचे शब्द माघारी घ्या.

**मा.निलेश बारणे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी माझा शब्द माघारी घेतो. शहर सुधारणा समितीमध्ये मी सदस्य आहे. माझा या गोष्टीला विरोध होता. आज आम्ही शेतकरी कुंटूबातील व्यक्ती आहोत, कस्पटे आहेत, मानकर आहेत, वाघेरे आहेत ४५ मी. ला ते रोडटच असेल. माजी सन्मा.सदस्य ते सुध्दा बिल्डर्स आहेत आणि १८ मी. रोड पार्क स्ट्रीटला गेलाततर .६५ टिडीआर आणि एफएसआय मिळणार आहे. ४५ मी. ला जर डायरेक्ट माझे शेतकरी जर रोडटच असतीलतर १.४० टिडीआर हा माझ्या शेतक-यांना भेटणार आहे आणि एफएसआय पण त्यामध्ये भेटणार आहे. मा.महापौर साहेब, माझ्या शेतक-यांना फायदा नको का. माझ्या शेतक-यांची २५ एक्कर जागा आहे. नाही म्हणलंतरी त्यांना ९ लाख रुपये फुटाचा त्यांना तोटा होईल. सभागृहाला माझी विनंती आहे की हा विषय मान्य करु नका. आमच्या शिवसेना पक्षाच्या वतीने याला विरोध नोंदवावा ही माझी विनंती, धन्यवाद.

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा अशी सूचना मी मांडते.

**मा.अरुणा भालेकर-** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनामेदन देते.

यानंतर सूचनेप्रमाणेचा ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ९०१ विषय क्रमांक - १०

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.नरवि/कावि/९/१००८/२०१६, दि.२८/०३/२०१६

२) मा.शहर सुधारणा समितीकडील ठ.क्र. ६१ दि.२१/४/२०१६

३) मा.महापालिका सभा ठ.क्र. ८६८ दि.२०/६/२०१६

विषय क्रमांक १० चा विचार पुढील सभेचे वेळी करणेत यावा.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक ११ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - ११

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.नरवि/कावि/१०/आकुर्डी/३८/२०१६ दि.११/०४/२०१६
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.८७० दि.२०/६/२०१६

विषय - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६
ना विकास विभागात पेट्रोलपंप/गॅसफिलींग स्टेशन अनुज्ञेय
करणेबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट
करणेबाबत कलम-३७ (१) अन्वये निदेश

संदर्भ- १. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे क्र. टिपीएस-
३००५/९८७/प्र.क्र.१९४/२००५/नवि-३० दि.१५/०५/२००६ चे निदेश

उपरोक्त संदर्भिय शासन निदेशाव्दारे शासनाने राज्यातील महापालिकांना ना विकास विभागात पेट्रोलपंप /गॅस फिंलिग स्टेशन अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम-३७(१) अन्वये खालील प्रमाणे निदेश दिलेले आहे.

<u>निदेश</u>

"राज्यातील महानगरपालिकेच्या विकास योजनेतील ना विकास विभागात पेट्रोलपंप /गॅस फिलिंगस्टेशन खालील अटींवर अनुज्ञेय करण्याची तरतुद संबंधित महानगरपालिकेच्याविकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

अट क्र. १. प्रस्तावित भुखंडाचे क्षेत्रफळ किमान २००० चौ. मी. असावे.

२. या भूखंडावर कमाल ०.२ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहील.

३. या भूखंडावर फक्त तळमजल्याचे बांधकाम अनुज्ञेय राहील

४. प्रस्तावित भूखंड राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग व किमान १८.०० मी. रूंद रस्त्यावर असावा.

५. केंद्र शासनाच्या पेट्रोलियम विभागाचे तसेच चीफ कंट्रोलर ऑफ

एक्स्प्लोझिव्ह यांचे संमतीपत्र आवश्यक राहील.

६. प्रचलित नियमानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच अन्य संबंधित विभागाकडील ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील. तसेच सेवा रस्ता /इमारत रेषा, नियंत्रण रेषा इत्यादी बाबतीत शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. आरबीडी-१०८१।८७१।रस्ते-७, दि. ९ मार्च २००१ व त्यांनतरची व संदर्भातील वेळोवेळी निर्गमित केलेली परीपत्रके बंधनकारक राहतील.

७. केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट अँण्ड हायवेज कडील दि. २५ सप्टेंबर, २००३। दि. १७ ऑक्टोबर, २००३ चे पत्र व त्यासोबतच्या सहपत्रातील सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

८. संबंधित महानगरपालिकेच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीतील पेट्रोलपंप /गॅस फिंलिग स्टेशनकरीताचे नियम लागू राहील."

वरील निदेशा नुसारच्या संपुर्ण तरतुदी ज्या महानगरपालिकांच्या संबंधित विकासनियंत्रण नियमावलीत समाविष्ट असतील त्या महानगरपालिका वगळता राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या संबंधित विकास नियंत्रण नियमावलीत वरील प्रमाणे बदल करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम -३७ च्या तरतुंदीचे पालन करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करावा असे निदेश दिले आहेत.उपरोक्त संदर्भिय शासन निदेशांची छायांकित प्रत मा. महानगरपालिका सभेच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ सोबत जोडली आहे.

सदर शासन निदेशा नुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ना विकास विभागात पेट्रोलपंप /गॅस फिंलिग स्टेशन अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम-३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास, तदनंतर फेरबदलाची सूचना प्रसिध्द करून हरकती व सुचना मागविणे, संबंधितांना सुनावणी देऊन हरकत व सूचना अर्जावर अंतिम निर्णय घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.राजेंद्र काटे -** मा.महापौर साहेब, मी पुढील प्रमाणे उपसूचना मांडतो- ना विकास विभागात पेट्रोलपंप / गॅस फिलींग स्टेशन बरोबरच गार्डन हॉटेल / लॉन कार्यालय यासही मान्यता देण्यात यावी.

**मा.संजय काटे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषयाची माहिती दयावी. कशासाठी हा विषय आणला त्याची माहीती दयावी.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. वि.क्र.११ या संदर्भात माहीती देण्यासाठी आदेशीत करण्यात आलेले आहे. त्या संदर्भात माहीती देऊ ईच्छितो. विकास नियंत्रण नियमावलीमध्ये आपल्या पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची जी विकास नियंत्रण नियमावली आहे त्यामध्ये ना विकास विभागात पेट्रोलपंप, गॅसपंप अनुज्ञेय करण्याच्या संदर्भात आज तरतूद नाही. तरी ती तरतूद करण्या संदर्भात शासनाने निर्देश दिलेले आहेत त्या निदेशाची आपण अंमलबजावणी करत आहोत आणि त्याच प्रथम पाऊल म्हणजे त्यासाठी महापालिकेची मान्यता अपेक्षीत आहे. हि तरतूद विकास नियंत्रण नियमावलीमध्ये जर समाविष्ट झालीतर ना विकास विभागात आपल्याला जे अत्यावश्यक वापर आहे, पेट्रोलपंप किंवा गॅसपंप सारखे ते आपल्याला अनुज्ञेय करता येईल. आज ते आपल्याला अनुज्ञेय करता येत नाही. त्यासाठी प्रस्तावित भूखंडाचे किमान क्षेत्र २ हजार चौ.मी. इतक आवश्यक असेल. त्या भूखंडावर कमाल ०.२ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय होऊ शकेल. तीथ तळमजल्याचे बांधकाम अनुज्ञेय राहील. अशाप्रकारचे जे वापर आहेत ते वापर आपल्याला राष्ट्रीय महामार्ग, राज्यमार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग व किमान १८ मी. रुंदीचे रस्ते असावे अशा रस्त्यावर ना विकास त्याठिकाणी पेट्रोलपंप अनुज्ञेय करता येईल. तरी हा विषय आम्ही महासभेपुढे सादर केलेला आहे त्यास मंजूरी मिळावी.

**मा.दत्तात्रय साने -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. याच्यामध्ये रेडझोनचा विषय आहे. ना-विकास मध्ये कुठले कुठले झोन आहेत.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विकास योजनेमध्ये रहिवास विभागाचा हिरव्या रंगाने दार्शविलेला विभाग असतो. डीपीवर ना विकास असणारे क्षेत्र.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. अटि, शर्ती शासनाच्या ज्या आहेत तशाच आहेत का बदल करण्याचा अधिकार महापालिका सभेला आहे.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शासनाने जे पाठविले त्याप्रमाणे ठेवलेले आहे. महापालिका सभेला बदल करण्याचा अधिकार आहे. तसे शासनाला पत्र पाठविता येईल. हरित पट्टयात वेगळ वैशिष्ठये आहे हरित पट्टयात नदी किंवा मोठया नाल्या सारखे प्रवाह असतील त्याचा शेतकी झोन असते त्यासाठी हरितपट्टा असतो आणि ग्रीन झोन हा मोठया विस्तृत स्वरुपाचा आणा तो नैसर्गीक नाला किंवा नदीला लागूनच असावा अस त्याच काही बंधन नाही.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या शहरातून पवना, मुळा, इंद्रायणी अशा तीन नदया जातात. ब्ल्यू लाईनच्या पलीकडे जावुन सुध्दा काही ठिकाणी रेड पट्टे आहेत ग्रीन झोन आहे त्याला लागून मोठमोठाले रस्ते आहेत. त्याठिकाणी जर मागणी झालीतर तुम्ही काय करणार.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. त्याठिकाणी मिळू शकेल. आपण जे म्हणतात पलीकडे मोठया प्रमाणात जर नाविकास विभाग असेलतर हा वापर अनुज्ञेय होईल.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. काही ठिकाणी ५००-७०० मी. वर ब्ल्यू लाईन आहे त्यामध्ये ग्रीन झोन असेलतर या नियमाचा फायदा घेता येईल का. संबंधित शेतक-यानी म्हणा किंवा एखादया डेव्हलपरने म्हणा जर या गॅस फिलींग सेंटरला किंवा पेट्रोल पंपाला तशाप्रकारची परवानगी मागीतलीतर तशी उपसूचना आम्ही देवू का.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. ग्रीन बेल्ट वेगळा आणि नो डेव्हलपमेंट झोन वेगळा.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्या शहरातील केवळ नाविकास झोन एवढाच भाग यामध्ये न घेता या विषयासाठी मी उपसूचना देणार आहे. याच्यामध्ये २ हजार चौ.मी. असा उल्लेख आहे. या साईजमध्ये काही फेरबदल करता येतो का.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्याला बदल करता येतो पण शासन ते मान्य करेल का नाही हे आपल्याला सांगता येणार नाही.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता तुम्हांला पेट्रोलपंप आणि गॅस फिलींग सेंटर आहेत याचा मिनीमम ऐरीया त्या कंपनी ठरवतातनां, शासन कोण ठरवणार. ते केंद्रशासन ठरवते. केंद्रशासनाने या लोकांना ज्याचे त्याचे अधिकार दिलेले आहेत. मिनीमम जर खुप लोकवस्ती असेलतर अगदी पाच ते सात गुंठयात पण तुम्हांला पेट्रोलपंप किंवा गॅस फिलींग सेंटर करता येतात. नुसत गॅस फिलींग सेंटर जर असेलतर ते कॉम्पॅक्ट जागेत पण करता येतं. त्यामुळे हे २ हजार चौ.मी म्हणजे ते २० हजार

स्क्वे.फुट झालं, २० हजार स्क्वे.फुट म्हणजे खुप मोठा प्लॉट झाला. अर्धा एक्कर प्लॉट झाला. अर्ध्या एक्कर प्लॉटची ही सिमा कमी करुन मिनीमम १ हजार स्क्वे.मी.चा प्लॉट असावा.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आपल्याला सुचना करायला हरकत नाही. शासन त्याच्यावर काय निर्णय घेईल ते आपल्याला सांगता येणार नाही.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मी पुढीलप्रमाणे उपसूचना मांडतो**--** पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये पेट्रोलपंप व गॅस फिलींग स्टेशन अनुज्ञेय व्हावे व त्या करिता ना विकास विभागासह किमान क्षेत्रफळ १००० चौ.मी. ( एक हजार चौरस मीटर) असावे तसेच ग्रीन बेल्ट, ग्रीन झोन या विभागात देखील योग्य सुरक्षित जागा सोडून वरील वापराकरीता तसेच वरील विभागांमध्ये खुल्या वापराचे कार्यालय, गार्डन रेस्टॉरंट अशा स्वरुपाचे वापरास व याकरीता किमान जागेचे क्षेत्रफळ १००० चौरस मीटर ते २०,००० चौरस मीटर पर्यंतचे (म्हणजेच दोन एकर क्षेत्रफळ) क्षेत्रफळाकरीता मान्यता देण्यात यावी.

**मा.शत्रुघ्न काटे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.बाबासाहेब धुमाळ -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा विषय गेल्या वेळेस आपल्याकडे आलेला होता. मी सांगीतले होते याच्यामध्ये अजून नॉर्म्स आहेत. पेट्रोल पंप कंपनीचे नॉर्म्स वेगळे आहेत ते यामध्ये टाकलेले नाहीत. त्याच्या अटि व शर्ती वेगळया आहेत. आपण दिलेले २० हजार स्क्वे.फुट म्हणजे २० गुंठे जागा झाली. कमीत कमी ११० फुट फ्रंटेज पाहीजे ते आपण टाकलेले नाही, ते टाकले पाहीजे. त्या शेजारी मस्जिद, मंदीर ही जागा पंपासाठी अव्हेलेबल असली पाहीजे. शेजारी मस्जिद, मंदीर कुठल्याही अवस्थेत असायला नाही पाहीजे. समजा २० गुंठे जागा घेतली तर त्याची तुम्ही चतुसिमा काय ठरविणार. जागा ताब्यात पाहीजे. चतुसिमा डिक्लेअर करायला पाहीजे.

**मा.संजय काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. राजेंद्र काटे यांनी उपसूचना दिलेली आहे या झोनमध्ये पेट्रोलपंप आहे त्याठिकाणी हॉटेल व्यावसायाला सुध्दा अलौड होईल का. ग्रीनबेल्ट नदीच्या कडेला जो असतो त्याच्यामध्ये कुठलही अलौड होणार नाही. उपसूचना मांडलेली आहे ती योग्य आहे का हे सांगावे.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. नाविकास झोन शहरामध्ये कुठे आहे असे एखादे उदाहरण दयावे.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. च-होलीमध्ये, बो-हाडेवाडीमध्ये फार मोठया प्रमाणात नाविकास झोन पट्टेची पट्टे आहेत म्हणजे

शंभर, दोनशे, पाचशे एक्करचे पट्टेची पट्टे आहेत. अशा ठिकाणी अनुज्ञेय होईल. विकास योजनेमध्ये ज्याप्रमाणे रहिवास विभाग, इन्डस्ट्रीअल विभाग असतो त्याप्रमाणे नाविकास विभाग केलेला आहे.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकाल्या आहेत.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. शासनाकडून जे काही निर्देश आलेले आहेत त्याप्रमाणे विषय आलेला आहे. परंतु या महापालिका सभेला त्याच्यामध्ये काही सुचना करायची असेलतर शासनाकडे तसे पाठवू शकतो का. नाविकास क्षेत्र जे आहे त्याचे डेफिनेशन सांगा. त्याच्यामध्ये कुठला भाग समाविष्ट होतो. नाविकास क्षेत्र म्हणजे काय त्याच्यामध्ये कुठला भाग समाविष्ट होतो. आपल्या ब्ल्यू लाईनमध्ये नदी बाजूचा जो भाग आहे तो आपण नाविकास क्षेत्र म्हणून समजतो. त्याच्यामध्ये तो समाविष्ट होतो का.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. हा जो नाविकास भाग आहे तो हिरव्या रंगाने दाखवलेले जे पट्टे आहेत, जसं ब्ल्यू लाईनने दाखवलेला असतो सलग हिरव्या रंगाचे जे पट्टे आहेत ते मोशीमध्ये भरपूर पट्टे आहेत

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक – ९०२ विषय क्रमांक - ११

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे
जा.क्र.नरवि/कावि/१०/आकुर्डी/३८/२०१६ दि.११/०४/२०१६
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.८७० दि.२०/६/२०१६

विषय - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६
ना विकास विभागात पेट्रोलपंप/गॅसफिलींग स्टेशन अनुज्ञेय
करणेबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट
करणेबाबत कलम-३७ (१) अन्वये निदेश

संदर्भ- १. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग यांचे क्र. टिपीएस-
३००५/९८७/प्र.क्र.१९४/२००५/नवि-३० दि.१५/०५/२००६ चे निदेश

उपरोक्त संदर्भिय शासन निदेशाव्दारे शासनाने राज्यातील महापालिकांना ना विकास विभागात पेट्रोलपंप /गॅस फिंलिग स्टेशन अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम-३७(१) अन्वये खालील प्रमाणे निदेश दिलेले आहे.

<u>निदेश</u>

"राज्यातील महानगरपालिकेच्या विकास योजनेतील ना विकास विभागात पेट्रोलपंप /गॅस फिलिंगस्टेशन खालील अटींवर अनुज्ञेय करण्याची तरतुद संबंधित महानगरपालिकेच्याविकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

अट क्र. १. प्रस्तावित भुखंडाचे क्षेत्रफळ किमान २००० चौ. मी. असावे.

२. या भूखंडावर कमाल ०.२ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहील.

३. या भूखंडावर फक्त तळमजल्याचे बांधकाम अनुज्ञेय राहील.

४. प्रस्तावित भूखंड राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग व किमान १८.०० मी. रूंद रस्त्यावर असावा.

५. केंद्र शासनाच्या पेट्रोलियम विभागाचे तसेच चीफ कंट्रोलर ऑफ एक्स्प्लोझिव्ह यांचे संमतीपत्र आवश्यक राहील.

६. प्रचलित नियमानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच अन्य संबंधित विभागाकडील ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील. तसेच सेवा रस्ता /इमारत रेषा, नियंत्रण रेषा इत्यादी बाबतीत शासन निर्णय, सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. आरबीडी-१०८१।८७१।रस्ते-७, दि. ९ मार्च २००१ व त्यांनतरची व संदर्भातील वेळोवेळी निर्गमित केलेली परीपत्रके बंधनकारक राहतील.

७. केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट अँण्ड हायवेज कडील दि. २५ सप्टेंबर, २००३। दि. १७ ऑक्टोबर, २००३ चे पत्र व त्यासोबतच्या सहपत्रातील सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

८. संबंधित महानगरपालिकेच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीतील पेट्रोलपंप /गॅस फिंलिग स्टेशनकरीताचे नियम लागू राहील."

वरील निदेशा नुसारच्या संपुर्ण तरतुदी ज्या महानगरपालिकांच्या संबंधित विकासनियंत्रण नियमावलीत समाविष्ट असतील त्या महानगरपालिका वगळता राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या संबंधित विकास नियंत्रण नियमावलीत वरील प्रमाणे बदल करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम -३७ च्या तरतुंदीचे पालन करून फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करावा असे निदेश दिले आहेत.उपरोक्त संदर्भिय शासन निदेशांची छायांकित प्रत मा. महानगरपालिका सभेच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ सोबत जोडली आहे.

सदर शासन निदेशा नुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या ना विकास विभागात पेट्रोलपंप /गॅस फिंलिग स्टेशन अनुज्ञेय करणेबाबतची तरतुद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेबाबत महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६, कलम-३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास , तदनंतर फेरबदलाची सूचना प्रसिध्द करून हरकती व सुचना मागविणे, संबंधितांना सुनावणी देऊन हरकत व सूचना अर्जावर अंतिम निर्णय घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्यास आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे. तसेच ना विकास विभागात पेट्रोलपंप / गॅस फिलींग स्टेशन बरोबरच गार्डन हॉटेल / लॉन कार्यालय यासही मान्यता देण्यात येत आहे. तसेच पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये पेट्रोलपंप व गॅस फिलींग स्टेशन अनुज्ञेय व्हावे व त्या करिता ना विकास विभागासह किमान क्षेत्रफळ १००० चौ.मी. ( एक हजार चौरस मीटर) असावे तसेच ग्रीन बेल्ट, ग्रीन झोन या विभागात देखील योग्य सुरक्षित जागा सोडून वरील वापराकरीता तसेच वरील विभागांमध्ये खुल्या वापराचे कार्यालय, गार्डन रेस्टॉरंट अशा स्वरुपाचे वापरास व याकरीता किमान जागेचे क्षेत्रफळ १००० चौरस मीटर ते २०,००० चौरस मीटर पर्यंतचे (म्हणजेच दोन एकर क्षेत्रफळ) क्षेत्रफळाकरीता मान्यता देण्यात येत आहे.

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे** - मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १२ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

विषय क्रमांक - १२

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/आकुर्डी/५०/२०१६ दि.२८/०४/२०१६
२) मा.महापालिका सभा ठ.क्र.८७४ दि.२०/६/२०१६

विषय - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ १५४ सह कलम ३७ (१) अन्वये निदेश विकास नियंत्रण नियमावलीत, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर करणेबाबत तरतूद समाविष्ट करणेबाबत.

संदर्भ- १. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग आदेश क्र. टिपीएस-२४१३/नाशिक-१९/प्र.क्र.२४५/२०१३/नवि-९ दि.१५.०१.२०१६

उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व नागपूर महानगरपालिका वगळता उर्वरित सर्व महानगरपालिकांना विकास नियंत्रणनियमावलीत, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर करणेबाबत तरतुद समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ सह कलम ३७ (१) अन्वये खालील प्रमाणे निदेश दिले आहेत.

**<u>निदेश-</u>**

राज्यातील, बृहन्मुंबई महानगरपालिका व नागपूर महानगरपालिका वगळता, उर्वरित सर्व महानगरपालिकांना, त्यांच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीत, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापरासंबंधीची, सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केल्यानुसारची तरतुद समाविष्ट करणेबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून यथायोग्य प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करावा. सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून कलम १५४ च्या तरतुदी लागू होतील

सोबत संदर्भिय शासन आदेश व त्या सोबतच्या परिशिष्टाची छायाप्रत मा. महापालिका सभेच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ जोडली आहे. सदर आदेश सोबतच्या परिशिष्टात विषयांकित बाबत खालील प्रमाणे तरतूद नमूद आहे.

Regulations for Waste Water Treatment & Recycling :

**A. TYPES OF WASTE WATER**

1) **Black Water**: It means waste water from W.C. urinals and M.S.W.

2) **Grey Water:**It means waste water from bathrooms, sinks and wash areas

3) Apart from residential waste water, waste water generated from industrial, medical. commercial usage shall also be treated as per guidelines given by the Pollution Control Board.

**B**. **APPLICABILITY**

These regulations shall be applicable to all developments/ redevelopments, part developments on plots having an area of 4,000 sq. m. or more as well those mentioned under (C-2) to (C-6) shall have the provision for treatment, recycling and reuse of waste water. The applicant shall along with his application for obtaining necessary layout approval/building permission shall submit a plan showing the location of waste water treatment plant, furnishing details of calculations, references, implementation. etc. This plan shall accompany with the applicant's commitment to monitor the system periodically from the date of occupation of the respective building.

**C**. **REGULATIONS**

**(C-1) For Layout approval / building permission**

I. In case of residential layouts, area admeasuring 4000 sq. m. (1 acre) or more, in addition to the open space prescribed in the bye-laws, a separate space for waste water treatment & recycling plant should be earmarked in the layout.

II. The recycled water shall be used for gardening, car washing, toilet flushing, irrigation, etc and in no case for drinking, bathing, washing utensils, clothes, etc

III. On the layout plan, all chambers, plumbing lines which are a part of waste water treatment should be marked in different colour while submitting the layout for approval to the concerned Municipal Corporation/ Council/ Approving authority.

IV. Only provision for basic civil work and required machinery will be proposed by the concerned Municipal Corporaion/Council. Other than this provision for additional machinery, pipes, tanks, landscape should be provided by owner developer at his own cost.

V. A clause must be included by the owner/developer in the purchase agreement that the purchaser, owner of the premises /organization or society of the purchasers shall ensure that.

a. The recycled water is tested every six months either in Municipal Laboratory or in the laboratory approved by Municipal Corporation or by State Government and the result of which shall be made accessible to the competent.

Authority/ EHO of the respective Ward Office.

b. Any recommendation from testing laboratory for any form of

corrective measures that are needed to be adopted shall be compiled Copy of any suchrecommendation and necessary action taken shall also be sent by the testing laboratories to the Competent Authority / EHO of respective wards

**(C-2) Group Housing / Apartment Building**

I. In case of group housing if the built-up area is 2000 sq. m. or above or if consumption of water is 20,000 lit/day or more, or if a multi-storied building which has 50 tenements or more, then waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1) should be constructed.

**(C-3) Educational, Industrial, Commercial. Government, Semi-government organization hotels, lodging, etc.**

For all buildings in this category havinga build-up area of 1500 sq. m. or More and if water consumption is 20,000 lit/day or more, then provision for wastewater treatment and recycling plant as mentioned in (C-1) is mandatory.

**(C-4) Hospitals**

All hospitals having 40 or more beds must provide a waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1).

**(C-5) Vehicle Servicing Garages**

All vehicle servicing garages shall ensure that the waste water generated through washing of vehicles is treated and recycled back for the same use as mentioned in (C-1)

**(C-6) Other hazardous uses**

All other establishments / buildings where chances of waste water generated containing harmful chemicals, toxins are likely and where such water cannot be directly led into municipal sewers, the concerned competent authority may direct the owners, users of such establishments, buildings to treat their waste water as per the directions laid in (C-1)

**D. PENALTY**

i Any owner/developer/organization /society violating the provisions of these- bye-laws, shall be fined Rs. 2500 on the day of detection and if the violation continues, than shall be fined Rs.100 for every day as concrete action after written notice from the concerned competent authority.

ii. If the results of test as mentioned in (C-1 i. a. b.) are not satisfactory, then the concerned owner/developer/organization/society shall be charged a penalty of Rs. 300/- per day till the necessary preventive action is taken and disconnection of water connection also.

उपरोक्त शासन निदेशा नुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर तरतुद समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास तदनंतर फेरबदलाची सूचना प्रसिध्द करून हरकती व सुचना मागविणे, संबंधितांना सुनावणी देऊन हरकत व सूचना अर्जावर अंतिम निर्णय घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्यास मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

**मा.महापौर -** याची माहिती दयावी.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. विकास नियंत्रण नियमावली पिंपरी चिंचवड शहराची आहे त्यामध्ये सांडपाणी प्रक्रिया व पुर्नवापर करणेची तरतूद सध्या जी आहे ती तरतूद नियम क्रमांक १५.३ ही सध्याची तरतूद फार त्रोटक स्वरुपाची आहे. त्यामध्ये फक्त एक एक्कर पेक्षा मोठया क्षेत्राचे विकास कार्य असेल त्याठिकाणी फक्त रिसायकलींग सिस्टीम म्हणजे सांडपाणी जे जनरेट होते त्या सोसायटीमध्ये त्यासाठी रिसायकलींग सिस्टीम बसविणे एवढयापुरती मर्यादीत तरतूद आहे. त्याऐवजी आता शासनाने सविस्तर नियमावली तयार केलेली आहे. त्यामध्ये त्यांनी ग्रूप हौसिंग असेलतर २ हजार स्क्वे.मी. क्षेत्र किंवा एक एक्कर पेक्षा मोठा प्लॉट असेलतर तिथं रिसायकलींग सिस्टीम अनिवार्य केलेले आहे किंवा कमर्शियल, इन्डस्ट्रीअल तिथ १५०० पेक्षा मोठे क्षेत्र असेलतर त्याठिकाणी सांडपाण्याचा पुनर्वापर करावा असे आहे किंवा हॉस्पिटल असतील ४० बेड पेक्षा मोठे हॉस्पिटल असतीलतर त्याठिकाणी सुध्दा सांडपाणी त्याचा पुर्नवापर करणे शासनाने

अनिवार्य केलेल आहे. त्या संदर्भातील सविस्तर तरतूद आता आपण या नियमाप्रमाणे करत आहोत. शासनाने त्यावर काही बंधन घातलेले आहेत किंवा अशाप्रकारे सोसायटीत जर रिसायकलींग केल नाही आणि तिथ जाऊन आपल्या वॉर्ड ऑफिसरने तपासणी केलीतर आणि रिसायकलींग केले नाहीतर पेनॉल्टी करता येईल. पॅनॉल्टीची तरतूद सुध्दा केलेली आहे. प्रत्येक सहा महीन्याचे ट्रिट वॉटरची तपासणी करावी ते चांगले नसेलतर त्यांना आपण पेनॉल्टी करु शकतो. त्याला आपण बंधनकारक करु शकतो. पुर्वी एक एक्कर पेक्षा मोठ क्षेत्र असेलतर त्यालाच फक्त अनिवार्य केलेल होत आता वापराप्रमाणे ऐरीया सुध्दा त्यांनी कामी केलेला आहे. म्हणजे २ हजार पेक्षा मोठे हौसिंग प्रकल्प असतीलतर अशाठिकाणी केलेले आहे किंवा हॉस्पिटलसारखे वापर असतील, छोटा प्लॉट आहे पण ४० पेक्षा जास्त बेड आहेततर त्यांनी सुध्दा ते वॉटर रिसायकलींग करणे अनिवार्य केलेले आहे.

**मा.सुरेश म्हेत्रे-** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा. सभागृह. याच्यामध्ये असे लिहीले आहे की, For all buildings in this category havinga build-up area of 1500 sq. m. or More and if water consumption is 20,000 lit/day or more, then provision for wastewater treatment and recycling plant as mentioned in (C-1) is mandatory. म्हणजे वापरावर पण केल आहे.

**मा.ठाकूर (उपसंचालक नगररचना) -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. सी-३ मध्ये एज्युकेशनल, इन्डस्ट्रीअल, कमर्शिअल, गव्हर्मेंट, सेमी गव्हर्मेंट,ऑरगनायझेशन, हॉटेल्स, लॉजींग इ. हे वापर आहेत. पाण्याचा वापर २० हजार पेक्षा जास्त असेल तरी अनिवार्य आहे.

**मा.वसंत लोंढे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. नाविकास झोनमध्ये ट्रिटमेंट प्लॅन करता येतो का. एमआयडीसीमध्ये कुठलेही पाण्याचे ट्रिटमेंट प्लॅन करत नाहीत संपुर्ण पाणी नाल्यामध्ये सोडले जाते. केमिकलचे लाल पाणी नदीला जाते ते पाणी शुध्द करुन सोडले पाहीजे. ते पाणी केमिकलचे पाणी आहे त्यामुळे नदीचे पाणी दुषित होते व मासे मरतात. एमआयडीसीने हे पाणी ट्रिटमेंट करुन सोडल पाहीजे. सर्व केमीकलच पाणी आहे.

**मा.योगेश बहल -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता नाना यांच्या म्हणण्याप्रमाणे रास्त आणि बरोबर आहे. आता ठाकूर साहेबांनी त्याच वाचन केले. मला वाटते बिल्डींग परमीशन मध्ये ऑलरेडी हे अंमलबजावणी होते. आमचे असे म्हणणे आहे की शासनाने निर्देश दिलेले आहेत त्याप्रमाणे बिल्डर असेल, हॉस्पिटल असेल, फॅक्टरी असेल त्यांना बंधनकारक आहे त्याला मान्यता देऊ चांगला विषय आहे. परंतु नानांच असं म्हणन आहे की आपल्याकडे एमआयडीसी आहे प्लॅनिंग ऑथोरेटी म्हणून महापालिका म्हणून आपल त्यांच्यावर काही नियंत्रण नाही. म्हणजे हे पथ्ये आपण सगळे पाळायचे आणि एमआयडीसीने मात्र त्यांच सर्व घाणेरड पाणी सरळ आपल्या नाल्यामध्ये सोडायचे, नदीमध्ये सोडायचे आणि सगळे

प्रदुषित करायचं. मग आपण हे करुन त्याचा फायदा काय. सगळे पथ्ये आम्ही पाळायचे, सगळे नियम आम्ही करायचे, लाखो रुपये डेव्हलपमेंट चार्ज भरायचे आणि शहर चांगले व्हावे, प्रदुषणमुक्त व्हावं याची सर्व काळजी आपण घ्यायची. पण मात्र आपल्याकडे असलेली एमआयडीसी, जेवढे कारखाने आपल्या क्षेत्रामध्ये आहेत त्याच प्रदुषीत पाणी सर्व आपल्या नदीला सोडले जाते, त्याच्यामुळे सगळे प्रदुषण होतं त्याच्यावर काय नियंत्रण आहे मग आपण हे नियम पाळून काय फायदा आहे. हा प्रश्न नानांचा आहे त्याला माझे अनुमोदन आहे. माझा प्रश्न असा आहे की आता जो विषय पटलावर आहे त्याच्या अनुषंगीक ऑलरेडी बिल्डींग परमिशन नॉर्म्सचा फॉलो करते. त्याच्यामध्ये त्यांनी सांगीतले की किती स्क्वेअर ऐरीया पाहीजे. किती पाण्याचा वापर असला पाहीजे. ते रिसायकलींग करुन ते सोडायचे मग ही सगळी काळजी आपण आपल्या शहरा पुरती घेतो, बिल्डरला करतो, हॉस्पिटलला करतो, हॉटेलला करतो, इन्डस्ट्रीअलला करतो. परंतु जे आपल्याकडे प्लॅनिंगला येतात त्यांना आपण टाकतो. पण जी लोक आपल्या हद्दीमध्ये आहेत, आपल्या परिसरात आहेत परंतु त्यांचे एमआयडीसीमध्ये कारखाने आहेत त्यांना मात्र हे लागू होत नाही आणि ते मात्र सरळ सरळ घाणेरड पाणी, दुषित पाणी नाल्याव्दारे नदीला सोडतात म्हणजे यात सर्व काळजी आपण घ्यायची आणि हे सर्व पथ्ये आपण पाळायचे मात्र ते काहीच पाळत नाहीत त्यामुळे ही सर्व नदी घाण होते आणि शहर प्रदूषित होतं आम्ही पथ्ये पाळायचे आणि त्यांनी मात्र सरळ सरळ सगळे नियम तोडायचे. त्यांच्यावर हे बंधन कोण घालणार.

**मा.प्रशांत शितोळे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. मुळातच आपले शहर एकमेव शहर महाराष्ट्रातील आहे की आपली जी कपॅसिटी आहे त्याच्यानुसार आवश्यकता असलेले एसटीपी प्लॅन्ट आपल्याकडे आहेत. त्याचा वापर आपण करत नाहीत ते आपले दुर्दैव आहे. पर्यावरण विभागाकडे हा विषय आहे. आज महापालिकेला जेवढे पर्यावरणाच्या बाबतीत बंधन शासनाने, केंद्रशासनाने, हरित लवादाने घालून दिलेले आहेत त्या लोकांचे बंधन पाळायचा आपण प्रयत्न करतो. एका बाजुला पवना, मुळा, इंद्रायणीच्या काठाला असलेले आपले हे चौदा-पंधरा एसटीपी प्लॅण्ट आहेत. कासारवाडीचा प्लॅण्ट १२० एमएलडीचा आहे आज त्या प्लॅण्टमध्ये १०० टक्के फ्लोने पाणी येत नाही. म्हणजे त्याची कपॅसिटी जास्त आहे पण तिथ पाणी जात नाही. आपली यंत्रणा असूनही वापरत नाही. हे जर नियम आपल्याकडे आलेतर काय परिस्थिती राहील हे मला माहिती नाही, आपण व्यावसायीकाला जरुर नियम लावा. मागच्या दिड दोन वर्षापुर्वी घडलेली दुर्घटना आहे. एका कर्मचा-यांचा गुदमरुन मृत्यू झाला सोसायटीमध्ये सुध्दा झालेला आहे. जेव्हा आपण या व्यावसायीकांना बंधन लावणार आहोत, या बंधनामध्ये यांच्यावर नियंत्रण कोणी ठेवते का. एका बाजुला आपल्या शहरामध्ये प्राधिकरण आहे, दुस-या बाजुला एमआयडीसी आहे, तीस-या बाजुला महापालिका आहे. या एमआयडीसीवर आपले

काहीच कंट्रोल नाही. आपण फक्त टॅक्सचे धनी असतो त्यामुळे माझी तुम्हांला विनंती आहे की ज्याच्यामुळे नदी प्रदुषण सगळयात जास्त होते, केमिकल सोडल जातं. आपल्याकड काही काही उदयोग असे आहेत की त्यांचे घाणेरडे पाणी आपल्या प्लॅण्टच्या चेंबरमध्ये आणून सोडणारे महाभाग एमआयडीसीमध्ये आहेत त्यांच्यावर काय ॲक्शन घेणार त्यांना कुठली बंधन लावणार आहेत. आपण पेपरमध्ये सारखच वाचतो की नदीमध्ये प्रदूषण झालं, नदीमध्ये काळ पाणी झालं, मासे मरतात हा महापालिकेचा दोष नाही. खाजगी व्यावसायीकाला सुध्दा कुठेतरी बंधन घालत असतो त्याप्रमाणे उदयोजकाला सुध्दा चांगली नियमावली असली पाहीजे. त्यासाठी निर्णय घेतला पाहीजे. आम्ही मंजूरी दिली नाहीतर तुम्ही नियम लावणार नाहीत का. मग आपल्या शहराच्या नदया काही गटार म्हणून वाहतील का. तुम्हांला लावणे भाग आहे. तुम्हांला अशाप्रकारचे बंधन, अशाप्रकारची नियमावली असणे, शहरात सांडपाणी प्रक्रीया केलेले सोडणे हे नियम आहेत हे आम्ही कशाला सांगायला पाहीजे. दुस-या बाजूला शहरात प्रत्यक्षात जागेवर काय परिस्थिती हे बघणे आपले काम आहे. या सर्व गोष्टी लक्षात घ्याव्यात. इन्डस्ट्रीअल ऐरीयामध्ये सुध्दा काय भूमिका राहील याबाबतीत सुध्दा निश्चित नियमावली आपल्या समोर आली पाहीजे. हा विषय होत असताना एमआयडीसीसाठी विशेष यंत्रणा करण्यासाठीची गरज आपल्या महापालिकेला आहे त्यासाठी या विषयाला माझी मंजूरी आहे.

**मा.संजय काटे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता नानांनी विषय मांडला. योगेश भाईनी त्याला अनुमोदन दिलं. त्याचप्रमाणे त्यांनी सांगीतल की आपण खाजगी लोकांना म्हणजे जे बिल्डर्स असेल, दवाखाना असेल, मोठमोठया सोसायटी यांना ऑलरेडी आपण हे नॉर्म्स प्रमाणे देतो. त्याचप्रमाणे आपण जर खाजगी लोकांना करतो तर आपल्या महापालिकेची जबाबदारी नाही का की माझ्या बोपखेल गावामध्ये एसटीपी प्लॅण्ट नाही. मैलामिश्रीत सांडपाणी डायरेक्ट नदीला सोडल जातं. महापालिकेनी पहीले स्वत: नियम पाळावेत आणि नंतर इतरांना बंधन घालण्याचा विचार करावा. आपल्याला अधिकार नाही दुस-याना बोलायचा. महापालिकेनी सगळे एसटीपी प्लॅण्ट चालू केले पाहीजे, धन्यवाद.

**मा.तानाजी खाडे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आता माहिती दिलेली आहे. नानांचा प्रश्न असा आहे की कंपनीचे जे घाण पाणी नदीला येते. त्यांनी त्या पाण्याच रिसायकलींग करायचे आहे. ते त्यांच्याकडून होत नाही. त्याच्यावर पर्यावरण कमिटी काम करते त्याच्यावरती केंद्र सरकारने एक जैवीक कमिटी नेमलेली आहे. प्रत्येक शहरात महापालिका आहे त्याठिकाणी कमिटी नेमलेली आहे. महापालिकेनी ही सात सभासदाची समिती नेमलेली आहे. ही जैविक समिती नेमलेली असताना देखील कंपनीकडून घाण पाणी नदीला जाते त्याच्यावर चौकशी करायची म्हणलेतर त्याठिकाणी कुलकर्णी साहेब आहेत ते सरळ म्हणतात की आपला संबंध नाही. कंपनीवर कारवाई करण्याचा आपल्याला अधिकार नाही. शासन सांगते हे नियम

झाले पाहीजेत हे आपण महापालिकेनी करायचे आणि कंपनीने काय करायचे. धनंजय आल्हाट मागच्यावेळेस जलपर्णी घालून आलेले होते. पाणी घाण होते त्याच्यावर काही कायदा केला पाहीजे. त्यांच्यावर कारवाई केली पाहीजे ती कारवाई करायची म्हणलेतर आपल्याला अधिकार नाहीत. आयुक्त साहेब आपल्या विषयपत्रीकेवरील १२ नंबरचा विषय मुंबई प्रां.मनपा, नागपूर हे वाचत नाही पण येथील जे पाणी आहे ते रिसायकलींग करुन आपण वापरायचे आहे. आज पर्यावरणा संदर्भात माहीती घ्यायची झालीतर केंद्रशासनाने जैविक कमिटी स्थापन केलीली आहे. आपल्या सभागृहानेही त्याला मान्यता दिलेली आहे. महापालिकेमध्ये त्यांना ऑफीस दिलेले आहेत. एसी आहे, चेअरमनला गाडी सुध्दा आहे. या विषयावर निर्णय घ्यायचा, काम करायच म्हणलेतर अधिकारीच नाहीत. जैविक कमिटीवर सदस्य नेमलेले आहेत. काम करायला अधिकारी आंग काढून घेतात, आमचा काही संबंध येत नाही काम काय करायचे. पाणी दुषित होत चाललेले आहे. कंपनी नदीला घाण पाणी सोडतात नदी दुषित होते. जलपर्णी घालून काही नगरसेवक येथे येऊन निषेध व्यक्त करतात. घाण पाणी सोडतात त्यांच्यावर कारवाई करत नाहीत. राज्य सरकार, केंद्र सरकार काही विषय आपल्याकडे पाठविणार आपण त्याला मंजूरी देतो त्याबद्दल दुमत नाही, आपली महापालिका सुध्दा त्याला मंजूरी देणार. पण पुढे काय करणार. आज पर्यावरण, जैविक कमिटी आहे तरी नदी प्रदुषीत होत चाललेली आहे, मासे मरतात, पक्षी मरतात, नदी प्रदुषीत होत चाललेली आहे. या सगळया विषया संदर्भात कुठलच नियोजन नाही. उदया काय म्हणणार कमिटी केली होती कमिटी काय झोपा काढत होती का, उदया आलं कुठ सदस्यांवर मग अधिकारी काही झोपा काढतात का. त्यांना काहीतरी अधिकार दयावेत. एवढ बोलून माझे दोन शब्द संपवितो, धन्यवाद.

**मा.वसंत लोंढे -** मा.महापौर साहेब,, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. कंपनीचे नाव ईंजिनीअरींग कंपनी म्हणून असते पण प्रत्यक्षात आतमध्ये केमीकल फॅक्टरी चाललेली असते. इलेक्ट्रीक कंपनी असते त्याठिकाणी केमीकल असते. नाव वेगळ आणि प्रॉडक्शन वेगळ असतं. मी कुलकर्णी यांना घेवुन गेलो होतो अधिकार नाहीत म्हणतात. हिनोदय कंपनीमध्ये घेवून गेलो होतो, सगळया केमीकल फॅक्टरीच पाणी नाल्यामध्ये सोडलेल आहे. नाव वेगळे देतात परंतु प्रत्यक्षात प्रॉडक्शन वेगळे काढतात याच्याकडे लक्ष दयावे.

**मा.सुरेश म्हेत्रे -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. यामध्ये येथून मागे इन्डस्ट्रीअल झालेल्या आहेत किंवा महापालिकेचा प्लॅण्ट आहे त्याचा समावेश यात करावा. यामध्ये असे लिहीले आहे की, If the results of test as mentioned in (C-1 i. a. b.) are not satisfactory, then the concerned owner/developer/organization/society shall be charged a penalty of Rs. 300/- per day till the necessary preventive action is taken and disconnection of water connection also. आता नानांनी सांगीतले इलेक्ट्रीक ईंजिनीअरींग कंपनी आहेत

त्याठिकाणी केमीकलच काम चालतं. हरकती व सूचना या मागविणार आहोत. हा पुढचा विषय आहे. या पध्दतीने करावे असे म्हणणे आहे.

**मा.धनंजय आल्हाट -** मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. या विषया संदर्भात चांगली चर्चा झालेली आहे. नानांनी विषय उपस्थित केला. हा विषय पुर्णपणे बिल्डींग परमीशनचा जरी असलातरी शेवटी पर्यावरणाशी संबंधित आहे. त्याच्यामुळे संजय कुलकर्णीचा विषय निघाला की सगळे सदस्य तुटून पडतात आणि एकही संधी त्याठिकाणी सोडत नाहीत. एमआयडीसी हद्दीतील परवानगी दिलेली असलीतरी त्याच्यामधुन जाणार दुषीत रसायनयुक्त पाणी आहे त्याच्यामध्ये जैव विवीधता म्हणजे पाण्यामधली सर्व जीवश्रृष्टी तीच संरक्षण म्हणजे पर्यावरणाच संतुलन आणि आता तानाजीने याठिकाणी विषय मांडला मागच्या वेळेस ही कमिटी आयुक्तांकडे गेली आणि आमचे अधिकार काय आहेत, परदेशी साहेब असताना हे विचारले त्यावेळेला संजय कुलकर्णी महाशय निर्भीड, मी यांना निर्भीड का म्हणतो की, निर्भीड पत्रकार असतात, निर्भीड नेते असतात तसे निर्भींड नाही मग ते कितीही आरोप झालेतरी अजीबात घाबरायचे  नाही आसल निर्भीड म्हणजे संजय कुलकर्णी. खरंतर या नदीचे जे प्रदूषण आहे ते सगळे करणं आपल्या हातामध्ये होतं. या सगळया कंपन्या की जे रसायनयुक्त पाणी त्यामध्ये जीवश्रृष्टी का बनते सगळयात जास्ती विषारी रसायनमिश्रीत झाल की त्याच्यामध्ये जे काही वनस्पती असतील किंवा जे काही जीव जंतू असतात की ते पाण्यामध्ये वाढतात त्याला आपण जैवविवीधता म्हणतो ते त्याठिकाणी मृत होतात. याला सर्वात मोठ कारणजर काय असेलतर जे कंपनीचे रसायनमिश्रीत पाणी त्यामध्ये जाते आणि हे होते. मी सुध्दा अनेकवेळा संजय कुलकर्णी यांच्याशी संवाद केला ते म्हणाले हा पर्यावरणा कडे विषय येत नाही. मोठमोठे धुलीकण हावेत येतात व हवा प्रदुषण होते त्याची सुध्दा जबाबदारी पर्यावरणाची नाही. पर्यावरणाची एनओसी घ्यायला पाहीजे. जैविक कमिटीला तुम्ही अधिकार दयावेत. नेमके त्यांचे अधिकार कोणते, यांचे अधिकार काय आहेत. ते पर्यावरणाशी संबंधित आहेत का. एक वर्षे झाले ती कमिटी स्थापन झालेली आहे. चांगल्या पध्दतीची ती कमिटी आहे. पर्यावरणाचे रक्षण करायचे असेलतर आपण त्याचे विश्वस्त आहोत. रक्षणकर्ते आहोत. म्हणून शासनाने विचारपुर्वक ही यंत्रणा स्थापन केलेली आहे. पर्यावरण संरक्षण करण्यासाठी आपण सुध्दा कारणीभूत ठरलेलो आहोत. संजय कुलकर्णी आज मोकार आहेत मोकार, सैराट आहेत सैराट. त्यामुळे आयुक्त साहेबांचे मी मनापासून अभिनंदन करतो. कचरा डेपो असे अनेक विषय आहेत, सगळे तुटून पडलेले आहेत कि केंव्हा पर्यावरणाचा विषय येतो. त्यांना सक्तीच्या रजेवर पाठविलेले आहे अत्यंत चांगला निर्णय तुम्ही घेतलेला आहे. कारण खरच आपल पर्यावरण इतक वाईट परिस्थितीमध्ये आपण चाललेलो आहोत. पर्यावरणाचा अहवाल म्हणजे अगदी,

बोगस आहे. मला एकच म्हणायच आहे की या कमिटीला अधिकार दया. परत एकदा वेगळया पध्दतीने प्रशासनाच्या वतीने हा विषय आणावा, चांगली चर्चा करु आणि चांगला निर्णय घेऊ.

**मा.राहूल जाधव -** मा.महापौर सहोब, मा.आयुक्त साहेब, सन्मा.सभागृह. आज हा विषय आपल्या समोर आहे. चिखली भागामध्ये सांडपाण्याचा विषय आहे. तो विषय खुप मोठया प्रमाणात दुषित पाण्या विषयी आहे. चिखली भागामध्ये इन्डस्ट्रीअल ऐरीया आणि भंगाराचा ऐरीया हा खुप मोठया प्रमाणात आहे. पर्यावरणाच्या विभागामार्फत आपण त्याठिकाणी ब-याचशा वेळा चिखली भागामध्ये सर्व्हे केलेला होता. ओढयानाल्यामध्ये जातो आणि ओढयानाल्या मधल सांडपाणी हे इंद्रायणी नदीमध्ये जातं. त्या पाण्याचे नमुने देखील आपण संजय कुलकर्णी साहेबांकडे चेक करण्यासाठी दिले होते. आज त्या पाण्यामध्ये संपुर्ण केमीकल असतं. त्या केमीकलमुळे पाणी दुषीत होत असतं दुषित पाण्यामुळे ब-याच गोष्टीना आपल्याला सामोर जाव लागतं. चिखली भागामध्ये ज्यावेळेला मागच्या दोन महीन्यात चार ते पाच वेळा आगी लागलेल्या होत्या त्यावेळेला आपण समिती नेमलेली होती. किती गोडाऊन अधिकृत आहेत आणि किती अनधिकृत आहेत किती जणांनी आपली परवानगी घेतलेली आहे. किती जणांनी आपल्या एनओसी घेतलेल्या आहेत त्यामध्ये असे सिध्द झालेले आहे महापालिकेनी केलेले गोदामाचे सर्वेक्षण त्याठिकाणी ९५ टक्के उदयोगधंदे हे अनधिकृत आहेत. त्याठिकाणी काही रसायनीक पिशव्या असतात, बॅरल आपल्या पाण्यामध्ये धुतले जातात त्यामुळे ते पाणी दुषीत होते. ते पाणी इतक दुषित होतं की इंद्रायणी नदीचे पाणी सुध्दा काळेकुट्ट झालेले असते. ड्रेनेज लाईनमध्ये सुध्दा गोडावून मधुन पाणी सोडले जाते व तेच पाणी दुषीत होत असते त्यामुळे त्याठिकाणी पर्यावरण विभागामार्फत या इन्डस्ट्रीअल भागामध्ये पुर्णपणे सखोल अशी चौकशी केली पाहीजे. जेणे करुन ते दुषीत पाणी इंद्रायणीमध्ये जाण्याचे थांबले पाहीजे. त्यासाठी ही नियमावली आजच्या विषयामध्ये आहे. यामध्ये हा विषय बसत नाही त्यामुळे त्या भागामध्ये सर्वेक्षण करुन योग्य उपाययोजना त्याठिकाणी करावी अशी विनंतीकरतो,धन्यवाद.

**मा.योगेश बहल** - मा.महापौर साहेब, मा.आयुक्त साहेब, सर्व सन्मा.सभागृह. सदरचा विषय आपण मंजूर करु या. या विषयाचे अधिकार आयुक्त साहेबांना देऊ यात. आयुक्त साहेबांनी याचे अध्यक्षपद घ्यावे. आणि या अधिका-यांमध्ये आपण ठाकूर साहेबांचा समावेश करावा. बिल्डींग परमिशनचे पठाण साहेबांचा समावेश असावा. डॉ.रॉय यांचा समावेश असावा. एमआयडीसीचे जे आरओ आहेत त्यांचा यात समावेश असावा. आपण पब्लिश तर करणारच आहोत. आणि महाराष्ट्र प्रदुषण नियंत्रण मंडळ (Maharashtra Pollution Control Board) चे जे अधिकारी आहेत. या लोकांची एक समिती आपल्या अध्यक्षतेखाली स्थापन करावी. त्यांचे पण इनपुट यात घ्यावे. त्यांचे इनपुट यात घेत असताना छोट्या-छोट्या प्लॉटचा पण यात विषय आहे. तर क्रेडाई नावाची संस्था आहे. ती बिल्डरच्या वतीने रिप्रेझेंट

करते. रॉय साहेबांना यात घ्यायचे कारण त्यांच्याकडे हॉस्पीटल्स, आरोग्यचे सगळे आहे. त्यामुळे या सर्व विभागप्रमुखांची एक समिती तुमच्या अध्यक्षतेखाली गठीत करावी. कारण हा शहराच्या संपूर्ण पर्यावरणाच्या अनुषंगाने खूप महत्वाचा विषय आहे. एमआयडीसीच्या अधिका-यांना देखील यात घ्यावे.

मी पुढिल प्रमाणे उपसूचना देतो- "मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मा.प्रशांत ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.पठाण-उपशहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी आणि एमआयडीसीचे आर.ओ. आणि क्रेडाई या संस्थेचा एक प्रतिनिधी व वास्तुविशारद संघटनेचे दोन प्रतिनिधी यांची याकामी समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात यावी."

**मा.संजय काटे -** मा.महापौर साहेब, उपसूचनेस मी अनुमोदन देतो.

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, उपसूचना स्विकारली आहे.

यानंतर उपसूचनेप्रमाणेचा दुरुस्त ठराव मतास टाकणेत आला असता-

ठराव क्रमांक - ९०३ विषय क्रमांक - १२

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ - १) मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/आकुर्डी/५०/२०१६ दि.२८/०४/२०१६

२) मा.महापालिका सभा ठ.क्र.८७४ दि.२०/६/२०१६

विषय - महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ १५४ सह कलम ३७ (१) अन्वये निदेश विकास नियंत्रण नियमावलीत, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर करणेबाबत तरतूद समाविष्ट करणेबाबत.

संदर्भ- १. महाराष्ट्र शासन नगरविकास विभाग आदेश क्र. टिपीएस-२४१३/नाशिक-१९/प्र.क्र.२४५/२०१३/नवि-९ दि.१५.०१.२०१६

उपरोक्त संदर्भिय आदेशान्वये शासनाने राज्यातील बृहन्मुंबई महानगरपालिका व नागपूर महानगरपालिका वगळता उर्वरित सर्व महानगरपालिकांना विकास नियंत्रणनियमावलीत, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर करणेबाबत तरतुद समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ सह कलम ३७ (१) अन्वये खालील प्रमाणे निदेश दिले आहेत.

**निदेश-**

राज्यातील, बृहन्मुंबई महानगरपालिका व नागपूर महानगरपालिका वगळता, उर्वरित सर्व महानगरपालिकांना, त्यांच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीत, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापरासंबंधीची, सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केल्यानुसारची तरतुद समाविष्ट करणेबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करून यथायोग्य प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करावा. सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून कलम १५४ च्या तरतुदी लागू होतील

सोबत संदर्भिय शासन आदेश व त्या सोबतच्या परिशिष्टाची छायाप्रत मा. महापालिका सभेच्या अवलोकनार्थ व निर्णयार्थ जोडली आहे. सदर आदेश सोबतच्या परिशिष्टात विषयांकित बाबत खालील प्रमाणे तरतूद नमूद आहे.

Regulations for Waste Water Treatment & Recycling :

**A. TYPES OF WASTE WATER**

1) **Black Water**: It means waste water from W.C. urinals and M.S.W.

2) **Grey Water:**It means waste water from bathrooms, sinks and wash areas

3) Apart from residential waste water, waste water generated from industrial, medical. commercial usage shall also be treated as per guidelines given by the Pollution Control Board.

**B. APPLICABILITY**

These regulations shall be applicable to all developments/ redevelopments, part developments on plots having an area of 4,000 sq. m. or more as well those mentioned under (C-2) to (C-6) shall have the provision for treatment, recycling and reuse of waste water. The applicant shall along with his application for obtaining necessary layout approval/building permission shall submit a plan showing the location of waste water treatment plant, furnishing details of calculations, references, implementation. etc. This plan shall accompany with the applicant's commitment to monitor the system periodically from the date of occupation of the respective building.

**C. REGULATIONS**

**(C-1) For Layout approval / building permission**

I. In case of residential layouts, area admeasuring 4000 sq. m. (1 acre) or more, in addition to the open space prescribed in the bye-laws, a separate space for waste water treatment & recycling plant should be earmarked in the layout.

II. The recycled water shall be used for gardening, car washing, toilet flushing, irrigation, etc and in no case for drinking, bathing, washing utensils, clothes, etc

III. On the layout plan, all chambers, plumbing lines which are a part of waste water treatment should be marked in different colour while submitting the

layout for approval to the concerned Municipal Corporation/ Council/ Approving authority.

IV. Only provision for basic civil work and required machinery will be proposed by the concerned Municipal Corporaion/Council. Other than this provision for additional machinery, pipes, tanks, landscape should be provided by owner developer at his own cost.

V. A clause must be included by the owner/developer in the purchase agreement that the purchaser, owner of the premises /organization or society of the purchasers shall ensure that.

a. The recycled water is tested every six months either in Municipal Laboratory or in the laboratory approved by Municipal Corporation or by State Government and the result of which shall be made accessible to the competent.

Authority/ EHO of the respective Ward Office.

b. Any recommendation from testing laboratory for any form of corrective measures that are needed to be adopted shall be compiled Copy of any suchrecommendation and necessary action taken shall also be sent by the testing laboratories to the Competent Authority / EHO of respective wards

(**C-2) Group Housing / Apartment Building**

I. In case of group housing if the built-up area is 2000 sq. m. or above or if consumption of water is 20,000 lit/day or more, or if a multi-storied building which has 50 tenements or more, then waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1) should be constructed.

**(C-3) Educational, Industrial, Commercial. Government, Semi-government organization hotels, lodging, etc.**

For all buildings in this category havinga build-up area of 1500 sq. m. or More and if water consumption is 20,000 lit/day or more, then provision for wastewater treatment and recycling plant as mentioned in (C-1) is mandatory.

**(C-4) Hospitals**

All hospitals having 40 or more beds must provide a waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1).

**(C-5) Vehicle Servicing Garages**

All vehicle servicing garages shall ensure that the waste water generated through washing of vehicles is treated and recycled back for the same use as mentioned in (C-1)

**(C-6) Other hazardous uses**

All other establishments / buildings where chances of waste water generated containing harmful chemicals, toxins are likely and where such water cannot be directly led into municipal sewers, the concerned competent authority may direct the owners, users of such establishments, buildings to treat their waste water as per the directions laid in (C-1)

**D. PENALTY**

i Any owner/developer/organization /society violating the provisions of these- bye-laws, shall be fined Rs. 2500 on the day of detection and if the violation continues, than shall be fined Rs.100 for every day as concrete action after written notice from the concerned competent authority.

ii. If the results of test as mentioned in (C-1 i. a. b.) are not satisfactory, then the concerned owner/developer/organization/society shall be charged a penalty of Rs. 300/- per day till the necessary preventive action is taken and disconnection of water connection also.

उपरोक्त शासन निदेशा नुसार पिंपरी चिंचवड महापालिकेच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर तरतुद समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास तदनंतर फेरबदलाची सूचना प्रसिध्द करून हरकती व सुचना मागविणे, संबंधितांना सुनावणी देऊन हरकत व सूचना अर्जावर अंतिम निर्णय घेऊन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्यास मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता

देणेत येत आहे. तसेच “मा.आयुक्त यांचे अध्यक्षतेखाली मा.प्रशांत ठाकूर-उपसंचालक नगररचना, मा.पठाण-उपशहर अभियंता, मा.डॉ.अनिल रॉय-आरोग्य वैद्यकीय अधिकारी, महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अधिकारी, एमआयडीसीचे आर.ओ. आणि क्रेडाई या संस्थेचा एक प्रतिनिधी व वास्तूविशारद संघटनेचे दोन प्रतिनिधी यांची याकामी समिती गठीत करण्यास मान्यता देण्यात येत आहे.”

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

-------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १३ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९०४ विषय क्रमांक - १३

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ : १) मा.महापालिका आयुक्त यांचेकडील जा.क्र.आरोग्य/२/कावि/३६९/२०१६ दि.०८/०७/२०१६

देशातील सर्व शहरां मधील नागरिकांना स्वच्छ पर्यावरण व चांगले आरोग्य मिळावे या करीता शहरांना स्वच्छतेची आणि या शहरातील व सर्व नागरिकांना शौचालयाची सुविधा उपलब्ध करून देण्याचे ध्येय गाठण्यासाठी केंद्रशासनाने स्वच्छ भारत अभियान संपूर्ण देशामध्ये राबविण्याची घोषणा दि.२/१०/२०१४ पासून केलेली आहे. महाराष्ट्र शासनाने देखील केंद्र शासनाच्या “ स्वच्छ भारत अभियान” च्या धर्तीवर राज्यामध्ये “ स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी)” राबविणेबाबत नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन, शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/ प्र.क्र.२३/नवि/३४, दि.१५/५/२०१५ अन्वये कळविणेत आलेले आहे. तसेच या अभियानाचे अनुषंगाने केंद्र व राज्य शासनाचे हिस्स्याची रक्कम (अनुदान) क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४ दि.१४/८/२०१५ अन्वये निर्गत करणेत आलेली आहे.

सदर अभियानाचे अनुषंगाने शहरातील ज्या कुटुंबाकडे स्वतःचे स्वतंत्र शौचालय नाही त्यांचेकरिता शौचालय उभारणेसाठी निधी उपलब्ध करून शहर हागंदारी मुक्त करणे (Open Defecation Free) हा या अभियानाचा मुळ उद्देश आहे. राष्ट्रीय जनगणना २०११ नुसार पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्षेत्रातील एकूण११,६८४ कुटुंबे अभियानांतर्गत वैयक्तीक शौचालय उभारणी करीता निधी उपलब्ध करणे आवश्यक आहे. नगर विकास विभाग मंत्रालय, मुंबई -३२ यांचे कडील प्राप्त पत्र क्र.स्वमअ-२०१५/प्र.क्र.४०/नवि-३४, नगर विकास विभाग दि.१७/८/२०१५अन्वये सदर अभियानाचे अनुषंगाने केंद्र शासन व राज्य शासन यांचेकडून खालील प्रमाणे अनुदान प्राप्त झाले आहे.

**स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) केंद्रशासन व राज्य शासन हिस्सा वाटप तक्ता**

| क्र | तपशील | केंद्र शासन अनुदान | राज्य शासन अनुदान |
|---|---|---|---|
| १ | वैयक्तिक घरगुती शौचालय | ८४,९६,०००/- | १,६९,८८,०००/- |
| २ | सामुदायिक शौचालय | ३४,६७,०००/- | ११,५६,०००/- |
| ३ | स्वच्छ महाराष्ट्रअभियानाचे ब्रँडिंग ( माहिती, शिक्षण व प्रसार आणि जन जागृती ) | ५,९०,०००/- | १,९७,०००/- |
| ४ | क्षमताबांधणी | १,५०,०००/- | ५०,०००/- |
| ५ | **एकूण** | **१,२७,०३,०००/-** | **१,८३,९१,००० /-** |
| | | **केंद्रशासन व राज्य शासन एकूण अनुदान** | **३,१०,९४,०००/-** |

वरील प्रमाणे प्राप्त अनुदान व मनपा हिस्सा यामधून प्रत्येक लाभार्थीस केंद्र शासनाचे र.रु ४०००/- , राज्य शासनाचे र.रु. ८०००/- व मनपा हिस्सा र.रु. ४०००/-याप्रमाणे वैयक्तिक घरगुती शौचालय बांधणेसाठी अनुदानाची रक्कम अदा करणेत येईल.

त्यानुसार सदर अभियान सुरु झालेपासून दिनांक ३०/४/२०१६ अखेर प्रपत्र "अ " प्रमाणे कामकाज झालेले आहे.शासन निर्णय क्र. स्वभाअ/२०१५/प्र.क्र.२४९/नवि-३४, दिनांक १९/११/२०१५ अन्वये "नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांमधील स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) च्या अंमलबजावणीचा आढावा घेण्याची बाब संबंधित नागरी स्थानिक स्वराज्य संस्थेच्या प्रत्येक महिन्याच्या सर्व साधारण सभेच्या विषय सूचीवर कायम स्वरूपी समावेश करून या विषयाचा सविस्तर आढावा सर्व साधारण सभेमध्ये घेण्यात यावा " असे कळविलेले आहे.

स्वच्छ महाराष्ट्र अभियान ( नागरी ) अंतर्गत महापालिकेने दिनांक ३०/६/२०१६ अखेर केलेल्या कार्यवाहीची माहिती खालील प्रमाणे

**प्रपत्र “अ”**

| **महानगरपालिकेचे नाव** | | **पिंपरी चिंचवड महानगरपालिका** | **शेरा** |
|---|---|---|---|
| जिल्हा | | पुणे | |
| वैयक्तिक शौचालय बांधकामासाठी अर्ज केलेल्या कुटुंबांची संख्या | | ५,१३७ | |
| केंद्र शासनाचे “स्वच्छ भारत अभियान”च्या संकेत स्थळावर अपलोड करणेत आलेल्या एकूण अर्जांची संख्या | | ४,६७६ | |
| मंजूर अर्जांची एकूण संख्या | | ३,४९४ | |
| बांधकाम सुरु झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | २,१२६ | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | वैयक्तिक घरगुती शौचालय | २,११४ | |
| बांधकाम सुरु झालेल्या | सामुदायिक | ३६१ सिटस | |

| | | | |
|---|---|---|---|
| शौचालयांची संख्या | शौचालय | | |
| बांधकाम पूर्ण झालेल्या शौचालयांची संख्या | सामुदायिक शौचालय | १२७ सिटस | |
| निर्गत करणेत आलेला पहिला हप्ता | ३,३६५ लाभार्थी | GOI+GOM= २०१.९ लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/- हिस्सा |
| | | ULB = ६७.३० लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **२६९.२ लाख** | |
| निर्गत करणेत आलेला दुसरा हप्ता | १,००७ लाभार्थी | GOI + GOM=६०.४२ लाख | GOI = २०००/- व GOM = ४०००/-हिस्सा |
| | | ULB = २०.१४ लाख | ULB = २०००/- हिस्सा |
| | **एकुण** | **८०.५६ लाख** | |

सबब, महापालिकेकडून राबविणेत येत असलेल्या स्वच्छ महाराष्ट्र अभियान (नागरी) अंमलबजावणीचा आढावा अवलोकन करणेत आला.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

------

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १४ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९०५ विषय क्रमांक - १४

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.नगरसचिव

**<u>मा.विधी समिती</u>**

अ) दि. ३/६/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

ब) दि.१७/६/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १५ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९०६ विषय क्रमांक - १५

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.नगरसचिव

**मा.महिला व बालकल्याण समिती**

दि.२५/५/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १६ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९०७ विषय क्रमांक - १६

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.नगरसचिव

**मा.शहर सुधारणा समिती**

दि.१९/५/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुमन नेटके -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १७ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९०८ विषय क्रमांक - १७

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.नगरसचिव

**मा.क्रिडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती**

दि.१८/५/२०१६, दि.२०/५/२०१६ व दि.१/६/२०१६ चा सभावृत्तांत कायम करणेत येत आहे.

**मा.अरुणा भालेकर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.सुजाता पालांडे -** मा.महापौर साहेब, विषय क्रमांक १८ वर मी पुढील प्रमाणे ठराव मांडते.

ठराव क्रमांक - ९०९ विषय क्रमांक - १८

दिनांक - २०.८.२०१६ विभाग- मा.आयुक्त

संदर्भ :-१) मा.हिरानंद उर्फ डब्बु आसवाणी, मा.रोहितअप्पा काटे यांचा प्रस्ताव-

२) मा.स्थायी समिती ठराव क्रमांक १६७११ दिनांक १२/०७/२०१६

३) मा.सभापती, स्थायी समिती यांचेकडील दि.१८/७/२०१६ चे पत्र.

मौजे पिंपरी येथे निर्वासितांची वसाहत सन १९४९ पासुन आस्तित्वात आहे. पिंपरी कॅम्प मधील बॅरॅक्स कमी क्षेत्राच्या अरुंद रुंदीच्या असून येथील बांधकामे दाट घनतेची आहेत. त्यामुळे बॅरॅक्स क्षेत्राचा विकास हा दाटवस्ती सदृश्य स्वरुपाचा आहे. पिंपरी चिंचवड शहराच्या जून्या हद्दीचे मंजूर विकास योजनेत पिंपरी येथील निर्वासितांची वसाहतीमधील बॅरॅक्स दाटवस्ती क्षेत्र म्हणून दर्शविलेल्या नाहीत. विकास नियंत्रण नियमावलीतील बिगर दाटवस्तीचे नियमानुसार बॅरॅक्स क्षेत्र विकसन करणे नियमाप्रमाणे शक्य होत नाही. पिंपरी चिंचवड शहराच्या मंजूर विकास योजनेत पिंपरी कॅम्पमधील बॅरॅक्स क्षेत्र दाटवस्ती म्हणून दर्शविल्यास दाटवस्तीचे नियमानुसार नागरिकांना बांधकाम परवानगी मिळू शकेल. सबब पिंपरी चिंचवड शहराच्या मंजूर विकास योजनेत पिंपरी कॅम्प मधील बॅरॅक्स क्षेत्र दाटवस्ती म्हणून दर्शविण्याकामी महाराष्ट्र प्रादेशिक व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करण्यास आणि फेरबदलाची सर्व वैधानिक कार्यवाही पुर्ण करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनास मंजुरीसाठी सादर करण्याकामी मा.आयुक्त, पिंपरी चिंचवड महानगरपालिका यांना प्राधिकृत करण्यास मान्यता देणेत येत आहे.

**मा.वैशाली काळभोर -** मा.महापौर साहेब, ठरावास अनुमोदन देते.

यानंतर सदर ठराव मतास टाकणेत आला असता-

अनुकूल- ८१ प्रतिकूल- ०

अशी मते पडली व सदर ठराव सर्वानुमते मान्य झाल्याचे मा.महापौर यांनी प्रकट केले.

--------

**मा.महापौर -** सर्वांचे आभार मानुन आजची सभा संपली असे जाहीर करणेत येत आहे.

(धराडे शकुंतला भाऊसाहेब)

**महापौर**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११०१८

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

नगरसचिव कार्यालय

क्रमांक - नस/९/कावि/४५२/१६

दिनांक - २५/११/२०१६



**नगरसचिव**

पिंपरी चिंचवड महानगरपालिका

पिंपरी - ४११ ०१८.

प्रत - सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

(विषय क्रमांक ११ चे लगत)

(मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/आकुर्डी/३८/२०१६ दि.११/०४/२०१६)

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम. १९६६**

ना विकास विभागात पेट्रोलपंप / गॅस फिलिंग स्टेशन अनुज्ञेय करणेबाबतची तरतूद विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करणेबाबत कलम-३७[१] अन्वये निदेश...

**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : १५ एप्रिल, २००६.

**महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६.**

क्र. : टिपीएस-३००५/९८७/प्र.क्र.१९४/२००५/नवि-३०:- ज्याअर्थी राज्यातील महानगरपालिकांच्या विकसित भागात पेट्रोलपंप / गॅस फिलिंग स्टेशन यांचा वापर अनुज्ञेय करणे धोकादायक होऊ शकते. वास्तव पेट्रोलपंप / गॅस फिलिंग स्टेशन यांचा वापर ना विकास विभागात अनुज्ञेय करणे योग्य होईल.

आणि ज्याअर्थी राज्यातील महानगरपालिकांच्या मंजूर विकास नियंत्रण नियमावलीत ना विकास विभागात पेट्रोलपंप / गॅस फिलिंग स्टेशन उभारण्याबाबतची तरतूद समाविष्ट नाही;

आणि ज्याअर्थी उपरोल्लिखित महानगरपालिकांच्या विकास नियंत्रण नियमावलीत, ना विकास विभागात पेट्रोलपंप / गॅस फिलिंग स्टेशन यांचा वापर अनुज्ञेय करणेबाबतची तरतूद समाविष्ट समाविष्ट करणे आवश्यक असल्याचे व याचा विचार करता संबंधित विकास नियंत्रण नियमावलीत, ना विकास विभागात पेट्रोलपंप / गॅस फिलिंग स्टेशन उभारण्याबाबतची तरतूद समाविष्ट करणेसाठी महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ [महाराष्ट्र अधिनियम ३७ या] [यापुढे "उक्त अधिनियम" असे उल्लेखिलेला] चे कलम ३७ अन्वये फेरबदलाचा प्रस्ताव [यापुढे "उक्त फेरबदल" असे उल्लेखिलेला] कार्यान्वित करणेबाबत राज्यातील सर्व महानगरपालिकांना निदेश देणे आवश्यक आहे असे शासनाचे मत झाले आहे.

त्यामुळे मला दिलेल्या आदेशानुसार राज्यातील सर्व महानगरपालिकांना उक्त अधिनियमाच्या कलम-३७[१] अन्वये खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

**निदेश**

"राज्यातील महानगरपालिकेच्या विकास योजनेतील ना विकास विभागात पेट्रोलपंप / गॅस फिलिंग स्टेशन खालील अटींवर अनुज्ञेय करण्याची तरतूद संबंधित महानगरपालिकेच्या विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे.

अट क्र. १) प्रस्तावित भुखंडाचे क्षेत्रफळ किमान २००० चौ.मी असावे.

२) या भूखंडावर कमाल ०.२ चटई क्षेत्र निर्देशांक अनुज्ञेय राहील.

३) या भूखंडावर फक्त तळमजल्याचे बांधकाम अनुज्ञेय राहील.

HCL/UD/UD/UD-३०/saturna

मा. उसंगर (नासंधा)   न.र.   सं. अ. ५.४.०६

४) प्रस्तावित भूखंड राष्ट्रीय महामार्ग, राज्य मार्ग व प्रमुख जिल्हा मार्ग व किमान १८.०० मीटर रुंद रस्त्यावर असावा.

५) केंद्र शासनाच्या पेट्रोलियम विभागाचे तसेच चीफ कंट्रोलर ऑफ एक्स्प्लोझिव्ह यांचे संमतीपत्र आवश्यक राहील.

६) प्रचलित नियमानुसार सार्वजनिक बांधकाम विभाग तसेच अन्य संबंधित विभागाकडील ना हरकत प्रमाणपत्र आवश्यक राहील. तसेच सेवा रस्ता / इमारत रेषा, नियंत्रण रेषा इत्यादी बाबतीत शासन निर्णय. सार्वजनिक बांधकाम विभाग क्र. आरबीडी-१०८१/८७१/ रस्ते-७, दिनांक ९ मार्च, २००१ व त्यानंतरची व संदर्भातील वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके बंधनकारक राहतील.

७) केंद्र शासनाच्या मिनिस्ट्री ऑफ रोड ट्रान्सपोर्ट ॲण्ड हायवेज कडील दिनांक २५ सप्टेंबर, २००३ दिनांक १७ ऑक्टोबर, २००३ चे पत्र व त्यासोबतच्या सहपत्रातील सूचनांचे पालन करणे आवश्यक राहील.

८) संबंधित महानगरपालिकेच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीतील पेट्रोलपंप / गॅस फिलिंग स्टेशन्सकरीताचे नियम लागू राहतील."

वरील निदेशानुसारच्या संपूर्ण तरतूदी ज्या महानगरपालिकांच्या संबंधित विकास नियंत्रण नियमावलीत समाविष्ट असतील त्या महानगरपालिका वगळता, राज्यातील सर्व महानगरपालिकांनी त्यांच्या संबंधित विकास नियंत्रण नियमावलीत वरील प्रमाणे बदल करण्यासाठी उक्त अधिनियमाच्या कलम-३७ च्या तरतूदींचे पालन करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनाच्या मान्यतेस्तव सादर करावा/ तसेच उक्त अधिनियमातील कलम-३७(१) मधील तरतूदीनूसार ६० दिवसांच्या विहीत कालावधीत तशी फेरबदलाची सूचना विहीत मार्गाने प्रसिद्ध करावी व तद्नंतर उक्त अधिनियमातील तरतूदींचे पालन करुन फेरबदलाचा प्रस्ताव शासनाकडे अंतिम मंजूरीसाठी सादर करावा."

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नांवाने,

{ सुधाकर नंगनुरे }
महाराष्ट्र शासनाचे उप सचिव

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी -
आयुक्त, सर्व महानगरपालिका
प्रत माहितीस्तव -
संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
सर्व उप संचालक नगररचना
सर्व सहायक संचालक नगररचना,
अवर सचिव (नवि-११/नवि-१३), कक्ष अधिकारी (नवि-९/नवि-१२) नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई
निवडनस्ती, कार्यासन नवि-३०.

HCLUDA\DAUD-३०/saturna

(विषय क्रमांक १२ चे लगत)

(मा.महापालिका आयुक्त यांचे जा.क्र.नरवि/कावि/१०/आकुर्डी/५०/२०१६ दि.२८/०४/२०१६)

प्रशासन विभाग
पोस्टाचे टपाल
दिनांक: 14 MAR 2016
आवक क्रं:- (290)
विभाग
लिपीक
मु. लिपीक
प्रशासन अधिकारी:-
सहा. आयुक्त प्रशासन:-
अति. आयुक्त:-
आयुक्त:-

290

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ सह कलम ३७ (१) अन्वये निदेश
विकास नियंत्रण नियमावलीत, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापर करणेबाबतची तरतूद समाविष्ट करणेबाबत..

महाराष्ट्र शासन
नगर विकास विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक,
मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
दिनांक: १५ फेब्रुवारी, २०१६

आदेश

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६

क्र. टिपीएस-२४१३/नाशिका-१९/प्र.क्र. २४५/२०१३/नवि-९: सध्या राज्यातील नागरी भागाचे रहिवास, वाणिज्य व औद्योगिक कारणास्तव वेगाने विकसन सुरु आहे. वाढती नागरी लोकसंख्या व पाण्याचे स्रोत यांचे प्रमाण व्यस्त आहे. नागरी भागात मोठ्या प्रमाणावर सांडपाणी तयार होते. या सांडपाण्यात रासायनिक व विषारी घटकांचा समावेश असण्याची शक्यता असते. सबब असे सांडपाणी प्रक्रिया न होता शहरातील मलनि:सारण वाहिन्यांमध्ये सोडणे योग्य नाही. यामुळे आरोग्याचा प्रश्न निर्माण होऊ शकतो. तसेच सदर सांडपाण्यावर प्रक्रिया झाल्यास काही कारणास्तव सदर पाण्याचा पुनर्वापर होऊ शकतो. यास्तव शासनाने, बृहन्मुंबई महानगरपालिका व नागपूर महानगरपालिका वगळता उर्वरित महानगरपालिकांसाठीच्या विकास नियंत्रण नियमावलीत याबाबतची तरतूद समाविष्ट करणेसाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ सह कलम ३७ (१) अन्वये निदेश देण्याची बाब शासनाच्या विचाराधिन होती. त्याअनुषंगाने राज्यातील, बृहन्मुंबई महानगरपालिका व नागपूर महानगरपालिका वगळता उर्वरित महानगरपालिकासाठीच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीत योग्य ती तरतूद समाविष्ट करणेसाठी, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम १५४ सह कलम ३७ (१) अन्वये कार्यवाही करुन यथायोग्य प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करणेसाठी, संबंधित महानगरपालिकांना खालीलप्रमाणे निदेश देण्यात येत आहेत.

निदेश

राज्यातील, बृहन्मुंबई महानगरपालिका व नागपूर महानगरपालिका वगळता, उर्वरित सर्व महानगरपालिकांना, त्यांच्या प्रचलित विकास नियंत्रण नियमावलीत, सांडपाणी प्रक्रिया व पुनर्वापरासंबंधीची, सोबत जोडलेल्या परिशिष्टात नमूद केल्यानुसारची तरतूद समाविष्ट करणेबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगररचना अधिनियम, १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये सर्व वैधानिक कार्यवाही पूर्ण करुन यथायोग्य प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करावा. सदर आदेश निर्गमित झाल्याच्या दिनांकापासून कलम १५४ च्या तरतूदी लागू होतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या नावाने व आदेशानुसार,

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32
सत्यमेव जयते

(रा. शा. चव्हाण)
कक्ष अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत आवश्यक कार्यवाहीसाठी -

आयुक्त, महानगरपालिका ( पुणे / ठाणे / नवी मुंबई / नाशिक / कल्याण डोंबिवली / उल्हासनगर / पिंपरी चिंचवड / मिरा भाईंदर /भिवंडी निझामपूर शहर /वसई विरार/ कोल्हापूर / सोलापूर / जळगांव शहर / मालेगांव / सांगली मिरज कुपवाड शहर /चंद्रपूर /लातूर /नांदेड वाघाळा शहर /धुळे /अहमदनगर /औरंगाबाद /अमरावती /परभणी / अकोला)

प्रत माहितीस्तव -

१) संचालक नगररचना, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२) विभागीय सह संचालक नगररचना, (कोकण / पुणे / नागपूर / नाशिक / औरंगाबाद / अमरावती)
३) सर्व सहायक संचालक नगररचना (शाखा)
४) सर्व नगर रचनाकार (शाखा)

T.P.

देसाई

## परिशिष्ट "अ"
## विकास नियंत्रण नियमावली नियम क्र.३८

**Regulations for Waste Water Treatment & Recycling :**

**D. TYPES OF WASTE WATER**

1) **Black Water**: It means waste water from W.C. urinals and M.S.W.
2) **Grey Water**: It means waste water from bathrooms, sinks and wash areas
3) Apart from residential waste water. Waste water generated from industrial, medical. commercial usage shall also be treated as per guidelines given by the Pollution Control Board.

**B. APPLICABILITY**

These regulations shall be applicable to all developments/ redevelopments, part developments on plots having an area of 4,000 sq. m. or more as well those mentioned under (C-2) to (C-6) shall have the provision for treatment, recycling and reuse of waste water. The applicant shall along with his application for obtaining necessary layout approval/building permission shall submit a plan showing the location of waste water treatment plant, furnishing details of calculations, references, implementation, etc. This plan shall accompany with the applicant's commitment to monitor the system periodically from the date of occupation of the respective building.

**C. REGULATIONS**

(C-1) For layout approval/building permission

I. In case of residential layouts, area admeasuring 4000 sq. m. (1 acre) or more, in addition to the open space prescribed in the bye-laws, a separate space for waste water treatment & recycling plant should be earmarked in the layout.

II. The recycled water shall be used for gardening, car washing, toilet flushing, irrigation, etc and in no case for drinking, bathing, washing utensils, clothes, etc

III. On the layout plan, all chambers, plumbing lines which are a part of waste water treatment should be marked an different colour while submitting the layout for approval to the concerned Municipal Corporation/ Council/ Approving authority.

IV. Only provision for basic civil work and required machinery will be proposed by the concerned Municipal Corporation/Council. Other than this provision for additional machinery, pipes, tanks, landscape should be provided by owner/developer at his own cost.

V. A clause must be included by the owner/developer in the purchase agreement that the purchaser, owner of the premises /organization or society of the purchasers shall ensure that.

a. The recycled water is tested every six months either in Municipal Laboratory or in the laboratory approved by Municipal Corporation or by State Government and the result of which shall be made accessible to the competent Authority /EHO of the respective Ward Office.

b. Any recommendation from testing laboratory for any form of corrective measures that are needed to be adopted shall be compiled, Copy of any such

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32

recommendation and necessary action taken shall also be sent by the testing laboratories to the Competent Authority/EHO of respective wards

(C-2) Group Housing/Apartment Building

i In case of group housing if the built-up area is 2000 sq. m. or above or if consumption of water is 20,000 lit/day or more, or if a multi-storied building which has 50 tenements or more, then waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1) should be constructed

(C-3) Educational, Industrial, Commercial, Government, Semi-government organization, hotels, lodging, etc.

i For all buildings in this category having a build-up area of 1500 sq. m. or more and if water consumption is 20,000 lit/day or more, then provision for waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1) is mandatory.

(C-4) Hospitals

i All hospitals having 40 or more beds, must provide a waste water treatment and recycling plant as mentioned in (C-1)

(C-5) Vehicle Servicing Garages

i All vehicle servicing garages shall ensure that the waste water generated through washing of vehicles is treated and recycled back for the same use as mentioned in (C-1)

(C-6) Other hazardous uses

i All other establishments/buildings where chances of waste water generated containing harmful chemicals, toxins are likely and where such water cannot be directly led into municipal sewers, the concerned competent authority may direct the owners, users of such establishments, buildings to treat their waste water as per the directions laid in (C-1)

D. PENALTY

i Any owner/developer/organization /society violating the provisions of these bye-laws, shall be fined Rs. 2500/- on the day of detection and if the violation continues, than shall be fined Rs.100 for every day as concrete action after written notice from the concerned competent authority.

ii. If the results of test as mentioned in (C-1 v. a. b.) are not satisfactory, then the concerned owner/developer/organization/society shall be charged a penalty of Rs. 300/- per day till the necessary preventive action is taken and disconnection of water connection also.

URBAN DEVELOPMENT DEPTT. MANTRALAYA, MUMBAI-32 सत्यमेव जयते

(R.S.Chahan)
Section Officer to Government.